क्रांती प्रीतीची

जॉयस मेयर

क्रांती प्रीतीची

क्रांती प्रीतीची

जॉयस मेयर

JOYCE MEYER
MINISTRIES
Nanakramguda, Hyderabad - 500 008

Unless otherwise indicated, Scriptures are taken from the Amplified® Bible.
Copyright © 1954, 1962, 1965, 1987 by the Lockman Foundation.
Used by permission.

Scriptures noted KJV are taken from the King James Version of the Bible.

Scriptures noted The Message are taken from The Message.
Copyright © 1993, 1994, 1995, 1996, 2000, 2001, 2002. Used by permission of NavPress Publishing Group.

Scriptures noted NIV are taken from the HOLY BIBLE:
NEW INTERNATIONAL VERSION®. Copyright © 1973, 1978, 1984 by International Bible Society. Used by permission of Zondervan Publishing House. All rights reserved.

Scriptures noted NKJV are taken from the NEW KING JAMES VERSION.
Copyright © 1979, 1980, 1982, Thomas Nelson, Inc., Publishers.

Copyright © 2009 by Joyce Meyer Ministries - Asia

All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed, or transmitted in any form or by any means, or stored in a database or retrieval system, without the prior written permission of Joyce Meyer Ministries - Asia.

Joyce Meyer Ministries - Asia
Nanakramguda,
Hyderabad - 500 008

Phone: +91-40-2300 6777
Website: www.jmmindia.org

The LOVE REVOLUTION - Marathi
First Print - September 2009

Printed in India at:
Caxton Offset Pvt. Ltd.
Hyderabad - 500 004

अनुक्रमणिका

	प्रस्तावना	vii
1.	जगाचे बिघडले तरी काय?	1
2.	समस्येचे मूळ	20
3.	कोणतीही चांगली गोष्ट योगायोगाने घडत नाही	32
4.	देवाकडून हस्तक्षेप	49
5.	प्रीती मार्ग शोधते	60
6.	चांगल्याने वाइटावर विजयी व्हा	70
7.	अन्यायग्रस्तांना न्याय	84
8.	प्रीती सामावून घेणारी आहे	106
9.	आपण मोलवान आहोत असे लोकांना वाटू द्या	123
10.	दयाळूपणाची आक्रमक कृत्ये	142
11.	लोकांना कशाची गरज आहे ते शोधा आणि त्याच्या उत्तराचा भाग व्हा	153
12.	विनाअट प्रीती	162
13.	प्रीती वाइटाची नोंद ठेवत नाही	170

14. प्रीती व्यक्त करण्याचे व्यावहारिक मार्ग 178

15. आपल्याला संजीवनाची गरज आहे, की क्रांतीची? 198

"क्रांती प्रीतीचे" नामवंत पाहुणे लेखक

डार्लीन झेक 12

मार्टिन स्मिथ 99

पास्टर पॉल स्कॅनलॉन 116

जॉन सी. मॅक्सवेल 133

पास्टर टॉमी बार्नेट 190

प्रस्तावना

क्रांती. लोकांच्या मनात आशा जागवणारा, त्यांच्या भावनांना हात घालणारा आणि निष्ठेची प्रेरणा देणारा असा दुसरा शब्द मानवी शब्दकोशात नाही. शतकानुशतके या शब्दाने लोकांच्या पेटत्या मनावर तेल ओतले आहे, आणि भित्र्यांना धैर्य दिले आहे. क्रांत्यांनी लोकांना उदात्त, मोठी ध्येये शोधण्यास चालना दिली आहे, आणि ज्यांच्यासमोर काही उद्दीष्ट नव्हते, अशा स्त्रीपुरुषांना असे ध्येय किंवा कारण दिले आहे की, ज्यासाठी ते मरण पत्करतील. क्रांत्यांमुळे महान पुढारी उदयास आणि महान अनुयायी उदयास आले आहेत, त्यांनी अक्षरशः जग बदलले आहे.

क्रांती म्हणजे नेहमी घडणाऱ्या गोष्टींमध्ये झपाट्याने, आमूलाग्र बदल घडणे. आतापर्यंत जगत आले तसे जगायला तयार नसलेल्या एखाद्या व्यक्तीद्वारे किंवा छोट्याशा गटाद्वारे नेहमी क्रांतीची सुरुवात होत असते. काहीतरी बदलू शकते आणि बदललेच पाहिजे असा त्यांचा विश्वास असतो. आपले विचार, आपल्या कल्पना लोकांच्या पचनी पडेपर्यंत ते प्रयत्न करीत राहतात आणि शेवटी क्रांतीकारी पद्धतीने परिस्थितीत बदल घडवून आणतात.

जगाने निरनिराळ्या क्रांत्यांचा अनुभव घेतला आहे. लोकांचा गैरफायदा घेणारी, त्यांच्यावर जुलूम करणारी सरकारे उलथून पडली आहेत. अमेरिकन क्रांती, फ्रेंच क्रांती आणि रशियन क्रांती (हिलाच बोल्शेविक क्रांती असेही म्हटले जाते.) यांमध्ये हेच घडले. जुन्या, कालबाह्य, प्रभावहीन पद्धती जाऊन त्यांच्या जागी नवीन विचारसरणी आल्यावर देखील क्रांती घडते. उदा. औद्योगिक क्रांती किंवा विज्ञानातील क्रांती. थॉमस जेफरसन यांनी म्हटले, ''प्रत्येक पिढीला नवीन क्रांतीची गरज असते.'' आणि आता जगाला सर्वांत मोठ्या क्रांतीची गरज आहे असा माझा विश्वास आहे. जगात आजपर्यंत झालेल्या क्रांत्यांसारखी क्रांती आपल्याला आता नको. राजकारण, अर्थकारण, किंवा

तंत्रज्ञान यांवर आधारित क्रांतीची आपल्याला गरज नाही. आपल्याला प्रीतीच्या क्रांतीची गरज आहे.

आपल्या जीवनातील स्वार्थी जीवनशैली आपण उलथून टाकण्याची गरज आहे. आपण प्रत्येकजण जोपर्यंत बदलण्यास तयार नाही, तोपर्यंत जगात काहीही बदलणार नाही. आपले वैयक्तिक जीवन आणि आपले रोजचे निर्णय यांमुळे आज जगाची ही स्थिती झाली आहे हे लक्षात न घेता आपण जगात बदल होण्याची अपेक्षा करतो.

प्रीती कशी घ्यावी आणि कशी करावी हे जर पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीला समजले तर आपले जग अतिशय वेगळे होईल. समाजाचे काहीतरी चुकते आहे, आणि त्यात बदल होण्याची गरज आहे याची आपणा सर्वांना जाणीव आहे असे मला वाटते, पण काय करावे किंवा बदल कसा घडवून आणावा हे कोणालाही माहीत नाही असे वाटते. नियंत्रणाबाहेर गेलेल्या जगाविषयी केवळ कुरकूर आणि तक्रारी करणे आणि कोणीतरी काहीतरी करावे असा विचार करणे एवढीच आपली प्रतिक्रिया असते. देवाने किंवा सरकारने किंवा अधिकारावर असलेल्या कोणातरी व्यक्तीने कृती करावी असे आपल्याला वाटते. पण वस्तुस्थिती ही आहे की, आपण प्रत्येकाने काहीतरी करण्याची गरज आहे. आतापर्यंत आपण जसा दृष्टीकोन ठेवून जगलो त्यापेक्षा अतिशय निराळ्या पद्धतीने जीवन जगायला आपण शिकले पाहिजे. आपण शिकायला, बदलायला आणि आपणदेखील समस्येचे एक कारण आहोत हे मान्य करायला तयार असले पाहिजे.

जे आपल्याला समजत नाही, ज्याचे आपल्याला ज्ञान नाही ते आपण दुरुस्त करू शकत नाही. म्हणून समस्येचे मूळ काय आहे हे आपण प्रथम समजून घेतले पाहिजे. बहुतांश लोक दुःखी का आहेत? कुटुंबे, शेजारपाजार, शहरे आणि राष्ट्रांमध्ये एवढा हिंसाचार का आहे? लोक इतके रागावलेले का आहेत? 'पापामुळे' असा विचार तुम्ही कदाचित करत असाल. तुम्ही म्हणाल, "लोक पापी आहेत, हीच मूळ समस्या आहे." तुमचे म्हणणे मला मान्य आहे, पण या प्रश्नाचा विचार मला व्यावहारिक दृष्टीकोनातून करायचा आहे. स्वार्थीपणा हे या सर्व समस्यांचे मूळ आहे असे माझे ठाम मत आहे. स्वार्थीपणा अर्थातच पापातून उद्‌भवतो. "मला जे हवे ते मी मिळवणारच. त्यासाठी काहीही करावे लागले तरी ते मी करीन," हे स्वार्थीपणाचे म्हणणे असते. देव आणि त्याचे मार्ग यांच्याविरुद्ध जेव्हा एखादी व्यक्ती जाते तेव्हा पापाचे अस्तित्व जाणवते.

ज्या प्रकारे आपण जगले पाहिजे नेमके त्याच्या उलट जगण्याची आपली प्रवृत्ती असते. आपण स्वतःसाठी जगतो, आणि तरीही आपले समाधान कधी होत नाही. आपण दुसऱ्यांसाठी जगले पाहिजे आणि आपण इतरांना जे देतो त्याच्या अनेकपट

आपल्याला मिळते हे रहस्य आपण शिकले पाहिजे. प्रसिद्ध डॉक्टर लूक यांचे शब्द मला फार आवडतात, ''द्या म्हणजे तुम्हांला दिले जाईल; चांगले माप दाबून, हलवून व शीग भरून तुमच्या पदरी घालतील; कारण ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला परत मापून देण्यात येईल'' (लूक.६:३८).

पुष्कळ समाजांमध्ये धनसंपत्ती, मालमत्ता असणे, नियंत्रण ठेवणे हेच आजकाल प्रमुख उद्दीष्ट झाले आहे. प्रत्येकाला आपण ''नंबर एक'' असावे असे वाटते, आणि कोणत्याही प्रसंगी केवळ एकच व्यक्ती पहिल्या क्रमांकावर असू शकते. त्यामुळे साहजिकच पुष्कळजण निराश होतात. जगात केवळ एकच सर्वोच्च, प्रथम क्रमांकाचा नेता, कंपनीचा एकच अध्यक्ष, एकच अभिनेता किंवा अभिनेत्री पहिल्या क्रमांकावर असू शकते. जगात केवळ एकच उत्कृष्ट लेखक किंवा चित्रकार असू शकतो. आपण सर्वांनी ध्येय समोर ठेवून ते साध्य करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा हे मला मान्य आहे, पण सर्व काही स्वतःसाठी मिळवायचे, करायचे आणि दुसऱ्यांची अजिबात फिकीर करायची नाही यावर माझा विश्वास नाही.

पासष्ट वर्षे जगल्यावर मी हे पुस्तक लिहित आहे, यावरून बऱ्याचशा गोष्टी मला माहीत आहेत, किंवा त्या समजण्यास मी पात्र आहे असे मला वाटते. निदान सुख कशामुळे मिळते, आनंद कशामुळे होतो आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात हे समजण्याइतपत दीर्घ आयुष्य मी जगले आहे. जीवन असे असायला हवे तसे असण्यास स्वार्थीपणाची निश्चितच मदत होत नाही, आणि स्वार्थीपणा ही माणसासाठी देवाची इच्छा नाही हे स्पष्ट आहे. आज जगभरात स्वार्थीपणा हीच मोठी समस्या आहे, आणि ती हटवण्यासाठी आक्रमकपणे चळवळ राबवणे हेच त्यावरचे उत्तर आहे हे मी या पुस्तकात सिद्ध करू शकेन असा माझा विश्वास आहे. आपल्या स्वार्थीपणाविरुद्ध आपण लढाई पुकारली पाहिजे. आपल्याला प्रीतीच्या क्रांतीची गरज आहे.

प्रीती ही फक्त एखादा शब्द किंवा तत्त्वज्ञान असू नये, तर ती कृतीत असली पाहिजे. ती दिसली आणि जाणवली पाहिजे. देव प्रीती आहे! प्रीती ही नेहमीच त्याची कल्पना आहे. तो आपल्यावर प्रीती करण्यासाठी, त्याच्यावर प्रीती कशी करावी हे आपल्याला शिकवण्यास, आणि आपणा स्वतःवर व इतरांवर कशी प्रीती करावी हे शिकवण्यासाठी आला.

आपण असे करतो तेव्हा जीवन सुंदर बनते; आणि असे करीत नाही तेव्हा एकही गोष्ट बरोबर घडत नाही. प्रीती हे स्वार्थीपणावरचे उत्तर आहे, कारण प्रीती देते, तर स्वार्थीपणा फक्त घेतो. आपल्या 'स्व'पासून आपली सुटका झाली पाहिजे. याच हेतूने

येशू आला हे आपल्याला २ करिंथ.५:१५ मध्ये पाहायला मिळते, ''आणि तो सर्वांसाठी ह्याकरता मेला की, जे जगतात त्यांनी पुढे स्वत:करता नव्हे तर त्यांच्यासाठी जो मेला व पुन्हा उठला त्याच्याकरता जगावे.''

जगासमोर असणाऱ्या लक्षावधी मुलांची उपासमार, एड्स, लढाया, छळ, देहविक्रीच्या व्यवसायासाठी होणारा मुलामुलींचा, स्त्रियांचा व्यापार; रक्ताच्या नात्यातील अनैतिक संबंध इ.सारख्या भयंकर समस्यांवियी अलीकडे मी विचार करीत असताना देवाला विचारले, ''देवा, जगात हे सर्व चालू असताना तू काही न करता कसे पाहू शकतोस?'' तेव्हा देवाची वाणी मी माझ्या आत्म्यात ऐकली, ''मी लोकांच्या द्वारे कार्य करतो. माझ्या लोकांनी उठून याविषयी काहीतरी करण्याची मी वाट पाहत आहे.''

इतर लाखो लोकांप्रमाणे तुम्हीही विचार करीत असाल की, *जगात असंख्य समस्या आहेत हे मला माहीत आहे, पण त्या इतक्या प्रचंड आहेत की माझ्या एकट्याच्या प्रयत्नाने असा काय फरक पडणार आहे?* याच विचारसरणीमुळे आपण गलितगात्र झालो आहोत, आणि दुष्टपणा मात्र विजयी होत आहे. आपण काय करू शकत नाही याविषयी विचार करणे थांबवून आपण जे करू शकतो ते करायची सुरुवात केली पाहिजे. या पुस्तकात मी आणि माझ्या विनंतीविरून इतर प्रथितयश लेखकांनी काही नवीन कल्पना आणि मार्ग सांगितले आहेत. क्रांतीकारक आणि सकारात्मक बदल घडवील अशा नवीन चळवळी सहभागी होण्यासाठी या कल्पना तुम्हांला मदत करतील.

जगाची अधोगती होत असताना निष्क्रीय राहण्यास माझा ठाम नकार आहे. सर्वच समस्या मला सोडवता येणार नाहीत, पण मला जमेल तेवढे मी करीन. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यास तुम्ही मला साथ द्यावी आणि जीवनाकडे बघण्याच्या तुमच्या दृष्टीकोनात आमूलाग्र बदल घडवण्यास तयार व्हावे अशी माझी प्रार्थना आहे. येथून पुढे जीवन म्हणजे दुसरे लोक आपल्यासाठी काय करतात ते नव्हे, तर आपण दुसऱ्यांसाठी काय करू शकतो ते आहे.

प्रत्येक चळवळीला एक ध्येय किंवा जाहीरनामा असावा लागतो. जॉयस मेयर मिनिस्ट्रीजमध्ये असणाऱ्या आम्ही प्रार्थनापूर्वक एक करार केला आहे. त्याच्याशी आम्ही समर्पित आहोत. तुम्हीही यात सहभागी व्हाल का?

मी सबबी सांगणे सोडून देऊन **अनुकंपित होतो.**
अन्यायाविरुद्ध **उभे राहतो.**
देवाच्या प्रीतीने युक्त होऊन वागण्यास **कटिबद्ध होतो.**
काहीही न करण्यास **मी नकार देतो.** हा माझा निश्चय आहे.
मी प्रीतीची क्रांती आहे.

हे शब्द तुमचादेखील जाहीरनामा व्हावेत ही माझी प्रार्थना आहे. दुसऱ्या कोणी काही करण्याची तुम्ही वाट पाहू नये, आणि ही चळवळ लोकप्रिय होईपर्यंत तुम्ही थांबू नये. हा निर्णय केवळ तुम्हीच घ्यायचा आहे. या समर्पणाची निवड तुम्हीच करायची आहे. स्वतःला विचारा : "मी समस्येचा एक भाग बनून राहणार का, समस्येचे उत्तर होणार आहे?" मी स्वतः उत्तराचा भाग होण्याचा निर्णय घेतला आहे. प्रीती हा माझ्या जीवनाचा गाभा असेल.

स्वतःला विचारा : "मी समस्येचा एक भाग बनून राहणार का, समस्येचे उत्तर होणार आहे?" मी स्वतः उत्तराचा भाग होण्याचा निर्णय घेतला आहे. प्रीती हा माझ्या जीवनाचा गाभा असेल.

तुमच्याविषयी काय? आज जगासमोर असणाऱ्या समस्या तुम्ही तशाच चालू ठेवणार आहात का? त्या अस्तित्वातच नाहीत असे समजून त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणार आहात, की प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होणार आहात?

क्रांती प्रीतीची

प्रकरण

1

जगाचे बिघडले तरी काय?

मी एकटाच आहे, फक्त एकटाच आहे, मी काहीही करू शकत नाही, पण मी काहीतरी करू शकतो आणि मी सर्वच करू शकत नसल्यामुळे, जे मला करता येते ते करण्यास मी नकार देणार नाही.

एडवर्ड एव्हरेट हेल

सकाळी माझ्या खिडकीतून बाहेरचे सुंदर दृश्य पाहत मी कॉफी पीत असते, तेव्हा जगातले ९६ कोटी ३० लाख लोक उपाशी असतात.

शंभर कोटीपेक्षा जास्त लोक दर दिवशी केवळ ४०-४५ रुपये कमवतात.

गरीबीमुळे आज तीस हजार मुले मरण पावतील. जगाला ज्यांची जाणीवही नाही अशा अतिशय दरिद्री खेड्यापाड्यांत ती मरण पावतात. याचा अर्थ असा की, दर आठवड्याला २,१०,००० - दर वर्षी १ कोटी १० लाख लोक मरण पावतात, आणि त्यामध्ये ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांची संख्या जास्त असते.

जगातील २ अब्ज २० कोटी मुलांपैकी ६४ कोटी मुलांना पुरेसा निवारा नाही, ४० कोटी मुलांना प्यायला स्वच्छ, शुद्ध पाणी मिळत नाही, आणि २७ कोटी मुले वैद्यकीय सेवांपासून वंचित आहेत.

ही आकडेवारी पाहून माझ्याप्रमाणेच तुम्हीही हादरला आहात का? मला तशी आशा आहे! ज्या जगात आपण जगत आहोत, त्याची भयानक स्थिती हे आकडे सांगतात. या गोष्टी आपल्या पृथ्वीवर आणि आपल्यासमोर घडत आहेत. आताच तुम्ही वाचलेली आकडेवारी कदाचित तुमच्या शहराला किंवा देशाला लागू पडत नसेल, पण आज आपण सर्वजण जगाचे नागरीक आहोत. आपण जागतिक समुदायाचा भाग आणि ज्यांची आपण कल्पनाही करू शकत नाही अशी दुःखे सहन करणाऱ्या कुटुंबांचा घटक आहोत.

सर्व जगाने जागे होण्याची ही घंटा आहे असे मला वाटते. आपले अज्ञान, आपला ढिसाळपणा, असंवेदनशीलता यांपासून हा घंटानाद आपल्याला जागे करील आणि दुःखे, दारिद्र्य, नुकसान आणि कमतरता, अन्याय आणि छळ, आणि मनुष्याला राहण्यास योग्य नाहीत अशा परिस्थितीविरुद्ध आवाज उठवण्यास आपल्याला चालना देईल. खरोखर ही प्रीतीच्या क्रांतीची वेळ आहे.

एक लहानसे तोंड, सहा ठणकणारे दात

कंबोडिया येथे जॉयस मेयर मिनिस्ट्रीजतर्फे झालेल्या वैद्यकीय कॅम्पमध्ये एक दातांचे डॉक्टर सहभागी झाले होते. त्यांनी एका लहान मुलीचे एकवीस दात काढले. त्यांपैकी सहा दातांमध्ये पू झाला होता. आम्ही ऑस्ट्रेलियाला जात असताना माझ्या पतीला दातदुखीचा खूप त्रास झाला त्याची यावरून मला आठवण झाली. त्यांना फार वेदना होत होत्या. आम्ही विमानात बसलो होतो, त्यामुळे पुरेसा उपचार मिळणे शक्य नव्हते. रात्री दहा वाजता आम्ही विमानतळावर उतरल्याबरोबर, कोणीतरी त्यांना दातांच्या डॉक्टरकडे घेऊन गेले, आणि त्यांना आराम पडला. पण या लहान मुलीप्रमाणे जी हजारो मुले वैद्यकीय उपचाराअभावी वेदना सोसत आहेत त्यांचे काय? याविषयी जरा विचार करा. एकवीस दात किडणे आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या भयानक वेदना कशा असतील याचा तुम्ही विचार करू शकता का?

अशा प्रकारचे दुःखसहन अस्तित्वात आहे; जगाच्या दुर्गम भागात अशा घटना सर्रास घडत आहेत. आपल्यापैकी पुष्कळजणांना त्यांची खबरबातही नसते किंवा टीव्हीवर पाहून जेवढी कल्पना येईल तेवढेच. आपण म्हणतो, "किती लज्जास्पद बाब. यासाठी कोणीतरी काहीतरी केले पाहिजे," आणि मग आपण नेहमीप्रमाणे कॉफी पिणे आणि बाहेरच्या सुंदर दृश्याचा आनंद घेणे चालू ठेवतो.

जेथे कचरा हाच खजिना आहे

कंबोडीयातील गिची नावाची एक दहा वर्षांची मुलगी जेथे कचरा टाकतात तेथे राहते. चार वर्षांची असल्यापासून ती तेथे राहत आहे. तिचे आईवडील तिचे पालनपोषण करू शकत नव्हते, म्हणून त्यांनी तिला व तिच्या थोरल्या बहिणीला घराबाहेर काढले. केवळ कचराकुंडीत राहून आणि काम करूनच त्या जगू शकत होत्या. आठवड्याचे सात दिवस गिची हाताने किंवा छोट्याशा लोखंडी तुकड्याने कचरा खणत असते आणि खायला काही मिळते का ते पाहते, किंवा विकून पैसे मिळण्यागे काही सामान मिळते का ते शोधत असते. या कचऱ्यात ती सहा वर्षे राहत आहे, आणि तिच्यापेक्षाही जास्त वर्षांपासून तेथे राहणारी इतर मुले आहेत.

हा शहराचा कचरा डेपो आहे हे तुम्ही समजून घेणे आवश्यक आहे. संपूर्ण शहरातून गोळा केलेला कचरा, लोकांनी टाकून दिलेल्या वस्तू तेथे रात्रभर ट्क्समधून आणला जातो. मुले रात्री अंधारात काम करतात. बॅटरी किंवा लाईट असलेली हेल्मेट्स घालून मुले काम करतात, कारण कचरा प्रथम येतो तेव्हाच त्यात चांगल्या गोष्टी (कचरा) मिळतो.

या कचराडेपोला मी भेट दिल्यानंतर "ते पाहून तुम्हांला कसे वाटले?" असा प्रश्न एका मुलाखतकाराने मला विचारला. माझ्या विचारांची जुळवाजुळव करीत असताना माझ्या लक्षात आले की, परिस्थिती इतकी भीषण आहे की त्याविषीय काय आणि कसा विचार करावा हेच मला समजेना. माझ्या मनात आलेले विचार मला शब्दांत मांडता येत नाहीत, पण त्याविषयी काहीतरी करण्याचा मी निश्चय केला.

लोकांना याविषयी सांगून त्यांचे मन तयार करण्यासाठी, तसेच आमच्या सेवाकार्याच्या आश्रयदात्यांकडून आणि डेव्ह व माझ्या वैयक्तिक देणगीद्वारे निधी उभा करण्यास आम्हांला सुमारे एक वर्ष लागले. पण आम्ही दोन मोठ्या बसेस घेऊन त्यांचे फिरत्या रेस्टॉरन्टमध्ये रुपांतर करू शकलो. या बसेस कचराडेपोजवळ जाऊन थांबतात, तेथील मुले बसमध्ये चढतात आणि आरामात बसून सुंदर जेवण खातात. तसेच त्यांचे भवितव्य चांगले व्हावे म्हणून वाचन व गणितही शिकवले जाते. आणि अर्थातच आम्ही त्यांना येशूच्या प्रीतीविषयी शिकवतो, पण तुमच्यावर प्रीती आहे असे आम्ही केवळ शब्दांनी सांगत नाही, तर त्यांच्या जीवनातील गरजांची पूर्तता करून कृतीद्वारे त्यांना ते दाखवतो.

केवळ चांगले हेतू असणे पुरेसे नाही

लोकांना येशू ख्रिस्ताच्या प्रीतीविषयी सांगावे या उदात्त हेतून रशियाला गेलेल्या एका माणसाची कथा मी ऐकली. तो तेथे गेला तेव्हा पुष्कळ लोकांची उपासमार होत होती. दिवसभराची ब्रेड मिळवण्यासाठी रांगेत उभे असलेले लोक त्याला दिसले तेव्हा तो त्यांच्याकडे गेला, आणि येशू तुमच्यावर प्रीती करतो असे सांगत त्याने रांगेतील प्रत्येकाला हस्तपत्रिका दिल्या. तो खरेच त्यांना मदत करू इच्छित होता, पण एका स्त्रीने त्याच्या नजरेला नजर भिडवून कडवटपणे म्हटले, "तुमचे शब्द खूप चांगले आहेत, पण त्यांनी माझे रिकामे पोट भरत नाही."

येशू तुमच्यावर प्रीती करतो हे ऐकून पुष्कळ लोकांना खूप वेदना होतात, हे मला माहीत आहे, येशूच्या प्रीतीचा अनुभव त्यांनी घेतला पाहिजे, आणि त्यासाठीचा सर्वांत चांगला मार्ग म्हणजे येशू तुमच्यावर प्रीती करतो हे सांगण्यासोबत त्यांच्या गरजांची

> केवळ शब्द पुरेसे आहेत असा विचार करण्यापासून आपण सावध राहिले पाहिजे.

पूर्तता करणे. केवळ शब्द पुरेसे आहेत असा विचार करण्यापासून आपण सावध राहिले पाहिजे. येशूने सुवार्ता गाजवली हे खरे, पण तसेच त्याने चांगली कृत्ये केली, रोग्यांना आरोग्य दिले (पाहा प्रे.कृ.१०:३८). बोलायला काही खर्च येत नाही, किंवा त्यासाठी फार कष्टही करावे लागत नाहीत, पण खरी प्रीती महाग, मोलवान आहे. तिच्यापायी देवाला आपला एकुलता एक पुत्र द्यावा लागला, आणि आपल्यामधून खऱ्या प्रीतीला प्रवाहित होऊ देण्यासाठी आपल्यालाही किंमत मोजावी लागेल. कदाचित आपल्याला वेळ, पैसा, प्रयत्न, किंवा मालमत्ता गुंतवावी लागेल. काहीही असो आपल्याला किंमत मात्र द्यावी लागेल?

देवाची आपल्यावर भिस्त आहे

माझ्या पतीबरोबर कॉफी पिण्यासाठी आणि मग दुपारचे जेवण घेण्यासाठी मी लवकरच घराबाहेर पडणार आहे. यासाठी आम्हांला साधारणतः दोन तास लागतील, आणि एवढ्या वेळेत सुमारे २४० मुले वेश्याव्यवसायात ढकलली जातील. याचा अर्थ असा की, आपण जर काही करणार नाही, तर कोणाच्या तरी स्वार्थीपणामुळे दर मिनिटाला दोन मुलांची आयुष्ये बरबाद होतील. आपण काय करू शकतो? आपण त्यांची

काळजी घेऊ शकतो; माहिती घेऊ शकतो; प्रार्थना करू शकतो, आणि कृती करू शकतो. या भयंकर परिस्थितीत स्त्रियांची आणि मुलांची सुटका करण्याचे चांगले रेकॉर्ड असलेल्या संस्था आणि सेवाकार्यांना आपण आर्थिक मदत करू शकतो, किंवा देव जर आपल्याला सुचवत असेल, तर आपण या बाबतीत कार्यही करू शकतो. आपण जर पूर्णवेळ काम करू शकणार नाही, तर एखाद्या प्रोजेक्टवर थोडा वेळ काम करण्याचा पर्याय आपण स्वीकारू शकतो.

लैंगिक गुलामगिरी

अंधाऱ्या गल्ल्यांतून तुम्ही गेला, तर पडझड आणि विनाशाची चिन्हे तुम्हांला जागोजाग दिसतील. वायरी आणि सळया पडक्या इमारतींना बांधून ठेवण्याचा प्रयत्न करत असतात. हवेत कचऱ्याची दुर्गंधी पसरलेली असते. पडक्या भिंतीमागून बालकाचा रडण्याचा, कोणीतरी कोणावर तरी रागाने ओरडल्याचा आवाज आणि रस्त्यांवर भटकणाऱ्या पुष्कळ कुत्र्यांपैकी एखाद्या कुत्र्याचे ओरडणे कानावर पडते.

हे सर्व ऐकून आणि पाहून तुमच्या नक्की भावना काय आहेत याची तुम्हांला पक्की जाणीव होते. संशयच नाही... हे ठिकाण दुष्टाईने भरलेले आहे. तुम्ही कल्पना करू शकत नाही, पण वेश्याव्यसासाठी मुलांची विक्री करणाऱ्या अनैतिक, दुष्ट माणसांनी हे ठिकाण निर्माण केले आहे.

साम्रावर्क सात वर्षांची असल्यापासून हे नरक तिचे वसतीस्थान झाले होते. वयाच्या बाराव्या वर्षी बसस्टॅन्डवर तिची सुटका करण्यात आली तेव्हा ती जणू काय निर्जीव हाडाचा सापळा अशी होती. तिच्या भावना मेल्या होत्या, डोळे निर्विकार होते, त्यांतून कसल्याही भावना व्यक्त होत नव्हत्या. तिच्या लहानग्या शरीरावर अत्याचार करण्यासाठी जास्तीत जास्त किंमत देणाऱ्या, वखवखलेल्या लोकांच्या वासनांना ती गेली पाच वर्षे बळी पडत होती. ती कोवळी होती, म्हणून ते एक डॉलरऐवजी तीन डॉलर देत असत.

तिच्या लैंगिक अवयवांना इतक्या भयंकर दुखापती झाल्या होत्या, की सर्वसाधारण जीवन जगण्यासाठी तिच्यावर मोठी शस्त्रक्रिया करावी लागली. पण तिला झालेला शारीरिक त्रास हा तिला झालेल्या आध्यात्मिक आणि मानसिक वेदनांपुढे कमीच होता.

साम्रावर्कला एचआयव्हीची बाधा झाल्याचे निष्पन्न झाले. ती अनाथ होती. तिला आपल्या आईवडिलांविषयी आठवतही नव्हते. तिच्यासारख्या इतर अनेक मुलींप्रमाणे ती अकल्पनीय दुष्टतेच्या अंधारात अडकली होती.

आकडेवारी सांगते :

- दर वर्षी १० लाख २० हजार मुलामुलींची वेश्याव्यवसासाठी विक्री केली जाते. आणि अगोदरच लाखो मुले यात अडकली आहेत.
- दर दोन मिनिटांनी एक मुला/मुलीला लैंगिक अत्याचारासाठी तयार केले जाते.
- गेल्या ३० वर्षांत लैंगिक अत्याचारापायी सुमारे तीस दशलक्ष मुलांनी आपले बालपण गमावले आहे.

या प्रकरणाच्या सुरुवातीस सांगितलेल्या डेन्टीस्टने (दातांचा डॉक्टर) जॉयस मेयर मिनिस्ट्रीजच्या मेडीकल कॅम्पमध्ये भाग घेतला. जॉयस मेयर मिनिस्ट्रीजचे हे सेवाकार्य थर्ड वर्ल्ड कंट्रीज म्हणजे अविकसित देशांत केले जाते. आमच्या स्टाफमध्ये काही पगारी सेवक आहेत, पण पुष्कळजण आपला स्वतःचा वेळ व पैसा खर्च करून या सेवेत सहभागी होतात. त्यांना सवय नाही अशा अतिशय उष्ण हवामानात ते रोज बारा ते सोळा तास काम करतात, तेथे एअर कंडिशनची सोय नसते, कधी कधी तर साधे पंखेही नसतात. अतिशय दुर्गम अशा खेड्यांत, ते काम करतात. ज्या लोकांना कधी कसलीही वैद्यकीय सुविधा मिळाली नाही अशा लोकांवर तो औषधोपचार करतात. आम्हांला त्यांना जीवन वाचवणारी आणि वेदना शमवणारी औषधे द्यावी लागतात. आम्ही त्यांना व्हिटामिन्स देतो, त्यांना अन्नपाणी देतो. आणि येशू त्यांच्यावर खरोखरच प्रीती करतो हे त्यांना समजू, जाणवू देतो. येशू ख्रिस्ताचा स्वीकार करण्याची संधी प्रत्येकाला दिली जाते, आणि त्यांच्यापैकी बरेचजण त्याचा स्वीकार करतात. या वैद्यकीय दौऱ्यावर गेलेले डॉक्टर्स, डेन्टीस्ट्स, नर्सेस, वैद्यकीय कर्मचारी जेव्हा भावनावश होऊन या कॅम्प्समुळे आमची जीवने कायमचची कशी बदलून गेली हे सांगतात तेव्हा माझे डोळे अश्रूंनी भरून जातात. आम्ही त्यांचे आभार मानण्याचा प्रयत्न करतो, आणि जीवन म्हणजे नक्की काय हे समजून घेण्याची संधी आम्ही त्यांना दिली म्हणून ते आमचे आभार मानण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या संस्थेत अंकौंटचे काम पाहणाऱ्या व्यक्तीला आम्ही कंबोडियाच्या दौऱ्यावर नेले. आमच्या सेवाकार्याचे चित्रण ती नेहमी पाहत असली, तर प्रत्यक्ष

दोऱ्यावरच्या अनुभवामुळे तिच्या जीवनावर मोठा प्रभाव पडला. तिने म्हटले, "आतापर्यंतचे आयुष्य जणू काय मी एखाद्या बुडबुड्यात जगत होते." तिला असे म्हणायचे होते की, आतापर्यंत मी वास्तविकतेपेक्षा वेगळे जीवन जगत होते. आणि मला वाटते की आपल्यापैकी पुष्कळजणांचे जीवनही असेच असते. अविकसित देशांतील लोक कसे जगतात हे पाहण्यासाठी त्या देशांच्या दौऱ्यावर जाण्याची संधी प्रत्येकालाच मिळणार नाही हे मला माहीत आहे, पण आपण त्यांविषयी वाचतो किंवा टीव्हीवर पाहतो तेव्हा ते लक्षात ठेवू शकतो. देव या लोकांवर प्रीती करतो, आणि त्याविषयी आम्ही काहीतरी करावे अशी त्याची इच्छा आहे.

उपासमार

मेहरत जगाकडे वेगळ्या दृष्टीकोनातून पाहते. इथिओपियातील अंगाचा या लहानशा खेड्यात ती राहते. इतर मुलांशी समरस होण्याचा ती खूप प्रयत्न करते, पण ती त्या सर्वांपेक्षा फार निराळी आहे.

तिचा जन्म झाला तेव्हा ती चांगली निरोगी होती, पण रोजच्या उपासमारीमुळे, अपुऱ्या आहारामुळे तिच्या शरीरावर दुष्परिणाम झाला. तिचा मणका वेडावाकडा झाला. त्यामुळे तिला चालणे, पळणे किंवा मित्रमैत्रिणींसोबत खेळणे फार कठीण होते. तसेच तिच्या पाठीवर मोठे कुबडही आले. ते खूप दुखत असे. तिची हाडे दुर्बल होती, तसेच ती स्वतःही दुर्बल होती.

तिचे वडील अहेबा यांना तिच्या दुःखाची चांगली जाणीव होती. आपल्या मुलांना चांगले, सकस अन्न द्यावे ... आणि आपल्या *मुलीला पुन्हा निरोगी करावे* हाच एक ध्यास त्यांना होता. आवश्यक असणारे अन्न मेहरतला मिळू शकेल, तिला आरोग्य मिळू शकेल. पण आता या क्षणी मात्र तिच्यासमोर काहीच आशा नाही.

आपल्या मुलांना आपण व्यवस्थित जेवणही देऊ शकत नाही याची खंत अहेबाला आहे. तसेच काही झाले नाही, तर मेहरतची अवस्था अधिकच कठीण होईल, तिला चालता येणार नाही, आणि ती मरून जाईल हे त्यांना माहीत आहे.

उपासमारीच्या वेदना आणि इतर लोकांपेक्षा वेगळे असण्याच्या वेदना मेहरतला माहीत आहेत. आणि येणारा प्रत्येक दिवस आपल्यालासाठी अधिक कठीण असणार याची तिला कल्पना आहे.

इंटरनॅशनल क्रायसिस एड या संस्थेच्या सोबतीने जॉयस मेयर मिनिस्ट्री मेहरतला आवश्यक असणारे अन्न देऊ लागली आहे, आणि औषधोपचार करू लागली आहे. पण मेहरतसारखी पुष्कळ मुले जगात आहेत. उपासमारीच्या समस्येवर विजयी होण्यासाठी त्यांना आपल्या मदतीची गरज आहे.

आकडेवारी सांगते :

- आता, या क्षणी जगभरात सुमारे ९६३ दशलक्ष लोक अन्नाला मोताद आहेत.
- उपासमारीच्या कारणामुळे जगात रोज सुमारे १६,००० मुले मरण पावतात. याचा अर्थ दर पाच सेकंदाला एक मूल मरण पावते.
- इ. स. २००६ मध्ये, सुमारे ९७ लाख मुले वयाची ५ वर्षे पूर्ण होण्याच्या आत मरण पावली. जवळजवळ हे सर्व मृत्यू विकसनशील देशांत झाले - त्यांपैकी चार पंचमांश मुले आफ्रिका आणि दक्षिण आशियातील होती. उपासमार आणि निकस आहाराची जास्तीत जास्त समस्या याच भागांना भेडसावते.

जगाच्या पायाला पडलेली भेग

मला असे वाटते की, जगाच्या पायालाच भेग पडली आहे, आणि आपण काही न करता स्वस्थ बसून जगाची होणारी शकले पाहत आहोत. तुम्ही जर लक्षपूर्वक ऐकाल, तर जगात सर्वत्र लोक असे म्हणत असलेले तुम्हांला ऐकू येईल, "आता जगाचे काही खरे राहिले नाही." बातम्यात आणि सर्वसाधारण संभाषणात आपल्याला हे ऐकायला मिळते. जगात चाललेल्या अन्यायाबद्दल जवळजवळ प्रत्येकजणच बोलतो, पण त्यात बदल करण्यासाठी कृती मात्र काहीच करत नाही. माझा प्रश्न असा आहे की, "अन्यायाविरुद्ध उभे राहून कोण सर्व काही सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करील?" मी करीन असे मी स्वतः तर ठरवले आहे. माझ्याप्रमाणेच करण्याचा निश्चय केलेले इतर हजारो जण मला ठाऊक आहेत, पण हे प्रचंड कार्य पूर्ण करण्यासाठी आपल्यामध्ये हजारोपटीने वाढ होण्याची गरज आहे.

जे काही तुम्ही करू शकाल ते केले पाहिजे

कदाचित तुम्ही विचार करीत असाल, जॉयस, मी जे काही करू शकतो त्याने जगाच्या समस्यांवर साधा ओरखडाही उमटणार नाही. तुमच्या भावना मला समजू शकतात,

कारण एके काळी मलाही तसेच वाटत होते. पण आपण सर्वजणच जर असा विचार करू तर कोणीच काही करणार नाही, आणि काहीही बदल होणार नाही. आपल्या वैयक्तिक प्रयत्नाने जरी समस्या सुटणार नाही, तरी आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नाने मोठा फरक पडू शकतो. ज्या गोष्टी आपण करू शकणार नाही त्यांविषयी देव आपल्याला जबाबदार धरणार नाही, पण ज्या गोष्टी आपण करू शकतो त्यांच्याबद्दल मात्र जरूर धरील.

अलीकडेच मी भारताच्या दौऱ्यावरून आले. तेथे जिममध्ये मला नेहमी पाहणाऱ्या एक स्त्रीने मला विचारले की, "कितीही लोकांना जेवण दिले, तरी लाखो लोक उपाशी राहणारच आहेत, तेव्हा तुमच्या या दौऱ्यांमुळे खरेच काही साध्य होणार का?" देवाने माझ्या मनात कोणते ओझे दिले आहे ते मी तिला सांगितले. देवाने सांगितलेली ही बाब माझ्या मनावर कायमची ठसली आहे. तुम्हांला किंवा मला जर तीन दिवस काहीही खायला मिळाले नसेल, आणि कोणीतरी आपल्याला एकवेळचे जेवण देऊ केले, तर आपण ते आनंदाने घेणार नाही का? अर्थातच आपण ते घेऊ. तसेच ज्यांना आम्ही मदत करतो ते लोक आहेत. त्यांच्यापैकी पुष्कळजणांची नियमित काळजी घेण्यासाठी योजना आम्ही हाती घेऊ शकलो, पण तरी त्यांच्यापैकी पुष्कळजणांना केवळ एकदा किंवा दोनदा मदत मिळेल. पण तरीदेखील हे आमचे कार्य योग्य आहे हे मला माहीत आहे. एखाद्या भुकेल्या मुलाला एक वेळचे जेवण देता आले तरी खूप बरे! निदान एखादा दिवस जरी एखाद्या व्यक्तीच्या वेदना शमवता आल्या तरी फार बरे आहे! "एखाद्या व्यक्तीच्या वेदना किमान तासभर जरी दूर करण्यासाठी तू काही करू शकत असशील ते करणे यथायोग्य आहे," हे जे देवाने मला सांगितले ते करण्यासाठी मला जे शक्य ते सर्व करण्याचा निश्चय मी केला आहे.

जगाने आपली चव घालवली आहे

जग आपल्याला जे देऊ करते ते निरस, बेचव आहे असे मी ठामपणे म्हणू शकते. मी हे जेवणाविषयी बोलत नाही. उदा. हॉलीवुडमध्ये निर्माण होत असलेले बहुतांश सिनेमे निरर्थक आहेत. पुष्कळसे संवाद आणि दृश्ये भिकार असतात. असली दृष्ये पाहून किंवा संवाद ऐकून आपण लगेचच म्हणतो, "जगाला झाले आहे तरी काय?" आपण ताबडतोब जगाला दोष देऊन मोकळे होतो. पण जग म्हणजे जगात राहणारे लोक. जर जगाने आपली चव घालवली असेल, तर याचा अर्थ जगातील लोकांचे दृष्टीकोन, वृत्ती आणि कृती निरस, बेचव झाल्या आहेत. येशूने म्हटले की तुम्ही जगाचे मीठ आहात,

पण मीठाने जर आपला खारटपणा घालवला तर ते काहीच उपयोगाचे नाही (पाहा मत्तय.५:१३). तसेच त्याने असेही म्हटले की, तुम्ही जगाचा प्रकाश आहा, आणि आपण आपला प्रकाश दडवून ठेवू नये (पाहा मत्तय.५:१४).

याचा या प्रकारे विचार करा: प्रत्येक दिवशी या अंधाऱ्या, बेचव जगात प्रवेश करण्यासाठी तुम्ही आपले घर सोडता तेव्हा तुम्ही जगाला आवश्यक असलेला प्रकाश आणि चव बनू शकता. कायम देवभिरू दृष्टीकोन ठेवून आणि बहुतांश लोक करतात त्याप्रमाणे कुरकूर न करता कृतज्ञ राहून, धीर धरून, कृपा करणे, क्षमा करणे, दयाळूपणे वागणे, आणि उत्तेजन देणे यांसारख्या गोष्टींद्वारे तुम्ही तुमच्या कामाच्या ठिकाणी आनंद आणू शकता. केवळ मैत्रीपूर्ण साधे हास्य करूनदेखील तुम्ही बेचव जगात स्वाद आणू शकता.

तुमच्याविषयी मला माहीत नाही, पण मला फिके जेवण आवडत नाही. माझ्या पतीच्या पोटात एकदा दुखू लागले. डॉक्टरांनी त्यांना काही दिवस पूर्णपणे फिके जेवण खायला सांगितले. मला पूर्ण आठवते की, ते जेवण खावे असे मला चुकूनही वाटले नाही. डेव्ह कुरकूर करणारा नाही, पण प्रत्येक वेळी जेवताना तो "या जेवणाला अजिबात चव नाही" असे म्हणत असे. त्यात थोड्या मीठ आणि मसाल्याची गरज असे - आणि जगाला नेमक्या याचीच गरज आहे.

प्रीती आणि प्रीतीच्या सर्व महान गुणवत्ता नसतील तर जीवन हे निरस, बेचव होऊन जाईल. तुम्ही एक प्रयोग करावा असे मला वाटते. थोडा विचार करा: आज मी जगात जाऊन सर्व गोष्टींत थोडा मसाला घालणार आहे. आणि मग घराबाहेर पडताना आपण देवाचे राजदूत म्हणून जात आहोत आणि लोकांना देणे, त्यांच्यावर प्रीती करणे, त्यांच्या जीवनाला थोडी चव देणे हे आपले ध्येय आहे हे लक्षात ठेवा. दिवसभरात तुमच्यासमोर येणाऱ्या लोकांकडे पाहून तुम्ही स्मित करू शकता. स्मित हे स्वीकाराचे आणि मान्यतेचे चिन्ह आहे. जगातील बहुतांश लोक मान्यतेसाठी खटपट करीत असतात. स्वतःला देवाच्या हाती सोपवून द्या, आणि तुम्ही जाल इतर लोकांना आशीर्वादित करणारे निर्णय घेऊन सर्वत्र चांगुलपणाची पेरणी करीत असताना देव तुमची काळजी घेईल असा विश्वास ठेवा.

बदल तुमच्यासोबत सुरू होतो

तुम्ही सर्व काही करू शकत नाही हे मला माहीत आहे. त्याविषयी मी अजिबात प्रश्न उपस्थित करीत नाही. तुमच्या जीवनात तुम्ही काही गोष्टींना 'नाही' म्हटले पाहिजे,

अन्यथा तुमचे जीवन ताणतणावाने भरून जाईल. मुलांना शिकवणे किंवा वयोवृद्धांची काळजी घेणे या गोष्टी मला करता येणार नाहीत, पण जगात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी मी बऱ्याच गोष्टी करीत आहे. मला असे वाटते की, आपणा प्रत्येकाने पुढील प्रश्नाचे उत्तर देणे आवश्यक आहे : "दुसऱ्या कोणाचे तरी जीवन सुखकर होण्यासाठी मी काय करीत आहे?" कदाचित अधिक चांगला प्रश्न असा असू शकेल : "दुसऱ्या कोणाचे तरी जीवन सुखकर होण्यासाठी आज मी काय केले आहे?"

हे पुस्तक वाचणे कदाचित कठीण वाटेल, कारण तुम्हांला न आवडणारे मुद्दे यात उपस्थित केले असतील. पण आपण प्रत्येकाने या मुद्द्यांचा परामर्श घेतला पाहिजे. कोणतीही चांगली गोष्ट अपघाताने घडत नाही. जर आपल्याला क्रांतीचा भाग व्हायचे असेल, तर याचा अर्थ गोष्टी बदलल्या पाहिजेत आणि जोपर्यंत लोक काही करीत नाहीत, तोपर्यंत गोष्टी बदलत नाहीत. आपण प्रत्येकाने म्हटले पाहिजे : "बदलाची सुरुवात माझ्यापासून होते."

कोणतीही चांगली गोष्ट अपघाताने घडत नाही. जर आपल्याला क्रांतीचा भाग व्हायचे असेल, तर याचा अर्थ गोष्टी बदलल्या पाहिजेत आणि जोपर्यंत लोक काही करीत नाहीत, तोपर्यंत गोष्टी बदलत नाहीत. आपण प्रत्येकाने म्हटले पाहिजे : "बदलाची सुरुवात माझ्यापासून होते."

क्रांतीकारी प्रीती

डार्लीन झेक

अंतःकरणाचा प्रवास हा सर्वांत किचकट प्रवास आहे. आनंद आणि दुःख, आशा आणि प्रतीक्षा, जीवनातील चढ आणि उतार... आणि दुःखाची बाब म्हणजे पुष्कळजणांसाठी सांगता न येणारी निराशा या सर्व गोष्टी हृदयात स्थान मिळवतात. जिच्यावर अवलंबून राहता येईल, जिच्यापासून शक्ती मिळवता येईल अशा देवाच्या महान प्रीतीची समज जर एखाद्या व्यक्तीला नसेल, तर मानवी अंतःकरण अतिशय कठीण अशा वास्तविकतांमध्ये टिकून राहण्यासाठी, त्यावर मात करण्यासाठी, तग धरण्यासाठी मार्ग शोधते. आणि श्रीमतांतील श्रीमंतापासून ते गरीबातील गरीबापर्यंत असंख्य लोक आज याच स्थितीत आहेत, कारण कोठे आसरा शोधावा, कोठे आधार शोधावा याबाबत अंतःकरणाची दरिद्रता भेदभाव करीत नाही.

यशया संदेष्ट्याने ६१ व्या अध्यायाच्या ११ व्या वचनात प्रीतीच्या जबरदस्त क्रांतीविषयी लिहिले आहे. "कारण भूमी जशी आपले अंकुर उगवते, मळा जसा आपणात पेरलेले बीज उगवेसे करतो, तसा प्रभु परमेश्वर सर्व राष्ट्रांदेखत धार्मिकता व कीर्ती अंकुरित करील."

प्रीतीची क्रांती हे केवळ महान संकल्पना नाही, तर तातडीचा विषय आहे. विशेषतः जगात आज आपल्याभोवती होणारा अन्याय जर आपण पाहत असू... सर्वांत महान दुःखांतिका म्हणजे मानवाचे भग्न, छिन्न हृदय.

एचआयव्ही एड्समुळे स्वतः हाडाचा सापळा झालेली एखादी माता आपल्या लहानग्या बाळाला स्तनपान करीत असल्याचे फोटो पाहून ही भग्नता पुनःपुन्हा आपल्यासमोर येते. तिच्यासमोर असलेल्या पर्यायांपैकी तिच्या दृष्टीने सर्वांत चांगल्या पर्यायाची निवड तिने केलेली असते... आपल्या बाळाला स्तनपान करून ती त्यालाही या घातक आजाराचा संसर्ग देत आहे की योग्य, सकस आहाराअभावी आपल्या बाळाला तिने मरणाच्या दारात लोटून द्यावे. आईचे अंतःकरण किती दुःखी आहे याची आपण कल्पनाही करू शकत नाही. माझ्यासारखीच ती एक आई आहे. आपल्या बाळाचे संगोपन करताना तिला तिलाही आनंद झालेला आहे.

अन्न नाही, पाणी नाही, कुठे जायचे नाही अशा परिस्थितीत भटकणारी मुलेमुली पाहून अंतःकरण विदीर्ण होते. अंतःकरणासमोर कायम एक मृगजळ दिसते. त्यांच्या

मनाअंतःकरणात असंख्य स्वप्ने आहेत... पण त्यांना शाळेला जाण्याची आणि खाण्यासाठी काहीतरी विकत घेण्याची संधी मिळाली तर किती बरे होईल!

निराशा लोकांना काय करायला लावते हे पाहिल्यास आश्चर्याचा धक्का बसतो. निराशेमुळे लोक आपापसात मारामाऱ्या करतात आणि स्वतःचे अधिकच नुकसान करतात... सतत गरीबी, दारिद्र्याचा सामना करावा लागला, तर लोक मानवी जीवनाला अजिबात किंमत देत नाहीत. पण इतक्या प्रचंड वेदना केवळ अंतःकरणच सहन करू शकते, हाताळू शकते.

आफ्रिकेच्या सहारा भागात १४ वर्षांचा एक मुलगा आपल्या लहान भावाची, बहिणीची आणि पुतण्याचे काळजी घेत आहे. तुटक्याफुटक्या पत्र्याचे छप्पर असलेल्या एका झोपडीत ते राहतात. एका लहानशा शेतात तो दिवसभर काम करतो. त्या सर्वांना आणि स्वतःला शाळेत जाता यावे, पुरेसे भोजन मिळावे यासाठी तो कष्ट करीत आहे. त्याचे आईवडील एचआयव्हीने वारले आणि या मुलांनासुद्धा एचआयव्हीची बाधा झाली असेल असे वाटून त्यांच्या गावाने त्यांना गावाबाहेर हाकलून दिले. परिस्थिती मोठी बिकट आहे. त्यांना अजून खूप परीक्षांना तोंड द्यायचे आहे. आणि अपार कष्ट, आजार आणि अनिश्चितता यांमुळे हे चौद वर्षांचे अंतःकरण विदीर्ण झाले आहे.

ऑस्ट्रेलियाच्या सिडने शहरातील एका तरुण स्त्रीने आपला पती आणि मुलांवर खूप प्रीती केली, त्यांच्यासाठी आपल्या जिवाचे पाणी केले, पण एके दिवशी तिला समजले की, बऱ्याच वर्षांपासून आपल्या नवऱ्याचे दुसऱ्या स्त्रीबरोबर संबंध आहेत आणि आता तो तिच्याबरोबर लग्न करू पाहत आहे. त्यामुळे या स्त्रीला एकाकीपण जाणवते आहे, आपला अपमान झाल्याचे शल्य तिला टोचत आहे, आणि पुढील आयुष्य नवऱ्याशिवाय घालवायचे आहे. तसेच कोर्टाकडून मुलांचा हक्क मिळेपर्यंत मुलांशिवाय राहावे लागणार आहे. ती खूप दुःखी आहे, जीवनात तिला समोर केवळ अंधार आणि अंधारच दिसत आहे.

युगांडामध्ये, चाइल्ड स्पॉन्सरशिपच्या एका पुढाऱ्यासमवेत मी बोलत होते. या भागातील अनाथ मुलांची सुटका करण्यासाठी आम्ही जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न करीत असलो तरी ज्या मुलांपर्यंत आम्ही पोहोचू शकत नाही त्यांची संख्य लक्षणी आहे हे तिने मला सांगितले. मी उभी राहून तिचा खांदा हलक्या हाताने दाबू लागले. तिच्या यातना, वेदना, निराशा ती मला सांगू लागली. लवकरच तिच्या शब्दांचे रूपांतर हुंदक्यात झाले.

आफ्रिकेपासून आशियापर्यंत आणि अमेरिकेपासून ऑस्ट्रेलियापर्यंत असल्या कितीतरी गोष्टी आपल्याला सर्वकालापर्यंत ऐकायला मिळतील. पाहावे तिकडे

निराशेच्या प्रचंड भिंती उभ्या असल्याचे, आणि हे दुष्टचक्र तोडण्यासाठी अन्न, औषधे, समुपदेशक, समाजाचे पाठबळ यांखेरीज अजून कशाची तरी गरज आहे हे जाणवते. प्रीतीच्या क्रांतीमध्ये आपल्याला आपले जीवनध्येय सापडते.

लूककृत शुभवर्तमानाच्या ४ थ्या अध्यायात हा संदेश अतिशय स्पष्टपणे सांगितला आहे :

> "परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे, कारण दीनांस सुवार्ता सांगण्यास त्याने मला अभिषेक केला; त्याने मला पाठवले आहे, ते अशासाठी की, धरून नेलेल्यांची सुटका व अंधळ्यांस पुन्हा दृष्टीचा लाभ ह्यांची घोषणा करावी, ठेचले जात आहेत त्यांस सोडवून पाठवावे; परमेश्वराच्या प्रसादाच्या वर्षाची घोषणा करावी" (पाहा लूक.४:१८-१९).

जेव्हा जेव्हा मी हा शास्त्रभाग वाचते तेव्हा तेव्हा इतरांची जीवने उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे स्मरण मला होते... छोट्या छोट्या गोष्टींपासून महान गोष्टींपर्यंत... कारण आता स्वतःचा आराम, स्वतःच्या सुखसोयी सोडून पृथ्वीतलावरील आपल्या इतर बंधुभगिनींसाठी काहीतरी करण्याची ही वेळ आहे.

असा एक महान शब्द आहे जो प्रीती आपल्या जीवनात आणते... तो शब्द म्हणजे आशा. पवित्र शास्त्र म्हणते, "ती आशा आपल्याला जिवाचा नांगर असून स्थिर व अढळ पडद्याच्या आतल्या भागी पोहचणारी आहे" (पाहा इब्री.६:१९). आणि स्तोत्र.३९:७ म्हणते, "तर आता हे प्रभू, मी कशाची अपेक्षा करू? माझी आशा तुझ्याच ठायी आहे." परिस्थिती कितीही बिकट, निराशाजनक, अशक्य असली तरीदेखील आशा सजीव असते. दुःखी लोकांना विश्वास आणि प्रीतीसोबत आशा देणे हे आपले सेवाकार्य आहे.

दारिद्र्य, गरीबीच्या वातावरणात राहणाऱ्या लोकांच्या समस्यांची उत्तरे शोधण्याच्या आव्हानाचा प्रचंड ताण माझ्या अंतःकरणावर आहे, पण ज्यांच्याकडे काहीही नाही त्यांच्यासोबत बसल्यावर देवाच्या कृपेचा अनुभव मोठ्या सामर्थ्याने येतो. हे लोक जगण्यासाठी धडपड करीत असताना देव पुन्हा एकदा प्रकाशतो. जखऱ्या ९:१२ मध्ये सांगितल्याप्रमाणे मी आशा धरून राहिलेले अनेक बंदिवान पाहिले आहेत... केवळ देवच आपले उत्तर आणि आपला पुरवठा करणारा आहे असा त्यांचा मनापासून विश्वास असतो.

देवाचा शोध घेणे, त्याच्यावर प्रीती करणे आणि त्याची सेवा करणे याला माझ्या जीवनात सर्वोच्च प्राधान्य आहे. देवाच्या समक्षतेचे मोल, भक्तीपूर्ण जीवन जगण्यास शिकणे आणि देवाची अद्‌भुत कृपा ही अवर्णनीय देणगी आहे, आणि त्याने आपल्यासाठी जे काही केले आहे, त्या सर्वांसाठी त्याचे पुरेसे आभार मानण्यासाठी आपल्याला याची गरज आहे. ऐन युद्धामध्ये विश्वासाचे गीत गाणे आणि येशूचे गौरव करणे हा मोठा पाठ मी शिकले आहे, पण माझे नेहमी चालू असलेले शिक्षण म्हणजे प्रभूला आपल्याकडून भक्तीमध्ये अजून कशाची अपेक्षा आहे हे समजून घेणे. भक्ती म्हणजे केवळ गीते गाण्यापेक्षा अधिक काही आहे हे पवित्र शास्त्रभर मला पाहायला मिळते. भक्ती म्हणजे आज पृथ्वीवर त्याचे हात आणि पाय होऊन जगणे.

एड्‌सने मरायला टेकलेल्या लोकांच्या हॉस्पिटलमध्ये बऱ्याच वर्षांपूर्वी मी काही सुंदर आफ्रिकन मुलांची भेट घेतली. ते सर्व अनाथ होते, पण तरीदेखील ज्यांना आशा आहे अशा लोकांप्रमाणे त्यांच्यात उत्साह भरलेला होता. त्यांनी उभे राहून "सर्व काही शक्य आहे..." या अर्थाचे गीत माझ्यासाठी गाईले. ते ऐकून मी खूप उत्साहित झाले. तेथील सर्व वातावरण आनंदाने भरून गेले. तो एक अविस्मरणीय क्षण होता, आणि देवाचे वचन आपल्या जीवनात देवाच्या वचनाच्या सामर्थ्याची आठवण देणारा क्षण होता.

इब्री.१३:५ म्हणते, "म्हणून त्याचे नाव पत्करणाऱ्या ओठांचे फळ असा स्तुतीचा यज्ञ आपण त्याच्याद्वारे देवाला नित्य अर्पण करावा." पुढे १६ वे वचन म्हणते, "चांगले करण्यास व दान करण्यास विसरू नका; कारण अशा यज्ञांनी देव संतुष्ट होतो."

देवाला गीत गाणे, सार्वकालिकतेच्या महान गीतामध्ये सहभागी होणे हा या पृथ्वीतलावरील एक मोठा आनंद आहे. महान आज्ञा पाळण्यासाठी त्याच्या सान्निध्यात आपल्याला ऊर्जा मिळते, आपले हात स्वर्गाकडे उभारले जातात, आणि मग सेवा करण्याच्या अविर्भावात ते सादर केले जातात. संत ऑगस्टीन यांनी म्हटले, "आपली जीवने ही डोक्यापासून पायाच्या बोटापर्यंत हालेलूयाने भरलेली असावीत."

स्वर्ग आणि पृथ्वीच्या निर्माणकर्ता आपल्याकडून जी अपेक्षा करतो त्यामध्ये, भक्तीमधील गीतगायन हे केवळ आरंभबिंदू आहे. नवीन गीते गाण्याची सूचना आपल्याला चाळीसपेक्षा अधिक वेळा दिली आहे, आणि त्याहीपेक्षा अधिक वेळा आपल्याला अर्पण आणण्यास आणि आज्ञापालन करण्यास सांगितले आहे, पण जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत संघर्ष करणाऱ्या लोकांची काळजी घेण्याद्वारे आपली

जीवने यज्ञ म्हणून सादर करण्याविषयी सुमारे २,००० पेक्षा जास्त संदर्भ आहेत. पण हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, आपण जर प्रार्थनेसाठी वेळ देणार नाही, देवाच्या वचनावर मनन करणार नाही, आणि ख्रिस्तासोबत घनिष्ट नातेसंबंध ठेवणार नाही, तर आपली सर्व सेवाभावी कृत्ये ही केवळ ज्यांची सेवा आपण करीत आहोत त्यांच्याऐवजी केवळ आपल्या स्वतःविषयी असतील.

तुम्ही भक्ती करता तेव्हा तुम्ही देवाच्या सान्निध्यात राहता, त्याच्या समक्षतेमुळे तुमची अंतःकरणे बदलतात. ख्रिस्ती जीवनाचा संपूर्ण प्रवास हा अंतःकरणाचा प्रवास आहे, म्हणून पूर्ण मनाने भक्ती करण्यास शिकणे ही आवश्यक प्रक्रिया का आहे हे तुमच्या लक्षात येईल. देवाची सेवा करीत असताना तो नेहमी आपल्याकडून सत्याची अपेक्षा करतो, आणि हे सत्य तुमच्या अंतःकरणाच्या चौकटीत निश्चित होते. म्हणून आपल्या अंतःकरणांची काळजी घेणे अतिशय महत्त्वाचे आहे.

"सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंत:करणाचे विशेष रक्षण कर,
कारण त्यात जीवनाचा उगम आहे."
(नीती.४:२३).

शिकागो शहराजवळील विलो क्रीक कम्युनिटी चर्चचे पाळक बिल हायबल्स यांनी काही वर्षांपूर्वी आम्हांला जे आवाहन केले ते मी कधीही विसरणार नाही. त्यांनी म्हटले, ख्रिस्ती विश्वासणारे आणि ख्रिस्ती पुढारी या नात्याने केवळ अन्यायाबद्दल बोलणे आणि त्याविषयीच्या डीव्हीडी पाहणे पुरेसे नाही, तर आपण गरीबीला आपल्याला स्पर्श करू दिला पाहिजे, आपल्याला तिच्यात सहभागी होऊ दिले पाहिजे. दारिद्र्याची वास्तविकता आपण सोयीनुसार विसरून जाऊ किंवा थोडेफार पैसे देऊन आपण आपली जबाबदारी पार पाडली असे आपण समजू नये, तर देवाच्या महान प्रीतीने कृती करण्यास आपल्याला पाचारण झाले पाहिजे, त्याची प्रीती आणि त्याचे जीवन आपण त्या लोकांना सांगितले पाहिजे. तो आपल्यासाठी मार्ग तयार करील असा विश्वास बाळगला पाहिजे. हाच तर खरा ख्रिस्ती जीवनप्रवास आहे. याच ठिकाणी आपली कृतीपूर्ण प्रीती आणि मनापासून केलेली भक्ती उपयोगात येते.

आणि जो कोणी माझ्या नावाने
अशा एखाद्या बालकाला जवळ करतो
तो मला जवळ करतो.
(मत्तय.१८:५).

"माझ्या बाळांची काळजी कोण घेईल?" असा टाहो मरणपंथाला लागलेली माता फोडते. नवीन मातेचा शोध करणाऱ्या लाखो मुलांमध्ये माझ्याही मुलांची गणना होईल हे तिला माहीत असते. कॅन्सर झालेल्या माझ्या मैत्रिणींना अशीच प्रार्थना करताना मी ऐकले आहे. दुःखाने काळवंडलेल्या या प्रसंगी अंतःकरण किती दुःखी असेल, किती भग्न होत असेल याचा मी विचारही करू शकत नाही. "आम्ही त्यांची काळजी घेऊ," असे तिला ओरडून सांगावे असे मला वाटते. ही अशी बाब असते की, या वेळी आपण आपल्या बाह्या वर सरसावतो, मोठा आवंढा गिळतो, प्रार्थना करतो आणि विश्वास ठेवतो व विश्वासाने पुढे पाऊल टाकतो. ज्यांना कुटुंबाची गरज आहे अशी अनाथ मुले शोधण्यासाठी, किंवा मैत्रीचा आधार शोधणारे एकाकी लोक शोधण्यासाठी आपल्याला तिसऱ्या म्हणजे अविकसित देशात राहावे लागत नाही; आपण राहतो त्या प्रत्येक शहरात अशी मुले आहेत, ज्यांची काळजी घेण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत असते, अशा मुलांना आपण, आपली मंडळी मदत करू शकते.

मला मंडळी आवडते... ती खरोखर वैविध्याने नटलेली आणि नव्या आत्मविश्वासाने भरलेली आहे. पण मंडळी सर्वप्रथम आणि पूर्ण मनाने देवावर प्रीती करते तेव्हा ती खरी मंडळी असते... आणि अशी मंडळी दुःखीकष्टी समाजाला मदत करण्यासाठी आपले हात पुढे करते, ती लोकांना येशूशी जोडते. ती गरीबांचा न्याय करीत नाही, किंवा त्यांच्यावर टीका करीत नाही ते केवळ प्रीती आणि प्रीतीच करते... आणि प्रीती करायला मोठे मोल द्यावे लागते. प्रीती करणे हे नाम नाही, तर क्रियापद आहे... आपल्या देवावर पूर्ण मनाने, पूर्ण शक्तीने आणि पूर्ण जीवाने प्रीती करणे... आणि जशी आपल्यावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करणे. खरोखर अद्‌भुत, आश्चर्यकारक आहे!

मग निराशेच्या या राक्षसावर आपण कशी मात करतो? या भयानक तुरंगात डांबले गेलेल्या लोकांसाठी दरवाजे उघडण्यासाठी आपण काय करायला हवे?

आपण कोणीही हा प्रश्न स्वतःच्या शक्तीने सोडवू शकत नाही. पण आपण कोठे तरी सुरुवात करण्याची गरज आहे; आपण एखाद्या मुलाला अर्थसहाय्य करू शकतो, आपल्या समाजातील वंचित लोकांसाठी आवाज उठवू शकतो, तुम्हांला शक्य होईल त्या प्रकारे तुम्ही मदत करू शकता (थोड्या काळासाठी, किंवा दीर्घकाळासाठी एखाद्याची आर्थिक जबाबदारी उचलणे, शनिवार रविवार आठवड्यातील एकाकी, निराश्रित लोकांसाठी देणे इ.) सामाजिक कार्यासाठी निधी गोळा करणे, तुमच्या मंडळीत अशा कार्यात सहभागी होणे, थोडे साधेपणाने जगणे - केवळ खर्च करण्यासाठी नाही, तर देण्यासाठी जगणे... ही यादी अशीच लांबत जाईल.

पण तितकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे, रोज स्थानिक किंवा जागतिक पातळीवर जी संधी आपल्याला मिळेल तिच्यात सहभागी होण्यासाठी आपली मने आणि जीवने तयार असणे... चांगल्या शोमरोन्याच्या दाखल्याप्रमाणे... त्या दिवसाचे आपले सर्व कार्यक्रम बाजूला टाकून तो त्या जखमी माणसाच्या मदतीला धावला. या शोमरोन्याचे हृदय कळवळ्याने भरले होते... आणि तो केवळ भावनावश झाला नाही, तर त्याने कृती केली.

आणि मला तुम्हांला हेही सांगू द्या की, आज मी कोणाला काही देण्याऐवजी मलाच उत्तेजनाची, सांत्वनाची, सेवेची गरज आहे असे तुम्हांला वाटत असेल तर निराश होऊ नका, तर स्तुतीभक्तीच्या वातावरणाने स्वतःला भरून टाका, तुमच्या अंतःकरणाला प्रेरणा मिळेल असे संगीत तुमच्या घरात लावा, देवाच्या वचनाच्या सीडी तुमच्या कारमध्ये लावा. आपल्याला जेथे उत्तेजन मिळेल असे तुम्हांला वाटते त्या मंडळीत, त्या लोकांत जा आणि देवाच्या आत्म्याने तुम्हांला सांगोपांग भरावे म्हणून त्याला अनुमती द्या. तुम्हांला आरोग्याची गरज असेल, किंवा आर्थिक अडचण असेल, नातेसंबंधाविषयी चमत्काराची गरज असेल... आपला देव समर्थ आहे. स्वतःला सर्वसमर्थ देवाच्या हाती सोपवून द्या, तो तुम्हांला कधीही सोडणार नाही, अथवा टाकणार नाही. त्याच्यावर भरवसा ठेवणे ही तुमची सर्वांत महान आशा आणि आनंद आहे. पण त्यासाठी मी तुम्हांला एका गोष्टीचे पुन्हा एकदा स्मरण देते... पूर्ण मनाने, पूर्ण जिवाने, आणि पूर्ण शक्तीने देवावर प्रीती करा आणि जशी स्वतःवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करा. देवाच्या दृष्टीने तुम्ही अतिशय मोलवान आहात हे विसरू नका.

तुम्हांला मनापासून सांगणारी,
डार्लीन झेक

जीवनाचा प्रवास हे गुंतागुंतीचे रहस्य आहे - आनंद आणि दुःख, आशा आणि प्रतीक्षा, आणि पुष्कळजणांसाठी कसलीच इच्छा न राहणारी प्रचंड निराशा. देवाची आपल्यावर असलेली महान प्रीती आपल्याला समजत नाही, आपण त्याच्यावर भरवसा टाकून शक्ती मिळवू शकतो हे आपल्याला समजत नाही, तेव्हा आपले अंतःकरण जीवनातील खडतर निराशा, समस्यांचा सामना करण्यासाठी दुसऱ्या पर्यायी मार्गांचा शोध घेते. आणि आज जगातील श्रीमंत व गरीबांसह बहुतांश लोक याच सापळ्यात अडकले आहेत.

यशया ६१:११ मध्ये प्रीतीच्या क्रांतीविषयी यशया संदेष्ट्याने सांगितलेल्या शब्दांची आठवण डार्लीन झेक यांनी आपल्याला करून दिली आहे. येशू अरण्यात मार्ग तयार करील तेव्हा लोकांना न्याय मिळेल याविषयीचे वर्णन करताना तो म्हणतो, "कारण भूमी जशी आपले अंकुर उगवते, मळा जसा आपणात पेरलेले बीज उगवेसे करतो, तसा प्रभु परमेश्वर सर्व राष्ट्रांदेखत धार्मिकता व कीर्ती अंकुरित करील."

एखाद्या महान संकल्पनेपेक्षा अधिक काही

प्रीतीची क्रांती ही केवळ महान कल्पना नाही, तर आज जगातील दुःखद अन्याय दूर झालेला आपल्याला पाहण्यासाठी आवश्यक बाब आहे - यात भग्न व अनुतापी हृदयाचाही समावेश आहे. स्तोत्र.२७:३ म्हणते, "सैन्याने माझ्यापुढे ठाणे दिले तरी माझे हृदय कचरणार नाही; माझ्यावर युद्धप्रसंग ओढवला तरीही मी हिम्मत धरून राहीन." सर्व मानवजातीच्या हृदयात आज हे घडण्याची गरज आहे.

प्रकरण

2

समस्येचे मूळ

आपल्यावर कोणीतरी प्रीती करणे ही आनंदाची गुरुकिल्ली नाही,
तर ज्याच्यावर प्रीती करावी असे कोणीतरी असणे ही आहे.
अनामिक

एखाद्या गोष्टीचे मूळ म्हणजे तिची सुरुवात, तिला आधार देणारी गोष्ट. सर्वसाधारणपणे मुळे ही जमिनीखाली असतात. त्यामुळे पुष्कळदा आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो आणि जे वर दिसते त्याच्याकडेच केवळ लक्ष देतो. दातदुखी असणाऱ्या व्यक्तीला रुट कॅनल करण्याची गरज असते. दाताचे मूळ किडलेले असते. जोपर्यंत त्याच्यावर इलाज केला जात नाही तोपर्यंत आराम मिळणार नाही. दाताचे मूळ दिसत नाही, पण होणाऱ्या असह्य वेदनामुळे ते तेथे आहे हे तुम्हांला समजते. जगाला वेदना होत आहेत, आणि समाजाला व व्यक्तींना त्रास देणाऱ्या समस्यांच्या मुळाशी आपण जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत या वेदना थांबणार नाहीत. आणि स्वार्थीपणा हेच मूळ आहे असे मला वाटते.

जिचा उगम स्वार्थीपणात नाही अशी एखादी समस्या आहे की नाही याचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केला, मला अशी एकही समस्या आढळली नाही. आपल्याला जे हवे किंवा जे चांगले वाटते ते मिळवण्यासाठी दुसऱ्या लोकांचा नाश करण्यात लोकांना काही वावगे वाटत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे स्वार्थीपणा हे जगातील सर्व समस्यांचे मूळ आहे.

जिचा उगम स्वार्थीपणात नाही अशी एखादी समस्या आहे की नाही याचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केला, मला अशी एकही समस्या आढळली नाही.

स्वार्थीपणाला हजारो चेहरे आहेत

स्वार्थीपणाला हजारो चेहरे आहेत, आणि त्यामुळेच आपण त्याला नक्की ओळखू शकत नाही. लहान बालकांना हवे ते मिळत नाहीत, तेव्हा ती ओरडतात, किंचाळतात, आणि मुलांची खेळणी दुसरी मुले घेतात तेव्हा आपल्याला त्यांच्यामध्ये हा स्वार्थीपणा दिसतो. इतरांपेक्षा चांगले दिसावे किंवा त्यांच्यापेक्षा चांगले करावे या आपल्या इच्छेत तो दिसतो. स्वार्थीपणा म्हणजे सर्व बाबतींत प्रथम असण्याची इच्छा. सर्वोत्कृष्ट करण्यामध्ये काहीच वाईट नाही, पण आपण यशस्वी होत असताना इतरांचे अपयश पाहण्यात आनंद होणे वाईट आहे.

स्वार्थीपणाचे सर्व प्रकार वाईट आहेत आणि त्यांमुळे समस्या उद्‌भवतात असा माझा विश्वास आहे. आज जगात सर्रास असणारे स्वार्थीपणाचे तीन विशिष्ट प्रकार आणि त्यांचे दुष्परिणाम यांकडे मी या विभागात तुमचे लक्ष वेधणार आहे.

लैंगिक अत्याचार : ॲन तेरा वर्षांची आहे. "तू आता मोठी झाली आहेस, आणि मोठ्या स्त्रिया जे करतात ते तू आता केले पाहिजेस," असे तिचे वडील तिला सांगतात. स्त्री म्हणजे काय हे त्यांनी तिला दाखवले तेव्हा ती भयभीत झाली, शरम आणि स्वतःची किळस वाटली. "मी जे करतो ते योग्य, चांगले आहे" असे जरी तिचे वडील तिला सांगत असले तरी हे सर्व ते गुप्त ठेवायला का सांगतात आणि आपल्याला एवढे वाईट तरी का वाटते हा प्रश्न तिला पडतो. वर्षामागून वर्षे जातात, तिचे वडील तिचा लैंगिक उपभोग घेत राहतात. हळूहळू ती भावनाहीन होते. तिच्या वडिलांनी तिचे बालपण, तिचे कौमार्य, तिचे निष्कलंकपण हिरावून घेतले आहे, आणि जर देवाने हस्तक्षेप केला नाही, तर तिचे जीवनही ते चोरून घेतील - आणि हे सर्व केवळ त्यांना हव्या असलेल्या गोष्टीसाठी!

अशा प्रकारे जवळच्या किंवा रक्तातल्या नात्यातील लैंगिक संबंधाच्या वाढत्या कहाण्या ऐकून आपण चक्रावून जातो, पण सत्य हे आहे की, असली ९०-९५ टक्के प्रकरणे उघड होत नाहीत. माझ्या वडिलांनी माझ्यावर बरीच वर्षे लैंगिक अत्याचार

केला. माझ्या बाबतीत काय घडते आहे हे सांगण्याचा मी दोनदा प्रयत्न केला, पण त्यांनी मला मदत केली नाही. मी खऱ्या अर्थाने मोठी होऊन माझी कथा लोकांना सांगेपर्यंत आणि देवाकडून मानसिक आरोग्य मिळेपर्यंत मला हे सर्व सहन करावे लागले. माझे वडील ८६ वर्षांचे होऊन वारले. पण त्यांच्या गुन्ह्याची त्यांना खऱ्या अर्थाने शिक्षा कधी झाली नाही. त्यांची मुलगी लहान असल्यापासून ते तिच्यावर बलात्कार करीत होते, हे त्यांच्या सहकाऱ्यांना, मित्रांना कधी समजले नाही.

लोक काय करतात ते आपण पाहतो आणि लगेच त्यांचा न्याय करून मोकळे होतो, पण त्यांच्या वागणुकीमागचे कारण काय हे मात्र क्वचितच आपल्याला समजते. 'समाजात समस्या निर्माण करणाऱ्या' असे आपण ज्यांना समजतो त्या स्त्रिया रक्ताच्या नात्यातील लोकांकडून होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या बळी असतात. उदा.,

- ६६ टक्के वेश्यांवर लहानपणी लैंगिक अत्याचार झालेले असतात.
- अमेरिकेच्या तुरुंगातील सर्व स्त्रियांपैकी ३६.७ टक्के स्त्रियांवर लहानपणी लैंगिक अत्याचार झालेले आहेत.
- ज्या मुलांवर अत्याचार झाले आणि दुर्लक्ष केले गेले त्यांच्यापैकी एक तृतीयांश मुले नंतर स्वतःच्या मुलांवर अत्याचार करतील.
- लैंगिक अत्याचार झालेल्या लोकांपैकी ९४ टक्के लोकांवर प्रथम अत्याचार वयाच्या बारा वर्षांपूर्वी होतात.

जवळच्या नात्यातल्या लोकांनी ठेवलेले लैंगिक संबंध आणि लैंगिक अत्याचार यामुळे आपल्या जगात दुःखाचे प्रमाण धक्कादायक आहे. आपल्याला हवे ते मिळवण्यासाठी दुसऱ्या कोणाला कितीही दुःख झाले तरी त्याची पर्वा न करणाऱ्या स्वार्थी लोकांमुळे हे घडते.

तुम्ही कदाचित खून करणार नाही, लबाडी करणार नाही, किंवा मुलांविरुद्ध हिंसा करणार नाही, पण तरीदेखील काही प्रकारे तुम्ही स्वार्थी असण्याची शक्यता आहे. ज्यांचे गुन्हे आपल्यापेक्षा मोठे आहेत त्यांच्याकडे बोट दाखवून आपण आपला स्वार्थीपणावर पांघरून घालण्याचा प्रयत्न करू, तर आज समाजातील समस्यांचा खऱ्या अर्थाना आपण कधीच सामना करू शकणार नाही. आपला स्वार्थीपणा कितीही असो, अथवा आपण तो कोणत्याही प्रकारे व्यक्त करीत असू, तरी आपणा प्रत्येकाने स्वतःच्या स्वार्थापणाची जबाबदारी घेतली पाहिजे.

हाव, लोभीपणा : स्वार्थीपणा पुष्कळ वेळा लोभीपणाचे रूप घेतो. लोभीपणा किंवा हाव हा असा आत्मा आहे की जो कधीही तृप्त होत नाही, तो नेहमी जास्त मिळावे

अशी अपेक्षा धरतो. आजचा आपला समाज हा सुखलोलूप समाज आहे. मी मोटारीतून प्रवास करते तेव्हा जिकडे तिकडे दिसणारे मॉल्स पाहून मी आश्चर्यचकित होते. जिकडे पाहावे तिकडे खरेदीवर काहीतरी बक्षीस देऊ केल्याचे आपल्याला पाहायला मिळते. वस्तू, वस्तू आणि अधिक वस्तू - आणि हे सर्व मृगजळ आहे. ते सुखी जीवनाचे आणि अधिक आनंदाचे आश्वासन देते, पण पुष्कळ लोकांसाठी हा भयानक कर्जाचा सापळा होतो.

अधिकाधिक वस्तू खरेदी करण्याच्या दबावामुळे आपण स्वार्थात गुंतून पडतो. पण, जर आपली इच्छा असेल तर आपण बदल होऊ शकतो ही चांगली बातमी आहे. आपल्याला खरोखर ज्याची गरज आहे ते खरेदी करण्यास आपण शिकू, तसेच जे आपल्याला हवे असे वाटते त्यापैकी थोडेफार खरेदी करायला आपण शिकू या. आणि आपल्या वस्तूंपैकी बऱ्याचशा वस्तू, विशेषतः ज्या आपण वापरत नाही, त्या गरजू लोकांना देण्यास शिकू या. देणे ही आपली रोजची सवय होईपर्यंत आपण द्यायचा सराव करू या. बहुतांश लोकांसाठी हा जीवन जगण्याची खऱ्या अर्थाने क्रांतीकारी पद्धत असेल.

पवित्र शास्त्र सांगते की, द्रव्याचा लोभ हे सर्व प्रकारच्या वाइटाचे मूळ आहे (पाहा १ तीमथ्य.६:१०). आपल्याला जे हवे ते सर्व आपण पैशाने मिळवू शकू असे लोकांना वाटते म्हणून ते पैशावर अधिक प्रीती करतात आणि तो मिळवण्यासाठी जवळजवळ काहीही करतात. त्यांना वाटते की पैशाने सुख विकत घेता येईल. पैशासाठी लोक खून, चोऱ्या आणि लबाड्या करतात - आणि या सर्वांचे मूळ स्वार्थीपणात आहे. अलीकडेच मी एका प्रसिद्ध अभिनेत्याचा लेख वाचला. त्यात त्याने लिहिले होते की, "आपल्याला हवे ते सर्व मिळाले म्हणजे आपण आनंदी, सुखी होऊ असे लोकांना वाटते, पण हे खोटे अभिवचन आहे." पुढे त्याने म्हटले, "मनुष्याला जे हवेहवेसे वाटते ते सर्व त्याला मिळाले तरी तो सुखी होत नाही, कारण जग देऊ करते ते सर्व मिळवल्यावरही ते एकाकीच असतात."

घटस्फोट: स्वार्थीपणा हेच घटस्फोटाचेदेखील कारण आहे. लोक विवाहाविषयी पुष्कळदा चुकीच्या कल्पना मनात बाळगून विवाह करतात. आपला पती/पत्नी आपल्याला आनंद देणारा/देणारी असावा/असावी असे आपल्यापैकी पुष्कळजणांना वाटते, आणि तसे घडत नाही तेव्हा भांडणे सुरू होतात. आपल्या पती/पत्नीला सुखी ठेवण्यासाठी शक्य ते सर्व करण्याचा निश्चय करून आपण विवाह केला तर परिस्थितीत किती बदल होईल!

''मी तसे करणार नाही, कारण माझा गैरफायदा घेतला जाईल हे मला माहीत आहे,'' असा विचार कदाचित तुम्ही करीत असाल. माझ्या पूर्वायुष्यात माझेही विचार असेच होते. पण आता जवळजवळ पूर्ण आयुष्यभर जगल्यानंतर पवित्र शास्त्र सत्य आहे असा विश्वास मी बाळगते. प्रीती कधी अंतर देत नाही असे ते शिकवते (पाहा १ करिंथ.१३:८). मनुष्य जे पेरतो 'केवळ त्याचीच' कापणी तो करील असेही ते शिकवते (गलती.६:७). जर पवित्र शास्त्रावर माझा विश्वास असेल, आणि तसा तो आहेच, तर माझ्या जीवनातील पिकाची मालकी माझी आहे असा विश्वास मी धरते, कारण मी जे काही पेरते त्यावरून ते पीक मिळते. जर आपण दया पेरली तर आपल्याला दयेची कापण करतो, जर आपण दयाळूपणा पेरला, तर आपण दयाळूपणाची कापणी करतो.

माझ्या मनात नेहमी केवळ मीच होते

बेचाळीस वर्षांपूर्वी माझा आणि डेव्हचा विवाह झाला त्या दिवसांचा मी विचार करते, तेव्हा प्रारंभीच्या वर्षांत मी कशी होते हे लक्षात येऊन मी थक्क होते. चांगुलपणा म्हणजे काय हे त्या काळात मला माहीतच नव्हते हे मी प्रामाणिकपणे सांगू शकते. ज्या घरात मी वाढले त्या घरात मी केवळ स्वार्थीपणाच पाहिला, आणि मला त्यापेक्षा वेगळे शिकवणारे कोणी नव्हते. घेण्यापेक्षा देणारे कसे व्हावे हे जर मला माहीत असते, तर आमच्या वैवाहिक जीवनाची पहिली वर्षे आहे त्यापेक्षा चांगली गेली असती. देव माझ्या जीवनात आल्यामुळे सर्व काही पालटले, जुन्या जखमा बऱ्या झाल्या, पण या अवधीत माझी बरीच वर्षे वाया गेली, ती आता मला परत मिळू शकत नाहीत.

डेव्हचे बालपण मात्र माझ्यापेक्षा अगदी वेगळ्या अशा ख्रिस्ती घरात झाले. त्याची आई धार्मिक होती. ती प्रार्थनाशील होती, आणि तिने आपल्या मुलांना द्यायला शिकवले. या संस्कारांमुळे डेव्हच्या अंगी असे गुण आले की, त्याला भेटण्यापूर्वीच्या माझ्या संपूर्ण आयुष्यात ते मला कधी पाहायला मिळाले नव्हते. त्याचे उदाहरण माझ्यासाठी फार मोलवान आहे. जर तो एवढा धीर धरणारा, संयमी नसता - आणि हा प्रीतीचा एक पैलू आहे - तर माझी खात्री आहे की, आमचे लग्न कधीच टिकले नसते. ते टिकले म्हणून मी देवाचे आभार मानते. आणि ४२ वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर मी प्रामाणिकपणे सांगू शकते की, दिवसेंदिवस ते अधिकच चांगले होत आहे. आता मी अधिक आनंदी आहे, कारण पूर्वीपेक्षा आता मी

नातेसंबंध जपण्यासाठी अधिक मेहनत घेते. डेव्ह त्याला आवडणाऱ्या गोष्टी करतो हे पाहून मला आनंद वाटतो. पूर्वी माझ्या इच्छेप्रमाणे काही झाले नाही तर माझ्या तळपायाची आग मस्तकात जात असे. पण आता चित्र पूर्णपणे बदलले आहे.

मी, मी, माझे माझे याचा मला पूर्ण कंटाळा येईपर्यंत माझ्या मनात नेहमी केवळ स्वतःचाच विचार असायचा. तुरुंगाचे दरवाजे उघडून कैद्यांना मुक्त करण्यासाठी येशू आला (पाहा यशया ६१:११). त्याने मला अनेक गोष्टींपासून मुक्त केले. त्यांपैकी सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे मी स्वतः! या स्वातंत्र्यात मी रोज वाढत आहे. सर्व काळ केवळ स्वतःच्याच इच्छा पूर्ण करण्यात खरा आनंद नाही हे समजल्यामुळे मी देवाची आभारी आहे.

माझ्याप्रमाणेच, तुमच्यासमोरही अशीच भिकार, चुकीची उदाहरणे असतील आणि तुमच्या प्रारंभीच्या आयुष्यात शिकलेल्या बऱ्याच गोष्टी विसरण्याची गरज असेल. प्रामाणिकपणे सांगा : तुम्हांला जे हवे ते मिळत नाही तेव्हा तुम्ही काय करता? तुम्हांला राग येतो का? तुम्ही कुरकूर करता का? देवाने तुमची काळजी घ्यावी म्हणून तुम्ही देवावर भिस्त ठेवता का, का आपण स्वतःची काळजी घेतली नाही, तर दुसरे कोणी आपल्याकडे लक्ष देणार नाही या भीतीने जगता? आपल्या स्वतःची काळजी आपण स्वतःच घ्यायला हवी हा विश्वास बाळगल्याने स्वार्थीपणा येतो, परिणामी जीवन दुःखी होते. तुम्ही स्वार्थीपणाकडे पाठ फिरवून इतरांना महत्त्व द्यावे, त्यांची काळजी घ्यावी आणि खऱ्या अर्थाने त्यांच्यावर प्रीती करावी असे आवाहन मी तुम्हांला करते.

स्वार्थीपणा ही निवड आहे

आपल्यापैकी पुष्कळजण स्वतःविषयी बोलण्यात, स्वतःविषयी विचार करण्यास आणि योजना आखण्यात वेळ घालवतात. आपण स्वतःवर संतुलित प्रकारे प्रीती करावी असे मी शिकवते, तरीदेखील आपण केवळ आपण स्वतःचाच विचार करण्याएवढे, आपण जणू जगाचा केंद्रबिंदू आहोत असे समजण्याएवढे स्वतःमध्ये गुंतण्यावर माझा विश्वास नाही. या पृथ्वीवर देवाची जी योजना आहे, तिचा आपण एक अतिशय महत्त्वाचा भाग असल्याने आपण स्वतःची काळजी घेतली पाहिजे हे खरे. आपण जीवनाचा आनंद घ्यावा म्हणून त्याने स्वतःचे जीवन दिले (पाहा योहान.१०:१०). म्हणून आपण आनंद घेतला पाहिजे, पण आनंदाचा खरा मार्ग आपले जीवन स्वतःसाठी राखून न ठेवता इतरांसाठी देण्यात आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

"तुम्हांला माझे शिष्य व्हायचे असेल तर तुम्ही स्वतःला विसरले पाहिजे, स्वतःवरील लक्ष दूर केले पाहिजे आणि त्याला अनुसरले पाहिजे" असे येशू म्हणतो (पाहा मार्क.८:३४). हा भीतीदायक विचार आहे हे मला माहीत आहे, पण या प्रकारे जगण्याचा मी बरीच वर्षे प्रयत्न केला आहे, आणि त्याने फरक पडतो हे मला समजले आहे. येशू पुढे असे म्हणतो की, आपण जर आपले स्वार्थी जीवन सोडून दिले तर तो आपल्याला निःस्वार्थी जीवन देईल (पाहा मार्क.८:३५). आपण कसे जगावे यासंबंधी तो आपल्यासमोर पर्याय ठेवतो. कोणती गोष्ट चांगली, कार्यकारी आहे हे तो आपल्याला सांगतो आणि ती करण्याचे अथवा न करण्याचे स्वातंत्र्य तो आपल्याला देतो. मी स्वार्थी राहण्याची निवड करू शकते, तशीच तुम्हीही करू शकता, पण आपण तसे करण्याची गरज नाही ही चांगली बातमी आहे. आपल्या स्वतःवर विजयी होण्यासाठी आणि आणि दुसऱ्या कोणाचे तरी जीवन सुखी करण्यासाठी आपल्याला मदत करण्यास देवाचे सामर्थ्य आपल्यासाठी उपलब्ध आहे.

प्रवास

स्वार्थीपणा शिकावा लागत नाही. आपला जन्मच त्यासोबत होतो. तो आपल्या स्वभावाचा अविभाज्य भाग आहे. पवित्र शास्त्र त्याला "पापी स्वभाव" असे म्हणते. जे करू नका असे देवाने सांगितले ते करून आदाम आणि हव्वा यांनी त्याच्याविरुद्ध पाप केले. त्यांनी प्रस्थापित केलेले हे पापाचे तत्त्व जन्मणाऱ्या प्रत्येक मनुष्यामध्ये जन्मतः घातले गेले. देवाने त्याचा पुत्र येशू याला पापांसाठी मरण्यास आणि आपल्याला पापापासून सोडवण्यास पाठवले. आदामाने जे केले ते नष्ट करण्यासाठी तो आला. आपला तारणारा म्हणून आपण येशूचा स्वीकार करतो तेव्हा आमच्या आत्म्यांत राहण्यासाठी तो येतो, आणि नवीकरण झालेल्या आमच्या अंतरात्म्याला आम्ही निर्णय घेऊ देतो, तेव्हा आपल्या देहात असलेल्या पापी स्वभावावर आपण विजयी होतो. तो स्वभाव जात नाही, पण आमच्यामध्ये राहणारा जो मोठा आहे, सामर्थ्यशाली आहे तो त्याच्यावर विजयी होण्यास आपल्याला मदत करतो (पाहा गलती.५:१६). याचा अर्थ असा नाही की, आपण कधीही पाप करीत नाही, पण आयुष्यभर आपण सुधारणा करीत आणि प्रगती करीत राहतो.

माझ्या स्वार्थीपणावर मी पूर्ण विजय मिळवला आहे असे निश्चितार्थाने म्हणू शकत नाही, तसेच दुसरे कोणी असा दावा करणार नाही याची मला खात्री आहे. कारण असे म्हणणे म्हणजे आपण कधीही पाप करीत नाही असे म्हणणे होय, कारण सर्व पाप हे

कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या स्वार्थीपणात मुळावलेले असते. मी स्वार्थीपणावर पूर्ण विजय मिळवलेला नाही, पण त्यात रोज सुधारणा होण्याची मला आशा आहे. मी प्रवासात आहे, आणि जरी माझे उद्दीष्ट सफल झाले नाही, तरी मला घेऊन जाण्यासाठी येशू येईल तेव्हा मी माझे ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असल्याचे त्याला दिसेल (पाहा फिलिप्पै.३:१२-१३).

प्रेषित पौलाने पुढीलप्रमाणे विधान केले : "ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो" (गलती.२:२०). पौल असे म्हणत होता की, आता मी स्वतःसाठी जगून स्वतःची इच्छा पूर्ण करीत नाही, तर देवासाठी जगून त्याची इच्छा पूर्ण करतो. पौलाचे परिवर्तन झाल्यावर सुमारे वीस वर्षांनी त्याने हे विधान केले हे पवित्र शास्त्राचा अभ्यास करताना माझ्या लक्षात आले. हे समजल्यामुळे मला मोठे उत्तेजन मिळाले. निःस्वार्थीपणे जगायला शिकणे हा त्याच्यासाठी एक प्रवास होता, तसाच तो इतर सर्वांसाठी आहे. पौलाने असेही म्हटले, "मी रोज रोज मरतो" (१ करिंथ.१५:३१). दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे इतरांना प्राधान्य देणे हा रोजचा संघर्ष होता आणि त्यासाठी रोज निर्णय घेण्याची गरज होती. आपण कसे आणि कशासाठी जगणार आहोत याचा निर्णय आपण प्रत्येकाने घ्यायचा आहे. हे करण्यासाठी आतापेक्षा चांगली दुसरी वेळ नाही. तुम्हांला व मला जगण्यासाठी आणि देण्यासाठी एकच जीवन आहे म्हणून प्रश्न असा आहे की, "आपण कसे जगणार आहोत?" इतरांचे कल्याण करायला प्राधान्य देण्यामधील आपापली जबाबदारी आपण प्रत्येकाने पार पाडली तर जगाला बदललवण्याचे सामर्थ्य असलेली क्रांती आपल्याला पाहायला मिळेल आणि आपण तिचा भाग होऊ शकू असा माझा ठाम विश्वास आहे.

कोणताही मनुष्य म्हणजे एखादे बेट नाही

"कोणताही मनुष्य म्हणजे एखादे बेट नाही" ही जॉन डोन यांची सुप्रसिद्ध ओळ तुम्ही ऐकली असेल अशी माझी खात्री आहे. या शब्दांचा साधासरळ अर्थ असा आहे की, लोकांना एकमेकांची गरज असते आणि त्यांचा एकमेकांवर प्रभाव पडतो. माझ्या वडिलांच्या माझ्या जीवनावर नकारात्मक परिणाम झाला, आणि डेव्हच्या जीवनाचा माझ्यावर सकारात्मक परिणाम झाला, तसेच आपल्या जीवनांचाही लोकांवर प्रभाव पडू शकतो आणि पडतो. येशूने आपल्याला एकमेकांवर प्रीती करायला सांगितले, कारण केवळ याच एका मार्गाने तो आहे हे जगाला समजेल (पाहा योहान.१३:३४-३५). देव

प्रीती आहे, आणि आपण आपल्या शब्दांत व कृतीत प्रीती दाखवतो, तेव्हा देव कसा आहे हे आपण लोकांना दाखवतो. आपण देवाचे राजदूत, त्याचे वैयक्तिक प्रतिनिधी आहोत, आणि तो आपल्याद्वारे जगाला आवाहन करीत आहे असे पौलाने म्हटले (पाहा २ करिंथ.५:२०). या वचनाचा मी जेव्हा जेव्हा विचार करते तेव्हा केवळ एवढेच म्हणते, ''वा! वा! किती महान हक्क आणि जबाबदारी!''

जबाबदारीशिवाय हक्क मिळत नाही हा धडा मला माझ्या जीवनात शिकावा लागला. आज आपल्या समाजात असणाऱ्या अनेक समस्यांपैकी ही एक आहे. लोकांना अशा गोष्टी हव्या असतात, ज्यासाठी ते पात्र नाहीत. स्वार्थीपणा म्हणतो, ''ते मला दे, मला ते हवे आहे आणि आताच हवे आहे.'' सुज्ञता म्हणते, ''मला काहीही देऊ नको, ते व्यवस्थित हाताळण्यासाठी मी पुरेसा परिपक्व झालेलो/झालेली नाही.'' आपण कशासाठीही थांबवण्यास किंवा त्याग करण्यास तयार नाही, म्हणून जगात कृतज्ञतेचा अभाव आहे. ज्या गोष्टींसाठी मला अधिक कष्ट करावे लागले आणि अधिक प्रतीक्षा करावी लागली त्या गोष्टींसाठी मी अधिक कृतज्ञ आहे हे माझ्या लक्षात आले आहे. सहजपणे मिळणाऱ्या गोष्टींचे आपल्याला मोल नसते.

अनेक दृष्टीने पाहता, आपण स्वार्थी मुलांची पिढी वाढवत आहोत, कारण आपण त्यांना खूप गोष्टी खूप लवकर देतो. त्यांना सायकलवर बसता येण्यापूर्वीच आपण त्यांना सायकल घेऊन देतो किंवा ती सोळा वर्षांची झाल्याबरोबर त्यांना गाडी घेऊन देतो. त्यांच्या कॉलेजचा खर्च आपण करतो, त्यांचे लग्न झाल्यावर त्यांच्यासाठी घर खरेदी करतो आणइ ती घरे महागड्या फर्निचरने भरतो. नंतर आपली मुले जर आर्थिक संकटात सापडली, तर शक्यतो आपण त्यांना त्याच्यातून बाहेर काढतो. त्यांना आपली गरज असेल तेव्हा आपण त्यांच्यासाठी उपलब्ध असतो. या गोष्टी आपण प्रेमाच्या नावाखाली करतो, पण आपण खरोखरच आपल्या मुलांवर प्रीती करीत आहोत, की केवळ त्यांना लाडावून ठेवत आहोत? कधी कधी असे करण्याद्वारे आईवडील आपली मुले लहान असताना त्यांच्याबरोबर न घालवलेल्या वेळेची भरपाई करण्याचा प्रयत्न करतात. मुलांना पुष्कळ गोष्टी देण्याद्वारे त्यांची अपराधीपणाची भावना कमी होते, आणि पालकांकडे वेळ नसेल तर आपल्या मुलांना पैसे देण्याचा पर्याय त्यांना सोपा वाटतो.

आपल्या मुलांना आशीर्वादित करायला आपणा सर्वांना आवडते, पण त्यांच्यासाठी किती करायचे याबाबत आपण एक शिस्त पाळली पाहिजे. शलमोन आपल्याला ''सुज्ञतेने व्यवहार'' करायला सांगतो (पाहा नीती.१:३). कधी कधी ''नाही'' म्हणणे ही आपण आपल्या मुलांना दिलेली सर्वोत्कृष्ट देणगी होऊ शकते,

कारण त्यामुळे हक्क आणि जबाबदारी यांविषयीचा महत्त्वाचा धडा शिकायला त्यांना मदत होते.

आदर्श उदारता

केवळ आपल्या मुलांसमोर औदार्यपूर्ण जीवन जगू नका, तर तुमच्या संबंधात येणाऱ्या सर्वांसमोर उदारतेने वागा. जीवनात तुम्ही घेणाऱ्यापेक्षा देणारे असाल, तर त्यांच्या परिचयाच्या इतर लोकांपेक्षा तुम्ही वेगळे आहात हे लवकरच त्यांच्या लक्षात येईल. तुमचा आनंद ते पाहतात तेव्हा स्वार्थी असण्यापेक्षा देण्यामुळे व्यक्तीला आनंद मिळतो हे त्यांना समजते. लोक पाहत असतात, आणि त्यांच्या काय लक्षात येते आणि ते काय लक्षात ठेवतात ते पाहून मला आश्चर्य वाटते.

तुमचा निःस्वार्थीपणा, तुमची विचारशीलता, तुमची सहनशीलता सर्व लोकांनी पाहावी आणि त्यांना समजावी असे पौलाने म्हटले (पाहा फिलिप्पै.४:५). आमची चांगली कृत्ये पाहून लोकांनी देवाला ओळखावे व त्याचे गौरव करावे म्हणून येशू आपल्याला उत्तेजन देतो (पाहा मत्तय.५:१६). आम्ही केवळ लोकांना दाखवण्यासाठीच गोष्टी कराव्यात असे येशू म्हणत नव्हता; तर आपल्या सभोवताच्या लोकांवर आपण कसा प्रभाव पाडतो, कसा परिणाम घडवून आणतो ते समजून घेण्यास उत्तेजन देत होता. मी सांगितल्याप्रमाणे नकारात्मक वागणुकीचा इतरांवर परिणाम होतो, तसेच उदारताही आपल्या सभोवतालच्या लोकांवर सकारात्मक प्रभाव पाडते आणि आपल्याला आनंदीत करते.

माझ्याविषयी काय?

या क्षणी तुम्ही कदाचित असा विचार करीत असाल की, "माझ्याविषयी काय? माझ्यासाठी कोण काय करणार आहे?" आम्ही जसे जगावे असे देवाला वाटते तसे जगण्यापासून बरेचदा हाच दृष्टीकोना अडखळण होतो. नेहमी हा "मी" समोर येतो. माझ्याविषयी काय, माझ्याविषयी काय, माझ्याविषयी का? आपल्या स्वतःच्या इच्छा पूर्ण करण्याची आपल्याला इतकी सवय झालेली आहे की, स्वतःला केवळ एक दिवसासाठीदेखील विसरण्याची कल्पना आपल्याला भयावह वाटते. पण तसे करण्यासाठी आपण जर धैर्य एकवटू शकलो, तर त्यामुळे मिळणारी मोकळीक व आनंद पाहून आपण आश्चर्यचकित होऊ.

आयुष्याचा बराच काळ मी रोज सकाळी उठल्यावर आपल्या बिछान्यातच पडून राहत असे, आणि स्वतःसाठी योजना आखत असे. मला काय पाहिजे, माझ्यासाठी सर्वांत चांगले काय आहे, आणि माझ्या योजनेला सहकार्य करण्यासाठी मी माझ्या कुटंबियांची आणि इष्टमित्रांची समजूत कशी काढू शकेन याविषयी मी विचार करीत असे. उठल्यानंतर माझा दिवस केवळ माझ्यावरच केंद्रित झालेला असे. माझ्या इच्छेप्रमाणे गोष्टी झाल्या नाहीत, तर मी अस्वस्थ, निराश होत असे, आणि कधी रागावतही असे. मला जे हवे ते न मिळाल्याने मी दुःखी होत असे, पण खऱ्या अर्थाने मी दुःखी होण्याचे कारण म्हणजे इतरांचा विचार न करता मी केवळ मला जे हवे ते मिळवण्याचा प्रयत्न करीत असे.

पण आपले जीवन राखून ठेवण्यापेक्षा ते देणे हे आनंदाचे रहस्य आहे हे समजल्यापासून माझी सकाळ अगदी निराळी असते. आज सकाळी, हे प्रकरण लिहिण्यापूर्वी मी प्रार्थना केली, नंतर आज माझ्या संपर्कात येणाऱ्या सर्व लोकांविषयी मी थोडा वेळ विचार केला. मग रोम.१२:१ मधून मी प्रार्थना केली. हे वचन जिवंत यज्ञ म्हणून स्वतःला देवाला अर्पण करण्याविषयी सांगते. आपले सर्व गुण, सर्व कौशल्ये, सर्व अवयव सर्व काही देवाच्या गौरवासाठी देणे. आज ज्या लोकांबरोबर मी काम करणार आहे किंवा ज्यांना भेटणार आहे त्यांच्याविषयी विचार करीत असताना मी देवाला म्हटले की, त्यांच्यासाठी मला काय करता येईल ते मला दाखव. त्यांना उत्तेजन देण्याचा, त्यांचे कौतुक करण्याचा मी निश्चय केला. आपल्याला भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची तारीफ करण्यासारखी एखादी तरी गोष्ट निश्चितच आपल्या लक्षात येईल. असे केले तर स्वतःवरील लक्ष दूर करण्यास मदत होईल. आज दिवसभर देव मला मार्गदर्शन करील असा विश्वास मी बाळगते.

इतरांवर प्रीती करण्यास आणि मदत करण्यासाठी देवाने तुमचा उपयोग करावा म्हणून तुम्ही स्वतःचे समर्पण करू इच्छिता तर तुम्ही पुढीलप्रमाणे प्रार्थना करावी असे मी सुचवते : "देवा, मी माझे डोळे, कान, तोंड, हात, पाय, अंतःकरण, पैसे, देणग्या, कलाकौशल्ये, क्षमता, वेळ आणि शक्ती तुला समर्पित करतो. आज मी जेथे जाईन तेथे आशीर्वाद होण्यासाठी तू माझा उपयोग करून घे."

"देवा, मी माझे डोळे, कान, तोंड, हात, पाय, अंतःकरण, पैसे, देणग्या, कलाकौशल्ये, क्षमता, वेळ आणि शक्ती तुला समर्पित करतो. आज मी जेथे जाईन तेथे आशीर्वाद होण्यासाठी तू माझा उपयोग करून घे."

जोपर्यंत तुम्ही असे जगण्याचा प्रयत्न करीत नाही, तोपर्यंत यातील आनंद तुम्हांला समजणार नाही. मी याला "पवित्र सवय" म्हणते, आणि इतर सर्व सवयींप्रमाणे हिचाही सराव केला पाहिजे. एखाद्या दिवशी मी पुन्हा स्वतःमध्ये गुंतून पडते आणि माझ्या नवीन सवयीचा सराव करायला विसरते, पण माझा जीवनाविषयीचा आनंद आणि उत्साह मावळतो तेव्हा मला ताबडतोब तिची आठवण होते आणि मी पुन्हा एकदा योग्य रस्त्यावर येते.

अशा प्रकारे जगण्याचा प्रयत्न मी बऱ्याच वर्षांपासून करीत आहे. "स्वकेंद्रित" जीवन आपल्या रोमारोमात भिनलेले असते, ते सहजासहजी मरत नाही. मी प्रीतीविषयी पुस्तके वाचली आहेत, पवित्र शास्त्र प्रीतीविषयी काय म्हणते ते समजून घेण्यासाठी मी ते पुनःपुन्हा वाचले आहे, त्याविषयी प्रार्थना केली आहे, मित्रांशी त्याविषयी चर्चा केली आहे, त्याविषयी संदेश दिले आहेत, आणि माझ्या विचारांत तिला प्राधान्य असावे म्हणून मी शक्य ते सर्व प्रयत्न केले आहेत. मी पुन्हा स्वार्थीपणाने वागत आहे याची जाणीव झाल्यावर मी अस्वस्थ होत नाही, कारण त्यामुळे मी स्वतःमध्येच गुंतून राहीन. मला अपयश येते तेव्हा मी देवाकडे क्षमा मागते आणि पुन्हा नव्याने सुरुवात करते. मला वाटते की हाच सर्वांत चांगला मार्ग आहे. आपण केलेल्या चुकांमुळे स्वतःविषयी वाईट वाटून घेण्यात आपण खूप वेळ घालवतो - आणि हा वेळेचा अपव्यय आहे. केवळ देव आपल्याला क्षमा करू शकतो आणि जर आपण त्याच्याकडे क्षमा मागू तर तो करायला तयार आहे.

होय, स्वार्थीपणा हे जगाच्या समस्येचे मूळ आहे असा माझा ठाम विश्वास आहे, पण जगात राहूनही जगासारखे न राहणे शक्य आहे. प्रीतीच्या क्रांतीमध्ये तुम्ही माझ्यासोबत सहभागी झाला, तुमच्या जीवनशैलीमध्ये तुम्ही आमूलाग्र बदल घडवून आणला आणि प्रीती करून घेण्याऐवजी प्रीती करणारे आक्रमक जीवन जगू लागला, तर समस्येचा भाग होण्याऐवजी तुम्ही उत्तराचा भाग व्हाल. सुरुवात करण्यासाठी तुम्ही तयार आहात का?

प्रकरण

3

कोणतीही चांगली गोष्ट योगायोगाने घडत नाही

"...तुला ठीक दिसले; मी आपले वचन
पूर्ण करण्यास सावध राहीन."
यिर्मया १:१२

जगाला बदलणारी कोणतीही क्रांती अचानक अपघाताने घडली नही. काही घटनांच्या वेळी, थोडेसे लोक एकत्र येऊन आवश्यक असलेल्या बदलांविषयी बोलू लागले, आणि त्यांची सुरुवात झाली. इतिहास घडवणाऱ्या या घटना, मग त्या सर्वसाधारण अस्वस्थतेतून किंवा योजनाबद्ध बंडाळीमधून जन्माला येऊ द्या, त्या आपोआप घडलेल्या नाहीत. त्या मुद्दाम, हेतूपुरस्सर, आवेशाने आणि नियोजनपूर्ण रीतीने घडविलेल्या होत्या. काहीही न करण्याचे कोणी तरी ठरवले म्हणून; "गोष्टी किंवा घटनांना त्यांच्या पद्धतीने हळूवारपणे उलगडू देण्यास" कोणी तरी नकार दिला म्हणून; अन्यायाने थैमान घातले असताना कोणी तरी उदासीन आणि निष्क्रिय राहण्याचे नाकारले म्हणून त्या घटना घडून आल्या. कोणीतरी कृती करण्याचा निश्चय केला म्हणून क्रांती घडून आल्या.

आताच कृती करा

आपण क्रियाशील राहण्यासाठीच्या सूचनांनी बायबल भरलेले आहे. आपण उदासीन राहण्याऐवजी क्रियाशील राहण्यासंबंधीच्या सूचना या साध्यासोप्या आहेत, पण असंख्य लोक त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्षच करतात. कदाचित त्यांना वाटते की, या गोष्टी आपोआप सुधारतील. त्या सुधारणार नाहीत. कोणतीही चांगली गोष्ट आपोआप घडत नाही. एकदा हे मला समजले की, मग माझ्या जीवनात चांगली सुधारणा होईल.

कशाविषयी तरी फक्त विचार करून इच्छित परिणाम साध्य होऊ शकत नाहीत. पण साध्य करण्यासाठी आपण हिरीरीने योग्य ती कृती करणे आवश्यक आहे. यश मिळवण्याच्या फक्त इच्छा करत आपले आयुष्य घालवले आणि सरतेशेवटी ते मिळवले असा एकही यशस्वी मनुष्य तुम्हांला सापडणार नाही. काहीही न करता यशस्वी झालेला असा एकही माणूस आपल्याला सापडणार नाही. हेच तत्त्व प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होण्यासंदर्भात लागू होते. येशूने शिकविल्याप्रमाणे आपल्याला इतर लोकांवर प्रीती करायची असेल तर आपण स्वतः त्या उद्देशाने सुरुवात करावी लागेल. ते अपघाताने घडणार नाही.

बायबल सांगते की, दयाळू आणि चांगले बनण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे (पाहा १ थेस्सल.५:१५). "प्रयत्न करणे" हा एक जोमदार वाक्यप्रचार आहे. जर आपण संधी शोधल्या तर त्या निश्चितपणे आपल्याला मिळतील आणि त्यामुळे आपण निष्फळ आणि रिकामे बसणार नाही. आपण सावधचित्त आणि क्रियाशील आहोत, की उदासीन आणि निष्क्रिय आहोत ते आपण स्वतःला विचारले पाहिजे. देव तर सतर्क आणि क्रियाशील किंवा कार्य करणारा असाच आहे! तो तसा आहे म्हणून मला आनंद वाटतो; नाही तर आपल्या जीवनातल्या गोष्टी वेगाने नाश पावल्या असत्या. देवाने फक्त जगाची आणि आपण जे सर्व पाहतो आणि आस्वादतो त्या सर्वांची निर्मितीच केली नाही तर तो त्याची देखभालही करतो, कारण त्याला ठाऊक आहे की, चांगल्या गोष्टी आपोआप अस्तित्वात येत नाहीत; योग्य कृतीचा परिणाम म्हणून त्या घडून येतात (पाहा इब्री.१:३).

देवाने उद्युक्त केलेल्या समतोल कृती आपल्याला आळशी आणि निष्फळ बनू देणार नाहीत आणि त्या आपले संरक्षण म्हणूनही कार्य करतील. योग्य गोष्टी करीत जागृत राहणे आपल्याला चुकीच्या गोष्टी करण्यापासून दूर ठेवील. जे चुकीचे आहे ते करण्यासाठी आपल्याला जास्त श्रम करावे लागत नाही, योग्य ते करण्याचा आपण स्वतः प्रयत्न केला नाही तर आपला नैसर्गिक स्वभाव वाईट किंवा योग्य तेच करण्याकडे आकर्षित होईल.

उदा. रोग व्हावा याची आपण निवड करावी लागत नाही; फक्त त्या रोगाच्या प्रभावक्षेत्राच्या आसपास आपण राहिलो की आपल्याला तो होतोच. पण आरोग्य आपण निवडून घ्यावे लागते. निरोगी राहण्यासाठी मला सतत चांगले अन्न, झोप आणि व्यायाम यांची निवड करावी लागते. काळजी, चिंता न करण्याची किंवा करण्याची मी निवड केली पाहिजे. कारण मला माहीत आहे की, त्यामुळे मी थकून जाईन आणि मला इतर काही शारीरिक समस्या निर्माण होतील. निरोगी राहण्यासाठी, मी माझ्या शरीरप्रकृतीकडे निश्चितार्थाने लक्ष दिले पाहिजे, पण स्वतःकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून मी सहज आजारी होऊ शकतो.

शरीर आळशी आहे

प्रेषित पौल आपल्याला स्पष्टपणे शिकवतो की, शरीर (देह) हे आळशी, वासनाखोर आणि अनेक पापी गोष्टींची इच्छा बाळगणारे आहे (पाहा रोम.१३:१४). प्रभूदेवाचे आभार मानू कारण आपण देहापेक्षा अधिक आहोत. आपल्याला आत्मा आहे आणि ख्रिस्ती व्यक्तीच्या क्षणिक भागामध्येच देवाचा स्वभाव राहतो. देव चांगला आहे आणि तो आपल्यामध्ये राहतो म्हणजे आपल्यामध्ये चांगुलपणाच वस्ती करतो. आपल्या आत्म्याद्वारे आपण देहावर अधिकार चालवू शकतो आणि त्याला शिस्त लावू शकतो - पण त्यासाठी परिश्रम करण्याची गरज आहे. त्यासाठी पवित्र आत्म्यासोबत सहकार्य करण्याची गरज आहे; तोच आपल्याला चांगल्या गोष्टी करण्यासाठी शक्ती देतो. पौल म्हणतो आपण देहाला पुरवठा करू नये आणि माझा विश्वास आहे की, काहीही न करण्याद्वारे आपण त्याला पुरवठा करतो.

काहीही न करणे ह्याची सवय लागू शकते. जितके अधिक आपण काही करणार नाही तितके अधिक आपल्याला काहीही करावेसे वाटणार नाही. माझी खात्री आहे की, एखाद्या दिवशी घरामध्ये उगाचच लोळत राहण्याचा तुम्ही अनुभव घेतला असेल, जितके अधिक तुम्ही लोळत पडाल तितके अधिक उठणे तुम्हांला अवघड जाईल. तुम्ही उठल्यानंतर सुरुवातीला सर्व काही कठीण आणि जड वाटेल पण जसजसे तुम्ही स्वतःहालचाल करीत राहाल तसतसा तुमचा उत्साह वाढत जाईल.

आज मी काहीशा निरुत्साही स्थितीतच जागी झाले. गेल्या सप्ताहाच्या शेवटी मी एका परिषदेमध्ये खूपच कष्ट केले आणि अजूनही मला काहीसा अशक्तपणा जाणवत आहे. त्यासोबतच ज्याविषयी मी आशा बाळगून होते अशा एका गोष्टीमध्ये मला निराशाच प्राप्त झाली होती. मला वाटते होते कोचावर पडून राहावे आणि स्वतःबद्दल

दुःख करत बसावे, पण मला गेल्या अनेक वर्षांचा हा चांगला अनुभव असल्याने आणि ते निष्फळ असल्याचे माहीत असल्याने, मी दुसरी निवड करण्याचे ठरवले. मी हे प्रकरण लिहायला बसले. शरीराला जसे वाटते त्याच्याविरुद्ध युद्ध करण्याची ही माझी पद्धत आहे. जितका अधिक काळ मी लिहिते तितके अधिक मला बरे वाटते.

एखाद्या परिस्थितीमध्ये आपले शरीर आपल्याला आळशीपणाची भुरळ घालत असेल, तर त्यावर विजय मिळवण्यासाठी देवाचे सहाय्य मागून आपण विजय मिळवला पाहिजे आणि आळशी न राहता क्रियाशील राहण्याचा निश्चय केला पाहिजे. त्यानंतर मग आपण पुढे जाऊ आणि आपल्या निर्णयानुसार कार्य करू तेव्हा आपल्याला समजेल की आपल्या भावना त्यांच्यासोबत जुळल्या गेल्या आहेत. देवने मला शिस्तीचा आणि संयमनाचा आत्मा दिला आहे तो या आजसारख्या दिवसासाठीच, पण त्याने जे मला दिले आहे ते मी उपयोगात आणते की माझ्या देहाच्या इच्छेनुसार चालते ते माझ्या निवडीवर किंवा निर्णयावर अवलंबून आहे.

ज्यांनी ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणून स्वीकारले आहे, पण आत्मिक प्रौढता घडविण्यासाठी पवित्र आत्म्यासोबत कार्य केले नाही, अशा "दैहिक ख्रिस्ती" लोकांविषयी पौलसुद्धा लिहितो. १ करिंथ.३:१-३ या वचनांमध्ये पौल ख्रिस्ती लोकांना सांगतो की, अधार्मिक, दैहिक लोक ज्यांच्यावर दैहिक स्वभावाचा पगडा आहे अशा लोकांशी बोलावे त्याप्रमाणे त्या ख्रिस्ती लोकांशी त्याला बोलावे लागते. तो त्यांना अधिक प्रभावशाली अशा गोष्टी शिकवू शकत नव्हता, तर ज्यांना "दुधाचे संदेश" म्हणता येईल अशा प्राथमिक गोष्टींवरच त्याला भर द्यावा लागत होता. सर्वसाधारण भावनिक उद्दीपणांना तुम्ही स्वतःवर नियंत्रण घेऊ देता का? आज मी स्वतः या सर्वसाधारण भावनिक उद्दीपनांच्या आहारी जाण्याच्या मोहात होते. प्रामाणिकपणे सांगू का, आज पूर्ण दिवसभर काही ना काही काम करत राहून मला त्यांना विरोध करत राहावे लागले. माझा विश्वास आहे की, त्यातून चांगले फळ प्राप्त होईल. मला माझ्या भावनांच्या आहारी जाणे परवडणारे नाही, कारण माझ्याकडे वाया घालवण्यासाठी एकही दिवस नाही.

उदासीनतेला कोणतेही पारितोषिक नाही

आमच्यापैकी कोणालाही व्यर्थ बसून आपला दिवस वाया घालवणे परवडणार नाही. देव उदासीनतेला पारितोषिक देत नाही. उदासीन लोक त्यांना योग्य वाटणाऱ्या गोष्टी करण्यासाठी त्यांची इच्छा वापरत नाहीत. त्याउलट त्यांना काही करावेसे वाटेपर्यंत ते

थांबून राहतात किंवा कोणत्या तरी अद्‌भुत अशा बाह्य शक्तीने उत्तेजन देईपर्यंत ते वाट पाहत बसतात. त्यांची इच्छा असते की, विशेषतः त्यांच्या बाबतीत, काहीतरी चांगले घडावे आणि ते घडलेले पाहीपर्यंत काहीही न करण्याचा त्यांचा निश्चय असतो. अशा दृष्टीकोनाची देव वाहवा करीत नाही; प्रत्यक्षात हे अत्यंत धोकादायक ठरते.

काहीही न करण्याचा निर्णय हाही एक निर्णयच असतो आणि हा निर्णय असा असतो जो आपल्याला अशक्त आणि अशक्तच बनवतो. आपल्याला नियंत्रित करण्याची सैतानाला यातून अधिकाधिक संधी प्राप्त होते. रिकामी जागा हीसुद्धा जागाच असते. देवाचे वचन आपल्याला शिकवते की, सैतानाने येऊन रिकामी जागा पाहिली तर तो लगेच ती ताब्यात घेतो (पाहा मत्तय.१२:४३.४४). जे काही चालले आहे त्याला निष्क्रियतेतून आपण सहमतीच दर्शवतो. ते बदलण्यासाठई जर आपण काहीच करत नसू, तर मग आपण हे मानलेच पाहिजे की जे काही घडत आहे ते ठीकच आहे.

काहीतरी करा

अत्यंत गरजवंत अशा लोकांमध्ये सेवा करण्यासाठी आम्ही निरनिराळ्या लोकांना मिशनरी फेऱ्यांवर घेऊन जात असतो. पण त्यांच्यापैकी सर्वचजण सारखाच प्रतिसाद देत नाहीत. आफ्रिका, भारत किंवा जगाच्या इतर भागांमध्ये लोक ज्या भयानक स्थितीमध्ये जीवन जगतात ते पाहून प्रत्येकालाच तयंची कणव येते. अनेकजण रडतात, अनेकजण आपली डोकी हालवतात आणि ही परिस्थिती भयंकर आहे असा विचार करतात, पण ही परिस्थिती बदलण्यासाठी काही करावे असा विचार ते करीत नाहीत. प्रभूने काहीतरी करावे म्हणून अनेकजण प्रार्थना करतात आणि काहीतरी करण्याची आपली सेवा आहे याचे समाधान मानतात. तरीही ते स्वतः काय करू शकतात याबाबत ते अधिक आवेशाने प्रभूचे मार्गदर्शन मिळवण्याचा प्रयत्न करीत नाहीत. अधिक धैर्य करून मी असे म्हणेन की त्यांच्यापैकी अनेकजण घरी परत जातात, आपल्या स्वतःच्याच जीवनात पुन्हा व्यस्त होऊन जातात आणि आपण काय पाहिले ते लवकरच विसरून जातात. पण प्रभूचे आभार मानू की, असे काहीजण असतात की जे वेगळे काहीतरी करण्यासाठी मार्ग शोधण्याचा निश्चय करतात. लक्षात ठेवा : अलिप्तता निमित्त शोधते, पण प्रीती मार्ग शोधते. प्रत्येकजण काहीतरी करू शकतो!

लक्षात ठेवा : अलिप्तता निमित्त शोधते, पण प्रीती मार्ग शोधते!

मला एक स्त्री आठवते. तिने ठरवले कोणत्या तरी मार्गाने मदत करायचीच! नेमके काय करावे ते काही काळ तिला सुचेना, कारण देण्यासाठी तिच्याकडे जास्तीचे पैसे नव्हते अगर मिशन सेवाक्षेत्रावर जाऊन राहणे तिला शक्य नव्हते. या परिस्थितीसंबंधी ती प्रार्थना करीत राहिल्यानंतर, देवाने तिला तिच्याकडे जे नाही त्याऐवजी तिच्याकडे जे आहे त्याकडे लक्ष देण्यास उत्तेजन दिले. तिच्या लक्षात आले की, ती खूप चांगली बिस्किटे, केक आणि तत्सम पदार्थ बनवू शकते. तिने तिच्या पाळकांना विचारले की, आठवडाभर ती असे पदार्थ तयार करून रविवारी उपासनेनंतर विकू शकेल का? कारण तो पैसा प्रभूच्या मिशनसेवाकार्यालाच जाणार होता. तिच्यासाठी आणि मंडळीच्या इतर सभासदांसाठी सुद्धा मिशनकार्यात सहभागी होण्याचा तो एक मार्ग बनला आणि कोणाला तरी मदत करण्यासाठी काहीतरी करण्यामध्ये ती कार्यरत राहू शकली.

मला अशीच आणखी एक स्त्री ठाऊक आहे जिला काहीतरी करण्याची तीव्र इच्छा होती. म्हणून तिने आपले सुंदर केस कापले आणि ते विकून अनाथ मुलांना मदत केली. हे काहीसे अतिरेकी वाटेल पण मी हे नक्कीच म्हणेन की काहीच न करण्यापेक्षा हे चांगले आहे. काहीच न करणे धोकादायक आहे, कारण त्यामुळे आपल्या जीवनात कार्य करण्यासाठी सैतानाला दार उघडले जाते.

आणखी एका स्त्रीची मी मुलाखत घेतली, ती 'मसाज' करणारी होती. इतरांपर्यंत पोहोचण्यासाठीच्या आमच्या काही गरजांचा उल्लेख मी त्या मुलाखतीमध्ये केला. आमच्या एका परिषदेला ती उपस्थित होती. त्यानंतर तिने एक खास दिवस आयोजित केला आणि त्या दिवसाचे सर्व उत्पन्न गरीब लोकांसाठी समर्पित केले. तिने एक हजार डॉलर्स गोळा केले आणि साक्ष दिली की हा देण्याचा दिवस तिच्यासाठी आणि ज्यांनी त्यामध्ये सहभाग घेतला त्यांच्यासाठी एक जीवन बदलणारा अनुभव ठरला. गरजवंत आणि गरीबांना मदत करण्यासाठी एकत्र काम करताना सर्वचजण किती उत्साहित बनले होते त्याची साक्ष तिने दिली.

आम्हा प्रत्येकालाच प्रेमाची गरज आहे, पण मी विश्वास ठेवते की आमचा वैयक्तिक आनंद हा खूपच प्रभावीपणे इतरांवर प्रेम करण्याशी निगडीत आहे. आपण देतो तेव्हा आमच्या हृदयात काहीतरी सुंदर घडते.

निष्क्रियता शत्रूला आमंत्रित करते

कोचावर पडून राहणे किंवा आरामखुर्चीवर मागे रेलून बसून राहणे आणि जे काही करायचे आहे त्याची तूच काळजी घे असे देवाला म्हणणे सोपे आहे. आपल्या मनात

चांगले विचार नसतील तर सैतान सहजपणे ते वाईट विचारांनी भरील. आपण आळशी आणि निष्क्रिय राहिलो तर तो आपल्याला सहजच चुकीच्या आणि पापी गोष्टी करण्यासाठी भुरळ घालील. बायबल आपल्याला सतत क्रियाशील राहण्यास सांगते, कारण त्यामुळे आपण आळशी आणि निष्फळ राहणार नाही. जर आपण दुसऱ्यांसाठी काय करता येईल याचा आवेशाने विचार करीत राहिलो तर आपल्या मनात वाईट विचारांना जागाच राहणार नाही.

निरुद्योगी लोक लवकर हताश, निराश होतात आणि स्वतःची कीव करू लागतात. ते सर्व प्रकारच्या पापांत सहज पडतात. प्रेषित पौलाने स्पष्टपणे सांगितले की जर एखादी तरुण स्त्री विधवा बनली तर तिने पुन्हा विवाह करावा. नाही तर ती निरुद्योगी गप्पा मारणारी आणि लुडबुडी बनेल (पाहा १ तीमथ्य.५:११-१५). पौल आणखी पुढे जाऊन असे सांगतो की काही तरुण विधवा त्यांच्या निरुद्योगीपणामुळे सैतानाच्या मागे जाणाऱ्या बनल्या आहेत. कार्यरत राहणे किती आवश्यक आहे? माझा विश्वास आहे की पौलाच्या लिखाणातून त्याचे महत्त्व अधिक पटते.

प्रत्यक्षात देवाच्या सर्व वचनांमध्ये आपल्याला निरुद्योगी न राहण्याविषयी उत्तेजन दिलेले आहे. जुन्या कराराच्या काळात एखादी व्यक्ती मृत्यू पावल्यावर तिच्या प्रियजनांनाच फक्त तीस दिवस दुःख करण्याची परवानगी दिली होती (पाहा अनु.३४:८). प्रथमदर्शनी हे सहानुभूतीशून्य वाटेल, पण देवाने हा नियम केला कारण त्याला माहीत होते की, हा दुःख करण्याचा आणि निष्क्रियतेचा काळ लांबला तर त्यातून गंभीर समस्या निर्माण होतील.

आपण काम करीत राहिले पाहिजे - अगदीच जास्तीचे करू नये नाही तर आपण प्रमाणाबाहेर दमून जाऊ - आपल्याला योग्य दिशा मिळेल इतक्या प्रमाणात आपण व्यस्त राहिले पाहिजे. संतुलन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. इतरांनाच मदत करण्यात आपण आपला सर्व वेळ खर्च करू शकत नाही, पण दुसऱ्या बाजूला, आपण त्यासाठी काहीच वेळ दिला नाही तर मोठे प्रश्न निर्माण होतील. तुमच्या माहितीतील अशा कोणा व्यक्तीचा तुम्ही विचार करा, जी निरुद्योगी, निष्क्रिय आणि उदासीन आहे; तुमच्या हेही लक्षात येईल की ती व्यक्ती तिच्या निष्क्रियतेमुळे आनंद हरवून बसलेली आणि खूपच निराश असलेली अशी आहे.

काही वर्षांपूर्वी माझ्या आंटीला मदतनीस असलेल्या ठिकाणी राहायला जायचे होते. पहिली तीनचार वर्षे तिला काहीच करायला नको होते. तिला तिचे घर सोडावे लागले म्हणून ती दुःखी होती आणि तिला मिळालेल्या तिच्या नवीन जीवनाच्या

वातावरणाशी जुळवून घेण्याची तिची मुळीच इच्छा नव्हती. तेथे करण्यासारख्या बऱ्याच गोष्टी उपलब्ध होत्या आणि इतरांना मदत करण्याच्या पुष्कळ संधीही उपलब्ध होत्या, तरी काहीही न करण्याचेच तिने ठरवले. दिवसेंदिवस ती तिच्या घरामध्ये बसून राहत असे आणि खूपच खचून गेली होती. शारीरिकदृष्ट्याही तिला समस्या जाणवू लागल्या आणि तिला जगणे कठीण जाऊ लागले. सरतेशेवटी तिने निर्णय घेतला की ती अशी काही न करता बसून राहणार नाही; आणि ती बायबल अभ्यासामध्ये सहभागी होऊ लागली, तेथील दवाखान्यात भरती झालेल्या रुग्णांना भेटी देऊ लागली. ती खेळ खेलू लागली. कार्यक्रमांना जाऊ लागली आणि तिने खूप मैत्रिणी मिळवल्या. लवकरच ती मला सांगू लागली की, तिच्या जीवनात पूर्वी कधी नव्हती एवढी ती आनंदी आहे आणि शारीरिकदृष्ट्याही एकदम उत्तम आहे.

निष्क्रिय व्यक्तीची वाटचाल वाईटाकडून अधिक वाईटकाडेच होते आणि हळूहळू तिच्या जीवनाच्या सर्वच भागांना ग्रासून टाकते. ती तिच्या परिस्थिती आणि वातावरणाद्वारे पुढे मागे असे खेळवले जाण्यास मुभा देते. आपल्या भावनांना स्वतःला चालवू देते आणि तिला काहीच करावेसे वाटत नसल्याने, त्यांचे जीवन उद्ध्वस्त होताना ते फक्त पाहत बसतात आणि तक्रारी करतात. त्यांना पुष्कळ गोष्टी करायच्या असतात, पण जवळजवळ व्यक्त करू न शकणाऱ्या भावनांनी ते ग्रासलेले असतात. त्यांना सर्वच गोष्टींचा आळस येतो आणि कोणत्याही गोष्टीत त्यांना उत्साह वाटत नाही. त्यांना असेही वाटू लागते की, त्यांना काही शारीरिक दुर्बलता आहे आणि म्हणूनच त्यांच्यात शक्ती नाही. त्यांच्यासाठी जीवन हे कधीही पार करू न शकणाऱ्या समस्यांची मालिकाच ठरते.

एखादे मोठे अपयश किंवा निराशेची मालिकी अनुभवल्यानंतर किंवा एखादी दुःखद घटना अनुभवल्यानंतर पुष्कळदा आपण स्वतःला निष्क्रिय बनवतो; त्याविषयी या प्रकरणाच्या शेवटी मी लिहिणार आहे. जेव्हा अशा गोष्टी घडतात तेव्हा आपल्याला सर्व काही सोडून द्यावेसे वाटते, पण जेव्हा आपण तसे करतो तेव्हा सैतान आपल्यावर झडप घालून परिस्थितीचा फायदा उठवायला टपूनच बसलेला असतो. आपण कोणत्याही कारणाने उदासीनतेद्वारे शत्रूला आपल्या जीवनात संधी देऊ नये.

क्रियाशील राहण्याने मला वाईट दिवसावर मात करता येते

आज मी माझा "वाईट दिवस" अनुभवत असताना, जगात असे लाखो लोक आहेत जे असा विचार करतील की ज्या गोष्टींना ते तोंड देत आहेत त्यामानाने मी आज सणच

साजरा करत आहे. गेल्या दोन दशकांपेक्षा अधिक काळापासून स्वतःला "लॉर्डस् रेझिस्टन्स आर्मी" (देवाची विरोधी सेना) असे म्हणवून घेणाऱ्या गनिमी सेनेच्या युद्धामध्ये लढण्यासाठी लहान मुलांना सैनिक बनवून गुलामगिरीत बांधले जात आहे. या गनिमी सेना उत्तर युगांडामध्ये आहेत; ते लोक अगदी सात वर्षे वयाच्या लहान बालकांनाही बळजबरीने सैनिक अथवा लैंगिक गुला बनवतात, आणि इतर गलिच्छ कामे करण्यासाठी सुद्धा वापरतात. काही आकडेवारी सांगते की, सुमारे तीस ते चाळीस हजार बालके अशा रीताने गुलामगिरीत आहेत. स्थानिक सरकारच्या विरुद्ध बंड म्हणून सुरू झालेले हे युद्ध असंख्य निरपराधी लोकांचा कत्तलखाना बनले. ही कत्तल अशा एका सेनाधिकाऱ्याकडून केली जात आहे की जो दावा करतो की, दहा आज्ञांवर आधारित समाज घडवण्याचा त्याचा उद्देश आहे, आणि ते करताना तो त्यापैकी प्रत्येक आज्ञा मोडत आहे.

हा मनुष्य, जोसेफ कोनी, एके काळी कॅथलिक चर्चमध्ये वेदीवर सेवा करणाऱ्यांचा सहाय्यक मुलगा म्हणून काम करायचा. आता त्याने जुना करार, कुराण आणि पारंपरिक आदिवासी धर्म यांची भेसळ करून स्वतःचेच एक तत्त्व बनवले आहे. त्याच्या सर्व युक्त्या या क्रूरच आहेत. हे लिहित असताना शस्त्रसंधी जाहीर झाली आहे, आणि अनेक बालकांना मुक्त केले गेले आहे, पण त्यांपैकी अनेकांचे आईवडील ठार केले गेले आहेत, त्यामुळे त्यांना परत जाण्यासाठी घरच राहिलेले नाही. अनेक बालकांना जबरदस्तीने मादक द्रव्यांची सवय लावण्यात आली आहे आणि ते पूर्णपणे व्यसनी बनले आहेत. त्यांना जबरदस्तीने अशी हिंसक कृत्ये करण्यास भाग पाडले जाते. लहानांच्याच नाही तर मोठ्यांच्या बाबतीतही ती अविश्वसनीय ठरावीत. लहान मुलांना त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला गोळ्या घालून ठार करण्यास भाग पाडण्यात आले. आता ते काय करणार? त्यांनी जे कृत्ये केले ते विसरण्याचा प्रयत्न करीत आक्रोशाने भरलेल्या रस्त्यावरून ते भटकत राहतात. त्यांना मदत हवी असणार आणि मी आज प्रार्थना करू शकते आणि देवाला म्हणू शकते की, माझा उपयोग कर. आताच ज्यांचे वर्णन केले तशा लोकांचा, ज्यांना खरोखरच समस्या आहेत अशा लोकांचा विचार करण्यासाठी मी माझे मन इतर गोष्टींवरून दूर करू शकते.

युगांडाला जाण्याची मला संधी मिळाली तेव्हा तेथील लोकांचे ते निराशेने भरलेले भकास चेहरे अजूनही माझ्या चांगलेच लक्षात आहेत आणि त्यांना मदत पाठवण्यासाठी मी शक्य ते सर्व करीत राहीन. मी प्रथम तेथे गेले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यांवर दिसणारा राग घालवून त्यांवर हास्य निर्माण करण्यासाठी शक्य ते सर्व करण्याची मी कल्पना करते. नवीन गाव वसवण्यासाठी आम्ही त्यांना मदत केल्यावर आणि तेथे त्यांना नवीन

दत्तक पालक, चांगले अन्न, प्रेम आणि शिक्षण यासोबतच येशूबद्दलचे सत्य शिक्षण आणि त्याची त्यांच्या जीवनासंबंधीची योजना हे सर्व मिळाल्यावर त्यांचे जीवन कसे बनले याची मी कल्पना करू शकते.

बालसैनिक

"कृपा करून देवा, आणखी खून नको. आज तर नकोच. मी यापेक्षा अधिक पाहू शकत नाही." अशा रीतीने प्रार्थना केली गेली.

दूर ऐकू येणाऱ्या किंकाळ्या, कानठळ्या बसविणारे बंदुकीच्या गोळ्यांचे आवाज ॲलन ऐकत होता आणि तीव्र भीतीने त्याला ग्रासून टाकले. या आवाजांचा अर्थ त्याला खूपच चांगला ठाऊक होता. तो कसा विसरू शकेल? ते तसेच आवाज होते, ज्या दिवशी सैनिक त्याच्या गावामध्ये घुसले आणि बळजबरीने हाणमार करून त्यांनी त्याच्या आईवडिलांना ताब्यात घेतले. त्यानंतर इतर बंदिवानांना दहशत बसावी म्हणून त्यांच्यावर क्रूरपणे प्रहार करून ठार केले.

त्या भयानक दिवशी बंडखोरांनी ॲलनला मागेच ठेवले. पण इतर पाच मुलांसोबत त्याने झुडपांमध्ये लपून, अन्नपाण्याशिवाय जमिनीवर झोपून काही आठवडे काढल्यानंतर ते बंडखोरांच्या हाती लागले. ॲलन त्या वेळी फक्त दहा वर्षांचा होता.

त्याला ताब्यात घेतल्यापासून दिवसातून दोन किंवा तीन वेळा त्याला मारण्यात येत असे आणि थोडेसे अन्न आणि पाणी दिले जात असे. "पोरा ऊठ. तुझे मित्र मरताना पाहण्याची आता वेळ आहे," एक बंडखोर सैनिक ॲलनवर खेकसला. ते सैनिक त्याच्या मित्रांच्या डोक्यात जाड मुळीच्या सोट्याने मारू लागले. त्यांच्या स्वतःच्या रक्ताच्या डबक्यामध्ये ते निपचित पडूपर्यंत ते सैनिक त्यांना मारतच राहिले; आणि हे सर्व भयानक दृष्य असहाय्यपणे पाहण्याची ॲलनवर जबरदस्ती करण्यात आली होती. मारून टाकण्याची धमकी देत त्या बंडखोरांनी त्याच्याकडून अनेक घृणास्पद दुष्ट कृत्ये करवून घेतली. त्याचे हृदय खोल अंधारात बुडत असल्याचेच त्याला जाणवत होते...

आज रात्री, ॲलनला जळाऊ लाकूड गोळा करण्यासाठी पाठवण्यात आले. त्या वेळी पळून जाण्याचा त्याने निश्चय केला. तो जोराने पळत सुटला... चक्कर येऊन खाली पडेपर्यंत पळत राहण्याचा त्याने निश्चय केला. स्वतंत्र होणे हे त्याचे

स्वप्न होते. तो जर पुरेशा अंतरापर्यंत पळू शकला तर तो एखादा दिवस तरी कोणत्याही रक्तपातापासून दूर राहू शकेल आणि त्याला त्याच्या भावनिक जखमा बऱ्या करण्याची संधी मिळेल.

असहाय्य बालसैनिकांना मदत करण्यासाठी आणि आश्रय देण्यासाठी युगांडातीरल गुलू या ठिकाणी वसवण्यात आलेल्या नवीन खेडेगावामध्ये सध्या ॲलन राहत आहे. जॉयस मेयर मिनिस्ट्रीज वाटोटो मिनिस्ट्रीसोबत सहकार्याने ह्या गावाचा विकास करीत आहे. निराश्रित आणि असहाय्य अशा बालकांसाठी हे गाव वसवले आहे.

आकडेवारी सांगते :

- युगांडामध्ये 'लॉर्डस् रेझिस्टन्स आर्मी' ने सुमारे तीस हजार बालकांना सैनिक आणि लैंगिक गुलाम म्हणून ताब्यात ठेवले आहे.
- २००७ पर्यंत जगभरामध्ये सुमारे २,५०,००० बालसैनिक आहेत.

सर्व दिवसभर मी निराशेत पडून राहण्याचा विचार करीत असतानाच मला एक ई-मेल आला. गेल्या पंचवीस वर्षांपासून प्रभूच्या सेवेमध्ये असणाऱ्या माझ्या मित्रांकडून तो संदेश आला होता. त्यांच्या बावीस वर्षांचा तरुण मुलगा थायरॉईड ग्रंथीच्या कॅन्सरच्या जीवघेण्या आजाराने गंभीर आजारी होता. जर मी माझ्या पलीकडे पाहिले तर मला हे समजून येईल की "माझ्या" शिवाय या जगामध्ये आणखी पुष्कळ काही सुरू आहे. मग हळूहळू माझ्या समस्यांच्या विचारांतून बाहेर पडून मला मिळालेल्या आशीर्वादांबद्दल मी अधिक कृतज्ञ बनले.

आम्ही कसा विचार करतो त्याच्याशीच आमच्या पुष्कळशा समस्या जडलेल्या असतात याचा जेव्हा मी विचार करते तेव्हा मी अचंबित होते. मला जे हवे होते आणि मला मिळाले नाही याचा मी जितका विचार करते तितका माझा उत्साह खाली, खाली आणि खालीच जातो. पण जेव्हा इतर लोक तोंड देत असलेल्या दुःखद प्रसंगांचा आणि समस्यांचा मी विचार करते आणि माझ्याकडे जे आहे ते पाहते तेव्हा माझ्या लक्षात येते की मला काही समस्याच नाहीत. दुःखी बनण्याच्या ऐवजी मी उपकारस्तुतीच करते!

मी सार्वकालिकरित्या कृतज्ञ आहे, कारण की देव मला सतत काहीतरी चांगले करत राहण्याची आठवत देत असतो. लक्षात ठेवा : आपण बऱ्याने वाईटाला जिंकतो (पाहा रोम.१२:२१). कोणी तुमची सेवा केली आहे का? त्यांच्यासाठी प्रार्थना का करू नये? त्यामुळे तुम्हांला बरे वाटेल. तुमचा अपेक्षाभंग झाला आहे का? तुमच्यापेक्षा

अधिक निराश असे लोक देवाने तुम्हांला दाखवावेत अशी त्याला विनंती करा, ज्यांना तुम्ही उत्तेजन देऊ शकाल. त्याद्वारे त्यांनाही मदत मिळेल आणि तुम्हांलाही बरे वाटेल.

प्रत्येक क्षणाला जग अधिकाधिक हिंसक बनत चालले आहे. मी माझे लिखाण पुढे चालवत असतानाच मला आणखी एक लिखित संदेश मिळाला की, दुसऱ्या शहरातील चर्चवर काल रात्री हल्ला झाला आणि बेछूट गोळीबारामध्ये दोन लोक ठार झाले व पाच जखमी झाले. मला बायबलमधील मत्तय.२४ वा अध्याय काय म्हणतो त्याची आठवण झाली. त्यामध्ये शेवटल्या काळाच्या चिन्हांबद्दल सांगितले आहे. त्यात त्याने म्हटले आहे, सर्व हिंसाचारामध्ये आणि कमालीच्या तुटवड्यामध्ये, मोठ्या प्रमाणावर लोकांमधली प्रीती थंडावेल. याच्या विरुद्ध आपण लढले पाहिजे. आपण प्रीती नाहीशी होऊ द्यायला नको, कारण तसे जर झाले तर आपण ही पृथ्वी त्या दुष्टाच्या हाती देऊ.

त्या चर्चमधील गोळीबारांसंबंधी मला समजले तेव्हा मी म्हणू शकले असेत, "ओह, हे खरोखरच दुःखद आहे." काही वेळ थोडे वाईट वाटून घेऊन मी पुन्हा माझ्या निराशेकडे वळू शकले असते. पण मी तसे करणे नाकारले, कारण अशा प्रकारच्या विचारसरणीमध्ये मी जगणार नाही. त्या घटनेसंबंधी ऐकल्यानंतर, काही क्षण मी विचार केला आणि ठरवले की, माझ्या मुलाला त्या चर्चच्या पाळकांना फोन करायला सांगायचा आणि त्यांना आमच्याकडून काही मदत हवी आहे का ते विचारायचे. कदाचित आपली प्रिय व्यक्ती गमावलेल्या कुटुंबियांना काही मदत हवी असेल किंवा आपली कोणीतरी काळजी करते हे समजल्याने त्यांना मोठे सहाय्य लाभेल.

मला आश्चर्य वाटते, किती तरी वेळा आम्ही कठीण प्रसंगांतून जातो आणि कोणीच फोनसुद्धा करीत नाही. माझी खात्री आहे की लोकांना वाटते सर्वजण तसे करीत असतील, म्हणून कोणीच करत नाही.

हे कोणाचे काम आहे?

खूप वर्षांपूर्वी मी ऐकलेली ही गोष्ट मला आठवली. एव्हरीबडी, समबडी, एनीबडी आणि नोबडी नावाचे चार मित्र होते. एक महत्त्वाचे काम पूर्ण करायचे होते. एव्हरीबडीला नक्की वाटत होते की, समबडी ते करून टाकील, पण नोबडीने ते केले. समबडीला त्याचा राग आला कारण ते एव्हरीबडीचे काम होते. एव्हरीबडीला वाटले एनीबडी ते करू शकेल, पण नोबडीच्या हे लक्षात आले की, एव्हरीबडी ते करणार नाही. सरतेशेवटी एनीबडी जे करू शकत होता ते नोबडीने केले. तेव्हा एव्हरीबडीने समबडीला दोष दिला.

वरील गोष्टीचा मथितार्थ प्रत्यक्ष जीवनात कार्यरत झाल्याची एक धक्कादायक घटना मी एकदा वाचली. १९६४ साली, कॅथरिन नेनोव्हेस या महिलेला पस्तीस मिनिटांच्या कालावधीत भोसकून ठार मारण्यात आले. त्या वेळी अडतीस शेजारी ती घटना पाहत उभे होते. त्यांचा हा प्रतिसाद निष्काळजी आणि गोठलेल्या संवेदना म्हणून संबोधला गेला. शहरी औदासिन्य आणि परकेपणाचा हा परिणाम होता. शेवटी, लॅटने आणि डॅर्ली यांनी केलेल्या सर्वेक्षणातून असे समजले की, कोणीही मदतीला गेला नाही, कारण तेथे पुष्कळ बघे लोक होते. पाहणारे लोक एकमेकांकडे मार्गदर्शनासाठी पाहत होते. कोणीच काही करत नव्हते, म्हणून त्यांनी मानले की कोणीही काही करू नये.

लोकांना गरजेच्या वेळी मदत मिळणे अवघड होत चालले आहे, कारण बघ्यांची संख्या वाढत चालली आहे. फिट्सचा विकार असलेल्या एखाद्या व्यक्तीला फीट आली तेव्हा त्याच्या आजूबाजूला एखादीच व्यक्ती असेल तर ८५% वेळा मदत केली गेली, पण पुष्कळ लोक भोवती असल्यावर फक्त ३१% वेळा मदत केली गेली.

या अभ्यासावरून निश्चित समजते की, जितके लोक काही करणार नाहीत, तितके अधिक लोक काहीच करणार नाहीत. पण जर समर्पित लोकांच्या एखाद्या लहान गटाने जर दुसऱ्यांची काळजी केली आणि त्यांना प्रेम दिले, थोडेसे हास्य आणि शुभेच्छा दिल्या, प्रशंसा आणि आदर दिला, तर ही चळवळ वाढू शकेल, नव्हे निश्चितच वाढेल.

सर्वेक्षणातून हे निश्चित झाले आहे की, आपल्या सभोवतीच्या लोकांचा आपल्यावर खूप परिणाम होतो. आपल्या पूर्णपणे अजाणतेपणी आपण एकमेकांकडून मार्गदर्शन मिळावे म्हणून एकमेकांकडे पाहतो. पुष्कळ लोक त्यांना पटत नसले तरी बहुसंख्यांकांशी सहमत होतात. त्या गटामध्ये राहता यावे म्हणून ते तसे करतात.

आपल्याला जर प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी व्हायचे, तर आपण जगाच्या पद्धतीमध्ये गुरफटून जाण्याच्या ऐवजी, ख्रिस्ती म्हणून एक उदाहरण बनले पाहिजे. जर कोणीतरी एकाने धैर्य करून काही कृती केली असती किंवा मदत करण्याइतकी प्रीती अंगी बाणवली असती, तर कॅथरिन जेनोव्हेसचा जीव वाचला असता.

देव उत्तर देईल अशा प्रार्थना तुम्ही करता का?

तुमच्या दैनंदिन प्रार्थनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी काही मुद्दे मी तुम्हांला देऊ इच्छिते. आज तुम्ही त्याच्यासाठी काय करावे ते दररोज देवाला विचारा. नंतर तुम्ही तुमच्या

दिवसात पुढे जा, येशू स्वतः देहरूपाने येथे असता तर विशिष्ट प्रसंगामध्ये त्याने काय केले असते असा तुमचा विश्वास आहे त्या संधी शोधा. जर तुम्ही ख्रिस्ती आहात तर तो आता तुमच्यामध्ये राहतो आणि तुम्ही तयाचे राजदूत आहात, त्याचे योग्य रीतीने प्रतिनिधित्व करा. गेल्या अनेक वर्षांपासून माझ्या सकाळच्या प्रार्थनेमध्ये प्रभूने माझ्यासाठी काय करावे त्याचीच यादी मी त्याला सांगत राहिले, पण अलीकडेच मी हा नवीन भाग माझ्या प्रार्थनेत समाविष्ट केला : "प्रभूदेवा, आज मी तुझ्यासाठी काय करू?"

अलीकडे मी प्रभूला विनंती करीत होते की, अगदी कठीण परिस्थितीतून जाणाऱ्या माझ्या एका मैत्रिणीला त्याने मदत करावी. ती कशाची तरी गरज होती आणि त्याने ती पुरवावी अशी मी त्याला विनंती करीत होते. त्याने दिलेले उत्तर ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला, "ती गरज भागवावी म्हणून मला विनंती करणे थांबव; तू काय करावे ते मी तुला दाखवावे अशी विनंती कर." माझ्या हे लक्षात आले की, बरेच वेळा, ज्या गोष्टी मी कराव्या अशी त्याची अपेक्षा आहे त्या त्याने कराव्या अशी विनंती मी करीत राहिले. त्याच्या सहाय्याशिवाय मी काही करावे अशी त्याची निश्चितच अपेक्षा नसते, पण त्याच वेळी मी निष्क्रिय बसून राहिल्यावर तो सर्व काही करणार नाही. आम्हीसुद्धा त्याच्यासह सहभागी व्हावे अशी देवाची इच्छा आहे. लोकांना मदत करण्यासाठी आम्ही आमच्या साधनांचा उपयोग करावा अशी त्याची इच्छा आहे, आणि जर त्याच्या गरजा भागवण्यासाठी आमच्याकडची साधने अपुरी पडली, तर आपण इतरांना त्यामध्ये सहभागी होण्याचे उत्तेजन देऊ आणि आपण सर्व मिळून जे शक्य ते करू.

सहभागी होण्यासाठी आम्ही खुले असावे ही देवाची इच्छा आहे.

मी तुम्हांला उत्तेजन देते की, देव उत्तर देईल अशा प्रार्थना करा. तुम्ही आणि तो भागीदार आहात, आणि त्याला तुमच्यासोबत आणि तुमच्याद्वारे कार्य करायचे आहे. तुम्ही काय करू शकता ते तुम्हांला दाखवण्याची त्याला विनंती करा, आणि ते करण्यासाठी साधनसामग्री आणि कल्पनाशक्तीही प्राप्त करण्यासाठी त्याच्यावरच अवलंबून राहा.

"तुमची साधनसामग्री वापरा" असे मी सांगितले म्हणून गोंधळात पडू नका. मी पैशापेक्षा अधिक दुसऱ्या गोष्टींसंबंधी बोलत आहे. आपल्या साधनसामग्रीमध्ये आपली शक्ती, वेळ, कौशल्य आणि आपल्याजवळ असलेल्या वस्तू, त्याचप्रमाणे

आपला पैसा या सर्वांचा समावेश होतो. कोणाला तरी मदत करण्यामध्ये पैशाचा समावेश होतो, पण बरेचदा त्यामध्ये वेळेचाही समावेश होतो, आणि मला वाटते आपल्या समाजामध्ये आपल्याला वेळेची इतकी कमतरता आहे की, एखाद्या व्यक्तीला मदत करण्यासाठी काही वेळ देण्यापेक्षा एखादा धनादेश लिहून देणे आपल्याला अधिक सोपे आणि सोयीचे वाटते. माझी अशी खात्री झालेली आहे की पुष्कळ वेळा ज्याला मी "तेथे उपस्थित असण्याची सेवा" म्हणते ती अनेकांना आवश्यक असते.

माझी एक मैत्रीण अशा एका मोठ्या शहरामध्ये राहते जेथे निराश्रितांची मोठी समस्या आहे. हिवाळ्यामध्ये एके रात्री ती कामावरून घरी येत असताना एक माणूस जवळ येऊन पैशाची भीक मागू लागला. त्या वेळी खूपच थंडी होती आणि अंधारही पडला होता. दिवसभर खूपच कष्ट करून ती थकलेली होती आणि घरी पोहोंचण्यासाठी अधीर झालेली होती. त्या असुरक्षित वाटणाऱ्या परिस्थितीमध्ये पैशाचे पाकीट बाहेर काढण्याच्या भानगडीत न पडता तिने वरच असलेल्या आपल्या पर्समध्ये हात घालून चिल्लर शोधण्याचा प्रयत्न केला, पण तिला काही यश येत नव्हते. त्या वेळी त्या माणसाने सांगण्यास सुरुवात केली की काल रात्री तो निराश्रितांच्या छावणीत झोपायला गेला तेव्हा कोणीतरी त्याचा कोट कसा चोरून नेला, आणि अशाच इतर समस्या तो सांगू लागला. चिल्लर शोधण्याचा प्रयत्न करतानाच त्याच्या बोलण्याला योग्य प्रतिसाद म्हणून मधून मधून योग्य ठिकाणी ती "हे फारच वाईट झाले!" अशा प्रकारच्या प्रतिक्रिया देत राहिली. सरतेशेवटी तिला पैसे हाती लागल्यावर तिने ते त्याच्या पेल्यात टाकले. तो स्मित हास्य करून म्हणाला, "माझ्यासोबत बोलल्याबद्दल आभारी आहे." माझी मैत्रीण म्हणाली, तिच्या हे लक्षात आले की त्या रात्री तिने त्या माणसाला पन्नास सेन्ट्स दिले, त्याबद्दल त्याने आभार मानले, पण त्याहीपेक्षा अधिक त्या माणसाला ह्याचे विशेष वाटले की, तो जे काही सांगत होता ते कोणीतरी ऐकून घेतले आणि प्रतिसाद दिला.

आमच्याकडे असा एक गट आहे, जो शहरांतील पुलांखाली राहणाऱ्या लोकांमध्ये सेवा करतो आणि त्यांना मदत देतो. त्या गटातील लोकांना असे समजले आहे की, या पुलाखाली येण्याच्या आधी त्या प्रत्येक व्यक्तीचे वेगळे जीवन होते, काहीतरी भयानक घटना जीवनात घडल्यामुळे ते तेथे पोहोंचले आहेत. त्यांना दिले जाणारे अन्नपदार्थ आणि नजीकच्या चर्चपरिसरात त्यांना दिली जाणारी आंघोळ आणि स्वच्छ कपडे यांचे त्यांना विशेष वाटतेच, पण कोणीतरी त्यांची पुरेशी काळजी घेते, त्यांच्यासोबत बराच वेळ गप्पा मारून त्यांच्या जीवनात काय घडले ते जाणून घेते, ह्याचे त्यांना सर्वांत जास्त अप्रुप वाटते.

मी तुम्हांला उत्तेजन देते की, दुसऱ्यांना मदत करण्यासाठी तुम्ही शक्य ते सर्व करा. फक्त तुम्ही त्यांच्या जवळ असावे असे त्यांना वाटत सेल, तर त्यासाठी वेळ काढा. तुम्ही काय करावे अशी त्याची इच्छा आहे ते देवाला विचारा - आणि तो तुमच्या प्रार्थनेचे उत्तर देईल म्हणजे मग तुम्ही ते करू शकाल.

आक्रमक चांगुलपणा आचरणात आणा

हे जग अन्यायाने भरलेले आहे अशी तुमची खात्री आहे का? उपासमार होत असलेल्या बालकांसाठी काही तरी केले जावे असे तुम्हांला वाटते का? ज्यांना स्वच्छ, सुरक्षित पिण्याचे पाणी मिळत नाही अशा ११ लाख लोकांना कोणीतरी मदत करावी असे तुम्हांला वाटते का? लोकांनी रस्त्यांवर आणि पुलाखाली राहावे का? ज्यांच्यासोबत गेली काही वर्षे तुम्ही उपासनेला गेला आहा अशा कुटुंबामध्ये काहीतरी दुःखद घटना घडली आणि गेले तीन महिने ते उपासनेला का येऊ शकले नाहीत ते कोणीही एक फोन करूनसुद्धा माहिती करून घेऊ नये? तुमच्याच गावात असलेली पण दुसऱ्या पंथाची असलेली चर्चइमारत जळाली तर त्यांना प्रत्यक्ष मदत न करता त्यांच्यासाठी फक्त प्रार्थना करणे योग्य आहे का? अन्यायासंबंधी कोणीतरी काहीतरी करावे असा तुमचा विश्वास आहे का? मी असे मानते की या सर्व प्रश्नांची तुम्ही योग्य उत्तरे दिली आहेत; मग आता माझा एक शेवटला प्रश्न आहे, तुम्ही त्यासाठी काय करणार आहात? जे करणे आवश्यक आहे ते करणारे "कोणीतरी" तुम्ही बनणार आहात का?

तुम्ही काय करणार असे मी विचारले म्हणून "काहीतरी करण्यासाठी" काय करावे लागेल, म्हणून तुम्ही घाबरलात का? अशा प्रकारच्या निमताळ्या भावनांची मला कल्पना आहे. मी खरोखरच स्वतःला विसरून, जे करायला पाहिजे ते करायचा आक्रमक निर्णय घेतला तर माझे काय होईल? मी माझी काळजी घेतली नाही तर कोण घेईल? देवाने म्हटले तो घेईल, म्हणून मला वाटते तो म्हणाला तसाच त्याचा उद्देश आहे का ते आपण तपासून पाहिले पाहिजे. स्वचिंतेतून आपण निवृत्त होऊन, तुमच्यापेक्षा देव ते काम अधिक चांगल्या प्रकारे करतो का याचा त्याचा अनुभव आपण का घेऊ नये? आपण जर त्याच्या कामाची, म्हणजे दुसऱ्यांना मदत करण्याच्या कामाची काळजी घेतली तर माझा विश्वास आहे तो आपलीही काळजी घेईल.

पुढे जात राहा

मी हे प्रकरण आता संपवत असताना मला सांगू द्या की जीवनात अशा घटना घडतात की त्यामुळे काही काळ जगापासून काही काळ अलग होण्याची इच्छा होते. माझ्या

हे लक्षात आले आहे की, जीवनात मोठे बदल घडताना पुनर्जुळणी करण्यासाठी काही काळ जातो, आणि त्यामध्ये होणारे क्लेष अगर नुकसान यामुळेच लोकांना प्रतिसाद द्यायला किंवा लोकांना मदत करायला नको असते. अशा गोष्टींची मला जाणीव आहे, आणि तुम्ही जर एखाद्या प्रकारचे नुकसान अनुभवे असेल आणि त्यामुळे तुम्ही सुन्न झाला आसाल, पुढे काहीही न करण्याची इच्छा बळावत असेल, तर तुम्हांला कसे वाटत असेल याची मला कल्पना आहे, पण पुढे जाण्यासाठी स्वतःला निग्रही बनवा असे उत्तेजन मी तुम्हांला देते. सैतान तुम्हांला एकटे पाडू इच्छितो, कारण मग त्याच्या लबाडीचा तुम्हांला एकट्याने सामनाच करता येणार नाही. जाऊन कोणा परक्याला मदत करा, असे तुम्हांला सांगणे विचित्र वाटेल हे मला ठाऊक आहे. पण माझ्या अंतःकरणात माझी खात्री आहे की, तसे करण्यामध्येच तुमचे संरक्षण आणि त्यासोबतच जगाच्या समस्यांवर उत्तर असेल.

मला पुन्हा एकदा सांगू द्याः माझा निश्चित विश्वास आहे की, आपल्याला प्रीतीच्या क्रांतीची गरज आहे. स्वार्थीपणा आणि उदासीनता नैराश्य आणि स्वतःबद्दलची कीव करणे या सर्वांचा आपण अनुभव घेतला आहे, आणि त्या सर्वांची परिणामसुद्धा आपण पाहिला आहे. या सर्व गोष्टींच्या परिणामांनी जग भरलेले आहे. आपण सर्वजण सहमतीने एक होऊ या आणि देवाच्या इच्छेने जीवन जगण्याचा निश्चय करू या. दुसऱ्यांसाठी आशीर्वाद बनण्याचे मनात ठरवा (पाहा गलती.६ः१०). प्रीती परिधान करा (पाहा कलस्सै.३ः१४). त्याचा अर्थ दुसऱ्यांच्या मदतीसाठी त्यांच्यापर्यंत पोहोंचण्याचा निश्चय करा. संधी मिळवण्यासाठी प्रार्थना करा आणि लक्ष ठेवा (पाळत ठेवा); देवासाठी गुप्तहेर बना! येशू दररोज ऊठून चांगले ते करत फिरला (पाहा प्रे.कृ.१०ः३८). ते अगदी सोपे आहे. इतका काळपर्यंत आपण ते कसे चुकलो याचेच मला आश्चर्य वाटते.

प्रकरण

4

देवाकडून हस्तक्षेप

उद्या नाही, तुमच्या सोयीची दुसरी कुठली तरी वेळ नव्हे,
तर हीच वेळ आहे. आपले सर्वोत्कृष्ट काम पुन्हा कधीतरी नाही,
तर आजच होऊ शकेल.
डब्ल्यू. ई. बी. ड्यूबाईस

मिशनरी दौऱ्यावर असताना मी पुष्कळदा हॉटेलमध्ये राहते. माझ्या खोलीत असताना कोणी त्रास देऊ नये म्हणून मी नेहमी दारावर "व्यत्यय आणू नका" असा बोर्ड लावते. माझ्या हॉटेलच्या खोलीच्या दारावर असा बोर्ड लावणे मान्य आहे, पण माझ्या जीवनावर मात्र लावण्याची परवानगी नाही.

तुम्हांला सोयिस्कर असेल त्यानुसार तुमच्या वेळापत्रकाप्रमाणे देव गोष्टी करीत नाही हे तुमच्या लक्षात आले आहे का? पौलाने तीमथ्याला सांगितले की, देवाचा आणि सुवार्तेचा सेवक या नात्याने त्याने त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत, मग त्या त्याच्या सोयीच्या असोत की गैरसोयीच्या (पाहा २ तीमथ्य.४:२). आज आपल्याला सुखसुविधांची जेवढी सवय लागली आहे तेवढी तीमथ्याला असेल असे मला वाटत नाही. तरीदेखील तीमथ्याच्या सोयीच्या अथवा गैरसोयीच्या वेळी देवाकडून होणाऱ्या हस्तक्षेपासाठी त्याने तयार राहावे म्हणून त्याला आठवण देणे आवश्यक आहे असे

पौलाला वाटले. जर तीमथ्याला हे ऐकायची गरज होती, तर आपल्यालादेखील हे वरचेवर ऐकायची गरज आहे, कारण तीमथ्यापेक्षा जास्त सोयीसुविधांची आपल्याला सवय लागली आहे. सोयीसुविधाला मी किती महत्त्व देते हे समजून घ्यायचे असेल, माझे एखादे सर्वांत छोटेसे साधन - भांडी धुण्याचे यंत्र, एअरकंडिशनर, हेअर ड्रायर, कपडे वाळवण्याचे यंत्र, कपडे धुण्याचे यंत्र, मायक्रोवेव्ह आणि इतर असंख्य वस्तू - व्यवस्थित काम करीत नसल्यावर मी कशी कुरकूर करते हे ऐकणे पुरेसे आहे.

आपल्या गाड्या थोड्या दूर पार्क कराव्या लागल्यामुळे, अमेरिकेत होणाऱ्या आमच्या सभांमध्ये कुरकूर करणारे लोक मी पाहिले आहेत, त्याउलट भारतामध्ये तीन तीन दिवस पायी चालून लोक बायबल कॉन्फरन्सला येतात. अमेरिकेत लोक बाथरूमला, पाणी प्यायला किंवा फोन घ्यायला उठून बाहेर जाऊन इतर लोकांसाठी अडचण निर्माण करतात, पण भारतात लोक अक्षरशः दिवसभर धुळीत बसतात, जागेवरून उठण्याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही. खूप थंडी पडली किंवा उष्णता वाढली तर माझ्या देशातील लोक कुरकूर करतात, पण मी भारतात जाते तेव्हा केवळ मी आणि माझ्यासह आलेले लोक उष्णतेबाबत तक्रार करीत राहतात.

आपल्याला सुखसोयींचे व्यसन लागले आहे असे मला वाटते. आपल्या सगळ्या आधुनिक सोयी आपण सोडून द्याव्यात असे मी म्हणत नाही, आणि ज्याची आपल्याला सवय झाली आहे त्या गोष्टींची आपण आशा धरतो हेही मला माहीत आहे, पण सुखसोयींविषयी आपली मानसिकता संतुलित असली पाहिजे असे मला वाटते. आपल्याकडे असलेल्या सोयीसुविधांसाठी देवाचे उपकार माना, पण त्या आपल्याला मिळाल्या नाहीत, म्हणून देव आपल्याला जे करायला सांगतो ते करण्यासाठी त्यांचे आपल्याला अडखळण होऊ नये.

बऱ्याच वर्षांपूर्वीची एक गोष्ट मला आठवते. सेन्ट लुई येथील बॅन्केट सेंटर येथे बुधवारी रात्री होणाऱ्या आमच्या शिक्षणसत्राला यायची एका अंध जोडप्याला इच्छा होती. ते बसने येऊ शकले असते, पण त्यांच्या नेहमीच्या मार्गावरची बस कॅन्सल झाली होती. त्यामुळे त्यांना कोणी आपल्या गाडीतून नेणेआणणे हाच एक मार्ग त्यांच्यासाठी उपलब्ध होता. ही किती महान संधी होती! मला वाटले की त्यांना मदत करण्यासाठी लोकांची रांग लागेल, पण कोणीच त्यांना मदत करायला तयार नव्हते, कारण हे अंध जोडपे वेगळ्या दिशेला राहत होते.

दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, या दांपत्यासाठी वाहनव्यवस्था पुरवणे सोयीचे नव्हते. आमच्या एका कर्मचाऱ्याला मी त्यांना न्यायला आणि आणायला सांगितले.

त्यासाठी आम्हांला त्या व्यक्तीला पैसे द्यावे लागले. आपण करणार असलेल्या मदतीसाठी जर आपल्याला पैसे मिळणार असतील तर मात्र मदत करायला आपण एका पायावर तयार असतो. द्रव्याचा लोभ हे सर्व प्रकारच्या वाइटाचे मूळ आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. द्रव्याला आपण आपल्या जीवनाचा मुख्य प्रेरणास्रोत होऊ देऊ नये. आपणा सर्वांना पैशाची गरज आहे, पण आपण इतरांना मदत करण्याचीही गरज आहे, आणि पुष्कळदा सोयीची नसणारी ही दयाळूपणाची कृत्ये कधी कधी आपल्यासाठी चांगली असतात ही वस्तुस्थिती आहे. कधी कधी या संधी आपली चाचणी घेण्यासाठी असतात. आपण समर्पित आहोत की नाही याची तपासणी देव याद्वारे करतो. ज्यासाठी तुम्हांला पैसे मिळणार नाहीत, किंवा तुमचे कौतुक होणार नाही अशी दयाळूपणाची कृत्ये करण्यास तुम्ही तयार असाल, तर तुमचे आध्यात्मिक हृदय चांगले ठणठणीत आहे याचे हे सकारात्मक चिन्ह आहे.

इस्राएल लोक आपल्या आज्ञा पाळतात की नाही हे देवाला पाहायचे होते, तेव्हा त्याने त्यांना अरण्यातून दूरच्या कठीण मार्गाने नेले (पाहा अनु.८:१-२). कधी कधी आपल्याबाबतीतही तो असेच करतो. देवाची एखादी आज्ञा पाळणे एकदम सोपे असेल आणि त्यासाठी आपल्याला ताबडतोब प्रतिफळ मिळणार असेल तर आपण आज्ञा पाळायला ताबडतोब तयार होतो. पण जेव्हा ते आपल्या गैरसोयीचे असते, आपल्या योजनेनुसार नसते आणि त्यातून आपल्याला काही मिळणार नसते तेव्हा काय? मग आपण किती आज्ञाधारक असतो? हे प्रश्न आपण स्वतःला विचारण्याची गरज आहे, कारण आपल्या समर्पणाच्या बाबतीत आपण प्रामाणिक असणे फार आवश्यक आहे. चर्चमध्ये उभे राहून "समर्पितो मी" असे गाणे सोपे आहे, पण हे समर्पण केवळ गाणे न राहता कृतीची मागणी करते तेव्हा काय?

देवा, ही चांगली वेळ नाही

देवाला अनुसरणे गैरसोयीचे असल्यामुळे त्याला न अनुसरणाऱ्या एका माणसाची गोष्ट पवित्र शास्त्र सांगते. फेलीक्स नावाच्या या मनुष्याने पौलाला सांगितले की, येऊन मला सुवार्तासंदेश सांग. पण जीवनाची शुद्धता, योग्य प्रकारे जगणे आणि भावनांवर नियंत्रण ठेवणे यांविषयी पौल त्याला सांगू लागला तेव्हा मात्र फेलीक्स घाबरला. मला सोयीचे वाटेल तेव्हा मी तुला परत बोलावीन असे सांगून त्याने पौलाला जायला सांगितले (पाहा प्रे.कृ. २४:२५). मला हे मनोरंजक वाटते, कारण आपण कसे आहोत हे यात अगदी स्पष्ट सांगितले आहे. देव आपल्यावर किती प्रीती करतो, आणि आमच्या

जीवनांसाठी त्याच्या किती चांगल्या योजना आहेत हे ऐकायला आपल्याला आवडते, पण जेव्हा तो आपल्याला शुद्ध करू लागतो, आपल्या चुका दुरुस्त करू लागतो तेव्हा मात्र ही योग्य वेळ नाही असे आपण त्याला सांगायचा प्रयत्न करतो. आमच्या दृष्टीने सोयीस्कर वेळ तो नक्कीच निवडणार नाही, आणि हे तो विशिष्ट उद्देशाने करतो असे मला वाटते.

इस्राएल लोक अरण्यातून प्रवास करीत होते तेव्हा त्यांना दिवसा मेघस्तंभ व रात्री अग्नीस्तंभ मार्गदर्शन करीत असे. ढग म्हणजे मेघस्तंभ पुढे सरकत असे तेव्हा त्यांना पुढे चालावे लागेल आणि तो जेथे थांबत असे तेथे त्यांना थांबावे लागत असे. लक्षात घ्यायची गोष्ट म्हणजे ढग कधी पुढे सरकेल याचे नक्की वेळापत्रक किंवा योजना नव्हती. मेघस्तंभ पुढे सरकत असे तेव्हा त्यांना कूच करावे लागे (पाहा गणना ९:१५-२३). पवित्र शास्त्र सांगते की, हा स्तंभ कधी दिवसा पुढे सरकत असे, तर कधी रात्री! कधी बरेच दिवस तो एका जागी थांबत असे तर कधी केवळ एक दिवस थांबत असे. आम्हांला त्रास देऊ नकोस असे देवाला सांगण्यासाठी रात्री ते "डू नॉट डिस्टर्ब"चा बोर्ड आपल्या तंबूच्या दारावर लावावा की काय असे त्यांना वाटत असेल. आता पुढे जायला हवे असे देवाला वाटे तेव्हा त्यांना सर्व आवरून त्याच्यामागे निघावे लागे. आपल्या प्रवासात आता पुढच्या पातळीवर, पुढच्या पायरीवर जायची वेळ झाली असे त्याला वाटेल तेव्हा "ही सोयीची वेळ नाही" असे त्याला कधीही म्हणून नये.

प्रवासाचे पूर्ण एक महिन्याचे कॅलेन्डर जर देवाने त्यांना दिले असते तर बरे झाले नसते का? त्यांची मानसिक, शारीरिक आणि भावनिक तयारी झाली असती. त्याने तसे का केले नाही याचे मला आश्चर्य वाटते. आपण कसा प्रतिसाद देतो हे पाहण्यासाठी तर तो असे करीत नाही ना?

सगळ्यांत चांगले काय आहे ते देवाला माहीत आहे, आणि त्याची समयसूचकता तर अगदी बरोबर असते. माझ्या जीवनातील एखादी गोष्ट हाताळण्यास, तिचा समाचार घेण्यास मी तयार नाही असे मला वाटते तेव्हा याचा अर्थ मी तयार नाही असा होतो. देव "मार्ग आणि साधने कमिटी"चा अध्यक्ष आहे. त्याचे मार्ग आपले मार्ग नाहीत, ते आपल्या मार्गाहून उंच आणि चांगले आहेत (पाहा यशया ५५:९).

हे सोपे का नाही?

लोकांना मदत करावी असे जर देवाला वाटते, तर ही सर्व प्रक्रिया तो सोपी आणि स्वस्त का करीत नाही? दुसरा एक प्रश्न विचारून मला या प्रश्नाचे उत्तर देऊ द्या. पाप

आणि गुलामगिरी यांच्याकडून आमचे स्वातंत्र्य, आमची मुक्ती खरेदी करण्यासाठी येशूने काही बलिदान केले का? देवाने तारणाची योजना सोपी का केली नाही असा प्रश्न मला पडतो. त्याला वाटेल ती योजना तयार करून "ही कार्यकारी होईल" असे तो म्हणू शकला असता. देवाच्या अर्थशास्त्रात स्वस्त गोष्टीला काही किंमत नाही असे वाटते. फुकट मिळालेली गोष्ट मी देवाला देणार नाही असे दावीद राजाने म्हटले (पाहा २ शमु.२४:२४). एखादी गोष्ट देताना तिची झळ आपल्याला लागत नाही तोपर्यंत ते खरे देणे नाही हे मी शिकले आहे. माझे सर्व जुने कपडे आणि जुन्या वस्तू देणे चांगले आहे, पण ते खरे देणे नाही. जी गोष्ट मी स्वतःसाठी ठेवू इच्छितो/इच्छिते ती देणे म्हणजे खरे देणे होय. तुम्हांला आवडणारी एखादी गोष्ट द्यायला देवाने तुम्हांला सांगितल्याचे कठीण अनुभव तुम्हांला आले असतील. देवाने त्याचा एकुलता एक पुत्र आमच्यासाठी दिला, कारण तो आपल्यावर प्रीती करतो. मग प्रीती आपल्याला काय करायला लावील? कोणा गरवंताला मदत करण्याची पाळी आली तर आपल्याला ते किमान गैरसोयीचे किंवा असुविधेचे वाटेल का?

एकमेकांवर खूप प्रेम करणाऱ्या आणि लवकरच विवाहबद्ध होणाऱ्या एका तरुण जोडप्याची कथा मी टीव्हीवर पाहिली. ती एका कार अपघातात सापडली आणि बरीच महिने कोमात राहिली. तिचा प्रियकर रोज तिच्या बिछान्याजवळ बसून राहत असे. सरतेशेवटी ती शुद्धीवर आली, पण तिच्या मेंदूला मार लागला होता त्यामुळे ती कायमची अधू राहणार होती. बऱ्याच गोष्टी तिला स्वतः करता येणार नव्हत्या. तिच्याशी लग्न न करण्याचा विचारही या तरुणाच्या मनाला शिवला नाही. चाकाच्या खुर्चीत बसून ते लग्नवेदीवर गेली. झालेल्या जखमा आणि लागलेल्या मारामुळे ती नीट बोलूही शकत नव्हती, पण तिला खूप आनंद झाला होता. आयुष्यभर या तरुणाने तिची देखभाल केली आणि ते आनंदाने जीवन जगले. त्याची मदत आणि उत्तेजन यांमुळे ती अपंगांच्या विशेष ऑलिम्पिकमध्ये भाग घेऊ शकली आणि त्यात तिने चांगली कामगिरीही केली.

या तरुणाने तिच्याकडे पाठ फिरवली असतील आपल्यापैकी पुष्कळजणांना त्यात काही वावगे वाटले नसते. कारण तिच्यासोबत राहणे किती गैरसोयीच झाले असते, त्याला तिच्यासाठी रोज त्याग करावा लागला असता. पण असल्या परिस्थितीत सापडल्यावर पुष्कळजण करतात तसे त्याने तिच्याकडे पाठ फिरवली नाही. तो तिच्यासोबत राहिला आणि मला वाटते की आपल्यापैकी पुष्कळांपेक्षा अधिक आनंदाचा अनुभव त्याने घेतला असेल.

तुम्ही जर माझ्याप्रमाणे असाल, तर इतरांच्या कल्याणासाठी मोठा त्याग करणाऱ्या लोकांच्या कथा वाचायला आवडत असतील. पण तुम्ही आणि मी या कथा वाचण्यापेक्षा अधिक काही करावे असे देवाला वाटते. कदाचित तुमची स्वतःची अशी एखादी कथा असावी असे देवाला वाटत असेल.

दुसऱ्या कोणाच्या तरी सोयीसाठी गैरसोय सोसणे

दुसऱ्या कोणत्या तरी व्यक्तीचे जीवन सुखावह व्हावे म्हणून देव एखाद्या व्यक्तीच्या जीवनात हस्तक्षेप करील आणि त्याला किंवा तिला गैरसोयीची वाटणारी गोष्ट करायला सांगेल. आपण देवाचे मार्ग समजून घेतले पाहिजेत, अन्यथा ज्याचा आपण स्वीकार केला पाहिजे त्याला विरोध करू. साधेसोपे सत्य हे आहे: आनंदी होण्यासाठी आपण दिले पाहिजे, आणि बलिदानाची, त्यागाची झळ जोपर्यंत आपल्याला पोहोचत नाही तोपर्यंत ते खरे देणे होत नाही.

पेत्र, आंद्रिया, याकोब, योहान आणि इतर शिष्यांचा मोठा सन्मान झाला. बारा शिष्य होण्यासाठी त्यांची निवड झाली. ते येशूकडून शिकणार होते आणि मग जगाला सुवार्ता सांगणार होते. येशूने त्यांना पाचारण केले तेव्हा ते सर्व कामात व्यस्त होते. त्यांना स्वतःची, आपल्या कुटुंबाची आणि व्यवसायाची काळजी घ्यायची होती. कसलीही पूर्वसूचना न देता येशू त्यांच्याकडे आला आणि म्हणाला, "माझ्यामागे या." पवित्र शास्त्र सांगते की, येशूने पाचारण केले तेव्हा पेत्र आणि आंद्रिया समुद्रात जाळी टाकीत होते. त्यांनी आपली जाळी तशीच टाकली आणि त्याच्यामागे गेले (पाहा मत्तय.४:१८-२१). अडथळ्याविषयी काय बोलता! तुम्ही याविषयी प्रार्थना करू शकता, याविषयी विचार करू शकता, किंवा घरी जाऊन आपल्या बायकामुलांशी चर्चा करा असे त्याने त्यांना सांगितले नाही. त्याने फक्त "माझ्यामागे या" असे म्हटले.

किती दिवस तुझ्यामागे यायचे आणि आम्हांला किती पगार मिळेल असे काही त्यांनी विचारले नाही. आम्हांला कसले भत्ते मिळतील, प्रवासाची भरपाई कशी मिळेल, कसल्या हॉटेलात आम्ही राहू असे प्रश्न त्यांनी विचारले नाहीत. आम्हांला काय काम करावे लागेल हेही त्यांनी विचारले नाही. सगळे सहज सोडून ते त्याच्यामागे गेले. आतादेखील मी हा वृत्तान्त वाचते तेव्हा मला हे मोठे कठीण वाटते. कदाचित जेवढी मोठी संधी तेवढा मोठा त्याग करावा लागतो.

देव माझ्याकडून काही गोष्टी करून घेऊ इच्छित होता, त्या वेळी मी कुरकूर करीत होते हे मला आठवते, कारण इतर लोकांकडून देव या अपेक्षा करीत नाही असे मला

वाटत होते. त्याने मला म्हटले, "जॉयस, तू माझ्याकडे पुष्कळ काही मागितले आहेस. तुला ते हवे की नको?" मला जगभरातील लोकांना मदत करता यावी अशी विनंती मी त्याला केली होती, आणि असे करीत असताना पुष्कळदा गैरसोय आणि असुविधा यांचा सामना करावा लागेल हे मी शिकत होते.

बी पेरल्याशिवाय पीक येणे अशक्य आहे. शलमोन राजाने म्हटले की, सर्व परिस्थिती चांगली होईपर्यंत आपण वाट पाहत राहिलो तर आपण कधीही कापणी करणार नाही (पाहा उपदेशक ११:४). दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, जेव्हा आपल्या सोयीचे नसेल आणि आपल्याला अधिक किंमत द्यावी लागत असेल तेव्हा आपण दिले पाहिजे आणि आज्ञा पाळल्या पाहिजेत. इतर लोक जे करायला तयार नव्हते ते करायला हे बारा लोक तयार असतील म्हणून कदाचित त्यांची निवड केली असेल. नकार देणाऱ्या कोणाला येशूने पाचारण केले असे पवित्र शास्त्र सांगत नाही, कदाचित त्याने बोलावले असेल. बाराजणांची निवड करण्यासाठी त्याने कदाचित हजारो जणांशी बोलावे लागले असेल. निदान आजच्या काळात तरी असेच होते. त्याग करायला तयार असणारे, आपल्या मूळच्या योजनांत होणाऱ्या बदलाला मान्यता देणारे, गैरसोय सोसण्यास तयार असलेले लोक फार थोडे आहेत. पुष्कळ लोक येशूवरील आपल्या प्रीतीविषयीची गाणी गातात. हे चांगले आहे, पण गाणी गाणे चांगले वाटत असले तरी त्याला त्यागाची गरज नसते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. खरी प्रीती त्यागाची अपेक्षा करते.

आज जगात खरी प्रीती फार दाखवली जात नाही, कारण तिच्यासाठी प्रयत्न करावे लागतात आणि किंमत द्यावी लागते. आपण जर गंभीरपणे प्रीतीच्या क्रांतीत सहभागी होणार असू तर ही वास्तविकता आपण लक्षात ठेवली पाहिजे. कुठलेही समर्पण करण्याअगोदर त्यासाठी काय किंमत द्यावी लागेल हे समजून घेणे सुज्ञपणाचे आहे. अन्यथा आपण ते तडीस नेऊ शकणार नाही.

देवाकडून हस्तक्षेप

ज्यांना आपण महान समजतो अशा पवित्र शास्त्रातील स्त्रीपुरुषांचा अभ्यास मी करते तेव्हा त्या सर्वांनी महान त्याग केल्याचे मला दिसते. देवाने त्यांना जे काही करायला सांगितले त्यात त्यांच्या सोयीचे असे काहीही नव्हते.

अब्राहामाला आपला देश, आपले नातेवाईक आणि आपले घर सोडून जावे लागले. जेथे जायचे तेथे पोहोंचेपर्यंत कुठे जायचे हे देवाने त्याला सांगितले नव्हते.

कदाचित राजा बनून आपण एखाद्या राजवाड्यात राहू असे त्याला वाटले असेल, पण त्याऐवजी त्याला ठिकठिकाणी भटकावे लागले, तंबूत राहावे लागले. दुष्काळामध्ये त्याला मिसर देशात जावे लागले (उत्पत्ती १२:१०). अब्राहामाला जरी मोठा त्याग करावा लागला, तरी देवाने त्याला आपल्याबरोबर करार करणारा मनुष्य होण्याचा हक्क दिला आणि त्याच्याद्वारे पृथ्वीवरील सर्व लोकांना देवाकडून आशीर्वाद मिळण्याची संधी दिली (पाहा उत्पत्ती २२:१८).

योसेफाने उपासमारीपासून राष्ट्राचे रक्षण केले, पण त्याअगोदर देवाने त्याला त्याच्या आरामदायक घरापासून दूर केले. घरात तो वडिलांचा लाडका होता. अनेक वर्षे त्याला गैरसोय सोसावी लागली. योसेफाला योग्य वेळी योग्य ठिकाणी ठेवण्यासाठी देवाने असे केले. पण हे प्रत्यक्षात घडल्यानंतरच योसेफाला हा कार्यकारणभाव समजला. आपण जेथे आहोत ते का आहोत, किंवा या परिस्थितीत आपण का आहोत हे पुष्कळदा आपल्याला समजत नाही आणि म्हणतो, "देवा, मी येथे काय करीत आहे?" मी देवाला पुष्कळदा असे म्हटले आहे, आणि जरी त्याने मला उत्तर देण्याचे कष्ट घेतले नाहीत, तरी आज जेव्हा मी मागे पाहते तेव्हा माझ्या लक्षात येते की त्या प्रत्येक गोष्टीमुळे आज मी जेथे आहे तेथे आहे.

एस्तेरने यहूदी लोकांचा नाशापासून बचाव केला, पण तिने तसे करावे म्हणून देवाने निश्चितच तिच्या अगोदरच्या योजनांमध्ये हस्तक्षेप केला. ती तरुण कुमारिका होती. आपल्या भविष्याविषयी तिने नक्कीच काही प्लॅन केले असतील. पण अचानक कसल्याही पूर्वसूचनेशिवाय ती राजाच्या जनानखान्यात पोहोंचली. राजाची तिच्यावर कृपा झाली आणि दुष्ट हामानाची योजना ती राजाला सांगू शकली. हामान यहूदी लोकांचा संहार करू पाहत होता.

जीवनात भीतीदायक वाटणाऱ्या गोष्टी करायला तिला सांगण्यात आले, पण तिच्या चुलत्याने तिला सुज्ञपणे सांगितले, "तू ह्या प्रसंगी गप्प राहिलीस तरी दुसऱ्या कोठूनही यहूद्यांची सुटका व उद्धार होईलच. पण मग तुझा व तुझ्या बापाच्या घराण्याचा नाश होईल. तुला ह्या असल्याच प्रसंगासाठी राजपद प्राप्त झाले नसेल कशावरून?" (एस्तेर ४:१४).

तिने त्याग केला नसता, तर देवाने दुसऱ्या कोणाची तरी निवड केली असती, पण तिच्या लोकांचा बचाव करणे हे तिचे भवितव्य होते. तो तिच्या जीवनाचा उद्देश होता. देवाने तुमच्या योजनांमध्ये हस्तक्षेप करू नये अशी तुमची इच्छा असल्यामुळे, तुमच्या जीवनासाठी असलेला हेतू, उद्देश चुकवू नका.

त्यागपूर्ण आज्ञापालन करणाऱ्या लोकांची यादी वाढतच जाईल. पवित्र शास्त्र या लोकांविषयी "त्यांना जग योग्य नव्हते," (इब्री.११:३८) असे म्हणते.

दुसऱ्या कोणाचे तरी जीवन सुखी व्हावे म्हणून या लोकांनी गैरसोय सहन केली. आम्हांला जीवन आणि तेही विपुलपणे मिळावे म्हणून येशू मरण पावला. नागरिकांना सुरक्षित राहता यावे म्हणून सैनिक मरण पावतात. कुटुंबाचे जीवन सुखावह व्हावे म्हणून वडील कामाला जातात, आणि दुसरे जीवन जगात आणण्यासाठी आया बाळंतपणाच्या वेदना सहन करतात. दुसऱ्या कोणाला काहीतरी मिळावे म्हणून कोणाला तरी नेहमी किंमत द्यावी लागते, वेदना सहन कराव्या लागतात हे स्पष्टच आहे.

हे प्रकरण फार महत्त्वाचे आहे, कारण प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होणे ही चांगली कल्पना आहे असे तुम्हांला वाटत असेल, तर प्रीतीत वाटचाल करण्यासाठी एरवी ज्या गोष्टी तुम्ही करणार नाही त्या तुम्हांला कराव्या लागतील हे यावरून तुमच्या लक्षात येईल. ज्याच्याशी तुमचे पटत नाही, ज्याच्यापासून दूर जावे असे तुम्हांला वाटेल अशा व्यक्तीसोबत तुम्हांला कदाचित काम करावे लागेल, कारण इतरांचे अपयश आणि दुर्बलता प्रीती सहन करते. जेथे मनोरंजनाची साधने नाहीत अशा ठिकाणी तुम्हांला कदाचित राहावे लागेल, कारण त्या ठिकाणी तुम्ही एकटेच अंधारात प्रकाश असे असाल. एखाद्या ठिकाणचे वातावरण तुम्हांला पापात पडण्यास उद्युक्त करीत असेल तर ते ठिकाण तुम्हांला सोडून जावे लागेल. अब्राहाम मूर्तिपूजक लोकांमध्ये राहत होता. त्याचे कुटुंबसुद्धा मूर्तिपूजा करीत होते. म्हणून देवाने त्याला ते ठिकाण आणि लोक सोडून जायला सांगितले यात काही आश्चर्य नाही. आम्ही जे पाहावे असे देवाला वाटते ते दाखवण्यासाठी बहुतेक वेळा देवाला आमच्या परिचित वातावरणापासून दूर न्यावे लागते.

गैरसोय किंवा हस्तक्षेपाचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही असा निश्चय तुम्ही कराल तर देव तुमचा उपयोग करून घेईल. तुम्ही जगात बदल घडवू शकाल. पण

गैरसोय किंवा हस्तक्षेपाचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही असा निश्चय तुम्ही कराल तर देव तुमचा उपयोग करून घेईल.

तुमच्या स्वतःच्या आरामशीर जीवनाशीच तुम्ही लगटून राहिला, तर तुम्हांला सोडून देवाला दुसऱ्या कोणाकडे तरी जावे लागेल.

सदोम आणि गमोरा

तुम्ही सदोम आणि गमोरा व त्यांतील दुष्टतेविषयी ऐकले असेल. पण देवाला इतका राग येण्यासारखे त्यांनी नक्की काय केले? त्यांच्या लैंगिक पापामुळे देव त्यांच्यावर क्रोधाविष्ट झाला आणि त्याने त्यांचा नाश केला असे पुष्कळदा आपल्याला वाटते. पण यापेक्षा अगदी वेगळ्या कारणामुळे देवाने त्यांच्याविरुद्ध कृती केली. त्यांच्या नाशाचे कारण मला समजले तेव्हा मला आश्चर्याचा धक्काच बसला. गरीबांना भोजन देण्याच्या गरजेविषयी मी पवित्र शास्त्रात वाचत असताना मला हे कारण समजले. "पाहा, तुझी बहीण सदोम हिचे पाप येणेप्रमाणे होते: गर्व, अन्नाची विपुलता व ऐषआराम ही तिला व तिच्या कन्यांना होती; दरिद्री व गरजवंत ह्यांस तिने हात दिला नाही. त्यांनी उन्मत्त होऊन माझ्यासमोर अमंगळ कृत्ये केली; ती पाहून मी तिचा निःपात केला" (यहे.१६:४९-५०).

सदोम आणि गमोराची समस्या ही होती की त्यांच्याकडे पुष्कळ होते, पण ते गरजवंतांना देत नव्हते. ते आळशी होते. त्यांची जीवनशैली सुखलोलूप होती. त्यामुळे ते अमंगळ कृत्ये करू लागले. यावरून हे आपल्या स्पष्ट लक्षात येते की, रिकामपणा आणि खूप सुखसोयी आपल्यासाठी चांगल्या नाहीत, त्या आपल्याला अधिकाधिक त्रासात पाडतात. आपल्याकडे जे आहे ते गरजवंतांना न देणे आपल्यासाठी चांगले नाही, वास्तविक ते धोकादायक आहे, कारण स्वार्थी जीवनशैली दुष्टाईसाठी दार उघडते. या गोष्टी आपल्यासाठी चांगल्या नाहीत एवढेच नाही, तर त्या देवाला दुखावणाऱ्या आहेत. आम्ही सर्व काही स्वतःसाठी राखून ठेवणारी तळी न होता, त्याचे आशीर्वाद वाहून नेणारे कालवे व्हावे अशी देवाची इच्छा आहे.

आज आपल्याला ज्या सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत त्याबद्दल आपण आभारी आहोत, पण देवाची आज्ञा पाळण्यासाठी किंवा गरजवंतांची मदत करण्यासाठी असलेल्या आमच्या इच्छेचा नाश करण्यासाठी सैतान त्यांचा वापर करीत आहे असे मला वाटते. आपल्याला सुखसोयींची सवय लागलेली आहे, पण आपण खबरदारी घेण्याची गरज आहे. मला आराम, सुखसोयी आवडतात; पण मला हव्या असलेल्या गोष्टी मिळाल्या नाहीत, तर कुरकूर न करण्याची सवय मी स्वतःला लावून घेतली आहे.

मी लिखाण करीत असताना कोणी अडखळण आणलेले मला आवडत नाही. कारण त्यामुळे लिहिण्याची माझी विचारमालिका तुटते. सर्व विचार पुन्हा सुरळीत करण्यासाठी मला पहिल्यापासून सुरुवात करावी लागते. काही क्षणांपूर्वी या बाबतीत माझी परीक्षा झाली. माझ्या परिचयाच्या एका महिलेने मला फोन केला. तिच्या

वैवाहिक जीवनातील समस्यांविषयी ती मला सांगत होती. ती बराच वेळ बोलत होती. वास्तविक तिच्यासाठी एवढा वेळ द्यायची माझी इच्छा नव्हती, पण ही एक प्रथितयश पण एकाकी महिला होती. ज्याच्याकडे मन मोकळे करावे असे तिला कोणी नव्हते. केवळ माझ्याकडेच ती मन मोकळे करू शकत असे. एखादी व्यक्ती, प्रसिद्ध, प्रथितयश आहे म्हणून ती एकाकी नाही असे समजणे चूक आहे. ही एक आंतरराष्ट्रीय ख्याती असलेली महिला होती. माझे प्रीतीवरचे लिखाण थांबवून मी प्रत्यक्ष कृती करावी असे देवाला वाटले!! जर कल्पना करा... आम्ही ज्यावर विश्वास ठेवतो असे म्हणतो त्याचे आचरण आम्ही करावे असे देवाला वाटते.

प्रकरण

5

प्रीती मार्ग शोधते

यशस्वी होण्याचा माझा निश्चय जर पुरेसा बळकट असेल,
तर अपयश मला कधीही गाठू शकणार नाही.
ओग मॅन्डीनो

इच्छा हा एक जबरदस्त प्रेरणास्रोत आहे. मला जर खरोखरच एखादी गोष्ट करायची असेल तर ती करायला मार्गही मला सापडेल हे सत्य सरतेशेवटी माझ्या लक्षात आले आहे. ''तुम्ही हे सगळे कसे काय करू शकता?'' असा प्रश्न लोक मला पुष्कळदा विचारतात. त्यावर मी सहजपणे उत्तर देते, ''कारण मला ते करायचे आहे.'' मी जे करावे असे देवाला वाटते ते करण्याची माझी इच्छा आहे. मला लोकांना मदत करायची आहे आणि माझे जीवितध्येय पूर्ण करायचे आहे. किंवा प्रेषित पौलाच्या शब्दांत सांगायचे तर तर ''मला माझी धाव संपवायची आहे.''

''माझ्यामध्ये इच्छाच नसेल तर काय'' असा प्रश्न कदाचित तुम्हांला पडेल. देवाच्या इच्छेप्रमाणे करण्याची तुम्हांला इच्छा आहे हे स्पष्टच आहे, नाहीतर पहिले प्रकरण वाचल्याबरोबर तुम्ही हे पुस्तक खाली ठेवून दिले असते. येशू ख्रिस्ताद्वारे तुमचा देवाबरोबर संबंध असेल, तर चांगले करण्याची इच्छा तुमच्यामध्ये आहे, कारण त्याने तुम्हांला त्याचा आत्मा आणि अंतःकरण दिले आहे. यहेज्केल ११:१९ हे वचन

अभिवचन देते की, "मी त्यांस एकच हृदय देईन; तुमच्यात नवीन आत्मा घालीन; मी त्यांच्या देहांतून पाषाणहृदय काढून टाकून त्यांस मांसमय हृदय देईन." आपण आळशी, निष्क्रीय किंवा स्वार्थी असून आणि या समस्या हाताळण्याची गरज आहे. पण विश्वासणारे या नात्याने देवाचे अंतःकरण आपल्याला मिळूनही, त्याच्या आज्ञा पाळण्याची इच्छा नसणे आणि लोकांना मदत करण्याची इच्छा नसणे अशक्य आहे.

मला वाटते की प्रश्न असा आहे : तुम्हांला ते किती हवे आहे? तुमची इच्छा पूर्ण करण्यापेक्षा देवाची इच्छा पूर्ण करणे तुमच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे का?

अलीकडेच एक तरुण मला तो किती दुःखी आहे हे सांगत होता. देव त्याला अजून उंच पातळीवर येण्यासाठी बोलावत आहे हे त्याला माहीत होते, पण त्यासाठी लागणारा त्याग करण्यास तो तयार नव्हता. त्याच्यासाठी मला वाईट वाटले, कारण त्यागाच्या पलीकडे असलेला आनंद त्याने चुकवू नये अशी माझी इच्छा होती. त्याने आपले मन बदलावे म्हणून मी प्रार्थना करीत आहे.

जर आपल्याला खरोखरच काही करायचे असेल, तर ते करण्याचा मार्ग आपल्याला सापडेल. जोपर्यंत आपण हे मान्य करीत नाही, तोपर्यंत आपण गोष्टी का करू शकत नाही याविषयीच्या सबबींनी स्वतःला फसवत राहू. सबबी फार धोकादायक आहेत. आणि आपल्याला हवी असणारी प्रगती न करण्याचे ते एक प्रमुख कारण आहे. तुम्हांला व्यायाम करायला आवडेल, पण तुम्ही का करू शकत नाही याविषयी तुम्ही सबबी सांगू शकाल. तुमच्या कुटुंबासमवेत तुम्हांला अधिक वेळ घालवायची इच्छा असेल, पण तुम्ही तसे का करू शकत नाही याविषयीची एखादी सबब तुमच्याकडे असेल. इतरांना मदत करण्यासाठी तुम्ही स्वतःला अधिक देण्याची गरज असेल, आणि तुमची तसे करण्याची इच्छाही असेल, पण तुम्ही प्रत्यक्षात ते न करण्यासाठी नेहमीच काही ना काही सबबी असतात. आपल्याला सबबी सुचवणारा सैतान आहे. या सबबी आपली फसवणूक करीत आहेत, आज्ञापालन करण्यात अडखळण होत आहेत हे जोपर्यंत आपल्या लक्षात येत नाही, तोपर्यंत आपण निष्फळ, आनंदहीन जीवन जगत राहू.

चांगला शेजारी

येशूने म्हटले, "तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण शक्तीने व संपूर्ण बुद्धीने प्रीती कर; आणि जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर" (लूक.१०:२७). ज्या शास्त्र्याशी तो बोलत होता त्याला पुढे तो असे

म्हणाला की, जर तू असे करशील तर जगशील. म्हणजे तू क्रियाशील, आशीर्वादित, अमर्यादित जीवनाचा आनंद घेशील असे तो म्हणत होता. पण स्वतःला नीतीमान म्हणवून घेण्यासाठी शास्त्र्याने विचारले, "माझा शेजारी कोण?" ज्यांच्यावर मी प्रीती करावी असे नक्की लोक कोण आहेत ते त्याला समजून घ्यायचे होते. ते स्पष्ट करण्यासाठी येशूने त्याला एक गोष्ट सांगितली.

एका वाटसरूला लुटारूंनी लुटले व बेदम मारहाण केली. त्याला तसेच रस्त्याच्या कडेला अर्धमेला टाकून ते निघून गेले. थोड्या वेळाने त्या रस्त्याने एक याजक (धार्मिक मनुष्य) आला. मदतीची गरज असलेल्या या माणसाला त्याने पाहिले आणि रस्त्याच्या दुसऱ्या कडेने तो निघून गेला. तो अगोदरपासूनच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने चालला होता, का जखमी माणसाने त्याला पाहून मदतीसाठी हाक मारू नये म्हणून त्याने रस्ता ओलांडला हे मला माहीत नाही, पण त्या जखमी माणसाजवळून न जाण्याची त्याने खबरदारी घेतली. मग दुसरा एक धार्मिक माणूस म्हणजे लेवी तेथे आला. तोही रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने निघून गेला. कदाचित ही धार्मिक माणसे चर्चला जाण्यासाठी घाई करीत असतील, आणि जे करायला चर्च त्यांना शिकवत असेल ते करण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसेल. धार्मिक माणसे गरजवंताला पुष्कळदा धार्मिक शब्द ऐकवतात, पण प्रत्यक्ष मदत मात्र काहीच करत नाहीत. आज ख्रिस्तीत्वासमोरील ही सर्वांत मोठी समस्या आहे असे मला वाटते. आपल्या ज्ञानाविषयी आपण अभिमान बाळगतो, पण त्या ज्ञानाच्या सहाय्याने जे करायला पाहिजे ते मात्र करीत नाही. आपण खूप बोलतो, पण लोकांनी जे पाहायला हवे ते म्हणजे कृतीशील प्रीती त्यांना दाखवत नाही.

ज्याला मदतीची खूप गरज होती त्या मनुष्याजवळून ही दोन धार्मिक माणसे निघून गेल्यावर, एक शोमरोनी त्या रस्त्याने आला. हा काही फार धार्मिक नव्हता. या गरजू माणसाला पाहिल्यावर त्याला त्याची दया आली. त्याच्याजवळ जाऊन त्याने त्याच्या जखमा स्वच्छ करून पट्ट्या बांधल्या. त्यानंतर त्याने त्याला स्वतःच्या घोड्यावर बसवले आणि एका उतारशाळेत नेले. उतारशाळेच्या मालकाला त्याने दोन दिवसांचे भाडे दिले आणि 'मी परत येईपर्यंत याची काळजी घे, वर झालेला सर्व खर्च मी परत आल्यावर देईन,' असे सांगितले. मग येशूने त्या शास्त्र्याला विचारले की, या तीन माणसांपैकी खरा शेजारी कोण? (पाहा लूक.१०:२७-३७).

या गोष्टीचे बरेच पैलू माझे लक्ष वेधून घेतात. पहिली गोष्ट म्हणजे मी म्हटल्याप्रमाणे, धार्मिक मनुष्यांनी काहीही केले नाही. काहीही न करायला आपण नकार दिला पाहिजे. देव ज्या गरजा आपल्या लक्षात आणून देईल त्यांची पूर्तता करण्यासाठी आपण जे काही करू ते अगदी किरकोळ असले तरी आपण काही ना काही करण्याचा

मार्ग शोधला पाहिजे. कधीकधी अशी वेळ येते की, आपण केवळ प्रार्थना करू शकतो किंवा सांत्वनपर शब्द बोलून उत्तेजन देऊ शकतो हे मला मान्य आहे, पण किमान कशा प्रकारे मदत करता येईल हे आपण पाहिले पाहिजे. आपण निदान त्याविषयी विचार तरी केला पाहिजे. आम्ही काहीच करू शकत नाही असे समजू नये, किंवा आपल्याला तकलीफ घ्यायची इच्छाच नसल्यामुळे काहीही न करण्यासाठी सबबी शोधण्याचा प्रयत्न करू नये.

या गोष्टीतील दुसरी बाब म्हणजे या माणसाला मदत करण्यासाठी शोमरोनी माणसाने खूप त्रास घेतला. त्याच्या प्रवासाला झालेल्या प्रचंड उशिराची मी कल्पना करते. तो काहीतरी महत्त्वाच्या कामासाठी निघाला होता हे नक्की, कारण आपले काम उरकून परत येईपर्यंत त्या माणसाची देखभाल करण्याची व्यवस्था त्याने केली. त्याने आपला वेळ व पैसा यांची गुंतवणूक केली, आणि गरजू माणसाला मदत करण्यासाठी तो स्वतःची गैरसोय सोसण्यास तयार होता.

तसेच या तातडीच्या गरजेमुळे शोमरोनी माणूस आपला मूळ उद्देशही विसरला नाही. हे देखील फार महत्त्वाचे आहे, कारण लोक भावनेच्या, कळवळ्याच्या आहारी इतके जातात की, त्यांच्या मूळ ध्येयापासून त्यांचे लक्ष विचलीत होते. आमची मुलगी सॅन्ड्रा हिला लोकांना मदत करायला खूप आवडते. ही चांगली गोष्ट आहे. पण कालच तिने मला फोन केला आणि कोणाला व किती प्रमाणात मदत करायची याबाबत तिला संतुलन राखता यावे म्हणून प्रार्थना करण्याची विनंती केली. तिला दोन जुळ्या मुली आहेत. त्यांची काळजी तिला घ्यावी लागते. तिच्या चर्चमधील पालकवर्गाला ती शिकवते, तसेच तिच्यावर इतर अनेक जबाबदाऱ्या आहेत, आणि तरी ती गरजू लोकांच्या विनंत्या ऐकत असते. पुष्कळदा काही विचार न करता ती मदत करायला पुढे सरसावते, तसेच आपल्या इतर जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष न करता मदत कशी करावी याचा विचार करीत नाही. याचा परिणाम असा होतो की, मदत करण्याची चांगली इच्छा असूनही ती कधी कधी निराश होते, गोंधळून जाते, आणि अर्थातच देवाची तशी इच्छा नाही.

येशूच्या गोष्टीतील शोमरोन्याने जे केले ते करायला मी तिला उत्तेजन दिले. मी तुम्हांलाही तेच सांगेन. तुमच्या योजना बदलण्यास आणि गैरसोय सोसण्यास तयार राहा. गरजेची पूर्तता करण्यासाठी आपला काही वेळ आणि पैसा द्यायला तयार राहा. मदत करण्यासाठी इतर लोक उपस्थित असतील तेव्हा सर्व काही स्वतःच करण्याचा प्रयत्न करू नका. गरज भागवण्यासाठी शोमरोनी माणसाने उतारशाळेच्या मालकाला सहभागी करून घेतले, जेणेकरून त्याचे मूळ काम करायला तो मोकळा होईल.

आपण रस्त्याच्या मधोमध चालत नसू, तर कडेच्या कोणत्या खड्ड्यात पडलो आहोत याचे सैतानाला काही वाटत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे एकतर लोक काहीच करीत नाहीत, किंवा सर्वच करायचा प्रयत्न करतात आणि मग निराश, उद्विग्न होतात. आपला गैरफायदा घेतला जात आहे असे त्यांना वाटते. आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात, इतरांना मदत करण्याच्या बाबतीतही, संतुलन राखण्याची गरज आहे. मी एकटीच सर्व काही करू शकत नाही, आणि काहीही चांगले करू शकत नाही हे मी फार कठीण मार्गाने शिकले, आपणा सर्वांच्या बाबतीतही असेच आहे. पण खूप गुंतण्याच्या भीतीला मी अजिबातच सहभागी होऊ न देण्यापासून रोखते.

तसेच माझ्या हेही लक्षात येते की, मदत करीत असताना आपण किती खर्च करावा याबाबतीत त्याने स्वतःवर काही मर्यादा घालून घेतली नाही. जखमी माणसाची देखभाल करायला जो काही खर्च येईल तो मी परत आल्यावर तुला देईन असे त्याने उतारशाळेच्या मालकाला सांगितले. जे काही करायला हवे ते करण्यास तयार असलेली व्यक्ती मोठ्या मुश्किलीने पाहायला मिळते.

आपल्या स्वतःचे प्राधान्यक्रम सुरक्षित ठेवण्यासाठी कधी कधी आपण स्वतःला मर्यादा घातल्या पाहिजेत असे मी सांगितले, पण या गोष्टीत पाहिले तर या माणसाकडे भरपूर पैसे होते, म्हणून त्याला स्वतःवर बंधन घालून घेण्याची गरज नव्हती. त्याने भयभीत दृष्टीकोनातून नव्हे, तर उदारतेच्या दृष्टीकोनातून कृती केली. एखादी समस्या सोडवण्यासाठी, किंवा गरज भागवण्यासाठी ते सर्व करा असे देव कदाचित आपल्याला म्हणणार नाहीत, पण आपण जे करू शकतो ते मात्र आपण करावे असे त्याला वाटते. आणि जर तो आपल्याला सर्वच करायला सांगत असेल तर आपण ते केले पाहिजे. आपले सर्वस्व देणे हे आव्हानात्मक आहे, तसेच आपल्याला विश्वासालाही बराच ताण द्यावा लागतो, पण त्यासोबतच या जगातील कोणत्याही गोष्टीचा आपल्यावर ताबा नाही याचे ज्ञानही आपल्याला होते.

तुझी सर्व बचत, आणि सर्व बचत सर्टिफिकेट्स देऊन टाक असे देवाने एकदा मला सांगितले. समर्पणाची ही नवीन पातळी माझ्यासाठी कठीण होती, कारण खूप दिवसांपासून मी पैसे साठवत होते आणि योग्य वेळी खरेदीला बाहेर पडण्याची माझी योजना होती. गिफ्ट सर्टिफिकेट्स हा सर्वांत कठीण भाग होता. माझ्या वाढदिवसानिमित्त मिळालेली अनेक सुंदर सर्टिफिकेट्स माझ्याकडे होती. पैशांची गरज पडेल तेव्हा त्यांचा वापर करता येईल ही कल्पना मोठी सुखद होती. देणे मला काही नवीन नव्हते. पण सर्वच देऊन टाकणे ही नवीन पायरी होती. देवाबरोबर काही वेळ वादविवाद करून आणि सुचतील त्या सबबी सांगण्याचा प्रत्न करून शेवटी मी त्याची

आज्ञा पाळली. आपली सर्व बचत देण्याचे दुःख तात्कालिक होते, पण आज्ञापालनाचा आनंद, आणि मालमत्तेचा माझ्यावर काही ताबा नाही हे ज्ञान हे कधीही न संपणारे होते.

अशा प्रकारे परीक्षा होण्याची ही माझी पहिलीच वेळ होती, पण अर्थातच अखेरची नाही. परीक्षा घेण्याची वेळ देव निवडतो आणि आपल्या फायद्यासाठी ते आवश्यक आहे. देव आपल्याला जे देतो त्याचा आनंद आपण घ्यावा असे त्याला वाटते, पण तसेच आपण केवळ सेवक आहोत, मालक नाही हे आपण समजून घ्यावे. तो मालक आहे आणि आनंदाने व मनापासून त्याची सेवा करणे हे आपले काम आहे.

माझा शेजारी कोण?

तुम्ही कोणाला मदत करावी, आणि तुमचा शेजारी कोण? तुमच्या संपर्कात येणारी कोणतीही गरजू व्यक्ती तुमची शेजारी आहे. ज्याचे म्हणणे तुम्ही ऐकावे अशी एखादी व्यक्ती ती असेल, किंवा उत्तेजन, कौतुक हवे असलेली एखादी व्यक्ती असेल. तुमचा थोडासा वेळ हवा असलेली एखादी व्यक्ती असेल किंवा ज्याची आर्थिक गरज तुम्ही भागवावी अशी एखादी व्यक्ती असेल.

आपल्यापेक्षा वेगळ्या असणाऱ्या व्यक्तींना आपण नेहमीच टाळण्याचा प्रयत्न करतो कारण त्यामुळे आपल्याला अवघडल्यासारखे वाटते. मला असे वाटते की, आपल्यासाठी काय सोयीचे आहे याचा विचार न करता त्यांना कसे वाटते याचा विचार आपण केला पाहिजे.

आपण चांगला शेजारी आहोत हे दाखवण्याची यादी न संपणारी आहे, पण आपल्याला लोकांना खरोखरच मदत करायची असेल, त्यांच्यासाठी आशीर्वाद व्हायचे असेल तर आपल्याला नक्कीच मार्ग मिळेल.

मोठा प्रभाव टाकणाऱ्या छोट्या गोष्टी

येशूने आपला वेळ वाया घालवला नाही, म्हणून त्याने केलेली प्रत्येक गोष्ट अर्थपूर्ण होती आणि तिच्यात आपल्यासाठी मोठा धडा आहे याची आपण खात्री बाळगावी. त्याच्या शिष्यांचे पाय धुण्यासाठी त्याने खर्च केलेल्या वेळेविषयी आपण विचार करू (पाहा योहान.१३:१-१७). त्याने हे जे केले त्याचा अर्थ काय? त्याच्या शिष्यांना त्याला अनेक गोष्टी शिकवायच्या होत्या. त्यापैकी एक म्हणजे एकदुसऱ्याची सेवा करणे. येशू देवाचा पुत्र होता आणि आहे. तो त्रैक्यातील दुसरी व्यक्ती आहे. त्यामुळे

तो किती महान आहे हे सांगण्याची गरज नाही. त्याने दुसऱ्यांचे - विशेषतः त्याचे विद्यार्थी असणाऱ्या लोकांचे - पाय धुण्याची काही गरज नव्हती. पण त्याने तसे केले, कारण ते अधिकारी असूनही सेवक असतील हे त्याला त्यांना शिकवायचे होते. हा महत्त्वाचा धडा शिकण्यात आज अनेकजण अपयशी ठरले आहेत.

येशूच्या काळात लोकांचे पाय बऱ्यापैकी घाण असत. लोक धुळीने भरलेल्या रस्त्यांवरून प्रवास करीत असत. त्यांच्या जोड्यांना खाली तळवे आणि वर काही पट्ट्या असत. घरात येणाऱ्या पाहुण्यांचे पाय धुण्याची पद्धत त्या काळात होती, पण हे काम घराचा मालक नव्हे, तर सेवक करीत असे. येशूने आपली वस्त्रे काढून सेवकाच्या रुमालावर (टॉवेल) ठेवली. हा दुसरा पाठ होता. एखाद्याची सेवा करण्यासाठी आपण आपले पद, प्रतिष्ठा काही वेळ बाजूला ठेवू शकतो, ते गमावण्याची भीती बाळगण्याची गरज नाही हे तो दाखवू इच्छित होता.

पेत्र हा सर्वांत जास्त बोलणारा, किंवा बडबड्या शिष्य होता. त्याने येशूला आपले धुऊ देण्यास मनाई केली. पण येशूने म्हटले, मी जर तुझे पाय धुतले नाहीत, तर आपण मित्र नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, त्यांचे नातेसंबंध चांगले आणि दृढ होण्यासाठी त्यांनी एकमेकांची सेवा, मदत केली पाहिजे. नवराबायकोने हे तत्त्व अंमलात आणले असते तर किती विवाह वाचले असते!

काही वर्षांपूर्वी मी ठरवले की येथून पुढे एकांगी नातेसंबंध ठेवायचे नाहीत. एकांगी म्हणजे सर्व काही मीच द्यायचे आणि दुसऱ्या व्यक्तीने केवळ घ्यायचे. अशा प्रकारचे नातेसंबंध हे खरे नातेसंबंध नाहीत, साहजिकच त्यांमध्ये हळूहळू कडवटपणा येतो. आपण एकमेकांसाठी करण्याची गरज आहे. चांगले नातेसंबंध टिकवण्याचा हा भाग आहे.

> आपण एकमेकांसाठी करण्याची गरज आहे. चांगले नातेसंबंध टिकवण्याचा हा भाग आहे.

आपल्या मुलांसाठी आपण पुष्कळ काही करतो, पण तशीच ती आपल्यासाठी करतात. ते जे आपल्यासाठी करतात ते पुष्कळदा आपण स्वतः अधिक सहजपणे करू शकू, पण त्यांनी आमच्याकडून घेण्यासोबतच आपल्याला देण्याचीही गरज आहे, आणि आपण त्यांना तसे करू दिले पाहिजे.

केवल आत्यंतिक गरज असेल तरच दिले पाहिजे असे नाही. ज्यांना काही गरज नाही त्यांच्यासाठी काहीतरी करण्याचे ओझे कदाचित आपल्यावर येईल.जर त्यांना

गरज नाही, तर असे का करावे? कारण कोणत्याही प्रकारच्या देण्यामुळे लोकांना उत्तेजन मिळते आणि आपल्यावर प्रीती केली जात आहे हे त्यांना समजते. आणि आपणा प्रत्येकाकडे कितीही गोष्टी असल्या, तरी आपल्यावर प्रीती केली जात आहे हे समजणे आनंदाचे वाटते. तुमच्याकडे असणाऱ्या साधनसामग्रीचा उपयोग इतरांसाठी आशीर्वाद होण्यासाठी करा म्हणजे तुमच्याकडची साधनसामग्री कधीही संपणार नाही.

पाय धुणे हे हलके काम होते. ते केवळ सेवकांसाठी राखीव होते. पण यात मोठा पाठ होता : स्वतःला नम्र करा आणि मोठा प्रभाव पाडणाऱ्या लहान, किरकोळ गोष्टी करायची तयारी ठेवा.

लहान लहान गोष्टी महत्त्वाच्या आहेत

भारताच्या मिशनदौऱ्यावर जाताना आम्ही आमच्यासोबत डिलिरियस बॅन्ड नेला. त्यांच्यातील स्टू या ड्रमवादकाला एका छोट्या मुलीने कातड्याचा एक छोटा पट्टा दिला. ब्रेसलेट म्हणून ती तो वापरत असे. स्वतःकडे कमी असूनही इतरांना देण्याच्या या छोट्याशा कृतीमुळे स्टूचे जीवन बदलले. त्याने जाहीरपणे सांगितले की मी मरेपर्यंत हा धडा विसरणार नाही. इतक्या लहान व्यक्तीला जर द्यायची इच्छा असेल तर त्याने काय करावे? होय, लहान गोष्टींचा मोठा प्रभाव पडतो.

तुम्ही कोणती लहान गोष्ट करू शकता? येशूने शिष्यांचे पाय धुतले आणि आपण त्याच्या उदाहरणाचे अनुकरण केले, तर आपण सुखी आणि आशीर्वादित होऊ असे सांगितले. एकमेकांसाठी आपण ज्या लहान लहान गोष्टी करू शकतो आणि केल्या पाहिजेत असे पवित्र शास्त्र सांगते त्यातील काही गोष्टींची यादी पुढे दिली आहे :

- एकमेकांची काळजी घेणे
- एकमेकांसाठी प्रार्थना करणे
- आशीर्वाद होण्याची इच्छा बाळगणे
- इतरांवर आपण कशा प्रकारे दया दाखवू शकतो ते पाहणे
- आतिथ्यशील आणि मित्रत्वाने राहणे
- एकमेकांबरोबर धीराने राहणे
- दुसऱ्यांच्या चुका आणि उणिवा सहन करणे
- संशयाचा फायदा इतरांना देणे

- एकमेकांना क्षमा करणे
- एकमेकांचे सांत्वन करणे
- विश्वासू राहणे
- प्रामाणिक राहणे
- एकमेकांना उचलून धरणे - इतरांना उत्तेजन देणे, त्यांना त्यांच्या बलस्थानांची जाणीव देणे
- आशीर्वादित होणाऱ्या लोकांसाठी आनंदित होणे
- एकमेकांना पुढे जाऊ देणे (दुसऱ्या कोणाला तरी आपल्यापुढे जाऊ द्या, किंवा चांगले असे काही तरी त्यांना द्या)
- एकमेकांचा विचार करणे
- लोकांच्या गुप्त बाबी उघड करू नका आणि त्यांचे दोष जाहीर करू नका
- एकमेकांच्या चांगुलपणावर विश्वास ठेवणे

मी म्हटल्याप्रमाणे ही पूर्ण यादी नाही. प्रीतीला अनेक चेहरे किंवा मार्ग आहेत. या पुस्तकात त्यांपैकी पुष्कळ पैलूंचा आपण विचार करणार आहोत. या ठिकाणी मी सांगितलेल्या गोष्टी या तशा साध्यासोप्या आहेत. आपली इच्छा असेल तर आपण सर्वजण त्या करू शकतो. त्यांच्यासाठी आपल्याला विशेष योजना आखण्याची गरज नाही, पण संधी मिळेल तसे दिवसभर आपण त्या करीत राहू शकतो.

तर मग जसा आपणाला प्रसंग मिळेल त्याप्रमाणे आपण सर्वांचे व
विशेषतः विश्वासाने एका घरचे झालेल्यांचे बरे करावे.
गलती. ६:१०

प्रीतीने स्वतःला व्यक्त केले पाहिजे

प्रीतीकडे एक गोष्ट या दृष्टीने आपण बहुधा पाहतो, पण प्रीती करणे हे क्रियापदसुद्धा आहे. प्रीती जी आहे ती राहण्यासाठी तिने कृती केली पाहिजे. प्रीतीचा एक भाग असा आहे की त्याला अभिव्यक्तीची गरज आहे. पवित्र शास्त्र विचारते की, आपल्याला जर एखादी गरज दिसते, आणि आपल्याला कळवळा न येतो आपण अंतःकरण बंद करतो, तर देवाची प्रीती आपल्यामध्ये कशी राहील? (पाहा १ योहान.३:१७). प्रीती दाखवली

नाही तर ती अधिकाधिक दुर्बल होत जाईल. स्पष्टच सांगायचे तर ती पूर्णपणे निष्क्रीय होईल. इतरांसाठी गोष्टी करण्यामध्ये आपण सक्रीय राहिलो, तर आपण स्वार्थी, निष्क्रीय आणि फलहीन राहण्यापासून स्वतःला वाचवू. प्रीतीची अविभाज्य कृती म्हणजे येशूने त्याचा स्वतःचा जीव आमच्यासाठी दिला. आपणही आपली जीवने एकमेकांसाठी दिली पाहिजेत. हे म्हणजे फारच झाले असे वाटते ना? आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्यापैकी बहुतांश लोकांना दुसऱ्या कोणासाठी तरी जीव द्यायची गरज भासणार नाही. पण आपले जीवन दुसऱ्यांना देण्याची संधी आपल्याला रोज मिळेल. ज्या ज्या वेळी तुम्ही तुमच्या स्वतःच्या इच्छा, गरजा बाजूला ठेवून, दुसऱ्यांसाठी प्रीतीची कृत्ये करता तेव्हा त्या क्षणासाठी, तासासाठी किंवा दिवसासाठी तुम्ही तुमचा जीव देत असता.

जर आपण देवाच्या प्रीतीने परिपूर्ण आहोत, आणि आपण तसे आहोत; कारण नवीन जन्माच्या वेळी देवाचा आत्मा आपली अंतःकरणे प्रीतीने भरतो, म्हणून आपण ही प्रीती आपल्यामधून वाहू दिली पाहिजे. निष्क्रियतेमुळे ती जर साचून राहिली तर ती काहीच उपयोगाची नाही. देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला (पाहा योहान.३:१६). तुमच्या हे लक्षात येते का? देवाच्या प्रीतीने त्याला द्यायला उद्युक्त केले! जर आपण लोकांना काही देत नाही, तर आम्ही त्यांच्यावर प्रीती करतो असे म्हणणे निरर्थक आहे. "आज कोणाला तरी मदत करण्यासाठी मी काय केले?" असे लिहिलेले मोठे बोर्डस तुमच्या घरात ठिकठिकाणी टांगा. तुमच्या अंगी नवीन सवयी बाणवून घेत असताना, आणि प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होत असताना तुम्हांला वेळोवेळी तुमच्या ध्येयाचे स्मरण हे बोर्ड्स करून देतील.

प्रीती ही कृती आहे. ती केवळ संकल्पना किंवा शब्द नाही. शब्द महत्त्वाचे आहेत आणि लोकांवर प्रीती करण्यासाठी आपण पुष्कळदा शब्दांचा उपयोग करतो, पण कृतीद्वारे आपण नेहमी आपली प्रीती दाखवली पाहिजे.

आज कोणाला तरी तुमची प्रीती दाखवण्यासाठी तुम्ही काय करू शकता? त्याविषयी थोडा वेळ विचार करून योजना आखा. दुसऱ्या कोणाच्या तरी आनंदात भर घातल्याशिवाय आजचा दिवस मावळू देऊ नका.

प्रकरण

6

चांगल्याने वाइटावर विजयी व्हा

दुष्टाईला विजय मिळवण्यासाठी आवश्यक असणारी एकच गोष्ट
म्हणजे चांगल्या माणसांनी काहीच न करणे.
एडमंड बर्क

काहीही न करणे सोपे आहे, पण ते तितकेच धोकादायक आहे. कारण जेथे दुष्टाईला विरोध होत नाही, तेथे ती जोमाने फोफावते. आपल्या समाजात किंवा जीवनात चुकीच्या असणाऱ्या गोष्टींविषयी कुरकूर करण्याच्या सापळ्यात आपण सर्वजण पुष्कळदा सापडतो. पण कुरकूर करण्यामुळे अधिक निराशा पदरी पडण्यापेक्षा दुसरे काही हाती लागत नाही. तिच्यामुळे काहीही बदलत नाही, कारण तिच्यात म्हणजे कुरकुरीत सकारात्मक ताकद नसते.

देवाने पृथ्वीची निर्मिती केल्यापासून तिच्यात ज्या काही चुका, ज्या काही वाईट गोष्टी घडल्या आहेत त्यांसाठी काहीही न करता तो केवळ कुरकूर करीत बसला असता तर काय झाले असते याची जरा कल्पना करा. पण देव कुरकूर करीत नाही. तो चांगला राहणे चालू ठेवतो आणि न्यायासाठी कार्य करतो. चांगुलपणाने आपण सर्व दुष्टाईवर विजयी होऊ हे त्याला माहीत आहे. दुष्टाई सामर्थ्यशाली आहे, पण चांगुलपणा त्यापेक्षा सामर्थ्यशाली आहे.

आपण थांबून हे लक्षात घेण्याची गरज आहे की, देव त्याच्या लोकांद्वारे कार्य करतो. होय, देव सर्वदा चांगला आहे. पण त्याने या पृथ्वीवर आपल्या मुलांद्वारे म्हणजे तुमच्या व माझ्याद्वारे कार्य करण्याची निवड केली आहे. सर्व प्रसंगी प्रीती करण्यास आणि चांगली कृत्ये करण्यास आपण समर्पित झालो तर तो किती तरी महान कृत्ये करील. मत्तय.५:१६ येशूने दिलेली सूचना आपण लक्षात ठेवण्याची गरज आहे : "त्याप्रमाणे तुमचा प्रकाश लोकांसमोर असा पडू द्या की त्यांनी तुमची सत्कर्मे पाहून तुमच्या स्वर्गातील पित्याचे गौरव करावे."

चांगुलपणा सामर्थ्यशाली आहे

दुष्टाईला आपण जितके दुष्टाईने प्रत्युत्तर देऊ तितकी ती वाढते. एल सीड नावाचा एक सिनेमा मला आठवतो. ज्या तत्त्वाविषयी मी बोलत आहे त्या तत्त्वाचा उपयोग करून ज्याने स्पेनला एक केले व स्वतः महानायक झाला त्याची ही कथा आहे. अनेक शतके ख्रिस्ती लोकांचा मूर लोकांशी संघर्ष चालू होता. ते एकमेकांचा द्वेष करीत आणि एकमेकांची हत्या करीत असत. युद्धात एल सीडने पाच मूर लोकांना पकडले. पण त्याने त्यांना ठार मारायला नकार दिला, कारण हिंसेने काही भले होत नाही हे त्याच्या लक्षात आले होते. आपल्या शत्रूंवर प्रीती करण्यामुळे त्यांची हृदये पालटतील आणि मग दोन्ही गट एकत्र शांतीने राहतील असा त्याचा विश्वास होता. त्याच्या या कृतीमुळे लोकांनी त्याला सुरुवातीला बंडखोर मानले, पण हळूहळू त्याच्या म्हणण्याप्रमाणे घडले आणि एक हिरो, महानायक म्हणून त्याचा सन्मान करण्यात आला.

पकडलेल्या मूर लोकांपैकी एकाने म्हटले, "कोणीही ठार मारू शकतो, पण केवळ खरा राजाच आपल्या शत्रूंवर दया दाखवू शकतो." एल सिडच्या दयाळूपणाच्या या कृतीमुळे त्याच्या शत्रूंनी त्या दिवसापासून त्याला आपला मित्र मानले आणि ते त्याचे साथीदार झाले. येशू खरा राजा आहे आणि तो चांगला, दयाळू आणि सर्वांवर कृपा करणारा आहे. त्याच्या उदाहरणाचे अनुकरण करण्यापेक्षा कमी काही आपण करू शकतो का?

ज्याच्यावर दया करावी असे आता क्षणी तुम्हांला कोण आठवते का? असे तुमच्याशी वाईटपणे वागलेले, पण ज्यांच्याशी तुम्ही चांगुलपणाने वागू शकता असे कोणी आहे का? दयाळूपणे आणि चांगुलपणाने वागणे, विशेषतः तुमच्या शत्रूंशी - ही तुम्ही केलेली सर्वांत शक्तीशाली गोष्ट होऊ शकेल.

प्रार्थना कार्य करते

टीव्हीवर आणि सिनेमात दाखवल्या जाणाऱ्या वाईट गोष्टींमुळे मागच्या काही वर्षांत दुष्टाईची झपाट्याने वाढ झाल्याचे आपण पाहिले आहे. ज्योतिष सांगणारे, जादूटोणा करणाऱ्या लोकांना टीव्हीवर कार्यक्रम करताना पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. फी न आकारता ते लोकांना भविष्य सांगतात. पुष्कळ डॉलर्स द्यायची तयारी असलेल्या लोकांना टीव्हीवर बोलावून ते त्यांची कुंडली पाहतात. ''यासारख्या गोष्टी टीव्हीवर दाखवणे भयंकर आहे. पुष्कळ लोक आपले पैसे व्यर्थ घालवत आहेत आणि त्यांची फसवणूक होत आहे,'' असे म्हणून मी बरेचदा याविरुद्ध आवाज उठवला. पुष्कळ लोक हीच गोष्ट बोलताना मी ऐकले. एके दिवशी देवाने माझ्या मनात हा विचार घातला, *''तू आणि याविषयी कुरकूर करणाऱ्या सर्व लोकांनी जर हा वेळ प्रार्थनेत घालवला असता तर आतापर्यंत मी याविषयी काहीतरी केले असते.''* तेव्हा मी प्रार्थना करू लागले तसेच इतर पुष्कळजणांना प्रार्थना करायला सांगितले. लवकरच टीव्हीवरील हे कार्यक्रम खोटे असल्याचे सिद्ध झाले व त्यांचे प्रसारण थांबले.

टीव्हीवर असले मंत्रतंत्रांचे आणि भविष्य सांगणारे कार्यक्रम सुरू झाल्याबरोबर त्याविरुद्ध कुरकूर करण्याची माझ्याप्रमाणे आपणा बहुतेकांची प्रवृत्ती असते. पण परिस्थितीत बदल होण्यासाठी आपण काहीच करीत नाही. दुष्टाईवर विजय मिळवण्यासाठी प्रार्थना ही शक्तीशाली गोष्ट आहे. म्हणून ज्याविषयी कुरकूर करण्याचा मोह आपल्याला होईल त्यासाठी आपण प्रार्थना केली पाहिजे. कुरकुरीला देव दुष्टाई समजतो, पण विश्वासाने भरलेली प्रार्थना शक्तीशाली आणि परिणामकारक असते. प्रार्थना ही चांगले काही तरी करण्यासाठी देवाला दार उघडते.

दुष्टाईला व्यवस्थित प्रत्युत्तर द्या

वचनदत्त देशात जाण्यासाठी इस्राएली लोक अरण्यातून प्रवास करीत होते तेव्हा त्यांना परीक्षांना, अडचणींना तोंड द्यावे लागले. त्या सर्वांनी याला कुरकूर करून प्रत्युत्तर दिले. ते सर्व प्रकारच्या अनैतिकतेत रममाण झाले. कुरकूर करणे हे त्यांच्या अनेक पापांपैकी एक होते. त्यामुळे नाश करणाऱ्याला त्यांच्या जीवनात प्रवेश मिळाला आणि त्यांच्यापैकी पुष्कळजण मरण पावले (पाहा १ करिंथ.१०:८-११). देवाशी विश्वासू राहून, त्यांची स्तुतीभक्ती करून आणि एकमेकांशी चांगुलपणाने वागून त्यांनी परीक्षांना तोंड दिले असते तर अरण्य पार करायला त्यांना कमी वेळ लागला असता. पण त्यांच्यापैकी पुष्कळजण अरण्यातच मरण पावले, ते कधीच आपल्या इच्छित स्थळी

गेले नाहीत. आपल्या बाबतीत घडणाऱ्या वाईट, दुष्ट गोष्टींसाठी प्रार्थना, स्तुती करण्याऐवजी, आभार मानण्याऐवजी आणि इतर लोकांना मदतीचा हात देण्याचे कार्य पुढे चालू ठेवण्याऐवजी कुरकूर करीत राहिल्याने किती वेळ आपण आपल्याला हव्या असणाऱ्या फळांपासून वंचित राहतो असा प्रश्न मला पडतो.

विश्वास आणि प्रीती

पुष्कळ वर्षांपूर्वी मी मंडळीत आणि सभासंमेलनात विश्वासाविषयीचे शिक्षण मला अधिक ऐकायला मिळाले, तसेच त्या काळात मी जी पुस्तके वाचली ती विश्वासासंबंधी होती. "देवावर विश्वास ठेवा आणि सर्व काही सुरळीत होईल" हाच विषय जणू काय सर्व ख्रिस्ती जगतात शिकवला जात होता.

विश्वासाशिवाय आपण देवाला संतोष देऊ शकत नाही (इब्री.११:६). म्हणून आपण त्याच्यावर विश्वास, भरवसा ठेवण्याची निश्चितच गरज आहे, पण देवाच्या वचनात अजून दुसरी एक गोष्ट आहे जिच्यामुळे आपले संपूर्ण चित्र स्पष्ट होईल असे मला वाटते. मी तुम्हांला सांगेन, पण देवाबरोबरच्या माझ्या प्रवासाच्या प्रारंभीच्या वर्षांमधील अनुभव मला तुम्हांला सांगू द्या.

वयाच्या नवव्या वर्षी मी येशूला आपला तारणारा म्हणून स्वीकारले, पण त्याच्यामध्ये मला काय आहे किंवा त्याच्यासोबतच्या नातेसंबंधामुळे माझे जीवन कसे बदलेल हे मला समजत नव्हते, कारण आध्यात्मिक गोष्टींसंबंधात मला शिक्षण मिळत नव्हते. ज्या घरात मी वाढले ते फार विचित्र होते. माझे वडील दारुडे होते, माझ्या आईशी ते विश्वासू नव्हते, अनेक स्त्रियांशी त्यांचे संबंध होते, ते फार तापट आणि मारकुटे होते. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्यांनी माझ्यावरही नियमितपणे लैंगिक अत्याचार केले. ही यादी वाढतच जाईल, पण माझ्या घराचे चित्र तुमच्या नजरेसमोर उभे राहिले असेल असे मला वाटते.

मी तेवीस वर्षांची झाले तेव्हा काय झाले ते आपण पाहू. डेव्हशी माझा विवाह झाला आणि मी त्याच्याबरोबर चर्चला जाऊ लागले. माझी देवावर प्रीती होती आणि त्याच्याविषयी शिकण्याची मला इच्छा होती. मी बायबलवर्गाला जाऊ लागले. देवाची प्रीती, कृपा आणि विश्वासाच्या पायाविषयी आवश्यक असणारी सिद्धान्ततत्त्वे मी शिकले.

माझे ख्रिस्तीत्व माझ्या रोजच्या व्यावहारिक जीवनात जणू काय मदत करीत नव्हते, म्हणून वयाच्या बत्तीसाव्या वर्षी मी खूप निराश, हताश झाले. मेल्यावर मी स्वर्गात

जाईन असा माझा विश्वास होता, पण पृथ्वीवर जगत असतानाचा माझा रोजचा दिवस आनंदाने आणि शांतीने जावा म्हणून काहीतरी मदत मिळावे असे मला तीव्रतेने वाटत होते. बालपणात झालेल्या अत्याचारामुळे माझे हृदय दुःखाने भरले होते आणि माझ्या रोजच्या जीवनात त्याचा परिणाम होत होता. दुसऱ्या लोकांशी त्यामुळे मला चांगले संबंध ठेवता येत नव्हते.

देवाचे वचन सांगते की, आपण देवाचा परिश्रमाने शोध घेतला तर तो सापडतो (पाहा नीती.८ः१७). मी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू केला आणि त्याचे दर्शन मला झाले त्यामुळे मी त्याच्या अगदी निकट गेले. माझ्या रोजच्या जीवनात त्याचे सान्निध्य जाणवू लागले आणि त्याला अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेण्यासाठी मी मनापासून अभ्यास करू लागले. मी जिकडे जाईन तिकडे जणू काय विश्वासाविषयीच ऐकू लागले. माझ्या निरनिराळ्या परिस्थितींत मी विश्वास लागू करू शकते, त्यामुळे देवासाठी दार उघडले जाईल व तो मला मदत करील हे मी शिकले.

जी तत्त्वे मी शिकत होते ती सत्य आहेत असा माझा पूर्ण विश्वास होता, पण तरीदेखील प्रचंड हताशेचा अनुभव मला येत होता, कारण ही तत्त्वे माझ्या जीवनात जणू कार्यच करीत नव्हती. त्या काळी देव माझा सेवाकार्यात उपयोग करून घेत होता. माझे सेवाकार्य खूपच वाढले होते, माझी निश्चितच खूप प्रगती झाली होती. पण तरीही माझ्या अंतःकरणा मला मोठी पोकळी जाणवत होती. म्हणून मी पुन्हा एकदा नेटाने शोध घेणे चालू केले. माझा शोध आणि सखोल अभ्यास यांद्वारे माझ्या लक्षात आले की, जी मुख्य शिकवण आपल्याला द्यायला येशू आला होता, तीच मला माहीत नव्हती. ही शिकवण म्हणजे देवावर प्रीती करणे, आपल्या स्वतःवर प्रीती करणे आणि इतरांवर प्रीती करणे (पाहा मत्तय.२२ः३६-३९). देवासोबत वाटचाल करीत असताना मी विश्वासाविषयी खूप ऐकले होते, पण प्रीतीच्या सामर्थ्याविषयी मी शिकले नव्हते.

देवावर विश्वास ठेवा आणि चांगले ते करीत राहा

गेली अनेक वर्षे या अद्‌भुत विषयाविषयी शिकत असताना माझ्या लक्षात आले आहे की, विश्वास केवळ प्रीतीद्वारे कार्य करतो. गलती.५ः६ नुसार विश्वास प्रीतीच्या द्वारे कार्य करतो.

पवित्र आत्म्याने मला स्तोत्र.३७ः३ या वचनाचा अभ्यास करण्यास सांगितलेः "परमेश्वरावर भाव ठेव व सदाचाराने वाग." देवासोबत सुरळीत नातेसंबंध

ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीपैकी केवळ अर्धीच गोष्ट आपल्याकडे आहे हे लक्षात येऊन मी हादरले. माझ्याकडे विश्वास होता, पण ''सदाचाराने वाग'' (चांगली कृत्ये कर) हा भाग नव्हता. माझ्या बाबतीत चांगल्या गोष्टी घडाव्यात असे मला वाटत होते, पण इतरांशी चांगले वागण्याची मात्र मला फिकीर नव्हती.

मी देवावर विश्वास तर ठेवत होते, पण चांगली कृत्ये करण्यावर लक्ष केंद्रित करीत नव्हते हे समजून घेण्यासाठी देवाने स्तोत्र.३७ः३ या वचनाद्वारे माझे डोळे उघडले. माझ्यामध्ये ही मोठी उणीव होती हे खरे, पण माझ्या हेही लक्षात आले की बहुसंख्य ख्रिस्ती लोकांचीदेखील हीच स्थिती आहे. आम्हांला हव्या असलेल्या गोष्टींसाठी आम्ही देवावर विश्वास ठेवत होतो. आम्ही ऐक्याने प्रार्थना करीत होतो, सहमतीच्या प्रार्थनेने आमचा विश्वास मोकळा करीत होतो, पण देवाने आपल्या गरजा पूर्ण करीपर्यंत आपण इतर लोकांसाठी काय करू शकतो याविषयी चर्चाविनिमय करण्यासाठी मात्र कधी जमत नव्हतो. आमच्यामध्ये विश्वास होता, पण त्याला प्रीतीच्या सामर्थ्याची जोड नव्हती.

मी पूर्णपणे स्वकेंद्रित होते असे समजू नका. मी सेवा करीत होते आणि लोकांना मदत करू इच्छित होते. पण लोकांना मदत करण्याच्या माझ्या हेतूमध्ये अनेक अशुद्ध हेतू होते. सेवाकार्यामुळे मला महत्त्व, प्रतिष्ठा मिळाली, लोकांवरील माझा प्रभाव वाढला. पण मी जे काही करते ते सर्व शुद्ध हेतूने करावे असे देवाला वाटत होते. मला खूप काही शिकायचे होते. लोकांना मदत करण्यासाठी मी पुष्कळदा दयाळूपणाची कृत्ये करीत असे. पण लोकांना मदत करणे हा माझा प्राधान्यक्रम नव्हता. लोकांवर प्रीती करणे ही माझ्या जीवनात प्रमुख गोष्ट होण्याची गरज होती.

इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा तुम्हांला अधिक चालना देणारी गोष्ट कोणती आहे हा प्रश्न स्वतःला विचारा. ती प्रीती आहे का? देवाच्या दृष्टीने जे महत्त्वाचे आहे त्यावर लक्ष केंद्रित करण्यास तुम्ही तयार आहात का?

पुस्तकाच्या पानातून हे शब्द तुमच्या अंतःकरणात घुसावेत म्हणून मी देवाकडे विनंती करीत आहे. प्रीतीच्या सामर्थ्याचे सत्य शिकल्यामुळे माझ्या जीवनात इतका बदल झाला की, इतर सर्वांनी देखील ते शिकावे असे मला वाटते. हे सत्य तुम्हांला माहीत नाही असे मी म्हणत नाही, इतरांवर प्रीती करण्याविषयी तुम्हांला कदाचित माझ्यापेक्षा जास्त माहिती असेल. पण जर तुम्हांला माहीत नसेल तर जे मी तुम्हांला सांगत आहे, त्यामुळे प्रीतीच्या क्रांतीचा भाग होण्यासाठी तुम्हांला उत्तेजन मिळेल. प्रीतीमध्ये जग बदलण्याचे सामर्थ्य आहे असा माझा विश्वास आहे.

स्वतःचा आणि इतरांचा उत्साह टिकवून ठेवा

ख्रिस्ताला ओळखणाऱ्या आपणापैकी प्रत्येकाने दररोज दुसऱ्यांसाठी काहीतरी दयाळूपणाचे कृत्य केले तर हे जग किती वेगळे होईल याची कल्पना करा. होणारे परिणाम अद्‌भुत असतील. आता विचार करा, आपल्यापैकी प्रत्येकाने जर दुसऱ्यासाठी रोज दोन चांगली, दयाळूपणाची कृत्ये करण्याचा निश्चय केला तर काय होईल. तुमच्या डोळ्यांसमोर चित्र उभे राहिले असेल अशी माझी खात्री आहे. आश्चर्यकारक असे परिणाम तुम्हांला पाहायला मिळतील. येशूने आपल्याला सांगितले तस जगण्यासाठी आपण जर समर्पित होऊ, तर आपण बऱ्याने वाईटावर विजय मिळवू आणि जग झपाट्याने बदलेल.

"असे कधीच घडणार नाही, तेव्हा उगीचच प्रयत्न करण्यात काय अर्थ?" असा प्रश्न विचारण्याचा मोहत तुम्हांला कदाचित होईल. प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यापूर्वीच नकारात्मक विचारांनी स्वतःला पराभूत होऊ देऊ नका. माझी जबाबदारी पार पाडण्याचा आणि इतरांनी आपली जबाबदारी पार पाडावी म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना करण्याचा निश्चय मी केला आहे. तसेच इतर लोकांशी बोलून त्यांना दुसऱ्यांसाठी शक्य तो चांगुलपणा करण्यास मी उत्तेजन देणार आहे.

माझ्या तीन मैत्रिणींनी हीच जीवनशैली स्वीकारली आहे. आम्ही जेवायला किंवा कॉफी प्यायला जातो तेव्हा इतरांना मदत करण्याविषयी देवाने आम्हांला कोणकोणते विचार दिले आहेत आणि त्यांच्यासाठी आशीर्वादाचे साधन होण्यासाठी कोणकोणत्या नवीन पद्धती अवलंबता येतील याविषयीच आमचे संभाषण चालू असते. असली संभाषणे देवाला आनंद देतात असा माझा विश्वास आहे, आणि निष्क्रीयपणे बसून जगात चालणाऱ्या वाईट गोष्टींविषयी केवळ कुरकूर करीत राहण्यापेक्षा हे चांगले आहे. प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन मी तुम्हांला करते. तुमच्या ओळखीच्या लोकांची यादी करा. इतरांच्या गरजा कशा भागवता येतील याविषयी चर्चा करण्यासाठी त्यांना आमंत्रण द्या. या पुस्तकातील तत्त्वे त्यांना सांगा. कोणाला मदतीची गरज आहे हे शोधा आणि त्यांना मदत करण्यासाठी तुम्ही ऐक्याने प्रयत्न करा.

चांगली कामे करण्यासाठी इतर लोकांना उत्तेजन देण्याची कल्पना नवीन नाही. इब्री लोकांस पत्राच्या लेखकाने याविषयी लिहिले आहे, "आणि प्रीती व सत्कर्मे करण्यास उत्तेजन येईल असे एकमेकांकडे लक्ष देऊ" (इब्री.१०:२४).

प्रीती व सत्कर्मे करण्यास एकमेकांना उत्तेजन येईल असे एकमेकांकडे लक्ष देण्याविषयी हे वचन सांगत आहे. लोकांवर प्रीती करण्यासाठी आणि चांगली कर्मे

करण्यासाठी आपण इतरांना उत्तेजन देऊ. आपण सर्वजण जर एकमेकांकडे लक्ष देऊ लागलो, एकमेकांची काळजी घेऊ लागलो तर सैतान किती अस्वस्थ होईल याचा तुम्ही विचार करू शकता का? आपण लोकांचा न्याय करावा, त्यांच्यावर टीका करावी, त्यांचे दोष शोधावेत, त्यांच्याविरुद्ध बोलावे असे त्याला वाटते. योग्य गोष्टी करण्यासाठी आपल्याला नवीन सवयी अंगी बाणवाव्या लागतील, पण त्याचे परिणाम आश्चर्यकारक असतील असे मला वाटते.

सत्कर्मांच्या बाबतीत धनवान असा

लोकांनी चांगले ते करावे; सत्कर्मांविषयी धनवान असावे; परोपकारी व दानशूर असावे यासाठी तरुण तीमथ्याने त्यांना चालना द्यावी असे पौलाने त्याला सांगितले (पाहा १ तीमथ्य.६:१८). लोकांना या गोष्टींची आठवण देण्याची गरज आहे असे पौलाला वाटले हे यावरून स्पष्ट होते. तुम्ही केवळ इतरांना स्मरण द्या असे मी म्हणत नाही, तर स्वतःलाही या गोष्टींचे स्मरण देण्याचे मार्ग शोधा. प्रीतीच्या विषयावरची चांगली पुस्तके आणि संदेश जमा करा. ती नेहमी वाचा आणि ऐका. देवाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची गोष्ट न विसरण्यासाठी शक्य ते सर्व करा.

जग ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांना पाहत आहे आणि ते जे पाहत आहेत ते फार महत्त्वाचे आहे असे मला वाटते. "परराष्ट्रीयांत आपले आचरण चांगले ठेवा, ह्यासाठी की, ज्याविषयी ते तुम्हांला दुष्कर्मी समजून तुमच्याविरुद्ध बोलतात त्याविषयी त्यांनी तुमची सत्कृत्ये पाहून समाचाराच्या दिवशी देवाचा गौरव करावा," (१ पेत्र.२:१२) असा सल्ला पेत्राने विश्वासणाऱ्यांना दिला.

तुम्ही दर रविवारी चर्चला जाता हे जर तुमच्या शेजाऱ्यांना माहीत असेल तर त्यांचे तुमच्या वागणुकीवर लक्ष आहे हे लक्षात ठेवा. मी लहान होते, तेव्हा आमचे शेजारी नियमितपणे चर्चला जात असत. वास्तविक ते दर आठवड्यातून कित्येक वेळा जात असत, पण तरीही करू नयेत अशा बऱ्याच गोष्टीही ते करत असत. "माझ्यापेक्षा ते चांगले नाहीत, ते दारू पितात, वाईट भाषा वापरतात, घाणेरडे विनोद करतात, त्यांना लगेच राग येतो. थोडक्यात ते ढोंगी आहेत," असे माझे वडील नेहमी म्हणत असत. माझे वडील सबब शोधत असत, आणि आमच्या शेजाऱ्यांच्या वागणुकीमुळे तर त्यांना उत्तेजनच मिळत असे.

ख्रिस्ती या नात्याने आपण अगदी परिपूर्णपणे वागत नाही, आणि येशूवर विश्वास ठेवण्यास नकार देणारे लोक नेहमीच आपल्यावर टीका करतील हे मला माहीत आहे,

पण आपला न्याय करण्यासाठी त्यांना कारण न देण्याचा आपण जास्तीत जास्त प्रयत्न करावा.

आशीर्वाद देण्याचे मार्ग शोधा

कोणाला तरी आशीर्वाद व्हावे किंवा साक्ष व्हावी अशी कोणती गोष्ट देव मला करण्यास सांगतो ते समजून घेण्यासाठी मी नेहमी आपले हृदय देवासाठी उघडे ठेवते. काही दिवसांपूर्वी मी माझ्या नखांची निगा करून घेत होते. पार्लरमध्ये एक तरुण मुलगी होती. ती गरोदर होती. हे तिचे पहिलेच गरोदरपण होते. होणाऱ्या वेदनांमुळे ती दोन महिने बिछान्यावर पडून होती. दोन महिन्यानंतर ती प्रथमच बाहेर पडली होती. साधारण आठवड्यानंतर ती बाळंत होणार होती आणि आता ती हातापायांच्या नखांची निगा करून घ्यायला आली होती. आम्ही थोडा वेळ गप्पा मारल्या. तिचे पैसे मी भरले तर बरे होईल असे मला वाटले. ही भावना बराच वेळ माझ्या मनात राहते का हे पाहण्यासाठी मी थोडा वेळ थांबले आणि तसे वाटत राहिल्याने मी तिचे आणि माझे पैसे भरले. तिला अर्थातच आश्चर्य आणि आनंद वाटला. त्याचा मी काही फार गवगवा केला नाही. पण कधी तरी तिने टीव्हीवर मला पाहिले किंवा माझे एखादे पुस्तक वाचले तर मी सांगते किंवा विश्वास ठेवते तसे केले हे तिच्या लक्षात येईल.

लोकांनी पाहावे म्हणून मी काही करीत नाही, पण लोक जे पाहतात ते आपल्या शब्दांपेक्षा मोठ्याने बोलते. त्या पार्लरमधील प्रत्येकाला माहीत आहे की मी एक पवित्र शास्त्र शिक्षिका आणि सेविका आहे. त्या तरुण स्त्रीला जरी मी माझ्याविषयी काहीच सांगितले नाही, तरी मी तेथून गेल्यावर पार्लरमधील स्त्रियांनी तिला माझ्याविषयी नक्कीच सांगितले असेल. म्हणून दयाळूपणाच्या एका कृतीमुळे अनेक हेतू साध्य झाले. मला आनंद झाला, तिला आनंद झाला; पाहणाऱ्या इतरांसाठी ते एक उदाहरण होते; आणि देवाला गौरव देणारी ती एक साक्ष होती. माझ्याकडे दुसरा पर्याय होता. तिचे पैसे न भरता मी माझ्याकडेच ठेवू शकत होते. हा पर्याय सोपा होता, पण त्याने माझ्या आत्म्याला समाधान मिळाले नसते.

लोकांना काय वाटेल याची चिंता करू नका

ज्यांच्याशी आपली ओळख नाही त्यांचे बील भरणे जरा विचित्र वाटेल असे कदाचित तुम्ही म्हणाल. तुमचे म्हणणे मी समजू शकते. त्यांना काय वाटले, ते कसा प्रतिसाद देतील असा प्रश्न मलाही पडतो, पण त्यानंतर माझ्या लक्षात येते की याविषयी विचार करणे हे माझे काम नाही. ख्रिस्ताची राजदूतिका होणे एवढेच माझे काम आहे.

एके दिवशी माझ्यामागे लाईनीत उभ्या असणाऱ्या एका महिलेला मी कॉफी देऊ केली. तिने ताबडतोब नकार दिला. खरे म्हणजे तिने इतका गोंधळ घातला की मी भांबावून गेले. प्रथम माझ्या मनात विचार आला, "ठीक आहे, येथून पुढे मी असे कधी करणार नाही." डेव्ह माझ्यासोबत होता. सैतानाला अगदी हेच हवे आहे हे त्याने मला सांगितले. म्हणून मी माझे विचार बदलला. हे प्रसंग सोपे नसतात, पण त्यावरून माझ्या लक्षात आले की, आशीर्वाद कसे घ्यावेत हे पुष्कळ लोकांना समजत नाही. बहुधा त्यांच्याबाबतीत हे कधीच घडत नसल्याने असे होत असावे.

कधी कधी मी निनावी गोष्टी करते, पण बरेचदा मला ते गुप्त ठेवता येत नाही. म्हणून मी निश्चय केला की जोपर्यंत माझे हृदय सरळ आहे तोपर्यंत गुप्त की उघड याने काही फरक पडत नाही. कृपाळूपणाची माझी प्रत्येक कृती ही देवाचे आज्ञापालन करण्याची आणि जगातील दुष्टाईवर विजय मिळवण्याची कृती आहे. लोकांच्या जीवनात कसल्या वाईट गोष्टी घडल्या आहेत याची मला कल्पना नाही, पण माझ्या चांगुलपणाच्या कृत्यामुळे त्यांच्या जखमा भरून येण्यास मदत होईल असे मला वाटते. तसेच माझा असाही विश्वास आहे की, दुसऱ्यांसाठी चांगुलपणाची कृत्ये करणे हा सैतानाने माझ्या जीवनात जी दुःखे आणली त्याची परतफेड करण्याचा मार्ग आहे. तो अतिशय दुष्ट आहे; जगात अनुभवास येणाऱ्या सर्व दुष्टाईचा तो उगम आहे, म्हणून प्रीती, चांगुलपणा आणि दयाळूपणाची प्रत्येक कृती ही त्यांच्या अंतःकरणात सुरा भोसकण्यासारखी आहे.

तुमच्या जीवनात जर तुम्हांला वाईट वागणूक मिळाली असेल आणि सैतानाने तुमच्या जीवनात आणलेल्या या दुःखाबद्दल तुम्हांला त्याचा सूड घ्यायचा असेल, तर तुम्हांला शक्य होईल तितक्या लोकांचे चांगले करा. हा देवाचा मार्ग आहे, आणि तो यशस्वी होईल, कारण प्रीती कधीच अपयशी होत नाही.

मी प्रीतीने आत्मा विकत घेतला

पवित्र शास्त्र सांगते की देवाने स्वतःचा पुत्र येशू ख्रिस्त याच्या मोलवान रक्ताने विकत घेतले आहे (पाहा १ करिंथ.६:२०; १ पेत्र.१:१९; प्रकटी.५:९). सैतानाने जे काही वाईट केले होते त्या सर्वांला या चांगुलपणामुळे खीळ बसली, आणि मानवाच्या पापांची क्षमा मिळून त्यांना वैयक्तिक देवाची सहभागिता मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला.

मी पूर्वी सांगितलेच आहे की, माझ्या वडिलांनी बरीच वर्षे माझ्यावर लैंगिक अत्याचार केले, त्यांच्या या दुष्ट कृत्यामुळे माझा आत्मा दुखावला गेला, येशूने मला आरोग्य देईपर्यंत मी सर्वसाधारपणे वागू शकले नाही. त्यांनी माझ्याशी जे केले ते विसरणे आणि त्यांना पूर्णपणे क्षमा करणे ही एक प्रक्रिया होती. प्रथम, मी त्यांचा द्वेष न करण्याचा निश्चय केला, कारण माझ्या वडिलांविषयी प्रीती आणि द्वेष या दोन गोष्टी एकाच अंतःकरणात राहू शकत नाहीत हे देवाने दाखवले. मी देवाकडे मदत मागितली आणि त्याने माझ्या अंतःकरणातून द्वेष बाहेर काढला. पण तरीदेखील मी त्यांच्याशी कमीत कमी संबंध ठेवला आणि त्यांच्यापासून शक्य तितकी दूर राहिले.

माझ्या आईची मानसिक स्थिती बऱ्याच वर्षांपासून ढासळत चालली होती. ज्या वर्षी मी डेव्हशी लग्न केले, त्या वर्षी माझ्या वडिलांनी माझ्याशी काय केले हे तिला समजले आणि ती पार खचून गेली. काय करावे हे तिला समजेना. मी चौदा वर्षांची असताना त्यांना माझ्याशी लैंगिक व्यवहार करताना त्यांनी पाहिले होते, मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे काय करावे हे तिला न समजल्याने तिने काहीच केले नाही. तिने काहीच न करणे हा आम्हा सर्वांसाठी अतिशय वाईट निर्णय झाला. दोन वर्षे तिला शॉक ट्रीटमेन्ट द्यावी लागली. माझ्यावरच्या लैंगिक अत्याचाराच्या सर्व आठवणी तिच्या डोक्यातून पुसून टाकण्यात आल्या. तिला त्यांची पुन्हा आठवण येईल असे काही करायची माझी इच्छा नव्हती, त्यामुळे माझ्या वडिलांच्या संगतीत राहणे माझ्यासाठी फार कठीण असले तरी सुट्टीच्या दिवशी किंवा अगदीच गरज असेल तेव्हा आम्ही आईवडिलांना भेटायला जात असू.

पुढे माझे आईवडील शहर सोडून त्यांचे बालपण ज्या गावात गेले तिकडे राहायला गेले. माझ्यापासून ते ठिकाण दोनशे मैल दूर होते. आता त्यांना अजूनही कमी वेळा भेटावे लागेल म्हणून मी आनंदित झाले. या दरम्यान मी माझ्या वडिलांना क्षमा करू शकले, पण मी खऱ्या अर्थाने त्यांना पूर्ण क्षमा केली नव्हती.

माझे आईवडील म्हातारे झाले, त्यांची तब्येत खचली आणि पैसे कमी झाले तेव्हा मी त्यांना सेन्ट लुई, मसूरी येथे परत आणावे व मरेपर्यंत त्यांची देखभाल करावी म्हणून देव माझ्या मनात कार्य करू लागला. याचा अर्थ त्यांच्यासाठी नवीन घर, फर्निचर, कार विकत घेणे, घराची स्वच्छता करणे, महिन्याचे वाणसामान आणणे, लॉनची साफसफाई करणे इ. कामासाठी नोकर पाहणे. प्रथम मला वाटले की माझा छळ करण्यासाठी सैतान ही कल्पना माझ्या मनात घालत आहे, पण हळूहळू देवाची योजना माझ्या लक्षात आली आणि मी हे प्रामाणिकपणे सांगते की असे करणे ही माझ्या जीवनातील सर्वांत कठीण गोष्ट होती.

एक, मी आणि डेव्हने काही पैसे साठवले होते. माझ्या आईवडिलांसाठी घर आणि आवश्यक त्या गोष्टी खरेदी करण्यासाठी ते सर्व पैसे खर्च होणार होते. दोन, माझ्यावर अत्याचार करण्याखेरीज त्यांनी दुसरे काही न केल्याने ते मदतीला पात्र नाहीत असे मला वाटत होते. मी डेव्हने याविषयी चर्चा आणि प्रार्थना केली तेव्हा हळूहळू माझ्या लक्षात आले की, देव जी गोष्ट मला करायला सांगत आहे ती फार कठीण गोष्ट असली तरी ती आतापर्यंत केलेल्या गोष्टींमध्ये सर्वांत शक्तीशाली गोष्ट आहे.

आपल्या शत्रूंवर प्रीती करणे, त्यांच्यावर दया करणे, त्यांच्याशी चांगुलपणाने वागणे याविषयी पवित्र शास्त्रातील सर्व शास्त्रभाग मी वाचून काढले. पुढील शास्त्रभागाचा माझ्यावर सखोल परिणाम झालाः

> ''तुम्ही तर आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, त्यांचे बरे करा, निराश न होता उसने द्या, म्हणजे तुमचे प्रतिफळ मोठे होईल आणि तुम्ही परात्पराचे पुत्र व्हाल; कारण तो कृतघ्न व दुर्जन ह्यांच्यावरही उपकार करणारा आहे''
>
> *(लूक.६:३५)*

हे वचन सांगते की तुम्ही काही गमावले असे समजू नका, किंवा निराश होऊ नका. हे तत्त्व समजण्यापूर्वी मी माझी बालपणाची वर्षे वाया गेली असे समजत होते, पण आता माझ्या लक्षात येते की, इतरांना मदत करता यावी म्हणून त्या वर्षांकडे मी अनुभव म्हणून पाहावे असे देव मला सांगत होता. लूकने असेही सांगितले की जे आपल्यावर अत्याचार करतात त्यांच्यासाठी आपण प्रार्थना करावी, त्यांचे बरे करावे (पाहा लूक.६:२८). हे अन्यायकारक वाटते, पण जेव्हा मी क्षमा करते तेव्हा स्वतःवरच उपकार करते हे मी आता शिकले आहे. मी क्षमा करते, तेव्हा माझ्या बाबतीत जे काही वाईट किंवा चुकीचे घडले त्यांच्या परिणामापासून मी स्वतःला मुक्त करते आणि मग देव या संपूर्ण परिस्थितीचे जे काही योग्य आहे ते करतो. माझ्या शत्रूचे तारण झालेले नसेल, तर माझ्याकडून कदाचित आत्मा विकत घेतला जाईल.

मी आणि डेव्हने हे केल्यावर माझे वडील फार आश्चर्यचकित झाले. ते जरी बोलले नाहीत, तरी त्यांनी माझ्याशी जे काही केले त्यानंतरही आम्ही त्यांच्यासाठी इतके सर्व का केले याचे आश्चर्य त्यांना वाटले हे मला माहीत आहे.

अशीच तीन वर्षे झाली, पण त्यांच्यात काही बदल झाल्याचे मला दिसले नाही. ते अजूनही दुष्ट, रागीट आणि स्वार्थी होते. कधी कधी तर त्यांच्या रागाचा पारा इतका

चढत असे की बोलता सोय नाही. पण या सर्व काळात देव त्यांच्यामध्ये कार्य करीत होता हे आता माझ्या लक्षात येते. देवाने आम्हांला सांगितले ते सर्व केल्यानंतर तीन वर्षांनी माझ्या वडिलांनी रडून पश्चात्ताप केला आणि येशूला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारले. हा फार आनंददायक अनुभव होता. त्यांनीच पहिले पाऊल उचलले, त्यांनी आम्हांला घरी बोलावले आणि क्षमा मागितली. त्याने माझी व डेव्हची क्षमा मागितली आणि आम्ही त्यांच्याशी किती चांगुलपणाने वागलो याचा उल्लेख केला. येशू ख्रिस्ताला तुमच्या अंतःकरणात आमंत्रण द्यायची तुमची इच्छा आहे का असे आम्ही त्यांना विचारले. त्यांनी केवळ स्वीकारच केला नाही, तर आम्ही त्यांचा बाप्तिस्मा करावा अशी विनंती केली. ज्या वडिलांनी माझ्यावर अत्याचार केले त्यांनी प्रभूचा स्वीकार केल्याचे मला पाहायला मिळाले. पात्र नसलेल्या व्यक्तीसाठी मी घर, फर्निचर, गाडी खरेदी करीत आहे असे मला वाटत होते; पण या चांगुलपणाच्या कृत्यांमुळे मी एक आत्मा खरेदी केला आहे, हे माझ्या लक्षात आले.

याच काळात, आमचे सेवाकार्य अद्‌भुत प्रकारे वाढत असल्याचे डेव्हच्या व माझ्या लक्षात आले. आम्ही अधिक लोकांना सहाय्य करू शकत होतो. ही वाढ आज्ञापालनाचे जी बी आम्ही पेरले त्यामुळे मिळणाऱ्या विपुल हंगामाचा एक भाग आहे असे मला वाटते. देव आपल्याला कठीण गोष्टी करायला सांगतो, तेव्हा तो त्या नेहमीच आपल्या आणि त्याच्या राज्याच्या फायद्यासाठी करायला सांगतो. लक्षात घ्या, आपण खरोखरच बऱ्याने वाईटावर विजयी होऊ शकतो. जॉन वेस्ली यांनी म्हटले, "तुम्हांला शक्य असे त्या सर्व ठिकाणी, शक्य असेल त्या सर्व मार्गांनी, शक्य असेल त्या सर्व वेळी, तुम्हांला शक्य होईल तितक्या वेळा, तुम्हांला शक्य होईल त्या सर्व लोकांचे बरे करा."

युद्धामुळे विधवा झालेल्या स्त्रिया

मुलांचे रडणे ऐकल्याबरोबर जेनिफर त्यांच्या मदतीसाठी धावते. सर्व काही ठीक होईल असे ती त्यांना सांगते. त्यांची आई या नात्याने, तिच्या सांगण्यावर ते विश्वास ठेवीपर्यंत ते त्यांना सांगत राहते.

घाबरणे, टाकून दिले जाणे आणि अत्याचार म्हणजे काय हे तिला माहीत आहे. ती बारा वर्षांची होती तेव्हा आफ्रिकेतील बंडखोर सैनिकांनी तिला तिच्या घरातून बळजबरीने उचलून नेले. तिला सतत मारहाण होत असे, बलात्कार होत होते,

आणि कठोर परिश्रम करावे लागे. पण जगण्याच्या दुर्दम्य इच्छेमुळे तिला पळून जायला धैर्य मिळाले. तिने पुष्कळजणांना आपल्यासोबत पळून जाण्यास धैर्य दिले.

ती आपल्या घरी आली तेव्हा तिचे कुटुंब तेथून निघून गेले होते. नवीन जीवन जगता यावे आणि स्वतःचे घर मिळावे म्हणून तिने एका माणसाशी लग्न केले. त्याला अगोदरची पत्नी होती. तिच्या लग्नाच्या दिवशी त्याने तिला मारहाण केली आणि तिच्या मित्रमैत्रिणींसमोर तिच्यावर चाकूचा वार केला. पण यापेक्षाही कठीण धक्का तिला बसायचा होता. वास्तविक तिच्यासाठी जो दिवस अतिशय आनंदाचा असायला हवा होता त्याच दिवशी त्याने सर्वांसमोर सांगितले की, ही निरुपयोगी, लज्जास्पद आहे. शारीरिक मारापेक्षा या शाब्दिक माराचा तिच्यावर अतिशय सखोल परिणाम झाला.

पुढे, तिचा नवरा एड्सने मरण पावला. ती एकटी पडली. तिला दोन मुले होती. तिने देवाला विचारले, "देवा तू खरोखरच अस्तित्वात आहेस का? माझ्या जीवनात केवळ छळ, यातना आणि लज्जाच असणार आहे का?" देवाने आपली विश्वसनीयता तिला दाखवली आणि ती आता पूर्ण पुनःस्थापनेच्या प्रक्रियेत आहे.

जॉयस मेयर मिनिस्ट्रीजसोबत कार्य करणाऱ्या वाटोटो मिनिस्ट्रीजतर्फे दिलेल्या एका सुरक्षित घरात आता ती राहत आहे. आता ती सन्मानयुक्त आणि उद्देशपूर्ण जीवन जगत आहे. युद्धामुळे अनाथ झालेल्या मुलांचे ती आता संगोपन करते. पण अजूनही इतर पुष्कळजणांना आरोग्य आणि पुनर्वसनाची आत्यंतिक गरज आहे.

अनाथ आणि विधवांची काळजी घ्या असे देवाचे वचन आपल्याला पुन्हा पुन्हा सांगते. त्यांच्यासाठी देवाच्या अंतःकरणात विशेष जागा आहे तशीच आपल्याही हृदयात असावी.

आकडेवारी सांगते :

- ज्यांचे पती एड्सने मरण पावले आहेत असा विधवांना पुष्कळ देशांत त्यांच्या घरातून हाकलून दिले असून त्यांच्यावर निरनिराळ्या प्रकारचे अत्याचार होत आहेत.[१]
- आफ्रिकेत विधवा प्रमुख असलेली बहुसंख्य घरे ही दारिद्र्यरेषेखालील घरे असतात.[२]

प्रकरण

7

अन्यायग्रस्तांना न्याय

चूक आणि बरोबर यांमध्ये कसलीही भूमिका न घेता तटस्थ
राहणे म्हणजे न्याय नव्हे, तर योग्य काय ते समजून घेऊन
त्याची बाजू घेणे आणि चुकीला, वाइटाला नेहमी विरोध करणे
म्हणजे न्याय होय.
थिओडोर रुझवेल्ट

देव हा न्यायाचा देव आहे. न्यायत्व हा त्याचा गुण मला फार आवडतो. तो वाईट, चुकीच्या गोष्टी सरळ करतो. पवित्र शास्त्र सांगते की, न्यायत्व आणि धार्मिकता हे त्याच्या राजासनाचा पाया आहेत (पाहा स्तोत्र.८९:१४). इमारत पायावर उभी राहते, तसेच देवाच्या पृथ्वीतलावरील सर्व कृती या न्याय आणि नीतीमत्त्व यांवर उभ्या आहेत असे आपण म्हणू शकतो. देवाचे सेवक या नात्याने आपण नीतीमत्त्व आणि न्याय यांच्यावर प्रीती करावी आणि पृथ्वीवर त्यांची वाढ करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आपल्याला सांगण्यात आले आहे.

समाजामध्ये न्याय नसेल तर नेहमीच समस्या उद्‌भवतात. १७८९ ते १७९९ या काळात फ्रान्समध्ये क्रांती झाली. प्रचंड रक्तपात झालेल्या या क्रांतीमध्ये सर्वसामान्य लोकांनी, शेतकऱ्यांनी उच्चभ्रू लोक आणि धार्मिक पुढारी यांच्याविरुद्ध उठाव केला.

फ्रान्सचे राजाराणी जोपर्यंत लोकांना न्यायाने वागवत होते, तोपर्यंत देशाची प्रगती झाली; पण जेव्हा त्यांनी भ्रष्टाचार, अन्याय सुरू केला; लोकांची उपासमार होत असताना, रोगांचा फैलाव होत असताना आपले ऐषोआरामाचे जीवन चालू ठेवण्यासाठी त्यांनी लोकांवर प्रचंड कर लादणे चालू ठेवले, तेव्हा लोकांनी त्यांच्याविरुद्ध बंड केले. त्यांनी नागरिकांना अन्यायाने वागवले तेव्हा त्यांचे सिंहासन डळमळीत झाले आणि शेवटी उद्ध्वस्त झाले.

यातून हे सत्य स्पष्ट होते की, न्याय नसेल तर गोष्टी सुरळीत चालत नाहीत. आज आपला समाज अन्यायाने भरला आहे. बरेचसे लोक त्याविरुद्ध झगडत असले तरी बहुसंख्य लोकांना त्याची काहीएक फिकीर नाही, किंवा जरी त्यांना काळजी वाटत असली तरी त्याविषयी काय करावे ते त्यांना कळत नाही.

ते आपले कर्तव्य आहे

अनाथ, विधवा, गरीब आणि छळ झालेल्यांची काळजी कोण घेतो? अर्थातच देव घेतो, पण आपले काय? लोकांचा छळ होतो तेव्हा सहन करता येणार नाही असे ओझे त्यांच्यावर येते. ते त्यांना अगदी दाबून टाकते, त्यांना हताश करते. हे ओझे बहुतेक वेळा त्यांची आशा हिरावून घेते. देव अनाथांचा पिता आणि विधवांचा रक्षक आहे (पाहा स्तोत्र.६८:५). जे एकाकी आहेत, ज्यांची देखभाल करण्यास कोणी नाही अशा लोकांसाठी देवाच्या अंतःकरणात खास जागा आहे असे वाटते. छळ झालेल्या लोकांना देव मदत करतो, गरीब आणि गरजूंना न्याय देतो (पाहा स्तोत्र.१४०:१२). या दुःखी लोकांना देव मदत करतो हे पाहून तुम्हांला आनंद झाला असेल याची मला खात्री आहे, पण जे लोक देवाला समर्पित आहेत त्यांच्याद्वारेच देव कार्य करतो हे लक्षात

> अनाथ, विधवा, गरीब आणि छळ झालेल्यांची काळजी कोण घेतो?

ठेवा. तुम्ही वैयक्तिकरित्या त्यांच्यासाठी काय करीत आहात असा प्रश्न आता स्वतःला विचारा. गरीब आणि गरजू लोकांना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे याविषयी पवित्र शास्त्रात दोन हजारपेक्षा जास्त उल्लेख आहेत हे मी तुम्हांला पूर्वीच सांगितले आहे. म्हणून गरजू, त्रस्त लोकांना आपण मदत करणे किती आवश्यक आहे हे तुमच्या लक्षात येईल.

खरा धर्म

प्रेषित याकोबाने सांगितले की, "देवपित्याच्या दृष्टीने शुद्ध व निर्मळ धर्माचरण म्हणजे अनाथांचा व विधवांचा त्यांच्या संकटात समाचार घेणे, व स्वतःला जगापासून निष्कलंक ठेवणे हे आहे" (याकोब.१:२७). याचा अर्थ असा की, जर आपला धर्म खरा असेल तर जीवनातील परिस्थितीने गांजलेल्या लोकांची काळजी घेण्याच्या कामात आपण सहभागी होऊ. या वचनाचा सारांश मी एवढाच सांगू शकते की, जर मी या लोकांची मदत करीत नाही, तर माझा धर्म खरा नाही. तो धर्माचा एक प्रकार असेल, पण तो पूर्णपणे देवाच्या इच्छेशी सुसंगत नसेल.

देवाच्या दृष्टीकोनातून पाहिले तर रविवारी चर्चमध्ये बसणारे सर्वचजण खरे विश्वासणारे असतात असे नाही हे मी शिकले आहे. नियम, रूढी, प्रथापरंपरा, सिद्धान्ततत्त्वे पाळणे म्हणजे येशूचा खरा विश्वासणारा होणे असे नाही. मी असे का म्हणते? कारण आपण ख्रिस्ताला स्वीकारतो तेव्हा आपल्याला देवाचे हृदय आणि त्याचा आत्मा मिळतो (पाहा यहेज्केल ११:१९). म्हणून देवाच्या दृष्टीने जे महत्त्वाचे ते करायला आपण शिकले पाहिजे - आणि दुःखी लोकांना मदत करणे हे त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

जॉयस मेयर मिनिस्ट्रीजचे व्यवस्थापन पाहणारी माझी मुले जर "आम्हांला आमच्या आईचे किंवा आईसारखे अंतःकरण आहे" असे म्हणत असतील, पण मी त्या परिस्थितीत जशी वागले असते तसे वागत नाहीत, तर काय उपयोग? आता आपली मुले ज्या पदावर आहेत ती त्या पदावर असण्याचे मुख्य कारण म्हणजे ती आपल्याला अगदी जवळून जाणतात आणि लोकांना मदत करण्याची त्यांना आपल्याप्रमाणेच इच्छा आहे.

एकमेकांवर प्रीती करा

आपल्या वैयक्तिक संपर्कात येणाऱ्या, तसेच आपल्यापासून दूर राहणाऱ्या आणि आपल्या वैयक्तिक संपर्कात कधीही न येणाऱ्या लोकांवरही आपण प्रीती केली पाहिजे असा माझा ठाम विश्वास आहे (पाहा प्रे.कृ.२:४४-४५, ४:३१-३२; २ करिंथ.८:१-४). हे पुस्तक वाचत असताना तुम्ही हे दोन्ही गट लक्षात ठेवावेत. उदा. तिसऱ्या जगात सेवा करणाऱ्या मिशनसंस्थेच्या द्वारे तुम्ही एखाद्या गरीब देशातील अनाथ मुलाला आर्थिक मदत करू शकता. तसेच तुमच्या चर्चमधील एखाद्या विधवेला घरी जेवायला

बोलावू शकता, तिची विचारपूस करून तिला अधिक चांगल्या प्रकारे कशी मदत करता येईल हे पाहू शकता. तुम्ही पुरवू शकता अशी तिची एखादी गरज असेल तर आनंदाने तिला मदत करा, कारण आनंदाने देणारी व्यक्ती देवाला आवडते (२ करिंथ.९:७).

आपल्या कुटुंबियांना, किंवा ज्यांच्याशी आपले चांगले, घनिष्ट संबंध आहेत त्यांच्या अडचणीत आपण त्यांना मदत करू, पण आपल्या वैयक्तिक वर्तुळाबाहेरच्या लोकांविषयी आपल्याला कमी जिव्हाळा वाटेल. त्यांना मदत करण्याची आपल्याला तितकीशी इच्छा वाटणार नाही. पण यात बदल व्हावा असे देवाला वाटते. मला समजलेली किंवा माझ्या लक्षात आलेली प्रत्येक गरज मी पूर्ण करू शकणार नाही हे मला माहीत आहे. पण मला काय करता येईल हे देवाने दाखवावे म्हणून मी निश्चितच विनंती करीन. मला समजलेल्या गरजांविषयी मी काहीच करू शकत नाही असे न म्हणण्याचा निश्चय मी केला आहे.

मंडळीने मंडळी राहावे ही जगाची गरज आहे

तू माझ्यावर प्रीती करतोस का असे येशूने पेत्राला तीन वेळा विचारले. पेत्राने 'होय' असे उत्तर दिल्यावर येशूने त्याला "माझी कोकरे चार" आणि "माझी मेंढरे चार" असे उत्तर दिले (पाहा योहान.२१:१५-१७). येशू जनावरांना खाऊ घालण्याबाबत बोलत नव्हता, तर लोकांना मदत करण्याविषयी बोलत होता. अनेक प्रसंगी त्याने स्वतःला मेंढपाळ, आणि त्याच्या अनुयायांना मेंढरे असे म्हटले होते, म्हणून तो काय म्हणत होता ते पेत्राला व्यवस्थित समजले.

आपण जर येशूवर प्रीती करतो तर दर रविवारी केवळ चर्चमध्ये गर्दी करून प्रथापरंपरा पाळण्यात रममाण न होता आपण इतर लोकांना मदत केली पाहिजे असे येशू या वचनात म्हणत आहे असे मला वाटते. अर्थात सहभागितेसाठी, देवाची भक्ती करण्यासाठी आणि शिकण्यासाठी आपण मंडळीत गेले पाहिजे, पण मंडळी हे लोकांना मदत करण्याचेही ठिकाण असले पाहिजे. जगभरातील हरवलेल्या लोकांना सुवार्ता सांगण्यामध्ये आणि विधवा, अनाथ, गरीब आणि गरजू लोकांना मदत करण्याच्या कामात जर मंडळी सहभागी होणार नसेल, तर तिला स्वतःला मंडळी म्हणवून घेण्याचा अधिकार आहे असे मला वाटत नाही.

हजारो लोकांनी चर्चला जाणे सोडले आहे. मंडळीतील रोडावणाऱ्या उपस्थितीविषयी जगभरातील मंडळ्यांचे पुढारी चिंताक्रांत झाले आहेत. या गळतीचे

मुख्य कारण म्हणजे आज पुष्कळ मंडळ्या निर्जीव धार्मिक केंद्रे झाल्या आहेत. त्यांच्यात खरे जीवन नाही. "आपण बंधुजनांवर प्रीती करतो ह्यावरून आपणास कळून येते की, आपण मरणातून निघून जीवनात आलो आहोत. जो प्रीती करत नाही तो मरणात राहतो," (१ योहान.३:१४) असे प्रेषित योहान म्हणतो. जर मंडळी देवाच्या खऱ्या प्रीतीने ओसंडून वाहत नाही, तर ती जीवनाने कशी युक्त होईल?

युरोपमध्ये दर आठवड्याला एक चर्च बंद पडते आणि मुस्लिम लोक ही चर्चेस खरेदी करून त्यांचे मशिदीत रूपांतर करतात असे मी ऐकले आहे. येशू ख्रिस्ताच्या मंडळीसाठी ही देवाची योजना निश्चितच नाही. पण पुष्कळ मंडळ्या जे करायला हवे तेच करीत आहेत, आणि त्यामुळे त्या जीवनाने परिपूर्ण आहेत. पण अशा मंडळ्या फारच कमी किंवा अपवादात्मक आहेत असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

प्रेषितांची कृत्येमध्ये आपण वाचतो त्याप्रमाणे प्रारंभिक मंडळी ही सामर्थ्यशाली मंडळी होती. त्या काळी ज्ञात किंवा माहीत असलेल्या जगाला तिने हालवून सोडले होते. तिचा प्रभाव आजही जगभरात पाहायला मिळतो. ती ऐक्याने भरलेली मंडळी होती. तिच्यात सहभागी असणारे सर्व लोक गरजू लोकांना मदत करण्यात आघाडीवर होते. त्यांच्या परिचयाच्या लोकांना तसेच इतर शहरांतील लोकांना ते मदत करीत असत.

प्रारंभीच्या मंडळीची झपाट्याने वाढ झाली. एकमेकांवर प्रीती करणारे चांगले लोक त्या मंडळीत होते. आज प्रीतीला धर्माची नाही, तर प्रीतीची गरज आहे! जगाला देवाची गरज आहे; आणि देव प्रीती आहे. जर आपल्याला हे मान्य असेल, आणि आपण प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होऊ तर जग पुन्हा एकदा देवाच्या गौरवाने भरून जाईल.

योग्य ते करायला शिका

कोणाला तरी गरज आहे हे पाहून किंवा ऐकून त्यासाठी काहीही न करणे बरोबर नाही. यशया संदेष्ट्याने म्हटले, "चांगले करण्यास शिका, नीतीच्या मागे लागा, जुलम्याला ताळ्यावर आणा; अनाथाचा न्याय करा; विधवेचा कैवार घ्या" (यशया १:१७).

चांगले काय आहे ते शिकण्यास आणि ते करण्यासाठी आपल्याला उत्तेजन देणे हा शिकवण्याचा उद्देश आहे. जाचलेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांना मदत करण्यासाठी मी प्रयत्न करावेत हे देवाला किती प्रकर्षाने वाटत होते याची काही

वर्षांपूर्वी मला कल्पना नव्हती, पण जेव्हा माझ्या ते लक्षात आले तेव्हापासून मी सुरुवात केली.

देवाने जुन्या करारात नियमशास्त्र दिले तेव्हापासून अनाथ, विधवा, जाचलेले, गरीब या सर्वांशी कसे वागावे यासंबंधी देव लोकांना मार्गदर्शन करीत आहे. मोशेद्वारे बोलताना त्याने म्हटले, "कोणा विधवेला किंवा पोरक्याला गांजू नका" (निर्गम २२:२२). देव पक्षपाती नाही, "तो अनाथ व विधवा ह्यांचा न्याय करतो आणि परदेशीयावर प्रीती करून त्याला अन्नवस्त्र पुरवतो" (अनुवाद १०:१८). त्याने लोकांना सांगितले की, उपरे, अनाथ व विधवा ह्यांना तुम्ही पोटभर जेवण दिले, तर मी तुमच्या हातच्या कामाला बरकत देईन (पाहा अनुवाद १४:२९). हे तीन गट नीट लक्षात ठेवा : विधवा, उपरे (अनोळखी लोक), अनाथ - हे सर्वजण पुष्कळदा खूप एकाकी लोक असतील. देवाला एकाकी लोकांची काळजी आहे.

एकाकी आणि विसरले गेलेले

जगण्यासाठी वेश्याव्यवसाय करणे भाग पडलेल्या अनाथ मुलीला किती एकाकी वाटत असेल याची मी कल्पना करू शकत नाही.

आकडेवारी सांगते :

- दर वर्षी पाच ते पंधरा वर्षे वयादरम्यानच्या वीस लाख मुलींना वेश्याव्यवसायात आणले जाते.
- ८९ टक्के वेश्यांना त्यातून सुटण्याची, पळून जायची इच्छा असते.
- थायलंडमध्ये किमान दोन लाख मुले आणि स्त्रिया वेश्याव्यवसायात आहेत, आणि त्यापैकी किमान एक तृतीयांश अठरा वर्षाखालील आहेत. अगदी सहा वर्षांच्या मुलीसुद्धी वेश्या म्हणून काम करतात.
- एकदा एका मुलीशी एका तासात पस्तीस पुरुषांनी संभोग केल्याचे एका डॉक्टरला आढळले.

या सर्व मुली अनाथ आहेत का? नाही. या सर्वच मुलींना आईबाप नाहीत असे नाही. पण देवाच्या दृष्टीने त्या अनाथ आहेत कारण एकतर त्या मुलींना आईबाप नाहीत, किंवा ज्यांना आहेत ते त्यांची काळजी घ्यायला तयार नाहीत.

किशोरवयातील वेश्याव्यवसाय

दुष्ट माणसांच्या सुखोपभोगासाठी तुमचे शरीर विका किंवा भुकेने मरा, हा भयंकर पर्याय कोणासमोर येऊ नये. बिर्तुकान केवळ एकोणीस वर्षांची आहे, पण वयाच्या चौदाव्या वर्षी तिने ही निवड केली. आणि अशा प्रत्येक प्रसंगी तिचे अंतःकरण दुखावले जाते, तिचा आत्मा खिन्न होतो. ज्या भयंकर अनुभवातून ती गेली आहे ते पाहता तिच्या भावना अजून शिल्लक आहेत हे पाहून आश्चर्य वाटते.

तिची सात महिन्यांची मुलगी अमिनाच्या डोळ्यांत पाहिल्यावर तिला उभारी येते. *"माझ्या मुलीने हाच व्यवसाय करू नये म्हणून मी ही निवड करते."* इथिओपियन भाषेत अमिना नावाचा अर्थ "सुरक्षित" असा होतो. आपल्या मुलीला सुरक्षित ठेवण्यासाठी शक्य ते सर्व करण्याच निश्चय बिर्तुकानने केला आहे.

स्वतःच्या समाधानासाठी किंवा लोभापोटी ती आपले शरीर विकत नाही. जगण्यासाठी ती शरीर विकते. चार बाय नऊ फूट आकाराच्या खोलीत ती राहते आणि व्यवसाय करते. एकही दिवस सुट्टी, विश्रांती न घेता पाच वर्षांपासून ती काम करीत आहे. आपली वासना शमवण्यासाठी दिवसभरात किमान पंधरा पुरुष तिच्या शरीराचा उपभोग घेत असताना आपले डोळे बंद करून ती अमिनाचा विचार करते. होणाऱ्या वेदनांची कल्पनाही करता येत नाही, पण अन्न आणि निवारा मिळवण्यासाठी एवढा एकच मार्ग तिला माहीत आहे. अमिनावर आपले किती प्रेम आहे याचा ती विचार करते तेव्हा आपण पाच वर्षांची असताना आपल्या आईने आपल्याला वाऱ्यावर कसे सोडून दिले असेल हे तिला समजत नाही.

आदिसअबाबातील रेड लाईट एरियात ती आली तेव्हा उपासमारीने ती मरायला टेकली होती. "माझ्यासमोर कोणतीही आशा नव्हती. देव माझ्यासोबत आहे आणि माझ्यावर प्रीती करतो हे मला माहीत आहे. जगण्याचा दुसरा मार्ग मला माहीत नाही." परिस्थिती बदलेल, जगण्यासाठी आपल्याला आपला आत्मा, आपले शरीर विकावे लागणार नाही अशी आशेची झुळूक कधी तिच्यासमोर येते.

आज, त्या आशेला अजून वाट पाहावी लागेल. तिचे पुढचे गिऱ्हाईक आले आहे.

आकडेवारी सांगते :

- जगभरात वेश्याव्यवसायात येणाऱ्या मुलींचे सरासरी वय तेरा ते चौदा वर्षे असते.
- ७५ % वेश्या पंचवीस वर्षांच्या आतील आहेत.

अध:पतनाची खालची पातळी आणि तिच्याविषयी काहीतरी करणे

भारतामध्ये मी एका रेड लाईट एरियाला (वेश्याव्यवसाय चालणारा भाग) भेट दिली तेव्हा पतनाची भयानक पातळी मला पाहायला मिळाली. तो संपूर्ण भाग इतका घाणेरडा होता की त्याचे वर्णन करता येत नाही. जिकडे तिकडे कुंटणखाने होते. मला एका ठिकाणी नेण्यात आले. तेथे तीन खोल्या होत्या. प्रत्येक खोलीत तीन खाटा होत्या. यापैकी कुठल्याही खाटेला प्रायव्हसी नव्हता. सगळा उघडा कारभार! स्त्रिया किंवा मुली या खोल्यात मुख्यतः रात्री पुरुषांच्या गरजा भागवत असत. आपले आणि आपल्या मुलांचे - जर त्यांना मुले असतील तर - पोषण करण्याइतपत पुरेसे पैसे मिळवण्याची आशा त्यांना होती. त्यांच्यापैकी बऱ्याचजणींना मुले होती. या स्त्रिया काम करताना ही मुले कोठे जात असतील? एकतर ती व्हरांड्यात खेळत असतील किंवा त्यांनी आपल्या आयांना त्रास देऊ नये म्हणून त्यांना दारू पाजून झोपवत असतील. जर ही मुले व्हरांड्यात खेळत असतील तर त्यांना आत खोल्यांतले दृश्य सहज दिसत असेल. त्यांच्यापैकी काहीजणींना आमच्या भोजन आणि शाळा योजनेची माहिती होती. त्यांच्या कामाच्या वेळात आम्ही यो योजनेअंतर्गत त्यांच्या मुलांची काळजी घेत असू. ही लहान मुले अक्षरशः कुंटणखान्यात राहतात.

कसलीही मदत नसल्याने, त्यांच्यातील मुली मोठ्या झाल्यावर वेश्याव्यवसायात ओढल्या जातील. या स्त्रिया स्वखुषीने असे राहत नाहीत, पण त्यांच्यासमोर दुसरा पर्यायच नाही. त्या अशिक्षित आहेत. दारिद्र्यात त्यांची वाढ झाली आहे. आपल्यापैकी पुष्कळजणांच्या कल्पनाशक्तीपलीकडची ही गोष्ट आहे. त्यांच्यापैकी काहीजणी कुंटणखान्याच्या मालकीच्या आहेत. त्यांना बंदिस्त ठेवले जाते आणि त्यांनी पुरेसे पैसे कमावले नाहीत, तर त्यांना मारहाण केली जाते.

मला आनंद वाटतो की, त्यांची सुटका व्हावी म्हणून आम्ही प्रयत्न सुरू केले आहेत. एक, त्याच भागातील स्थानिक मिनिस्ट्रीजच्या मदतीने आम्ही त्या भागात तीन

वर्षे कार्य करीत आहोत. तेथील वेश्यांची संख्या घटून तीन हजारहून तीनशेवर आली आहे.

आमच्या संस्थेने रेड लाईट एरियापासून सुमारे तीन तासांच्या प्रवासाच्या अंतरावर पुष्कळ एकर जमीन खरेदी केली आहे. तेथे आम्ही एक गाव उभे केले आहे. या स्त्रियांना आपले व स्वतःच्या कुटुंबियाचे पोषण करता यावे म्हणून त्यांच्यासाठी एक प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. फ्रेब्रुवारी २००८ मध्ये आम्ही पहिल्या तीनशे वेश्या आणि त्यांच्या मुलांना या रेस्टोरेशन सेंटरमध्ये आणले. ज्यांना बदलण्याची इच्छा आहे त्या सर्वांना येथे आणण्याचा आमचा हेतू आहे.

या किशोरवयीन मुलींना जेव्हा मी त्यांना तेथे मिळणारी शॉवर आणि टॉयलेटची सुविधा दाखवली तेव्हा आनंदाने त्या मोठ्याने हसल्या. एखाद्या भिंतीच्या मागे आपल्या डोक्यावर पाण्याची बादली ओतणे याशिवाय दुसरी आंघोळ त्यांना माहीत नव्हती. त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणता येणे आणि त्यांना आशा देता येणे ही मोठी सुखद भावना आहे. एकेकाली मी स्वार्थी, स्वकेंद्रित जीवन जगत होते, त्यापेक्षा आता मला खूप चांगले वाटते. या सेवाकार्यात भारतातील आमच्या सहकाऱ्यांचे मोलवान सहकार्य आहे, कारण त्यांनी विश्वासूपणे दिलेल्या दानांमुळेच हे शक्य होते. आम्ही त्यांचे मनापासून आभारी आहोत.

वेश्याव्यवसायात अडकलेल्या काही स्त्रिया विधवा आहेत हे मला तुम्हांला सांगू द्या. एक तर त्यांचे नवरे मेले आहेत, किंवा कोणत्या तरी कारणाने मारले गेले आहेत. उदरनिर्वाहाचे इतर साधन त्यांच्याकडे नाही, म्हणून पैसे कमवण्यासाठी त्यांना याच एका पर्यायाकडे वळावे लागते.

जगातील जाचलेल्या लोकांना मदत करण्यासाठी काय करावे हे आपण शिकू शकतो. आपल्याला केवळ माहिती आणि ठाम निश्चय यांची गरज आहे, म्हणजे आपण पुष्कळ लोकांची जीवने सकारात्मक रीतीने बदलू शकतो. आपणा प्रत्येकाने जर आपली जबाबदारी पार पाडली तर आपण प्रीतीची क्रांती सुरू करू शकतो.

सगळीकडे अन्याय

केवळ तिसऱ्या किंवा अविकसित जगातच अन्याय आहे असे नाही, तर आपल्या शेजारीपाजारी आणि शहरात सर्वत्र तो आहे. आपण ज्या लोकांसोबत काम करतो त्यांच्या गरजा आहेत. अन्यायाला अनेक चेहरे आहेत. तीन मुले असलेल्या ज्या स्त्रीला

नवऱ्याने सोडून दिले आहे तिच्या चेहऱ्यावर आपल्याला तो दिसतो. वाढत्या वयात पालकांकडून किंवा दुसऱ्या मोठ्या व्यक्तीकडून लैंगिक किंवा शारीरिक अत्याचार झालेल्या मुलीमुलाच्या चेहऱ्यावर तो दिसतो. गरीब देशातील एखाद्या पुनर्वसन केंद्रात वाढलेल्या एखाद्या वडिलाच्या चेहऱ्यावर आपल्याला तो दिसतो. त्याला चांगले जीवन जगण्याची इच्छा असते, पण काय किंवा कसे करावे हेच त्याला समजत नाहीच. त्याला फार थोडे शिक्षण मिळाले आहे, आणि यापेक्षा वेगळ्या प्रकारे कोणी जगत असल्याचे त्याने टीव्हीशिवाय दुसरीकडे कोठे पाहिलेले नाही.

काही लोक अन्यायाच्या दुःखांतिकेवर विजयी होतात आणि प्रगती करतात. पण बरेचजणांना ते जमत नाही. तुमच्यामाझ्यासारख्या कोणीतरी त्यांच्यात गुंतवणूक करणाऱ्यांची त्यांना गरज आहे. आमची संस्था शाळांतील मुलांना लिहिण्यावाचण्यास शिकण्यास मदत करते. मुलांना शिकवण्यासाठी स्वयंसेवक हवेत म्हणून आम्ही जाहिरात केली, पण आठवड्यातून किमान एक तासदेखील द्यायला फार कमी लोक तयार होतात हे पाहून वाईट वाटते. या मुलांना "कोणीतरी" नक्कीच मदत केली पाहिजे, पण दुःखाची गोष्ट म्हणजे त्या कोणीतरीपैकी आपण होत नाही आणि मदत करीत नाही. आपणा सर्वांकडे पटेल अशा काही ना काही सबबी आहेत, पण त्या देवाला मान्य होतील का? मला जे करायची इच्छा नसे त्यासाठी मी बरीच वर्षे सबबी सांगायचे, पण "उदासीनता सबबी सांगते, पण प्रीती मार्ग शोधते," हे सत्य मला समजले आहे. आणि हे माझे आवडते विधान झाले आहे.

> उदासीनता सबबी सांगते, पण प्रीती मार्ग शोधते.

नीतीमत्त्वाचा मापदंड

पवित्र शास्त्रात आपण जुन्या करारापासून सुरुवात केली, तर गरजू किंवा गरीब लोकांना मदत करणाऱ्या लोकांची एकामागून एक उदाहरणे आपल्याला पाहायला मिळतात. ईयोब हा असा माणूस होता. त्याने म्हटले, अंधळ्याचे डोळे, लंगड्याचे पाय आणि गरजू व गरीब माणसांचा पिता होऊन त्याने धार्मिकता पांघरली आहे (पाहा ईयोब २९:१४-१६). धारण करणे या शब्दाला विशेष अर्थ आहे, तो आपण समजून घ्यावा. या प्रकारे विचार करा: मी कपडे घालतो कपड्याच्या कपाटाजावळ उभा राहून कपड्यांनी हँगरवरून उडी मारून माझ्या अंगात येण्याची वाट पाहत नाही. मी काळजीपूर्वक कपडे निवडतो आणि ते केवळ अंगात घालत नाही, तर ते माझ्यावर चांगले दिसतील याची खबरदारी घेतो.

देवाने म्हटले की ईयोब धार्मिक, नीतीमान पुरुष आहे, आणि ईयोबाने म्हटले की "मी नीतीमत्ता धारण केली आहे." दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्याने काही उद्देश मनात ठेवून ते केले आहे. त्याच्या काळात धार्मिकता म्हणजे गरीब, विधवा, अनाथ आणि गरजूंची व जाचलेल्या सर्वांची काळजी घेणे असे होते.

आज आपल्या समाजात काही मानदंडच उरले नाहीत. असे वाटते की बहुसंख्य लोक त्यांना जे बरे वाटते ते करतात. सर्वत्र स्वार्थीपणाचे साम्राज्य आहे. हृदयाची सरळता, सत्य, प्रामाणिकपणा, सन्मान, विश्वासूपणा, आणि दुःखी-गरजू लोकांसाठी खरा कळवळा असलेले स्त्रीपुरुष निर्माण करणाऱ्या मापदंडांची आज आपल्याला गरज आहे. जर जास्तीत जास्त लोकांकडे हे गुण असतील तर जग निराळे होईल. "होय, आज असा मापदंड असला तर बरे होईल," असे कदाचित तुम्हांला वाटेल. पण केवळ इच्छा धरण्याने काही साध्य होत नाही हे लक्षात ठेवा. आपण कृती केली पाहिजे. जगातील लोक बदलले तरच जग बदलेल आणि या बदलाची सुरुवात आपणा प्रत्येकापासून झाली पाहिजे. आपण प्रत्येकाने ज्योत पुढे धरून "मी प्रीतीची क्रांती आहे" असे म्हटले पाहिजे.

चौथ्या प्रकरणात तुम्ही राणी झालेल्या एस्तेर या यहूदी तरुणीविषयी वाचले. तिने व तिच्या देशवासीयांनी मुक्तीसाठी आनंदोत्सव केला तेव्हा गरीबांना देणग्या देण्याचा आदेश तिने दिला. देवाने आपल्यासाठी ज्या चांगल्या गोष्टी केल्या त्यांसाठी आनंद करताना, गरजवंत लोकांची आठवण आपण ठेवली पाहिजे. बेघर लोकांसाठी असलेल्या निवाराकेंद्रांत ख्रिसमसच्या काळात कार्य करणाऱ्या चर्चकमिटीत माझी एक मैत्रीण आहे. या निवाराकेंद्रांत असणाऱ्या मुलांची नावे, वय, कपड्यांची साईज इ. सर्व माहिती चर्च गोळा करते. मदत करू शकणारे चर्चचे सभासद एकेका मुलाचे नाव निवडतात आणि त्या मुलासाठी ख्रिसमस गिफ्ट खरेदी करतात. डिसेंबर महिन्यात त्या केंद्रात पार्टी आयोजित केली जाते. त्यात खाद्यपदार्थांची रेलचेल असते. ख्रिसमसचे संगीत वाजत असते, येशूच्या जन्माची गोष्ट आणि त्याची प्रत्येक मुलावर असलेली प्रीती याविषयी सांगितले जाते, आणि अर्थातच प्रत्येक मुलाला बक्षीस दिले जाते.

पार्टी झाल्यावर, बेघर मुलांना आपण मदत केली म्हणून चर्चच्या सभासदांना बरे वाटते. पण पुष्कळजणांनी असे सांगितले की, पार्टीवरून घरी आल्यावर ते अधिकच कृतज्ञ होतात, कारण त्यांची घरे पूर्वीपेक्षा अधिकाच आनंदित आणि आशीर्वादित होतात.

दुसऱ्यांची गरज प्रथम पाहणे आणि अनुभवणे फार चांगले आहे, कारण आपण किती आशीर्वादित आहोत याची जाणीव त्यामुळे आपल्याला होते. तसेच आपण

किती प्रयत्न करण्याची गरज आहे हेही आपल्याला समजते. ख्रिसमसच्या काळात लोक अधिक उदार होतात, आणि पुष्कळजण इतरांना मदत करण्याचा प्रयत्न करतात. पण गरीब आणि गरजू लोकांना केवळ ख्रिसमसच्या काळातच नव्हे, तर सर्व प्रसंगी गरज असते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

हे लिहित असताना मी आणि डेव्ह एका हॉटेलमध्ये आहोत. या हॉटेलचे बाथरूम आणि शॉवर फार लहान आहे. ते इतके लहान आहे की, डेव्हचे डोके छताला लागते. गैरसोयीबद्दल सुरुवातीला त्याने थोडी कुरकूर केली, पण ज्यांना साधे पाणी मिळत नाही, पाणी आणण्यासाठी ज्यांना कित्येक तास चालावे लागते त्यांची त्याला आठवण झाली. या लोकांना मुश्किलीने आंघोळ करायला मिळते आणि मिळालीच तरी बाथरूम किंवा शॉवर नसतो. गरजू लोकांपर्यंत पोहोचणे, त्यांना मदत करणे हे आमच्यासाठी आशीर्वाद आहे हे आम्हा दोघांच्याही लक्षात आले आहे, कारण त्यामुळे कुरकूर न करता सर्व गोष्टींबद्दल देवाचे आभार मानण्यास आम्हांला मदत होते.

बवाज हा धनवान आणि त्याच्या समाजातील एक पुढारी होता. रूथला धान्य मिळावे आणि तिचे व तिच्या सासूचे पोषण व्हावे म्हणून त्याने आपल्या शेतात जाणूनबुजून सरवा मागे ठेवला असे पवित्र शास्त्र सांगते (रूथ.२:१६). रूथ आणि नामी या दोघीही विधवा आणि गरीब होत्या. शेतातील सर्व पीक गोळा करायचे नाही असे त्या दिवसांत नियमशास्त्र सांगत असे. गरीबांना वेचता यावे म्हणून शेतात काही धान्य सोडावे लागत असे. देवाने गरीबांना नेहमीच पुरवले, नेहमीच त्यांची काळजी घेतली हे आपल्याला पुन्हा पुन्हा पाहायला मिळते. पण त्याने केलेला पुरवठा हा आकाशातून पडला नाही, किंवा असाच चमत्काराने मिळाला नाही, त्याने लोकांद्वारे तो पुरवला.

कृतीशील प्रीती

जॉयस मेयर मिनिस्ट्रीजमध्ये "लव्ह इन ॲक्शन" नावाचे एक खाते आहे. कोणत्या तरी कारणाने आर्थिक अडचण जाणवणाऱ्या आमच्या सेवकांची गरज भागवता यावी म्हणून आमचे सेवक आणि संस्था यात डोनेशन देऊ शकते. कदाचित एखाद्या व्यक्तीला वैद्यकीय खर्च असेल, किंवा मुलाच्या एखाद्या विशेष गरजेने त्यांना आर्थिक अडचण भासत असेल. आमच्यापैकी ज्यांना खरी गरज आहे त्यांना मदत करण्यासाठी सज्ज असण्याचा निर्णय आम्ही घेतला.

तुमचा पवित्र शास्त्राभ्यासगट असेल, किंवा प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होण्याची इच्छा असलेले मित्र असतील तर एखादा खजिनदार निवडू शकता किंवा बँकेत एखादे खाते उघडून त्यात प्रत्येकाला काही डोनेशन जमा करायला सांगा. तुम्ही या खात्याला "लव्ह इन ॲक्शन" म्हणू शकता. तुम्हांला दुसरे नाव द्यायचे असेल तर देऊ शकता. आपल्याला पुष्कळदा लोकांच्या गरजांविषयी ऐकायला मिळते आणि आपल्याकडे अधिक पैसे असते तर बरे झाले असते असे वाटते. अशा प्रसंगांसाठी आपण तयार का असू नये? यात रस असणारा गट जर तुम्हांला मिळत नसेल, तर एकदोन लोक जमा करा आणि तुम्ही स्वतःच हे करा. पण काहीही न करण्यास नकार द्या!

माझ्या हाताचा उपयोग जर मी इतरांना मदत करण्यासाठी करीत नसेल तर मला त्याची गरज तरी काय?

गरीब व गरजू लोकांना ईयोब कशी मदत करतो याचा अभ्यास करीत असताना एक धक्कादायक विधान माझ्या लक्षात आले. तो म्हणतो, "वेशीवर कोणी आपल्या पक्षाचा आहे हे पाहून मी पोरक्यावर आपला हात उचलला असला; तर माझी खवाटे पाठीतून निखळून पडोत, माझे हात खांद्यांच्या सांध्यातून मोडून पडोत" (ईयोब ३१:३१-२२). यावरून गरीबांना मदत करण्याच्या बाबतीत तो किती गंभीर होता हे लक्षात येते. मी इतका गंभीर होण्यास तयार आहे का? तुम्ही तयार आहात का?

रोज सकाळी उठून आपण जर आपल्यासाठीच जगणार असू, तर आपल्या जगण्याचा खरा उद्देश तरी काय? मी हे शोधण्याचा प्रयत्न केला, पण या जीवनशैलीमुळे मी अगदी रिक्त, असमाधानी राहते हे मला समजले. या पृथ्वीवर त्याचे प्रतिनिधी म्हणून आपण असे राहावे ही देवाची मुळीच इच्छा नसेल असे मला वाटते.

इतरांवर प्रीती करण्याविषयीचे सर्व शास्त्रसंदर्भ पुन्हा एकदा वाचून पाहावेत म्हणून थोडा वेळ मी हे लिखाण थांबवले. आणि आता माझी पूर्वीपेक्षाही अधिक खात्री पटली आहे की, जीवनाचा हाच खरा उद्देश आहे. चांगले करण्यासाठी तुम्ही स्वतःला द्यावे असे आवाहन मी करते. देवाला तुमचे हात, तोंड, पाय, डोळे आणि कान द्या आणि दुसऱ्या कोणाचे तरी जीवन चांगले करण्यासाठी यांचा उपयोग कर अशी विनंती देवाला करा. भुकेल्या, दुःखी, एकाकी असलेल्या कोणाला तरी मदत करण्यासाठी आपले हात पुढे करा.

प्रीतीचा हंगाम

निःस्वार्थीपणे जगणे आणि देणे यांमुळे आपल्या जीवनात हंगाम येतो. पिकाची आशा बाळगण्यात काहीच गैर नाही. आपल्या स्वतःला काहीतरी मिळावे म्हणून इतरांना मदत करावी हा आपला उद्देश नसावा, तर देव आपल्याला सांगतो की तुम्ही ज्याची पेरणी करता त्याची कापणी करा. हे सत्य अधिक चांगल्या प्रकारे सांगणारे एक वचन म्हणजे लूक.६:३८ : "द्या म्हणजे तुम्हांला दिले जाईल; चांगले माप दाबून, हलवून व शीग भरून तुमच्या पदरी घालतील; कारण ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला परत मापून देण्यात येईल."

जे मनापासून परमेश्वराचा शोध घेतात त्यांना प्रतिफळ देण्याचे अभिवचन तो देतो (पाहा इब्री.११:६). मूळ ग्रीक भाषेत प्रतिफळ या शब्दासाठी जो शब्द वापरला आहे त्याचा अर्थ "या जीवनात मिळालेले वेतन" किंवा "भरपाई" असा होतो. जुना करार ज्या हिब्रू भाषेत लिहिला त्या भाषेत प्रतिफळ म्हणजे, "फळ, वेतन, उत्पादन, किंमत किंवा परिणाम." ॲम्प्लीफाईड बायबलमध्ये रिवॉर्ड (प्रतिफळ) हा शब्द ६८ वेळा वापरला आहे. आमचे आज्ञापालन आणि आम्ही निवडलेले चांगले पर्याय यांच्या प्रतिफळाची वाट पाहा असे परमेश्वर सांगतो.

गरीब, गरजू, जाचलेल्या लोकांची जर आपण काळजी घेतो, तर आपल्याला काही कमी पडणार नाही असे अभिवचन देव देतो. पण जर त्यांच्या गरजेपासून आपण आपले डोळे फिरवले तर आपल्यावर अनेक शाप येतील (नीती.२८:२७). नितीसूत्राचा लेखक असेही म्हणतो की, आपण गरीबांना देतो तेव्हा आपण देवाला उसने देतो (पाहा नीती.१९:१७). देवाला जे उसने दिले आहे त्यावर तो अधिक व्याज देणार नाही असे मला वाटत नाही.

जाचलेल्यांस न्याय मिळावा म्हणून प्रयत्न करण्याचे आवाहन मी तुम्हांला करते. याचा साधासोप अर्थ म्हणजे जी गोष्ट बरोबर नाही, सरळ नाही हे तुमच्या लक्षात येते तेव्हा ती सरळ करण्याचा प्रयत्न करणे.

प्रकाशात जगणे

आपल्या जीवनात अधिक प्रकाश असावा असे आपणा सर्वांना वाटते. याचा अर्थ अधिक सुस्पष्टता, चांगले आकलन आणि कमी संभ्रम. यशया संदेष्ट्याने म्हटले, "तू आपले अन्न भुकेल्यांस वाटावे; तू लाचारांस व निराश्रितांस आपल्या घरी न्यावे; उघडा

दृष्टीस पडल्यास त्यास वस्त्र द्यावे; तू आपल्या बांधवाला तोंड लपवू नये हाच तो उपास नव्हे काय? असे करशील तर तुझा प्रकाश प्रभातीप्रमाणे फाकेल, तुझी जखम लौकर भरेल, तुझी धार्मिकता तुझ्यापुढे चालेल व परमेश्वराचे गौरव तुझे पाठीराखे होईल'' (यशया ५८:७-८). त्याने असेही म्हटले की, आमचे आरोग्य, पुनःस्थापना आणि नवीन जीवनाचे सामर्थ्य हे ताबडतोब येईल. माझ्याप्रमाणेच तुम्हांलाही हे चांगले वाटत असेल असे वाटते.

न्याय (धार्मिकता) आमच्यापुढे चालेल, परमेश्वराचे गौरव तुझे पाठीराखे होईल असेही यशया म्हणतो. जर आपण जाचलेल्यांना कृतीपूर्ण मदत करतो तर देव आपल्यापुढे जातो तसेच आपला पाठीराखाही होतो. सुरक्षितता आणि खात्रीची ही भावना मला आवडते.

''यशयाने पुढे म्हटले, जर तू आपल्या जिवाला इष्ट ते भुकेल्यांस देशील, दुःखग्रस्त जिवांस तृप्त करशील; तर तुझा प्रकाश अंधकारात झळकेल, निबिड अंधकार तुला मध्यान्हाचे तेज असा होईल'' (यशया ५८:१०).

''परमेश्वर तुझा सततचा मार्गदर्शक होईल, तो अवर्षणसमयी तुझ्या जिवास तृप्त करील, तुझ्या हाडांस मजबूत करील; तू भरपूर पाणी दिलेल्या मळ्यांप्रमाणे होशील; पाणी कधी न आटणाऱ्या झऱ्याप्रमाणे होशील'' (यशया ५८:११). हे सर्व आपण जाचलेल्यांस न्याय मिळवून देण्यासाठी जगण्याचा परिणाम आहे.

या अभिवचनांत मला जे दिसते ते तुम्ही पाहत आहात असे मला वाटते. देव आपल्याला जे करायला सांगतो ते आपण केले तर देव जे आपल्याला आनंदाने देईल ते मिळवण्यासाठी आपण आपले पुष्कळसे जीवन व्यर्थ घालवतो. गरीब, भुकेले, निराश्रित, अनाथ, विधवा आणि गरजू यांची आपण काळजी घ्यावी. इतरांना मदत करण्यासाठी जगा म्हणजे देव शक्य त्या सर्व प्रकारे तुम्हांला समाधान देईल.

क्रांतीकारी प्रीती

मार्टिन स्मिथ

आपली प्रीती कशाभोवती फिरते?

मला हे सर्व स्पष्ट आठवते. १० जानेवारी २००८ चा दिवस होता. रस्त्यावर मोठमोठे खड्डे होते त्यामुळे आमची बस जाऊ शकत नव्हती. आम्ही बसमधून खाली उतरलो. भयंकर उकाडा होता. मागच्या महिन्याचा कचरा जाळला जात होता. त्यात टाकलेल्या टायरचा वास सर्वत्र पसरला होता. दुकाने, वर्कशॉप्स, झोपड्या आणि घरे. साड्या आणि सॅन्डल्स, अनवाणी पाय, आणि मती गुंग करणारा गोंगाट.

पण नंतर जो अनुभव आला त्याच्यापुढे हे काहीच नव्हते...

हे भारतातील मुंबई शहर होते, आणि शहरातील अनेक झोपडपट्ट्यांपैकी एकीत आम्ही होतो. रस्त्यावर कोठे लाल दिवे नव्हते. सर्वजण आपापल्या कामात व्यस्त होते - विकणे, तयार करणे, झाडणे, वाहणे इ.

येथे आम्ही प्रेम किरण पाहायला आलो होतो. वेश्यांची मुले आणि कुटुंबियांची देखभाल करण्यासाठी उभारलेला हा प्रकल्प होता. डेव्ह आणि जॉयस यांनी आम्हांला आमंत्रण दिले होते. हा प्रकल्प आम्ही स्वतःच्या डोळ्यांनी पाहावा असे त्यांनी सुचवले होते.

एकाच खोलीत इतके जीवन मी कधी पाहिले नव्हते. जणू काय खोलीत ते मावत नव्हते. सूर्यफुले मावळत्या सूर्याकडे जशी आपले तोंडे करतात तसे सत्तर हसरे चेहरे आम्हा पाहुण्यांकडे पाहत होते. बाहेर रस्ता, झोपड्या आणि गल्ल्या दिसत होत्या. जगण्यासाठी चाललेली धडपड दिसत होती. पण आत खोलीत मी मात्र माझ्या जीवनातील सर्वांत रोमांचक अनुभव घेत होतो. एका बालिकेवरून माझी नजर हटत नव्हती. तिचे नाव फारीन होते. तिच्यामध्ये असे काहीतरी होते की, सोडून जाणे मला कठीण वाटत होते.

पुढच्या तासाभरात मला तिच्याविषयी अधिक समजले. इतर सर्व मुलांप्रमाणे फारीनची आईही वेश्या होती. प्रेमकिरणने तिचे आयुष्य सुखावह केले होते - अन्न, कपडे, शिक्षण आणि सर्व समर्पित ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांचे प्रेम, जिव्हाळा दिला होता. तरीदेखील माझ्या मनात प्रश्नांचे मोहोळ उठले होते.

फारीनची आई काम करीत असताना फारीनला किती वेळा खाटेखाली दडून राहावे लागले?

रात्री झोपडपट्टीतल्या अंधाऱ्या रस्त्यांवर तिला किती धोक्यांना तोंड द्यावे लागले असेल?

ती जर आता बाहेर पडली नसती तर तिच्या जीवनात वेगळे असे काय घडले असते?

मी कसा काय निघून जाऊ?

कसा?

मुंबईमध्ये त्या दुपारी सर्व बदलले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही शहरात कॉन्सर्ट करीत होतो. त्या मुलांना आणि स्त्रियांना स्टेजवर आणण्याव्यतिरिक्त आम्ही दुसरे काय करू शकत होतो? ते आले. त्यांना तेथे स्टेजवर पाहणे मोठे आनंददायक होते. मग काहीतरी आश्चर्यकारक घडले. आम्ही वाजवायला सुरुवात केली आणि या आया सहज नाचू लागल्या. लाल लीपस्टीक लावलेल्या, रंग उडालेल्या साड्या घातलेल्या या वेश्या हजारो लोकांच्या समुदायासमोर बेधुंद होऊन आनंदाने नाचल्या.

त्या नाचत असताना माझ्या मनात विचार आला : न्याय कोठे असावा? तुच्छ मानलेल्यांचे स्वागत कोठे केले जाईल? गरीबीने पिचलेल्यांना स्वातंत्र्य आणि आशा कोठे मिळेल?

मी चर्चमध्ये वाढलो, पण मला काही पाठ शिकायला मिळाले नाहीत. गरीबी आणि दारिद्र्याचा सामना करण्याची वेळ येईल तेव्हा ख्रिस्ती विश्वासणारे या नात्याने आपण काय करावे हे मला माहीत नव्हते. काही वर्षांपूर्वी भक्ती करीत असताना वेश्या स्टेजवर नाचल्या असत्या तर मी तेथून कित्येक मैल दूर पळून गेलो असतो. पण आता हे काळाचे चिन्ह असल्यासारखे वाटते. देव आता मंडळीत अधिक सामर्थ्याने कार्य करीत आहे, आणि या प्रकारच्या लोकांचे स्वागत करण्याची गरज आहे हे शिकवीत आहे.

म्हणून प्रीतीच्या क्रांतीत सहभागी होण्याची कल्पना येते तेव्हा माझ्यासमोर एक प्रश्न येतो : आमची प्रीती कशाभोवती फिरते?

मी मुंबईवरून घरी परत आलो. माझ्या डोक्यात गोंधळ माजला होता. मी पूर्वीप्रमाणे विचार करीत नव्हतो. फारीनच्या बाबतीत माझ्यावर ओझे आले होते.

आपण जर काही केले नाही, तर तिचे जीवन दुःखसहन, गरीबी, अत्याचार आणि रोग यांनी खुरटले जाईल. ती माझीच दुसरी मुलगी आहे, आमचे कुटुंब तिच्याशिवाय अपुरे आहे असे मला वाटू लागले.

पण देवाच्या योजना माझ्यापेक्षा वेगळ्या होत्या.

एक वर्ष आणि काही महिन्यानंतर मी हा अनुभव लिहित असताना, परिस्थिती किंवा गोष्टी जशा असतील असे मला वाटले होते तशा नाहीत. फारीनने शहर सोडले नाही. ती आपल्या कुटुंबियासमवेतच आहे. पण तिची आई आता वेश्या म्हणून काम करीत नाही. मुंबईपासून काही तासांच्या प्रवासाच्या अंतरावर ते राहायला जाणार आहेत. त्यांच्यासारख्याच इतर लोकांच्या संगतीत ते राहणार आहेत. भूतकाळातील सर्व धोका, गोंधळ यांपासून दूर जाऊन जीवनात नवीन वाटचाल करण्याची इच्छा असणाऱ्या माजी वेश्यांची ती वसाहत आहे. फारीन आता खूप आनंदी दिसते.

आणि माझ्याविषयी काय?

मी पुन्हा एकदा बाप झालो, पण फारीनचा नाही. दरम्यानच्या काळात मी आणि माझी पत्नी ॲना हिने 'कम्पॅशनआर्ट' नावाच्या एका सेवाभावी संस्थेला जन्म दिला.

दारिद्र्याच्या सर्व प्रकारांचा सामना करण्यासाठी कलेशी संबंधित (पुस्तके, अल्बम्स) असणाऱ्या गोष्टींद्वारे निधी गोळा करण्याचे कार्य ही संस्था करते. गरीबी लोकांची आशा आणि जीवन हिरावते. याविषयी आम्ही दोघे जॉयस आणि डेव्हशी बोललो. ते जणू काय कम्पॅशन आर्टचे आजीआजोबा आहेत. त्यांचा कळवळा आणि सुज्ञता यांमुळे आम्ही हे पाऊल उचलू शकलो.

पण त्याहीपेक्षा अधिक म्हणजे कंपॅशन आर्ट फार्म्युल्याची पुनर्मांडणी करीत आहे. आपण इतरांची काळजी घेतो तेव्हा आपला विश्वास योग्य मार्गावर राहतो असे म्हणतात, पण तसे नाही. तो दुर्बल होत जातो. आपले हेतू आणि कळवळा जर आपल्याच अजेंड्याभोवती फिरत राहिला तर विश्वास मजबूत कसा राहणार?

आपली प्रीती आपल्या आजूबाजूला पसरते तेव्हा वर देवाशी आपण अधिक घनिष्टतेने जोडलो जातो.

अलीकडे स्टेजवर माझ्यासमोर मायक्रोफोन असतो, समोर लोकसमुदाय असतो तेव्हा आता काय असा प्रश्न मला पडतो तेव्हा यशया ५८ व्या अध्यायातून वाचावे अशी प्रेरणा मला होते. त्यातील शब्दांचा साधेपणा आणि सामर्थ्य यांना मी विरोध करू शकत नाही. तीन हजार वर्षांपूर्वी इस्राएल लोकांना प्रत्यक्ष हे दिले होते तरी, आजदेखील ते तेवढेच लागू होतात.

सुरुवातीच्या ओळींनी मी भारावून जातो : "कंठरव कर, कसर करू नकोस; आपला स्वर कर्ण्याप्रमाणे मोठा कर" (यशया ५८:१).

यानंतरची गोष्ट कानात सांगण्याची किंवा फक्त फाईलमध्ये ठेवण्यासारखी नाही, तर ओरडून सांगण्याची आहे. हा महत्त्वाचा प्रश्न आहे आणि जगात सर्वत्र, सर्वांनी याचा विचार केला पाहिजे, "ते तर रोजरोज माझ्याकडे येतात, माझे मार्ग ते जाणू इच्छितात; धर्माचरण करणाऱ्या व आपल्या देवाचे नियमशास्त्र न सोडणाऱ्या राष्ट्रांप्रमाणे ते माझ्याजवळ रास्त निर्णय मागतात; देवाची समीपता ते इच्छितात" (व.२). त्यांचे हृदय सरळ नाही, त्यांची वाटचाल पतनाकडे चालली आहे असे या शब्दांवरून लक्षात येते.

त्यांच्या सर्व धार्मिक कृत्यांकडे देवाने का दुर्लक्ष केले या प्रश्नाचे उत्तर देव देतो, "आम्ही उपास करतो ते तू का पाहत नाहीस? आम्ही आपल्या जीवास पीडा देतो ती तू का लक्षात आणत नाहीस? पाहा, आपल्या उपासाच्या दिवशी तुम्ही आपले कामकाज चालवता, तुम्ही आपल्या सर्व मजुरांकडून काबाडकष्ट करविता. पाहा, तुमच्या उपासांचा परिणाम तर असा होतो की तुम्ही त्या वेळी कटकटी करता व दुष्टपणाने ठोसाठोशी करता; तुमचा शब्द उर्ध्वलोकी ऐकू जावा ह्यासाठी तुमचे हल्लीचे उपास आहेत असे नाही" (व.३-४).

मग पुन्हा एक पाठ शिकायला मिळतो : "दुष्टतेच्या बेड्या तोडाव्या, जुवाच्या दोऱ्या सोडाव्या, जाचलेल्यांस मुक्त करावे, सगळे जोखड मोडावे, हाच मला पसंत असा उपास नव्हे काय? तू आपले अन्न भुकेल्यांस वाटावे; तू लाचारांस व निराश्रितांस आपल्या घरी न्यावे; उघडा दृष्टीस पडल्यास त्यास वस्त्र द्यावे; तू आपल्या बांधवाला तोंड लपवू नये हाच तो उपास नव्हे काय? असे करशील तर तुझा प्रकाश प्रभातीप्रमाणे फाकेल, तुझी जखम लौकर भरेल, तुझी धार्मिकता तुझ्यापुढे चालेल व परमेश्वराचे गौरव तुझे पाठीराखे होईल" (व.६-८).

याचा परिणाम काय होईल ते देव स्पष्ट सांगतो : "असे करशील तर तुझा प्रकाश प्रभातीप्रमाणे फाकेल, तुझी जखम लौकर भरेल, तुझी धार्मिकता तुझ्यापुढे चालेल व परमेश्वराचे गौरव तुझे पाठीराखे होईल. तेव्हा तू हाक मारशील ती परमेश्वर ऐकेल; तू धावा करशील तेव्हा तो म्हणेल, हा मी आहे. जर तू आपल्यामधून जोखड लादण्याचे सोडून देशील, बोट दाखवण्याचे व दुष्ट गोष्टी बोलण्याचे टाकून देशील" (व.८-९).

देव आपल्या निकट आहे, आणि आपली जीवने त्याची आहेत या अर्थाची गीते आपण वर्षानुवर्षे गात आहोत. देवाच्या समक्षतेची अनुभव घेण्याचा प्रयत्न आपण

केला आहे. त्याची वाणी ऐकण्याचा, त्याच्या योजना समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. पण हे सर्व करीत असताना त्याच्यासोबतची घनिष्टता गमावून बसलो आहोतः "तेव्हा तू हाक मारशील ती परमेश्वर ऐकेल; तू धावा करशील तेव्हा तो म्हणेल, हा मी आहे. जर तू आपल्यामधून जोखड लादण्याचे सोडून देशील, बोट दाखवण्याचे व दुष्ट गोष्टी बोलण्याचे टाकून देशील; जर तू आपल्या जिवाला इष्ट ते भुकेल्यांस देशील, दुःखग्रस्त जिवांस तृप्त करशील; तर तुझा प्रकाश अंधकारात झळकेल, निबिड अंधकार तुला मध्यान्हाचे तेज असा होईल" (व.९-११).

आपण असे केले तर काय प्रतिफळ मिळेल हे यशया पुढे सांगतो : "बहुत काळ मोडून पडलेली शहरे तुझे लोक पुन्हा बांधतील; पूर्वीच्या पिढ्यांनी घातलेले पाये तू पुन्हा उभारशील; मोडतोडीचा जीर्णोद्धार करणारा, वस्ती होण्यासाठी रस्त्यांची दुरूस्ती करणारा, असे तुझे नाव पडेल" (व.१२).

यापेक्षा अधिक आहे : "तर तू परमेश्वराच्या ठायी हर्ष पावशील; तू देशांच्या उच्च स्थलांचे जयोत्साहाने आक्रमण करशील, असे मी करीन; आणि तुझा पिता याकोब ह्याच्या वतनाचा तुला उपभोग घेऊ देईन; परमेश्वराच्या तोंडचे हे शब्द आहेत" (व.१४).

या सर्वांमागे अजून एक सत्य आहे. वस्तुस्थिती ही आहे की, आपली प्रीती इतरांभोवती केंद्रित करणे किंवा फिरू देणे कठीण आहे. आपल्या स्वतःची गोष्ट असते तेव्हा मात्र ते सोपे असते. का? याचे एक कारण हे की, मनाई केलेल्या झाडाचे फळ खाणाऱ्या दांपत्यापासून ते लवकरच विधवा होणाऱ्या स्त्रीकडे गच्चीवरून पाहणाऱ्या राजापर्यंत, आणि देवाची कृपा केवळ आपल्या लोकांवर न होता इतरांवर झाल्यामुळे रागावणाऱ्या संदेष्ट्यांपर्यंत हे असेच आहे. आपल्या बाबतीत नेहमीच असे आहे. देवाला आपल्या अंतःकरणाच्या सिंहासनावर बसू न देता, स्वतःला बसवल्यामुळे हा सततचा संघर्ष चालू आहे.

पूर्वीपेक्षा आता तर फारच कठीण आहे असे वाटते. केवळ आपलीच तहान भागवण्याचा, आपल्याचा इच्छा पूर्ण करण्याचा दबाव आपल्या चहूबाजूंनी आपल्यावर येत आहे. सुंदर दिसणे, कपडे, उत्पन्न, घर, नातेसंबंध, उद्योगव्यवसाय हे सर्व आपल्याला हवे आहे आणि त्यासाठी केवळ आपणच लायक आहोत असे वाटते. आपले जीवन अधिक चांगले, अधिक सुखावह करण्यासाठी या गोष्टी आहेत.

पण जीवनाविषयीचे सत्य आपल्याला माहीत आहे, नाही का? आपल्या स्वतःभोवती केंद्रित असलेले जीवन आपल्याला खऱ्या सुखापर्यंत नेऊ शकत नाही हे आपल्याला माहीत आहे.

इतिहास घडवणारे होण्यासंबंधी असलेले आमचे गीत गाण्यासाठी, वाजवण्यासाठी मला नेहमीच आवडते. गीतांच्या शब्दांचा लोकांवर प्रभाव पडेल, त्यांना आशीर्वाद मिळेल. इतिहास बनवणारे घडवण्यासाठी लक्षणीय जीवन जगण्याची चालना मिळेल या विश्वासाने बॅन्डमध्ये आम्ही पुष्कळ गाणी पुन्हा पुन्हा म्हटली आहेत. पण अजून काही आहे.

जर आपल्याला इतिहास बनवणारे बनायचे असेल, तर आपल्यापैकी बहुतेकांसाठी निश्चित कारणे असली पाहिजेत. निःस्वार्थी जीवन जगून चांगुलपणाची छोटी छोटी कृत्ये करूनही आपण इतिहास घडवू शकतो. मदर तेरेसा यांनी म्हटले, ''महान गोष्टी नाहीत, तर महान प्रीतीने केलेल्या लहान गोष्टी.'' हे जर आपण आपल्या डीएनएत (रक्तात) भिनवले, तर जगातील २ अब्ज ख्रिस्ती लोक काही आठवड्यांच्या आत जगातील दारिद्र्य संपवतील. अशा प्रकारचा इतिहास झालेला मला पाहायला आहे. स्वतःवरचे लक्ष दूर करा आणि यशयाने ५८ व्या अध्यायात सांगितलेल्या अभिवचनानुसार आपण देवाचे स्पष्टपणे ऐकू, त्याचे सान्निध्य, आणि हेतू यांत अधिक जवळ येऊ, स्वतःवर लक्ष न देता समस्या सोडवणे व आपल्या आजूबाजूच्या लोकांच्या गरजा भागवणे याव लक्ष केंद्रित करू.

मला एक गोष्टी नक्की माहीत आहे : मोठे नेहमीच समर्थ, शक्तीशाली असेल, पण लहान नेहमीच खूप सुंदर असते. या प्रीतीच्या क्रांतीमध्ये महान होण्याचे सामर्थ्य आहे, पण प्रीतीच्या निःस्वार्थी, त्यागपूर्ण लहान लहान कृत्यांमुळेच हे साध्य होणार आहे. म्हणून आमचे मोठे स्टेज, अल्बम्सची होणारी प्रचंड विक्री, मोठी गाणी - हे सर्व फार चांगले आहे, पण प्रवाहाविरुद्ध जगलेल्या जीवनासारखेते विस्मयकारक नाही.

एक अखेरचा मुद्दा. संगीताचा याच्याशी काय संबंध? सर्व सर्जनशील गोष्टी सोडून दूर कार्डबोर्डच्या खोक्यात राहण्याची इच्छा तीव्र आहे. आमच्या जीवनात ''खरे'' असे काही करण्याची ही पद्धत आहे असे वाटते. पण ही पूर्ण कथा नाही. शरीर, मन आणि आत्मा यांच्याशी मानवाचे कल्याण जडलेले आहे. संगीताचे सामर्थ्य मी पाहिले आहे, आणि ते देवाचे गुप्त शस्त्र आहे असे मला वाटते. युद्धाच्या प्रसंगी ते लोकांमध्ये ऐक्य घडवते, हृदयाच्या जखमांवर फुंकर घालते - वांशिक दंगलीत बळी पडलेल्या रवांडामधील लोकांपासून ते ट्वीन टॉवरच्या दुर्घटनेत सापडलेल्या न्यू यॉर्कमधील लोकांपर्यंत, तसेच ज्यांच्या द्वेषवृत्तीमुळे इतक्या यातना आल्या, त्या सर्वांवर संगीताचा परिणाम होतो.

तुम्ही देवाला चित्रात आणले तर भारतातील आकाशाखाली हजारो लोक देवाची स्तुती करताना, देवदूतांसह देवाची भक्ती करताना पाहायला मिळेल. तुमचे डोळे उघडा

म्हणजे लोकांना आरोग्य मिळालेले तुम्हांला पाहायला मिळेल. संगीतामुळे असाह्य मुलांच्या तोंडात ताबडतोब अन्न पडणार नाही, पण स्वर्गाने पृथ्वीला स्पर्श केल्याचा तो क्षण असतो आणि त्या क्षणी पुनःस्थापना होते. मग आपल्यावर कोणी तरी प्रीती करते, आपण एकटे नाही हे जाणवते. देवाने आपल्याला सोडलेले नाही ही भावना जाणवते.

संगीत हे करू शकते. देव आम्हांला हे सोडून कोठेतरी झोपडीत जाऊन राहा असे सांगत नाही. कठीण परिस्थितीत जगणाऱ्यांना मदत करण्यासाठी, देवाने संगीताचे जे दान आम्हांला दिले आहे त्याचा वापर करण्यासाठी तो आम्हांला पाचारण करतो. यशयाचे शब्द जर आपण आपलेसे केले, तर येणाऱ्या दिवसांत एक ओळही न गाता मोठे चमत्कार झाल्याचे आपल्याला पाहायला मिळेल असा माझा विश्वास आहे.

हे संगीत आणि प्रीतीची क्रांती आहे.

स्टीवन कर्टीस चॅपमन हे फार चांगले गीतकार, आराधनेचे चालक आहेत. प्रत्येक क्षणी लोकांना प्रेरणा देणारा हा माणूस आहे. नम्रतेने आणि कृपेने ते नेतृत्व करतात. त्यांनी एकदा मला हा दृष्टीकोन अगदी व्यवस्थित समजावून सांगितला. त्यांच्या गाण्यांचे हजारो अल्बम्स विकले गेले असतील, असंख्य पारितोषिके मिळाली असतील, पण "तुम्हांला सर्वात जास्त अभिमान कशाचा वाटतो, किंवा कशामुळे तुम्ही अधिक नम्र झाला" असे त्यांना विचारले, तर ते म्हणतात, देव माझ्या जीवनात कार्य करतो याचे हे सुस्पष्ट चिन्ह आहे.

जेव्हा आपण आपल्यापलीकडे पाहतो, इतरांवरची आपली प्रीती आपल्याला आपला आराम सोडण्यास प्रवृत्त करते, आपली संपत्ती आपण जीवनांची पुनर्उभारणी करण्यासाठी खर्च करतो, तेव्हा देव आमच्या जीवनात कार्य करतो याचे ते सुस्पष्ट चिन्ह आहे.

म्हणून ही अशी क्रांती आहे की जिचे टीव्हीवर प्रक्षेपण होणार नाही. आणि आपल्याला त्याची गरजही नाही. आपल्या चांगुलपणाच्या कृत्यांचा पुरावा आपल्या जीवनातून ठळक दिसेल, आपला शेजार बदलेल आणि वातावरणात आशेचा किरण उगवेल.

हे इतके सोपे आहे.

प्रकरण

8

प्रीती सामावून घेणारी आहे

जर तुम्ही लोकांचा न्याय करता, तर त्यांच्यावर प्रीती करायला
तुमच्याकडे वेळ नाही.
मदर तेरेसा

इलिनॉईसमधल्या हार्बर शहरातील २३ व्या रस्त्याच्या स्प्रूस ॲव्हेन्यू कोपऱ्यावर असलेल्या चर्चमध्ये जेमीने प्रवेश केला. तिला मदतीची खूप गरज होती. चर्चची इमारत ती बरेच दिवसापासून पाहत होती. आठवड्यातून दोनतीनदा लोक चर्चला येतात आणि जातात हे तिने पाहिले होते. चर्चच्या समोर रस्त्यापलीकडच्या कॉफीशॉपमध्ये ती बहुधा नेहमी बसत असे. आपल्याला चर्चला जायचे धैर्य झाले आणि आपण कधी चर्चला गेलो, तर आपले स्वागत कसे होईल असा प्रश्न तिला पडत असे.

लहान असताना जेमी आपल्या शेजाऱ्याबरोबर काही वेळा संडेस्कूलला गेली होती. पण चर्चच्या उपस्थितीविषयी तिला फारच थोडी माहिती होती. आपण त्या वातावरणात फिट बसू की नाही, आपला स्वीकार केला जाईल की नाही याची तिला खात्री नव्हती. चर्चमध्ये जातानापेक्षा बाहेर येताना लोक अधिक आनंदित दिसतात का हे पाहण्याचा प्रयत्न ती करीत असे. पण लोक इतक्या झपाट्याने निघून जात की तिला स्पष्ट काही दिसत नसे. चर्च संपल्यावर कधी कधी कोणीतरी कॉफीशॉपमध्ये येत असे.

त्यांच्यापैकी काहीजण एकटे बसत आणि विशेष म्हणजे ते तिच्यासारखेच एकाकी दिसत असत. काहीजण इतर लोकांबरोबर येत, ते हास्यविनोद करीत असत आणि सुखी दिसत. त्यामुळे आपल्यालाही एक दिवस चर्चमध्ये जायचे धैर्य होईल अशी आशा तिला वाटत असे.

जेमी अशा घरात वाढली जेथे तिला फार कमी प्रेम मिळाले. तिचे आईवडील दोघेही दारुडे होते, आणि जरी त्यांनी तिच्यावर अत्याचार केले नाहीत, तरी तिच्यातील दोष शोधून तिच्यावर टीका करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांनी तिच्या स्वतःच्या प्रतिमेला मोठा धक्का दिला. ते तिची तुलना नेहमी तिच्या भावाबरोबर करीत. तो प्रत्येक बाबतीत तिच्यापेक्षा उजवा होता. त्यामुळे तिला नेहमी आपल्यावर कोणाची प्रीती नाही, आपण कुरुप आहोत, मूर्ख आहोत, आपल्याला काहीच किंमत नाही असे वाटत असे.

तेरा वर्षांची झाल्यावर तिला चुकीची संगत लागली. ती दारू पिऊ लागली आणि ड्रग्ज घेऊ लागली. तिच्या भावनिक वेदना इतक्या तीव्र होत्या की, दारू आणि ड्रग्जनी ती त्या बधीर करू लागली. त्यातच तिला ब्युलेमिया हा खाण्याबाबतीचा विकार जडला. ती नेहमीप्रमाणे जेवत असे, पण लठ्ठ होऊ नये म्हणून खाल्ल्यानंतर नेहमी बळजबरीने उलटी करीत असे.

तिचा बारावा वाढदिवस ती कधीही विसरली नाही. त्या दिवशी तिच्या आईने तिच्याकडे तुच्छतेने पाहिले आणि म्हटले, "तुझ्या वाढदिवसाचा केक तयार करायला माझ्याकडे वेळ नाही, पण तुला त्याची गरज तरी काय? तू अगोदरच जाड आहेस." त्या दिवसापर्यंत आपण लठ्ठ आहोत असे तिला वाटत नव्हते. पण त्यानंतर प्रत्येक दिवशी ती आरशात स्वतःकडे पाहत असे. तिच्या प्रत्यक्ष वजनापेक्षा आपले वजन ३० किलोने अधिक आहे असे तिला वाटायचे. तिची आई तिला नेहमी जे टोमणे मारायची त्यामुळे तिच्या मनातील तिची स्वतःची प्रतिमा भंग पावली.

जेमीला शाळेत फार चांगले मार्क्स मिळत नसत. आपण कॉलेजला जायच्या लायकीचे आहोत असे तिला वाटत नसे, म्हणून हायस्कूलचे शिक्षण संपल्यावर एका किराणामालाच्या दुकानात शेल्फवर सामान मांडण्याचे आणि पिशव्या भरण्याचे काम स्वीकारले. स्वतःच्या पायावर उभे राहण्याएवढे पैसे तिला कधी मिळत नसत, पण स्वतःचे कपडे, मद्य आणि काही ड्रग्ज विकत तिला विकत घेता येत असे. त्याव्यतिरिक्त कॉफीशॉपमध्ये बसून किंवा आजूबाजूच्या रस्त्यांवरून भटकत इतर कुटंबे कशी असतील याचा विचार करीत ती जास्तीत जास्त घराबाहेर राहण्याचा प्रयत्न करीत

असे. ज्यांच्यावर भरवसा ठेवावा असे जवळचे मित्र तिला कोणी नव्हते. तिच्या जीवनातील लोक फक्त घेणारे होते, देणारे नव्हते आणि त्यांच्यापैकी बऱ्याचजणांची तिला भीती वाटत असे.

एके दिवशी दुसरे लोक चर्चमध्ये जात असताना, सर्व धैर्य एकवटून ती चर्चमध्ये गेली. आपल्याकडे कोणाचे लक्ष जाऊ नये म्हणून ती गर्दीत मिसळली. पण त्यासोबतच कोणीतरी आपले स्वागत करावे आणि "आज तुम्ही इथे आलात म्हणून आम्हांला आनंद वाटतो" असे म्हणावे अशीही सुप्त इच्छा तिच्या मनात होती. काही लोक आपल्याकडे बघत आहेत आणि आपसात कुजबुजत आहेतहे तिच्या लक्षात आले. पण कोणी स्नेहल, मैत्रीपूर्ण आहे असे वाटले नाही. बहुतेक लोकांच्या दृष्टीने तिने विचित्र कपडे घातले होते आणि तिचे केसही तेरा रंगांनी रंगवलेले होते. ते मुळात काळे होते. तिने बॅगी जीन्स आणि बॅगी शर्ट घातला होता. आपण खूप लठ्ठ आहोत असे तिला वाटे म्हणून आपले वजन लपवण्यासाठी ती असले कपडे घालायची.

जेमी शेवटच्या बाकावर बसली, पुढे काय चालले आहे हे तिला समजले नाही. लोक उभे राहत आणि बाकांच्या मागच्या रॅकवर असलेल्या पुस्तकांतून काहीतरी वाचत असत. काही गाणी, ऑर्गन, प्रार्थना आणि दानार्पण झाले. सगळ्यांच्या समोर एक प्लेट फिरवली गेली. काही लोकांनी त्यात पैसे टाकले. दुःखी आणि रागावलेल्या वाटणाऱ्या एका माणसाने वीस मिनिटे संदेश दिला, तो तिच्या डोक्यावरून गेला. तो पाळक असावा असे तिला वाटले, पण तिला खात्री नव्हती. सरतेशेवटी, सभा संपायला आली असे वाटले, कारण सर्वजण पुन्हा उभे राहिले आणि त्यांनी अजून एक गीत गाईले.

बाहेर जाताना कोणीतरी आपल्याला काहीतरी म्हणेल असे तिला वाटले. नक्कीच कोणीतरी काहीतरी बोलेल! पाळक दारात उभे राहिले, आणि बाहेर जाणाऱ्यांना शेकहॅन्ड करू लागले. जेमी त्यांच्याजवळ पोहोचली तेव्हा त्यांनी तिच्याकडे पाहून स्मित केले नाही, किंवा डोळ्याला डोळेही भिडवले नाहीत. तो केवळ आपले कर्तव्य पार पाडीत आहे, कधी एकदा हे संपते असे त्याला झाले आहे हे तिच्या लक्षात आले.

ती पायऱ्या उतरून खाली आली तेव्हा एक स्त्री तिची वाट पाहत उभी असल्याचे तिला दिसले. सरतेशेवटी कोणाचे तरी आपल्याकडे लक्ष गेले असे वाटून तिला आनंद झाला. या स्त्रीने तिला पाहिले होते हे खरे, पण जेमीच्या बाबतीत सर्वच चूक आहे असे तिला वाटत होते. म्हणून तिने म्हटले, "माझे नाव मार्गारेट ब्राऊन आहे. तुझे नाव काय?" जेमीने आपले नाव सांगितले. मग मार्गारेटन पुढे बोलू लागली, "येथे तुझे नेहमीच स्वागत आहे, पण होलीनेस टॅबरनॅकलमध्ये येताना आम्ही कसे कपडे घालतो

याविषयी तुला मार्गदर्शन करावे असे मला वाटते. जीन्स घालायची नाही, लोकांचे लक्ष वेधणार नाही असे केस. येशूने आपल्याला नम्र व्हायला शिकवले आहे. तुझे येथे नेहमीच स्वागत आहे.''

जेमी त्या दिवशी कॉफी शॉपमध्ये जाऊ शकली नाही; कुठेतरी एकांतात जाऊन ती खूप रडली. तिला वाटले, देवानेसुद्धा आपल्याला नाकारले आहे. आत्महत्येचे विचार मनात घोळवत तिने उरलेला दिवस घालवला. ती निराशेच्या खोल गर्तेत पडली होती. जगण्यासाठी काही कारणच नाही असे तिला वाटू लागले.

यातील नावे काल्पनिक आहेत, पण अशा जेमी, होली टॅबरनॅकल्स आणि मिसेस ब्राऊनसारख्या धार्मिक स्त्रियांनी जग भरलेले आहे. दर आठवड्याला चर्चला येणाऱ्याजाणाऱ्या लोकांनी ते भरले आहे. पुष्कळजणांना जायचा कंटाळा येतो, आणि सभा संपण्याची देखील ते वाट पाहत नाहीत. ते दुसऱ्यांवर टीका करणारे, त्यांचा न्याय करणारे आणि स्वतःला शिष्ट समजणारे असतात.

देव सर्वांवर सारखीच प्रीती करतो

ज्या दिवशी जेमी होलीनेस टॅबरनॅकलमध्ये गेली होती, त्या दिवशी येशू बहुधा तेथे नसावा, कारण त्यालाही तेथे आवडले नसणार. पण जर येशू तेथे असता तर त्या दिवशी जेमीला तेथे येताना त्याने पाहिले असते. एकतर तो तिच्याजवळ बसला असता, किंवा तिला आपल्यासोबत समोर नेऊन तिच्याजवळ बसला असता आणि ती प्रथमच आली का ते विचारले असते. ती पहिल्यांदाच आली हे त्याला समजले असते, तर तिला जे समजले नाही ते तिला त्याने समजावून सांगितले असते. तिने त्याच्याकडे पाहिल्यावर त्याने स्मित केले असते, तिच्या हेअरस्टाईलचे कौतुक केले असते. त्याने तिला रस्त्यापलीकडच्या कॉफी शॉपमध्ये कॉफीसाठी आमंत्रणदेखील दिले असते. त्यामुळे जेमीला पुढच्या रविवारी पुन्हा चर्चला यावेसे वाटले असते. पण त्या दिवशी अर्थातच येशू तेथे नव्हता, नाहीतर त्या दिवशी लोक जसे वागले तसे वागले नसते. कोणीही त्याचे व्यवस्थित प्रतिनिधीत्व केले नाही, आणि कोणीही देवाचे अनुकरण करीत नव्हता.

पक्षपाती नाही

देव पक्षपाती नाही असे पवित्र शास्त्रात अनेक ठिकाणी सांगितले आहे (पाहा प्रे.कृ.१०:२४; रोम.२:११; इफिस.६:९). दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर लोकांची

वेशभूषा, त्यांचे उत्पन्न, त्यांचे पद पाहून तो त्यांना वेगळ्या प्रकारे वागवत नाही. तो सर्वांना सारखेच वागवतो. आपल्यामधील परक्या व उपऱ्या लोकांना कसे वागवावे याविषयी देवाने मोशेला अनेक सूचना दिल्या. त्यातील पहिली सूचना, "तुमच्यामध्ये राहणाऱ्या परदेशीय माणसाला स्वदेशीय माणसासारखे वागवा, त्यांच्याशी मित्रत्वाने वागा, त्यांना कुठल्याही प्रकारे त्रास देऊ नका," ही होती (पाहा निर्गम २२:२१; २३:९; लेवीय १९:३३). प्रेषित पेत्राने असे म्हटले :

कुरकूर न करता एकमेकांचा (विश्वासणाऱ्यांचा) (परक्यांवर प्रीती करा, पाहुणे, परदेशीय, गरीब आणि ख्रिस्ताच्या शरीराचा भाग म्हणून तुमच्याकडे येणारे इतर सर्वजण) पाहुणचार करा.
१ पेत्र.४:९

हा भाग घाईघाईने वाचून संपवण्यापूर्वी, तुमच्या परिचयाचे नसलेल्या आणि तुमच्यापेक्षा एकदम वेगळे असलेल्या लोकांशी तुम्ही किती मित्रत्वाने वागता हे जरा तपासून पाहा. काही लोक मुळातच मित्रत्वाने वागणारे असतात. पण आपल्यापैकी जे असे वागत नाहीत, त्यांनी तसे वागण्याचा निश्चय केला पाहिजे, कारण पवित्र शास्त्र तसे सांगते.

भपकेदार कपडे घालून सभेला येणाऱ्या लोकांकडे विशेष लक्ष देऊ नका, किंवा त्यांना मानाच्या जागा देऊ नका असा सल्ला प्रेषित याकोबाने दिला. त्याने म्हटले, जर लोक असे वागू लागले, आणि त्यांना विशेष वागणूक मिळावी असे वाटू लागले तर त्यांचे हेतू चुकीचे आहेत. प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या आपण तोंड पाहून वागू नये असे त्याने म्हटले (पाहा याकोब.२:१-४). दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे आपण सर्वांशी सारखेच वागले पाहिजे.

येशूमध्ये सर्वजण एक आहेत असे पौलाने म्हटले (पाहा गलती.३:२८). आपण केवळ लोक पाहिले पाहिजे, ते काळे आहेत, गोरे, लाल का पांढरे आहेत हे पाहण्याची गरज नाही. त्यांच्या कपड्यावरील लेबल, हेअर स्टाईल, त्यांच्या गाड्या, त्यांचे उद्योगव्यवसाय किंवा पदे हे पाहण्याची गरज नाही, तर ज्यांच्यासाठी येशू मरण पावला ते हे लोक आहेत एवढेच पाहिले पाहिजे.

कॉफी शॉपपासून धडा

आपण सर्वांनी आपले वर्तुळ वाढवण्याची गरज आहे. त्यात सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश करता येईल एवढे मोठे ते केले पाहिजे. अलीकडेच मी बर्मिंगहम, इंग्लंड

येथील पाळक पॉल स्कॅनलॉन यांच्यासोबत होते. आम्ही पुष्कळ लोकांबरोबर कॉफी शॉपमध्ये कॉफी पीत होतो. आमची वाट पाहणाऱ्या एका मुलीची हेअरस्टाईल मी पाहत होतो, आणि प्रामाणिकपणे सांगायचे तर मी पाहिलेली ती सर्वांत विचित्र गोष्ट होती. डोक्याच्या मधोमध खालपर्यंत गेलेली केसांची ओळ सोडली तर तिने पूर्ण टक्कल केले होते. केसाची मधली पट्टी काळ्या, निळ्या, लाल आणि पांढऱ्या रंगाने रंगवली होती. तसेच तिचे नाक, जीभ, ओठ, आणि कानावर अनेक ठिकाणी टोचलेले होते. मला थोडे अस्वस्थ वाटले, कारण ती थोडीही माझ्यासारखी नव्हती. आम्ही इतक्या वेगळ्या होतो की, तिच्याशी साधर्म्य सांगता येईल अशी एकही गोष्ट मला दिसत नव्हती. तिच्याकडे न पाहता आपली कॉफी मागवावी असे मला वाटले.

त्याउलट पॉलने तिच्याशी संभाषण सुरू केले आणि पहिली गोष्ट तिला बोलला की, "मला तुझे केस आवडले. ते असे उभे करण्यासाठी तू काय करतेस?" त्याने तिच्याशी संभाषण चालू ठेवले, आणि तंग वाटणारे वातावरण हळूहळू मोकळे झाले. लवकरच आम्ही सर्वजण तिच्याशी बोलू लागलो, आम्ही तिला आमच्या वर्तुळात समाविष्ट केले. त्या दिवशी मी एक मोठा धडा शिकले - मला वाटते तितकी मी मॉडर्न नाही. माझ्यात अजूनही काही धार्मिक विचारसरणी आहे, मला तिचा मुकाबला केला पाहिजे आणि थोडेफार वेगळे वाटणाऱ्या लोकांसह सर्वांना आपल्या वर्तुळात समाविष्ट करून घेण्याइतपत वरची पातळी गाठली पाहिजे.

कॉफी शॉपमधील त्या मुलीच्या दृष्टीने मी कदाचित विचित्र आणि वेगळी असेन. आपणच असे मापदंड का ठरवतो आणि त्यापेक्षा वेगळे कोणी असले तर त्याच्या/तिच्यामध्ये काही समस्या आहेत असे का समजतो? कोणती हेअरस्टाईल योग्य आहे, कोणते कपडे योग्य आहेत? देवाकडून दहा आज्ञा घेण्यासाठी मोशे चाळीस दिवस व चाळीस रात्री सिनाय पर्वतावरून खाली आला तेव्हा कसा दिसत असेल याविषयी मी एकदा विचार करीत होते. त्याचे केस विस्कटलेले असतील, दाढी ठीकठाक करण्याची गरज असेल आणि त्याचे जोडे व त्याचे कपडे थोडेफार मळले असतील.

बाप्तिस्मा करणारा योहान थोडा विचित्र होता. तो वाळवंटात एकटात राहत असे, प्राण्याची कातडी पांघरत असे आणि मध व टोळ खात असे. रानातून बाहेर आल्यावर तो मोठ्याने ओरडला, "अहो पाप्यांनो, पश्चात्ताप करा, कारण देवाचे राज्य जवळ आले आहे."

परक्या, अनोळखी लोकांशी आपण कसे वागतो, याची खबरदारी घ्या, कारण आपण कदाचित देवदूतांचे स्वागत करू असे पवित्र शास्त्र शिकवते (पाहा इब्री.१३:२).

आपण दयाळू, मित्रत्वाने आणि कृपेने त्यांच्याशी वागावे असे ते सांगते. आज समाजातील पुष्कळ लोक अनोळखी, परक्या लोकांशी बोलतदेखील नाहीत, त्यांच्याशी मित्रत्वाने वागण्याची गोष्ट तर दूरच राहिली.

कदाचित तुम्ही म्हणत असाल, "जॉयस, आम्ही आज निराळ्या जगात राहत आहोत! तुम्ही ज्यांच्याशी बोलत आहात ती व्यक्ती कोण आहे हे तुम्हांला माहीतही होणार नाही." मला वाटते की, तुम्ही सुज्ञता वापरावी. ज्याला हॅलो म्हणावे अशी एखादी नवीन व्यक्ती मंडळीत, कामाच्या ठिकाणी, शाळेत किंवा तुमच्या शेजारी आहे का ते पाहा.

तुमच्या नंबरची वाट पाहत तुम्ही डॉक्टरच्या ऑफिसात बसला असताना, तेथे एखादी वयोवृद्ध, प्रौढ स्त्री असेल तर तिच्याशी तुम्ही बोलू शकता. ती अगदी एकाकी असेल. तिच्यासाठी दहा मिनिटे वेळ काढा, आणि तिची कहाणी लक्षपूर्वक ऐका. कदाचित तिची व तुमची पुन्हा कधीही भेट होणार नाही, पण तिला तुमची आठवण राहील. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही तिच्यासाठी जे काही केले त्याजद्दल देवाला तुमचे कौतुक वाटेल. होय, ही एक किरकोळ गोष्ट होती, पण तुम्ही तिला सहभागी करून घेतले!

या प्रकरणानंतर पॉल स्कॅनलॉन यांचा लेख आहे. त्यांच्या मृत, कर्मकांडात रमणाऱ्या चर्चला प्रीतीने भरलेल्या संजीवनाचा अनुभव घेणाऱ्या चर्चमध्ये परिवर्तित करण्यासंबंधीचा स्वतःचा अनुभव त्यांनी त्यात सांगितला आहे. त्यांच्या गोष्टीवरून आपल्याला पुष्कळ शिकायला मिळेल, आणि स्वतःला काही कठीण प्रश्नांची उत्तरे द्यायला भाग पाडेल. तुमच्या मंडळीत जर खरे संजीवन आले तर तुम्हांला खरोखर आनंद होईल का, किंवा पुष्कळ लोकांना जेमी जशी वाईट वाटली तसे तुम्हांला वाटून तुम्ही चर्च सोडून जाल? ते एखाद्या सुधारणागृहातून आले असतील, त्यांच्याजवळ दारूचा किंवा इतर गोष्टींचा दुर्गंध येत असेल. जगातील दुःखी लोक नेहमीच चांगल्या पोशाखात असतात किंवा त्यांच्याजवळ नेहमीच सुगंध येत असतो असे नाही. कधी कधी ते तसे असतात, पण नेहमीच नाही. म्हणून केवळ कव्हर पाहून आपण पुस्तकाविषयी मत बनवू नये, तर ते वाचले पाहिजे. लोक कसे दिसतात हे पाहणे सोडून द्या आणि ते काय आहेत ते पाहा.

तुमच्या आरामकक्षातून बाहेर पडा

दुसऱ्या कोणाला तरी आनंदी करण्यासाठी तुमच्या स्वतःच्या आरामकक्षातून बाहेर पडणे, स्वतःच्या आनंदाची पर्वा न करणे म्हणजे लोकांना देवाची प्रीती दाखवणे.

पुष्कळ ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांना संजीवनासाठी प्रार्थना करायला आवडते. प्रार्थना करीत असताना ते हरवलेल्या आत्म्यांसाठी रडतातसुद्धा! पण त्यांच्या मंडळीत जर खरोखरच संजीवन आले, तर त्यांच्यापैकी पुष्कळजण ती मंडळी सोडून दुसरीकडे जातील. कारण त्यामुळे त्यांच्या नेहमीच्या जीवनशैलीत फरक पडेल आणि त्यांना ते आवडणार नाही.

> दुसऱ्या कोणाला तरी आनंदी करण्यासाठी तुमच्या स्वतःच्या आरामकक्षातून बाहेर पडणे, स्वतःच्या आनंदाची पर्वा न करणे म्हणजे लोकांना देवाची प्रीती दाखवणे.

अलीकडेच मी एका चर्चमध्ये संदेश दिला. शेजारच्या हॉस्पिटलमधील पेशंट्स तेथे व्हीलचेअरवर येतात. मी वक्ता असल्यामुळे मला समोरच्या ओळीत बसवले होते, पण पहिल्या ओळीच्या पुढे सर्व व्हीलचेअर्स होत्या. माझ्यासमोर बसलेल्या व्यक्तीकडे फारच घाण वास येत होता. घाण वास आल्यावर मला उलटीसारखे वाटते. (आमची मुले लहान होती, तेव्हा डेव्ह जर घरी असेल तर त्याला मी त्यांची डायपर्स बदलायला सांगत असे.)

तेथे बसल्यावर मला देवाच्या विनोदबुद्धीची जाणीव झाली; मी जेथे असायला हवे अशी त्याची इच्छा होती, नेमके तेथेच त्याने मला आणले होते. मी उठून प्रीतीविषयी आणि लोकांना आपल्या वर्तुळात सहभागी करून घेण्याविषयी संदेश देण्याच्या तयारीत होते. बोलायची वेळ येईपर्यंत मी पुष्कळ प्रार्थना करीत होते, मी खूप धार्मिक दिसत असेन, कारण जणू काय स्वर्गाकडे पाहत आहे अशा तऱ्हेने मी मान वर करून पाहत होते. देवानेच मी तेथे बसण्याची व्यवस्था केली होती हे मला माहीत होते, आणि खरेच मला तेथे बसण्याची गरज होती. इतरांना मी जे करायला सांगणार होते, त्यापूर्वी मला त्याचा अनुभव घेणे आवश्यक होते. आपण जिकडे जाऊ तिकडे सर्वत्र आपल्याला कंफर्टेबल वाटेलच असे नाही. त्या मनुष्याला आंघोळ घालण्यासाठी बहुधा कोणी नसावे. ज्यांना अशा प्रकारे सेवा करायची इच्छा आहे ते दवाखान्यात जाऊन पेशंट्सना आंघोळ घालण्याची, त्यांना स्वच्छ करण्याची सेवा करू शकतात.

जेमी पुन्हा प्रयत्न करते

हे प्रकरण संपवत असताना मला जेमीची गोष्ट पूर्ण करू द्या. चर्चमधील त्या दुःखद अनुभवानंतर तिने पुन्हा चर्चला न जायचा निश्चय केला. सोमवारी ती निराश

मनःस्थितीतच कामाला गेली. एका सहकाऱ्याच्या ते लक्षात येऊन काय झाले ते तिने विचारले. सर्वसामान्यतः जेमी इतरांशी मनमोकळेपणे बोलत नसे. सर्व काही ती मनातच ठेवी. पण त्या दिवशी ती इतकी दुःखी होती की, प्रश्न ऐकल्यावर ती रडू लागली. तिची सहकारी समांथा हिने मॅनेजरकडून लवकर सुटी मागून घेतली आणि जेमीला घेऊन बाहेरच्या लाउंजमध्ये आली. जेमीने आपले मन तिच्याकडे मोकळे केले. चर्चमधील अनुभवही सांगितला. अधिक बोलता यावे म्हणून समांथाने तिला आपल्या घरी जेवायला यायचे आमंत्रण दिले. ती संध्याकाळ जेमीसाठी जीवन बदलणारी ठरली.

समांथा खरी विश्वासणारी होती. मदत करायला ती सदैव तयार असे. ती आठवड्यातून दोनदा जेमीला भेटू लागली. तिची विचारपूस करू लागली आणि येशू तिच्यावर किती प्रीती करतो हे सांगू लागली. साधारणतः तीन महिने गेल्यावर समांथाने तिला रविवारी आपल्याबरोबर चर्चला येतेस का म्हणून विचारले. जेमीला फार उत्सुकता किंवा आनंद झाला नाही; पण समांथाला वाईट वाटू नये म्हणून तिने होकार दिला.

जेमीला रिझरेक्शन चर्चमध्ये आलेला अनुभव पूर्वीच्या चर्चपेक्षा फार वेगळा होता. तिचे आनंदाने स्वागत करण्यात आले. ती पाहुणी असल्यामुळे तिला समोरच्या रांगेत विशेष स्थान दिले. सभेत चाललेली प्रत्येक गोष्ट जणू तिच्यासाठीच चालली होती. ते सर्व तिला समजले कारण ते वास्तविक जीवनाशी संबंधित होते. ते गात होती ती गाणी अर्थपूर्ण होती. ती ऐकून तिला बरे वाटले. सभा संपल्यावर तिला कॉफी प्यायला नेले. पुष्कळ लोक तिला भेटले. ते नंतर तिचे घनिष्ट मित्र झाले. या चर्चमध्ये सर्व वयोगटांतील आणि संस्कृतीचे पुष्कळ लोक होते. काहींनी सूट, टाय घातला होता, तर काहींनी जीन्स, टीशर्ट घातले होते. प्रत्येकजण स्वतःच्या आवडीप्रमाणे पोशाख घालू शकत होता.

जेमीने आपले जीवन येशूला दिले आहे. ती आता चर्च चुकवत नाही. तिचे लग्न झाले असून तिला दोन मुले आहेत. तिचे संपूर्ण कुटुंब शहरातील सुवार्ताप्रसारकार्यात सहभागी होते. या कार्यात रस्त्यावर राहणाऱ्या लोकांची सेवा केली जाते. जेमीला हे काम करायला आवडते, कारण आपलीही स्थिती अशीच झाली असती हे तिला माहीत आहे.

वाईट अनुभव आल्यानंतर, जेमीने ठरवल्याप्रमाणे आत्महत्या केली असती तर किती दुःखद झाले असते, नाही का? देवाचा शोध घेण्याच्या प्रयत्नात लोक चर्चपर्यंत पोहोचतात, पण चर्चने देवाचे योग्य प्रकारे प्रतिनिधित्व न केल्याने ते अडखळतात हे

पाहून, ऐकून मला वाईट वाटते. आपल्या वर्तुळात सर्व प्रकारच्या लोकांना सामावून घेण्याचा प्रयत्न आपण करू. कोणी तुमच्यासारखे नाही, म्हणून त्याला/तिला वगळण्याचा विचार करू नका. ज्यांना आपण अगदी जवळचे, घनिष्ट म्हणू शकू असे मित्र आपणा सर्वांना आहेत. त्यात काहीच वावगे नाही. येशूनेदेखील बारा शिष्यांपैकी तिघांसोबत जास्त वेळ घालवला. पण त्याने इतरांना कमी लेखण्याचा प्रयत्न केला नाही. आपण कुचकामी, कमी महत्त्वाचे आहोत असे त्यांना वाटू दिले नाही.

क्रांतीकारी प्रीती

पास्टर पॉल स्कॅनलॉन

स्थानिक मंडळी ही देवाची सर्वोत्कृष्ट कल्पना आहे! आपण देवाची अभिव्यक्ती, त्याचे हास्य आणि शहरातील त्याचा पत्ता आहोत. दुःखाची गोष्ट म्हणजे पुष्कळ मंडळ्या हे लक्षात घेत नाहीत, परिणामी देवाच्या घराच्या प्रभावक्षेत्रात असणारे लाखो लोक आपापल्या घरी दुःखात मरतात. पुष्कळ मंडळ्यांनी धारण केलेल्या धार्मिकतेच्या बुरख्यामुळे त्यांना येशूची खरी ओळख कधी होत नाही.

ओलांडून पलीकडे जाणे

दहा वर्षांपूर्वी आमची मंडळी आमूलाग्र बदलातून गेली. त्या वेळी भयंकर वेदना झाल्या. या अनुभवाला आम्ही "ओलांडणे" म्हणतो. या अनुभवाचे आता एक पुस्तक झाले आहे. त्यात याविषयी सविस्तर सांगितले आहे. इंग्लंडमध्ये प्रत्येक मंडळीत सर्वसाधारणपणे वीस लोक असतात, आणि बाकीचे ९८ टक्के लोक चर्चला जात नाहीत, ते चर्चविरोधी असतात. म्हणून ब्रिटीश मानदंडानुसार आमची मंडळी खूपच मोठी होती, कारण त्या वेळी आमच्या मंडळीत ४५० पेक्षा जास्त लोक होते. एका बिल्डिंगमध्ये आम्ही जमत असू. त्या इमारतीची किंमत जवळजवळ चुकती करण्यात आली होती. आम्ही सुखी आणि सुखवस्तू होतो. आम्हांला चांगले उपदेश ऐकायला मिळत आणि संगीत देखील चांगले होते. एवढे असूनही कशाची तरी उणीव होती. कोणत्यातरी मूलभूत गोष्टींची उणीव होती, पण कोणाच्या ते लक्षात येत नव्हते.

"विश्वासणाऱ्यांची चांगली देखभाल, भरपूर आत्मिक अन्न आणि कमी व्यायाम" या कधी न संपणाऱ्या चक्रात आम्ही पडलो होतो. असले विश्वासणारे म्हणजे मंडळीला गतीशून्य करणारे सैतानाच्या हातातील प्रभावी शस्त्र असतात. हे फार चांगले लोक असतात, आणि हीच खरी समस्या असते! त्यांच्यापैकी कोणीही दुःखी नसते, त्यांची हृदये वाईट नसतात, त्यांची वृत्ती वाईट नसते.

आपल्या मंडळ्यांत आणि सेवाकार्यांत कशाची उणीव आहे हे जगभरातील पाळकांना सांगता येत नाही. आणि ते सांगत असताना आपण निराशावादी, अस्वस्थ दिसू नये अशी त्यांची इच्छा असते. राजाचे नवे कपडे या कथेतील मुलाप्रमाणे त्यांची

स्थिती असते. राजाच्या अंगावर कपडे नाहीत हे सर्वांना दिसत होते, पण समजत नव्हते. त्या लहान मुलाने मात्र स्पष्टपणे ओरडून सांगितले.

सर्वच जण जर आनंदी, प्रेमळ, मैत्रीपूर्ण आणि आशीर्वादित असतील तर आम्ही मरत आहोत हे कोण सांगेल? पण १९९८ च्या उत्तरार्धात मी तो लहान मुलगा झालो, आणि वीस वर्षांत प्रथमच मी मंडळीला सांगितले की, "आपण नागडे, स्वतःच्या धुंदीत मग्न, सुरक्षित आणि असंबंद्ध आहोत." यात माझाही समावेश होता. हे लक्षात येणे आमच्यासाठी सोपे नव्हते, कारण इतर मंडळ्यांप्रमाणेच आमच्याकडे ईश्वरविज्ञान होते, हरवलेल्यांना सुवार्ता सांगण्याची भाषा होती, पण प्रत्यक्षात कोणीच सुवार्ता सांगत नव्हते. हरवलेल्या आत्म्यांसाठी आम्ही प्रार्थना करीत असू, संदेश सांगत असू, आणि गीते गात असू. हरवलेल्यांसाठी आम्ही अश्रूदेखील ढाळत असू, पण कोणाही हरवलेल्याचे तारण झाले नाही. आम्ही स्वतःमध्येच दंग असणारा धार्मिक क्लब झालो होतो. जे अजून हरवलेले आहेत, दुःखी आहेत त्यांच्याविषयी असणारा देवाचा कळवळा आमच्या लक्षात येत नव्हता.

जानेवारी १९९९ मध्ये मी "९९ साली आपण ९९ सोडत आहोत" या शीर्षकाचा संदेश दिला. ९९ मेंढरे सोडून हरवलेल्या एका मेंढराचा शोध घेणाऱ्या मेंढपाळाचा म्हणजेच येशूचा संदर्भ यात होता. जे मंडळीत आहेत त्यांचा प्राधान्यक्रम पहिला नाही, तर दुसऱ्या लोकांना आपण प्राधान्य दिले पाहिजे. तेव्हा चांगल्या, आत्म्याने भरलेल्या लोकांची प्रतिक्रिया पाहून मी सुन्न झालो. घाणेरडे, पापी लोक आता आपल्या चर्चमध्ये येणार ही कल्पनाच त्यांना सहन होईना.

आमच्या स्वतःत रममाण असणाऱ्या मंडळीला पुन्हा एकदा आत्मे वाचवण्याच्या कार्यात गुंतवण्याचा प्रयत्न करीत असताना १९९९ साली मी बससेवा सुरू केली. देवाने हे मला करायला कसे सांगितले त्याची एक वेगळीच कथा आहे. मला केवळ चांगल्या कल्पनेची गरज होती, म्हणून ही देवानेच सुचवलेली कल्पना आहे याची खात्री पटण्यासाठी एवढे पुरेसे होते.

लवकरच शेकडो पापी लोकांना आम्ही बसने आणू लागलो. चर्चला न जाणाऱ्या, ओबडधोबड, उद्धट आणि कधी काय करतील याचा भरवसा नसलेल्या या लोकांनी आमच्या सुंदर क्लबची वाट लावली. आमचे आदरणीय सभासद त्यांना "बसमधले लोक" म्हणत असत. हे लोक आपल्या सुरक्षिततेला आणि स्थैर्याला धोका आहेत असे त्यांना वाटे. ज्या लोकांवर माझी प्रीती होती, आणि जे माझ्यावर प्रीती करतात याची मला खात्री होती, त्यांच्याकडून मला धमकी देणारी, टीका करणारी पत्रे रोज

मिळत आणि फोन येत. बसमधून येणाऱ्या मुलांनी आमच्या संडेस्कूलची वाट लावली आणि या मुलांचे पालक धूम्रपान करून, आरडाओरडा करून आणि विशेष म्हणजे आमचे तथाकथित उच्चभ्रू सभासद जेथे बसत त्या आसनांवर बसून सभेचा विचका करतात अशी टीका होत असे.

हे थांबवा अशी गळ घालण्यासाठी पुढाऱ्यांचे थव्यांमागून थवे माझ्याकडे येत होते. पण आता खूप उशीर झाला होता. हरवलेल्या आत्म्यांसाठी असलेला देवाचा कळवळा मला समजला होता त्यामुळे मी त्यांच्या ऐकण्यापलीकडे गेलो होतो. जवळजवळ दोन वर्षे मी प्रचंड एकाकीपणा सहन केला, वैयक्तिक टीका सहन केली. सर्वांत दुःखाची गोष्ट म्हणजे ज्यांना मी आपले मित्र समजत होतो त्यांच्याकडून हे सर्व होत होते. एकेकाळी आपणही नाशाच्या समुद्रात गटांगळ्या खात होतो, तेव्हा कोणीतरी येऊन आपल्याला वाचवले हे ते विसरले होते.

या सर्व गोष्टी माझे मत परिवर्तन करण्यात अपयशी ठरल्या तेव्हा "भविष्यसंदेश सांगणाऱ्यांचा" जमाव आला. हे आमच्या मंडळीतील तथाकथित भविष्यसंदेश सांगणारे होते. ते गटागटाने माझ्याकडे येत आणि देवाने त्यांना मला जे सांगायला सांगितले ते सांगत असत. त्यांच्या संदेशांचे सर्वसाधारण स्वरूप असे होते : "तुम्ही जर हे थांबवणार नाही, तर आपली मंडळी फुटेल, तुम्हांला आणि तुमच्या कुटुंबाला त्रास होईल, पुढारी सोडून जातील, आर्थिक उत्पन्न घटेल, आणि देशातील आपली साक्ष डागाळेल." पण किंमत अधिक असल्यामुळे देव मला "हे करू नकोस" असे सांगत आहे असे अजिबात वाटत नव्हते. मी हे केले तर मला किती किंमत भरावी लागेल हे देव मला दाखवत होता, आणि मला ते मान्य होते, कारण या गोष्टी अगोदरच घडत होत्या. पुष्कळ जण चर्च सोडून चालले होते, परिणामी आमचे महिन्याचे उत्पन्न हजारो डॉलर्सनी कमी झाले होते. जाणाऱ्या लोकांची जागा नवीन लोक घेत होते, पण हे गरीब लोक होते. गरीब लोकांकडे केवळ द्यायला पैसे नसतात असे नाही, तर त्यांच्यापर्यंत पोहोचणे आणि त्यांना सांभाळणे फार खर्चिक असते.

स्थानिक मंडळीने आपल्या समाजापर्यंत पोहोचणे ही जगभरात अजूनही मोठी लढाई आहे असे मला वाटते. आणि हे जर खरे असेल तर मंडळी अजून गदगदा हलवली गेली नाही. पाळक या नात्याने हजारो मिळवण्यासाठी शेकडो आणि लाखो मिळवण्यासाठी हजारो गमावण्यास आपण तयार असले पाहिजे.

मला स्थानिक मंडळी आवडते. तीस वर्षांपासून मी एकाच मंडळीत आहे, त्यापैकी सव्वीस वर्षे मी पूर्ण वेळ सेवा करीत आहे. मंडळीवर माझी खूप प्रीती आहे, पण

आरामशीर, निष्क्रीय ख्रिस्ती जीवन जगत मरायला माझा विरोध आहे. जीवन पूर्ण जगायचे, पण रिकामे मरायचे असा निश्चय मी केला आहे. स्थानिक मंडळीच्या चार भिंतीत मी हे करू शकत नाही, तसेच तुम्हीही करू शकणार नाही.

येशूच्या सेवाकार्याच्या प्रारंभीच्या काळात, तो कफर्णहूम नावाच्या शहरात गेला. लोकांनी त्याच्यावर प्रेम केले; त्याचे शिकवणे आणि आजारावर व भुतांवर असलेले त्याचे सामर्थ्य पाहून ते आश्चर्यचकित झाले. त्यांची त्याच्यावर इतकी प्रीती होती की, तो शहर सोडून जाताना लोकांनी त्याला थांबवून ठेवण्याचा प्रयत्न केला असे लूक आपल्याला सांगतो (पाहा लूक.४:४२).

त्याला आपल्यामध्येच थांबवून ठेवण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला त्याने दिलेला प्रतिसाद धक्कादायक आणि सखोल होता. साधेपणामुळे धक्कादायक, आणि त्याचे प्राधान्यक्रम कोणते आणि कशामुळे त्याला चालना मिळते हे समजल्यामुळे सखोल. त्या सर्व आशीर्वादित लोकांकडे पाहून येशूने सहजपणे म्हटले, "मी आता अधिक काळ तुमच्यासोबत राहू शकत नाही, कारण इतर ठिकाणच्या दुसऱ्या लोकांकडे मला पाठवले आहे, मी त्यांच्याकडेही जाऊन त्यांना सुवार्ता सांगितली पाहिजे. तुमच्या हे लक्षात येते का? मला दुसऱ्यांना सुवार्ता सांगण्यासाठी पाठवले आहे... दुसऱ्यांना... दुसऱ्यांना!" (पाहा लूक.४:४४). हे सर्व इतरांविषयी आहे.

आपल्याला जर जखम झाली, तर केवळ आपल्यामधून केवळ आपण गळू, आपले आशीर्वाद, आपल्या सुखसोयी, आणि आपला आनंद हेच गळेल. पण देवाचे तसे नाही, त्याच्यातून इतर लोक गळतील. अर्थात याला अपवाद आहेत, पण ते फार दुर्मीळ आहेत. पिढ्यान्‌पिढ्या मंडळी कफर्णहूमच्या लोकांप्रमाणे येशूला आपल्यामध्येच ठेवायचा प्रयत्न करीत आहे, आणि पिढ्यान्‌पिढ्या येशू मंडळीला आपला आराम सोडून इतरांपर्यंत पोहोचायला शिकवायचा प्रयत्न करीत आहे. देवाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे काय आहे ते समजून घेण्यातील अपयश हे मंडळीचा दुःखी जगावर परिणाम न होण्याचे कारण आहे.

आपण इतरांसाठी आशीर्वाद व्हावे म्हणून आपल्याला आशीर्वाद देण्यात आले आहेत. इतरांचे तारण करावे म्हणून आपले तारण करण्यात आले आहे. इतरांना आरोग्य द्यावे म्हणून आपल्याला आरोग्य दिले आहे, इतरांना क्षमा करावी म्हणून क्षमा करण्यात आली आहे, आणि देवाच्या प्रीतीच्या महान क्रांतीमध्ये सहभागी व्हावे म्हणून आपल्यावर प्रीती करण्यात आली आहे. हे मी, आम्ही, आमचे, माझे याविषयी नाही. हे नेहमीच इतरांविषयी आहे.

प्रेषित पौलाने म्हटले की, देवाकडून जे सांत्वन आपल्याला मिळते, ते केवळ आपल्या एकट्याचे नाही : "आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचा देव व पिता, जो करुणाकर पिता व सर्व सांत्वनदाता देव, तो धन्यवादित असो. तो आमच्यावरील सर्व संकटात आमचे सांत्वन करतो, असे की ज्या सांत्वनाने आम्हांला स्वतः देवाकडून सांत्वन मिळते त्या सांत्वनाने आम्ही, जे कोणी कोणत्याही संकटात आहेत त्यांचे सांत्वन करण्यास समर्थ व्हावे. कारण आमच्या बाबतीत ख्रिस्ताची दुःखे जशी पुष्कळ होतात तसे ख्रिस्ताच्या द्वारे आमचे सांत्वनही पुष्कळ होते" (२ करिंथ.१:३-५).

आपले त्रास, आपली दुःखेसुद्धा केवळ आपली एकट्याची नाहीत, त्यांच्यामध्ये इतर लोकांच्या सुखाचे, आशेचे आणि प्रेरणेचे बीज आहे. माझा आशीर्वाद माझा नाही; माझ्यावरील दया माझी नाही; माझ्यावरील कृपा माझी नाही; आणि माझे जीवन माझे नाही. हे सर्व इतरांचे आहे, आणि तुम्ही आणि मीसुद्धा कधीकाळी हे इतर किंवा दुसरे होतो.

ज्यांच्यावर तुमची प्रीती आहे, आणि वीस वर्षे ज्यांच्यासाठी तुम्ही आयुष्य वेचले ते लोक चर्च सोडून जाताना पाहून खूप दुःख होते. ज्यांच्यासोबत आपण म्हातारे होऊ असे वाटले त्या लोकांपासून वेगळे होण्याचे दुःख हे बाळंतपणाच्या वेदनादेखील आहे. एखाद्या वाईट गोष्टीतून चांगले होणार हे समजून घेणे त्या वेळी कठीण असते, पण जे आपण सोडू शकत नाही, तेथेच आपण थांबतो आणि जर आपण थांबलो तर काय झाले असते ते आपल्याला कधीही समजणार नाही. पुढे जाण्यास काकू करणाऱ्या लोकांना देव पुढे ढकलत नाही. पुढे जाण्याचा निश्चय आपण केला पाहिजे. प्रत्येक दुःखात बीज असते, आणि जीवन वाचवणारी नवीन जी मंडळी आम्ही होणार होतो ते माझे बी होते.

१९९८ च्या उत्तरार्धात, मी मंडळीला मोठी चर्च इमारत बांधण्यास प्रवृत्त केले होते. अलीकच्या काळात आमच्या देशात बांधल्या गेलेल्या चर्चेसमध्ये ते सर्वांत मोठे होते. दोन हजार लोक बसू शकतील एवढे मोठे ते होते. मी जर ते बांधले तर हरवलेले लोक येतील ही खात्री मला होती म्हणून मी ते बांधले. ते लवकर आले असते तर बरे झाले असते असे मला वाटते, कारण आमची पहिली सभा त्यात घेण्यात आली तेव्हा केवळ ३०० लोक उपस्थित होते. २००० क्षमतेच्या हॉलमध्ये केवळ ३०० लोक! मोठे केविलवाणे दृश्य होते.

हा इ. स. २००० चा जानेवारी महिना होता. आपल्या वडिलांनी खोदलेल्या विहिरी इसहाकाने पुन्हा खणल्या या गोष्टीतून (पाहा उत्पत्ती २६) देवाने त्या दिवशी मला वचन

दिले. पलिष्ट्यांनी त्या विहिरी बुजवल्या होत्या म्हणून इसहाकाने पहिल्या दोन विहिरी पुन्हा खणल्या. त्याने त्यांना एसेक (कलह) आणि सितना (वैर) अशी नावे दिली. पुढे जाऊन त्याने तिसरी विहीर खणली. पण या वेळी भांडण झाले नाही, म्हणून या विहिरीला त्याने रहोबोथ म्हणजे विस्तार हे नाव दिले. तो म्हणाला, ''परमेश्वराने आमच्या भूमीचा विस्तार केला आहे. आता ह्या देशात आमची वाढ होईल.'' रविवार सकाळच्या आमच्या पहिल्या भक्तीच्या समयी २००० क्षमतेच्या चर्चमध्ये बसलेल्या ३०० लोकांकडे मी पाहिले आणि संदेश दिला की ''तीन हा आकडा उफाळून येणारा आहे.'' दोन वर्षे वैर आणि कलह यांना तोंड दिल्यावर आता आमच्या रहोबोथची वेळ आली आहे असा विश्वास मला वाटला. आता मंडळीत हजारो लोक आले आहेत, आमचा रहाबोथ खरोखर आला आहे.

जीवनाच्या अखेरच्या तासांदरम्यान, येशू पिलाताच्या दरबारात उभा होता. त्याला किंवा बरब्बाला मुक्त करण्याचा पर्याय पिलाताने लोकांसमोर ठेवला होता. सणाच्या प्रसंगी लोक विनंती करतील त्या कैद्याला सोडण्याची पद्धत होती. बरब्बा खुनी आणि बंडखोरांचा पुढारी होता. येशूवरील कोणताही आरोप सिद्ध झाला नव्हता. आतापर्यंत त्याने लोकांना केवळ मदतच केली होती. तरीदेखील लोकांनी बरब्बाला सोडा आणि येशूला वधस्तंभी खिळा अशी ओरड केली. सत्य हे आहे की, जग नेहमी बंडखोराची किंवा क्रांतीकारकाची निवड करते. शब्दकोशात बंडखोर शब्दाचा अर्थ ''सरकार किंवा राज्यकर्त्याला विरोध करणारा'' असा दिला आहे. पण क्रांतीकारक म्हणजे ''नवीन शासनव्यवस्था, राज्यव्यवस्था आणण्यासाठी सरकार उलथून टाकणारा'' असा होतो.

हे पुस्तक प्रीतीच्या बंडखोरीविषयी नाही, तर प्रीतीच्या क्रांतीविषयी आहे. आपण जगाविरुद्ध बंड करीत नाही; आपण त्यात क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपल्यासाठी पर्याय पाठवला. आमचा पुढारी येशू हा बंडखोर नाही, तर क्रांतीकारक आहे. बदल घडवून तो विजयी होतो. आज हे आपल्यासाठी आव्हान आहे. मंडळीने जगावर प्रीती करायची तर, आपण कुरुप, वर्तुळाबाहेरच्या लोकांवर टीका न करता प्रीती करण्याचे निरनिराळे मार्ग आपण शोधले पाहिजेत.

अलीकडेच अमेरिकेतील एका विमानतळावर चक्कर मारत असताना मला एक वृद्ध स्त्री दिसली. आधारासाठी तिच्या हातात काठी होती. आपले सामान ती तपासणीच्या पट्ट्यावर ठेवायचा प्रयत्न करीत होती. सुरक्षारक्षक तिच्याशी कडकपणे वागत होता, आणि ती असहाय्य असल्याचे पाहूनही तिला मदत करीत नव्हता. मी ताबडतोब तिचे

सामान उचलून फिरत्या पट्ट्यावर ठेवू लागलो. नंतर पट्ट्यावरून तिचे सामान उतरवण्यासाठी तिला मदत करावी म्हणून मी पलीकडे गेलो. तिने माझ्याकडे स्मित करून पाहिले आणि आभार मानून म्हटले, "मी तुझी फार आभारी आहे. तुझी दयाळूपणाची वागणूक त्या माणसाच्या वागणुकीची भरपाई आहे." तिचे हास्य आणि शब्द मी कधी विसरणार नाही. त्या स्त्रीच्या शब्दांतून मंडळीविषयीचे एक सत्य माझ्या मनावर ठसले. मंडळी ही दुःखी जगासाठी देवाकडून मिळालेली भरपाई आहे.

भरपाई म्हणजे नुकसान, दुःख, जखम यांमुळे होणारी हानी कमी करण्यासाठी, भरून काढण्यासाठी देणे. आपण देवाचे असे प्रभाव आहोत. समाजातील दुःखे आपण संतुलित ठेवतो. प्रीती आणि आशेचे राजदूत आणि व्यापारी म्हणून आपण या जगात हास्य आणतो. भरपाई जे घडले ते बदलत नाही, पण जे घडले त्याचा प्रभाव मात्र कमी करते. हसावे कसे हे विसरलेल्या जगासाठी प्रीतीची क्रांती ही देवाची भरपाईची मोठी योजना आहे.

भंगलेल्या जगाच्या विरोधात आणि शत्रुत्वात फोफावण्यासाठी आपला जन्म झाला आहे. मासे जसे पाण्यात सहज संचार करतात तसे विरोधी वातावरणात संचार करण्यासाठी आपली रचना करण्यात आली आहे. माशाला पाण्यातून बाहेर काढले तर तो मरतो. फूल जमिनीतून काढले तर ते मरते. चर्चला जगातून काढले तर ते मरते. माशांना कधी आपण भिजलो असे वाटत नाही, कारण पाणी त्यांचे घर आहे, पण तरीही पुष्कळ ख्रिस्ती लोकांना आपल्या वातावरणाची ॲलर्जी आहे. समुद्रकिनाऱ्यावर टॉवेलने स्वतःला कोरडे करणाऱ्या माशासारखे आपण आहोत. ही विचित्र कल्पना किंवा उदाहरण आहे हे मला माहीत आहे, पण माझा मुद्दा यामुळे अगदी स्पष्ट होतो.

पवित्र शास्त्र विरोधी वातावरणातील मंडळीचे चित्रही पुष्कळदा उभे करते. नासलेल्या जगात आपण मीठ, अंधारात प्रकाश, लांडग्यांमध्ये मेंढरे, मायदेशापासून दूर असलेले परके व उपरे असे आपले वर्णन केले आहे. विरोधी, शत्रुत्वाच्या वातावरणात आपली जोमाने वाढ व्हावी या रीतीने आपली रचना करण्यात आली आहे. आपण मंडळी आहोत, नरकाच्या विषाने प्रदूषित झालेल्या जगात भरभराट होणारा स्वर्गाचा भाग आहोत. प्रीतीची क्रांती सुरू करणारी देवाची क्रांतीसेना आपण आहोत. तुमच्यामध्ये आणि माझ्यामध्ये आजच ही क्रांती सुरू होण्याची गरज आहे.

प्रकरण

9

आपण मोलवान आहोत असे लोकांना वाटू द्या

तर मग शांतीला व परस्परांच्या बुद्धीला पोषक होणआऱ्या
गोष्टींच्या मागे आपण लागावे.
रोम. १४:१९

प्रीतीच्या क्रांतीला चालना देणारा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे इतर लोकांना ते मोलवान आहेत याची जाणीव करून देणे. मदर तेरेसा यांनी म्हटले, ''कोणालाही नकोसे वाटणे, कोणाचीही आपल्यावर प्रीती नसणे, कोणाला आपली फिकीर नसणे, सर्वजणांनी आपल्याला विसरून जाणे ही फार मोठी पोकळी, खायला काहीही नसण्यापेक्षा मोठी गरीबी आहे असे मला वाटते.'' रोज ज्या व्यक्ती आपल्याला भेटतात, किंवा ज्यांच्या संपर्कात आपण येतो, त्यांना देवाची मुले या नात्याने आपण किती मोलवान आहोत याची जाणीव नसते हे माझ्या लक्षात आले आहे. आपण कुचकामी, निरुपयोगी आहोत असे लोकांना वाटावे म्हणून सैतान फार नेटाने काम करीत असतो, पण लोकांची उभारणी करून, त्यांना उत्तेजन देऊन, सद्‌बोध करून आपण सैतानाचा हा प्रभाव नाहीसा करू शकतो. मनापासून, मोकळेपणाने कौतुक करणे हा एक त्याचा मार्ग आहे. कौतुक करणे, शाबासकी देणे ही जगातील सर्वांत मोलवान देणगी आहे.

प्रीतीच्या क्रांतीला चालना देणारा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे इतर लोकांना ते मोलवान आहेत याची जाणीव करून देणे.

पुष्कळ लोकांना स्वतःची इतरांबरोबर तुलना करायची सवय असते. असे करताना त्यांना स्वतःच्या क्षमतांची, गुणवत्तांची जाणीव होत नाही. आपण स्वतः मोलवान आहोत ही भावना इतर लोकांच्या ठायी निर्माण करणे खर्चिक नाही, तसेच त्याला फार वेळही लागत नाही. दुसऱ्या लोकांवर लक्ष केंद्रित करून त्यांना काहीतरी उत्तेजनपर बोलण्यासारखे सापडेपर्यंत आपल्या स्वतःवरील लक्ष कमी करणे, एवढेच फक्त त्यासाठी करावे लागते. लोकांना मोलवान वाटू देण्यासाठी काही पैसे खर्च करावे लागत नाहीत, पण पैशाने विकत घेता येत नाही असे काहीतरी त्यामुळे त्यांना मिळते. प्रामाणिकपणे कौतुक करणे, शाबासकी देणे ही किरकोळ बाब वाटते, पण त्यामध्ये प्रचंड सामर्थ्य आहे.

आपल्यासमोर उद्दिष्टे ठेवणे यावर माझा विश्वास आहे. इतरांना उत्तेजन देण्याची सवय अंगी बाणवण्यासाठी मी देवासोबत काम करीत होते तेव्हा दिवसातून किमान तीन लोकांना उत्तेजन देण्याचे, कौतुक करण्याचे आव्हान मी स्वतःसमोर ठेवले. आक्रमक प्रोत्साहन देणारे होण्यासाठी तुम्हीदेखील असे एखादे उद्दीष्ट तुमच्यासमोर ठेवावे असे आवाहन मी तुम्हांला करते.

विसर पडलेल्यांना विसरू नका

पुष्कळदा लोकांना आपण एकाकी आहोत, सर्वजण आपल्याला विसरून गेले आहेत असे वाटते. आपण इतके कष्ट करतो, इतकी मेहनत घेतो; पण कोणालाही आपली आठवण होत नाही, कोणालाही आपली काळजी नाही असे त्यांना वाटते. एका स्त्रीने मला तिचा अनुभव सांगितला. आतापर्यंतच्या आयुष्यात आपण जणू काही अदृश्य आहोत असे तिला वाटायचे. तिच्या आईवडिलांनी देखील तिच्याकडे कसे दुर्लक्ष केले हे सांगताना तिच्या चेहऱ्यावर दाटलेले दुःखाचे भाव माझ्या नजरेतून निसटले नाहीत. आपण खूप एकाकी आहोत, सगळ्यांनी आपल्याला टाकून दिले आहे असे तिला वाटू लागले. तिचा जन्म झाला तेव्हा तिचे आईवडील तरुण होते; बाळाची काळजी घेण्यासाठी त्यांची मानसिक तयारी झाली नव्हती, तसेच ते फार स्वार्थी होते. त्यांनी तिच्यावर प्रेम केले नाही किंवा तिला भावनिक आधार दिला नाही. तिचे बहुतेक सर्व बालपण आणि किशोरपण तिने आपल्या खोलीत वाचन करण्यात घालवले.

या स्त्रीने केलेले आपल्या बालपणाचे वर्णन, आणि आपण अदृश्य आहोत ही भावना खूप दुःखद होती. त्यामुळे मलाही असा प्रश्न पडला की माझे उद्दीष्ट साध्य करण्याच्या नादात किती लोकांकडे दुर्लक्ष करून त्यांना असे अदृश्य वाटू दिले असेल? मी दृढनिश्चयी व्यक्ती आहे, जीवनात एखादे ध्येय समोर ठेवले की ते साध्य करायचेच हा माझा निश्चय असतो. मी पुष्कळ काही साध्य करते, पण असे करीत असताना इतर लोकांना दुखवू नये हे मला शिकावे लागले. इतर समर्पित लोकांच्या सहकार्याशिवाय कोणीही यशस्वी होऊ शकत नाही, आणि त्याबद्दल त्यांचे योग्य ते कौतुक न करणे, त्यांचा उल्लेख न करणे ही भयंकर शोकांतिका आहे, आणि देवाला न आवडणारी वागणूक आहे.

साध्या गोष्टी महान होऊ शकतात

अनाथ, विधवा, जाचलेले, परदेशीय यांच्या बाबतीत असलेल्या आपल्या जबाबदारीविषयी पवित्र शास्त्र नेहमी बोलते. ज्यांना एकाकी वाटते, आपल्याकडे दुर्लक्ष केले जाते असे वाटते, आपल्याला सर्वजण विसरले आहेत असे वाटते, आपली काही किंमतच नाही असे वाटते अशांचा उल्लेख तो करतो. जाचलेल्या, त्रासलेल्या, भुकेल्या लोकांची त्याला काळजी आहे. लोकांची भूक अनेक प्रकारची असते. त्यांच्याकडे खायला भरपूर अन्न असेल, पण आपण मोलवान आहोत असे वाटण्यासाठी एखादा उत्तेजनपर शब्द ऐकायची भूक त्यांना लागली असेल. दुःखाने पीडलेल्या, खचलेल्या लोकांस देव वर उचलतो, तो उपऱ्यांचे संरक्षण करतो, अनाथ व विधवा यांची दाद घेतो (पाहा स्तोत्र.१४६ः७-९). तो हे कसे करतो? तो हे लोकांच्या द्वारे करतो! आपण मोलवान आहोत हे इतरांना जाणवू देण्यासाठी जगणारे समर्पित लोक त्याला हवे आहेत. तुच्छ, टाकलेल्या लोकांना आपण मोलवान आहोत, प्रिय आहोत असे वाटू देण्यासाठी मदर तेरेसा यांनी आपले जीवन वेचले. तिने साध्या साध्या, छोट्या गोष्टी केल्या पण त्या महान होत्या. त्यांनी म्हटले, "प्रीती ही खरी प्रीती होण्यासाठी महान असण्याची गरज नाही. आपण फक्त न थकता प्रीती केली पाहिजे."

आपल्याला दत्तक घेतले आहे

स्तोत्र.२७ः१० या वचनाने मला खूप उत्तेजन मिळालेः "माझ्या आईबापांनी मला सोडले तरी परमेश्वर मला जवळ करील."

माझ्या आईला माझ्या वडिलांची खूप भीती वाटत असे, म्हणून ते माझ्यावर करीत असलेल्या अत्याचारापासून ती मला सोडवू शकली नाही. मला फार एकाकी, टाकून दिलेली, विस्मरणात गेलेली आहे असे वाटायचे. सरतेशेवटी, कोणीही मला मदत करणार नाही हे लक्षात येऊन परिस्थितीपासून सुटका होईपर्यंत तिला धैर्याने तोंड देण्याचा निर्धार केला. कोणीतरी येऊन आपली सुटका करीपर्यंत तग धरून राहण्याचा प्रयत्न करणारे असंख्य लोक दिवसभरात आपल्या संपर्कात येत असतात - आणि ते कोणीतरी तुम्ही किंवा मी असू शकतो.

पवित्र शास्त्र सांगते की, देव प्रीती आहे. ''त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले'' (इफिस.१:४). त्याची स्वतःची मुले म्हणून आपल्याला दत्तक घेण्याची योजना त्याने त्याच्या प्रीतीनुरुप आखली. या सुंदर शब्दांनी माझ्या जखमी हृदयाला आरोग्य मिळाले. एकाकी, सोडून दिलेल्या लोकांना देव उचलून घेतो आणि त्यांना मोल देतो. तो त्याच्या वचनाद्वारे, त्याच्या पवित्र आत्म्याद्वारे आणि इतरांना मदत करण्यासाठी जगणाऱ्या आत्म्याने भरलेल्या लोकांद्वारे कार्य करतो.

आपल्याला भेटणारी प्रत्येक व्यक्ती ही रूपांतर केलेला येशू आहे असे मदर तेरेसा समजत असत. त्या ज्या नजरेने लोकांकडे पाहत त्या नजरेने आपण जर पाहिले तर किती वेगळ्या प्रकारे त्यांच्याशी वागू याची जरा कल्पना करा. येशूने म्हटले की, लोकांना - ''कनिष्ठालाही'' - तुम्ही जे चांगले किंवा वाईट करता ते मला करता (पाहा मत्तय.२५:४५). दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे आमची वागणूक तो स्वतःला लावून घेतो. जर कोणी माझ्या एखाद्या मुलाचा अपमान केला, त्याला तुच्छ लेखले, त्याच्याकडे दुर्लक्ष केले तर तो मी माझा वैयक्तिक अपमान समजेन, मग देवालादेखील तसेच वाटते हे समजून घेणे आपल्याला इतके कठीण का जावे? चला, आपण सर्वजण लोकांची बांधणी, उभारणी करण्यासाठी झटू या, आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला बरे वाटण्यासाठी, त्यांच्या नजरेत त्यांचे स्वतःचे मोल वाढवण्यासाठी झटू या.

स्मित करून सुरुवात करा

स्मित ही प्रीतीची सुरुवात आहे. स्वीकार आणि मान्यता याचे ते दर्शक आहे. प्रत्येकाकडे पाहून स्मित करायला आपण शिकले पाहिजे. आपण असे करतो तेव्हा केवळ त्यांना आनंद होतो असे नाही, तर आपल्यालाही बरे वाटते, आनंद होतो.

मी पुष्कळदा विचारांत गढलेली असते, त्यामुळे मी पुष्कळदा गंभीर किंवा रागात असल्यासारखी दिसू शकते. तसेच माझ्यावर पुष्कळ जबाबदाऱ्या आहेत. मी काळजी घेतली नाही तर खिन्न, उदास, गंभीर असल्यासारखी दिसेन. लोकांकडे पाहून स्मित करायला, ते कसे आहेत ते विचारायला आणि त्यांच्याशी आपुलकीने बोलण्यासारखे काहीतरी शोधण्यास शिकत आहे. लोकांशी मित्रत्वाने वागण्यासाठी आपल्याकडे वेळ नसेल तर आपले संतुलन बिघडले आहे आणि नातेसंबंधाच्या दुर्घटनेकडे आपली वाटचाल होत आहे. नातेसंबंध हे जीवनाचा मोठा आणि अविभाज्य भाग आहेत. पवित्र शास्त्र हे वास्तविक नातेसंबंधाविषयीचे पुस्तक आहे हे माझ्या लक्षात आले आहे. देवासोबत, आपल्या स्वतःसोबत आणि इतरांसोबतचा आपला नातेसंबंध याविषयी ते बोलते.

केवळ एक स्मित आणि मित्रत्वाने केलेले स्वागत यामुळे व्यक्ती किती मोकळी होते हे पाहणे आश्चर्यकारक आहे. जेथे जाऊ तेथे आपण या दोन गोष्टी लोकांना देऊ शकतो. कदाचित तुम्ही विचार करीत असाल की, *हे माझ्यासाठी नाही. मी अंतर्मुख व्यक्ती आहे, मला एकटे राहायला, स्वतःमध्ये रममाण व्हायला आवडते. लोकांमध्ये, विशेषतः ज्यांना मी ओळखत नाही त्यांच्यामध्ये मिसळायला मला आवडत नाही.* उत्तेजन देणे, सद्‌बोध करणे, सुधारणूक आणि लोकांना मोलवान वाटू देणे याविषयी पवित्र शास्त्र काय सांगते हे समजून घेईपर्यंत मीही अशीच होते. या गोष्टी मी सहजपणे करू शकत नसले, तरी त्या मला शिकता येणार नाहीत असा याचा अर्थ होत नाही.

"मला एकटे राहायला आवडते" असे म्हणून मी अनेक वर्षे मित्रत्वाने वागण्यासंबंधी सबब सांगत राहिले, पण एकटे राहणे हे दान आहे असे पवित्र शास्त्रात कोठेही सांगितले नाही हे मला समजले. स्वतःला एकटे समजणे ही स्वतःला कमीपणासून, अपमानापासून दूर ठेवण्याची केवळ एक सबब आहे. आपण जर लोकांकडे पाहून स्मित केले आणि त्यांनी उलट स्मित केले नाही तर आपल्याला कसे वाटेल? असा विचार आपण करतो. आपल्याकडे दुर्लक्ष केले असे मला वाटेल. आपल्यापैकी पुष्कळजण चांगले, निरोगी नातंसंबंध वाढवण्यापेक्षा हे दुर्लक्ष टाळण्याचा प्रयत्न करण्यात वेळ घालवतात. दवाखान्यात किंवा इतरत्र मी एखाद्या व्यक्तीशी मित्रत्वाने बोलण्याचा प्रयत्न केला आणि त्याला किंवा तिला ते आवडले नाही तर काय? माझी स्थिती मोठी अवघड होईल. आपण लोकांच्या थट्टेचा विषय झालो असे होईल, त्यापेक्षा आपण आपल्या कोशात शांत राहिलेलेच बरे. असे घडते तेव्हा स्मित करून किंवा एखादा मित्रत्वाचा शब्द बोलून एखाद्या व्यक्तीला देवाचा स्पर्श करण्याची संधी आपण गमावू. आपण स्मित करू तेव्हा दुसऱ्या कोणालातरी आपण स्मित करण्यास प्रवृत्त करू, आणि आपण देऊ शकत असलेली हे सर्वांत मोठे बक्षीस आहे.

प्रीतीच्या क्रांतीचा भाग होण्यासाठी प्रयत्न आणि सरावाची गरज आहे. ती आपल्याला आपले काही मार्ग बदलायला सांगेल आणि देवाने त्याचे मार्ग आपल्याला दाखवावेत म्हणून विनंती करायला सांगेल. लोकांनी आपल्याकडे दुर्लक्ष केले असे वाटू नये, किंवा कामात फार व्यस्त असल्यामुळे येशूने लोकांकडे दुर्लक्ष केले, त्यांच्याशी मित्रत्वाने वागला नाही, त्यांच्याकडे पाहून स्मित केले नाही अशी कल्पना तरी तुम्ही करू शकता का? येशू असे कधीच वागणार नाही हे आपल्याला माहीत आहे आणि आपणही तसेच करण्याचा निर्धार केला पाहिजे. अधिक स्मित करायची सुरुवात करा. एकटे असतानादेखील तुम्ही स्मित करू शकता, त्यामुळे तुम्हांला अधिक हलके आणि आनंदित वाटेल. पौलाने ज्यांच्यामध्ये सेवा केली त्यांना त्याने पवित्र चुंबनाने एकमेकांचे स्वागत करा असे सांगितले (पाहा रोम.१६:१६). ही त्या काळची प्रथा होती. मी तुम्हांला केवळ स्मित करायला सांगत आहे.

ते सहजपणे होत नसले तरी चिंता करू नका

या प्रकरणाच्या शेवटी तुम्हांला जॉन मॅक्सवेल यांचा लेख वाचायला मिळेल. ते एक आंतरराष्ट्रीय किर्तीचे वक्ते असून नेतृत्वाविषयी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. ते आमचे मित्र आहेत. जॉनच्या सहवासात आल्यावर काही मिनिटातच प्रत्येकाला आपण फार महत्त्वाचे, फार मोलवान आहोत असे वाटू लागते. त्यांच्याशी मी या विषयाविषयी चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले की माझ्या वडिलांचा माझ्यावर असाच परिणाम होत असे. वाढत्या वयात जॉनपुढे केवळ चांगले उदाहरण होते एवढेच नाही, तर उत्तेजन देण्याचे दान (कला, कौशल्य) देवाने त्याला दिले होते.

पवित्र शास्त्र उत्तेजनाच्या दानाविषयी बोलते (पाहा रोम.१२:८) ज्यांना हे दान दिले आहे त्यांनी ते आस्थेने, उत्सुकतेने, आस्थेने स्वीकारावे असे म्हटले आहे. मला जसे चांगले बोलण्याचे दान आहे, त्यामुळे विशेष प्रयास न करता मी प्रभावीपणे बोलू शकते; तसे काही लोकांना उत्तेजन देण्याचे दान आहे. ते लोकांना सहजपणे उत्तेजन देतात. लोकांना उत्तेजन देणे हे त्यांच्यासाठी स्वाभाविक आहे. उत्तेजन देण्याच्या दानाला काहीजण कमी लेखतील, पण आज जगात या दानाची सर्वाधिक गरज आहे असे मला वाटते.

असले लोक आपल्यासभोवती असल्यावर फार बरे वाटते. पण मी पुन्हा एकदा तुम्हांला सांगते की, लोकांना उत्तेजन देणे तुम्हांला सहजासहजी जमत नसले तर निराश होऊ नका. मला देण्याची आवड आहे आणि लहानपणी मी एखाद्या व्यक्तीला आनंद

व्हावा म्हणून त्याला/तिला बक्षीस द्यायच्या योजना बनवत असे. देण्याचे आत्मिक दान प्रत्येकालाच असेल असे नाही (याही दानाचा उल्लेख रोम १२ मध्ये उत्तेजनाच्या दानासोबत केला आहे), पण प्रत्येकाला द्यायला आणि विशेष उद्देशाने द्यायला सांगितले आहे.

हसा

हसण्याचा आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर किती परिणाम होतो हे आपल्यापैकी बहुतेकांनी ऐकले आहे. स्मित करणे हे हास्याचे दार आहे, आणि हसण्याची आपल्याला नियमित गरज आहे.

पवित्र शास्त्र सांगते की आनंदी हृदय हे औषधासारखा परिणाम करते (पाहा नीती.१७:२२). शिकवण्याच्या माझ्या सेवाकार्याचा विचार करीत असताना एक विशेष गोष्ट माझ्या लक्षात आली. ती म्हणजे शिकवत असताना मी फार विनोद करते. याला मी विशेष बाब म्हणते, कारण माझ्या वास्तविक जीवनात मी विनोदी नाही, तर गंभीर आहे. पण पवित्र आत्मा माझ्याद्वारे बोलतो आणि हसण्यामुळे मिळणाऱ्या आरोग्यदायी परिणामांची त्याला कल्पना आहे हे माझ्या लक्षात आले आहे.

आम्ही हसावे आणि इतर लोकांना हसवावे ही देवाची इच्छा आहे. याचा अर्थ असा नाही की आपण सर्वजणांनी जोकर झाले पाहिजे, किंवा चुकीच्या वेळी हसले पाहिजे. पण जीवनाकडे हसतमुखाने पाहण्यासाठी आपण निश्चितच एकमेकांना मदत करू शकतो. स्वतःकडे गंभीरपणे पाहण्याऐवजी आपण स्वतःची थट्टा करायला, स्वतःकडे पाहून हसायला शिकलो तर फार बरे होईल.

अलीकडे तीनदा मी पांढरी पॅन्ट घातली आणि तीनही वेळा माझ्याकडून तिच्यावर कॉफी सांडली. त्याबद्दल मी एकतर स्वतःलाच दोष देऊ शकेन किंवा स्वतःचीच खिल्ली उडवून पुढच्या वेळी अधिक काळजी घ्यायचा निश्चय करीन. केलेल्या चुकीबद्दल लोकांना स्वतःला दोष देताना मी मी ऐकते. त्यांच्या या कृतीमुळे देवाला दुःख होते यात काही शंका नाही. ख्रिस्तामध्ये आपण किती मोलवान आहोत हे जर आपल्याला माहीत असेल तर देवाने जे निर्माण केले आहे त्याचे मोल आपण कमी करणार नाही.

आपल्या सर्वांकडूनच मूर्खपणाच्या चुका होतात, त्यामुळे हसायचे की रडायचे, अस्वस्थ व्हायचे यांपैकी एक पर्याय आपण निवडू शकतो हे लोकांना समजण्यासाठी मदत करण्याची सवय आपण स्वतःला लावून घेऊ. लोकांना परिपूर्ण न होण्याची

सवलत द्या! सर्वोत्कृष्ट करण्याचा दबाव जगात सर्वांवर आहे. आपण तसे करू शकलो नाही, तरीदेखील आपण मोलवान आहोत, स्वीकारणीय आहोत हे समजण्यासाठी उत्तेजनाचे शब्द आपल्याला हवे असतात.

माझ्या दोन्ही मुली चांगल्या, समर्पित माता आहेत. आपल्याकडून काहीतरी चुकले असे त्यांना वाटते तेव्हा तुम्ही फार चांगल्या माता आहात आणि ते किती महत्त्वाचे आहे याची आठवण मी त्यांना करून देते. लोक जे काही चांगले करतात ते आपण गृहीत धरू नये. आपण अपयशी आहोत, कुचकामी आहोत, असे लोकांना वाटावे म्हणून सैतान न थकता प्रयत्न करतो. त्याउलट तुम्ही यशस्वी आहात असे लोकांना वाटावे म्हणून आपण तितक्याच नेटाने प्रयत्न केले पाहिजेत.

वाईट परिस्थितीचे चांगल्या वातावरणात झपाट्याने रूपांतर हास्याखेरीज दुसऱ्या कशाने होत नाही. आपल्यातील "लहान मुलाला" आपण फार लवकर गुदमरवून टाकतो. एखादी वस्तू खाली पडली, कपडे खराब झाल्यामुळे, पडल्यामुळे किंवा चूक झाल्यामुळे मुले अस्वस्थ होत नाहीत. मोठी माणसे परवानगी देईपर्यंत ते त्याही परिस्थितीत हसण्याचा आणि मजा करण्याचा मार्ग शोधतात. येशूने म्हटले की, जोपर्यंत आपण मुलांसारखे होत नाही, तोपर्यंत देवाच्या अद्‌भुत अभिवचनांत आपण प्रवेश करू शकत नाही (पाहा लूक.१८:१७). म्हणून या बाबतीत आपण एकमेकांनी मदत करावी असे मी आग्रहाने सांगते.

मी परिपूर्ण असावे म्हणून जे लोक माझ्यावर दबाव टाकीत नाहीत, त्यांच्या संगतीत राहायला मला आवडते. देव आमच्यावर विनाअट प्रीती करतो. याचा अर्थ असा की, आम्ही जसे आहोत तसा तो आमचा स्वीकार करतो आणि मग आपण जसे असावे तसे होण्यास आपल्याला मदत करतो. हास्य किंवा स्मित हे स्वीकाराचे चिन्ह आहे. लोकांना स्वतःकडे पाहून हसण्यास शिकायला मदत करणे म्हणजे "तुझ्या सर्व गुणदोषासह मी तुझा स्वीकार करतो" असे म्हणणे.

एकमेकांच्या उणिवा, दुर्बलता समजून घेणे हे प्रीती दाखवण्याचा एक साधासुधा मार्ग आहे. इतरांना उत्तेजन देऊन त्यांची उभारणी करा असे पौलाने लोकांना शिकवले आणि तसे करण्याचे त्यांना वरचेवर स्मरण दिले. "म्हणून तुम्ही एकमेकांचे सांत्वन करा व एकमेकांची उन्नती करा; असे तुम्ही करतच आहा" (१ थेस्सल.५:११). पवित्र आत्मा स्वतः आमच्यामध्ये राहतो, तो आमच्याबरोबर चालतो, आमचे सांत्वन करतो, आम्हांला उत्तेजन देतो, आणि आमची उन्नती करतो. आम्ही जसे असायला हवे तसे होण्यास तो आम्हांला उत्तेजन देतो. आपण चुका करतो तेव्हा तो आपल्याला दोष देत नाही; तर तो आपल्याला पुढे जाण्यास प्रोत्साहन देतो.

उत्तेजनाच्या अभावी निराशा, हताशा, अपयश, घटस्फोट येतात. लोक जीवनात जे साध्य करू शकतात त्यापासून उत्तेजनाचा अभाव त्यांना रोखून धरतो. आपणा सर्वांना उत्तेजनाची गरज आहे. उत्तेजन देणे हा आपल्या समजात प्रीतीच्या क्रांतीला बळ देण्याचा साधासुधा मार्ग आहे हा मुद्दा मला पुन्हा एकदा ठासून सांगू द्या.

सकारात्मकतेवर जोर द्या

माझ्या नवऱ्याकडून झालेल्या लहान लहान चुकांची त्याला आठवण न करून देणे हा त्याच्यावर प्रीती करण्याचा एक मार्ग आहे हे देव मला दाखवू लागला. एकमेकांना चिडीला आणणाऱ्या शेकडो किरकोळ गोष्टी आपण करू शकतो, पण आपण त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे आणि लोकांनादेखील आपल्याला त्यांचे स्मरण करू देऊ नये.

जर तुम्हांला एखाद्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावायचा असेल तर तुम्ही तसे करू शकता, पण किरकोळ गोष्टींना अवास्तव महत्त्व दिल्याने बहुतेक नातेसंबंध तुटले आहेत हे लक्षात घ्या. केलेल्या चुकीची वारंवार आठवण करून दिल्यामुळे लोक दुःखी होतात. ज्या गोष्टींमुळे मला त्रास होतो त्या गोष्टी माझ्यासमोर लोकांनी करू नये म्हणून मी त्या सतत सांगत राहिले, पण त्यामुळे त्यांच्यावर अधिकच दबाव येऊन माझ्या सान्निध्यात ते अवघडल्यासारखे होतात हे माझ्या लक्षात आले. प्रार्थना आणि सकारात्मकतेवर जोर देणे अधिक प्रभावी आहे हे मला समजले.

लोकांची बलस्थाने आणि त्यांनी केलेल्या चांगल्या गोष्टींची आपण दखल घेतो, त्यांना महत्त्व देतो तेव्हा आपल्या दुर्बलतांवर आणि दोषांवर मात करण्याचा प्रयत्न करण्याची प्रेरणा त्यांना मिळते. मला न आवडणाऱ्या गोष्टींचा उल्लेख न करणे, त्या विसरून जाणे याचा प्रयत्न करताना प्रारंभी हे किती मोठे आव्हान आहे हे पाहून मी आश्चर्यचकित झाले. पण आता माझ्या लक्षात आले आहे की, छोट्या गोष्टींमुळे माझे वैतागून जाणे हीच खरी मोठी समस्या होती.

अलीकडचीच गोष्ट! मी व्यवस्थित केलेल्या बिछान्यावर बसून डेव्हने तो विस्कटला, आणि नीट न करता बाहेर चालला म्हणून मी त्याला रागावले. आश्चर्यचकित होऊन त्याने माझ्याकडे पाहिले, आणि तो बसला नव्हता तर मीच बसले होते हे त्याने माझ्या लक्षात आणून दिले. डेव्हच दोषी आहे याची मला इतकी खात्री होती की, वास्तविक मीच दोषी होते हे मी पार विसरले होते. दोष दाखवणारा आत्मा कधी कधी आपले डोळे आपल्याच दोषांकडे कसे आंधळे करतो आणि इतरांना दोष देण्यास प्रवृत्त करतो हे या उदाहरणावरून आपल्या लक्षात येईल.

लोकांमधील सकारात्मक बाबींवर भर देऊन प्रीती दाखवा. त्यांच्यातील नकारात्मक गोष्टी शोधण्याचा प्रयत्न करण्याची गरज नाही, तर त्यांच्यातील सकारात्मक बाबी शोधण्याची गरज आहे!

सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे दिवसातून किमान तीन लोकांचे कौतुक करण्याचे, त्यांना उत्तेजन देण्याचे ध्येय समोर ठेवून सुरुवात करा. दिवसाच्या अखेरीस आपण कोणाकोणाला उत्तेजन दिले याचा आढावा घ्या. तुम्ही सहजपणे तिघांचे स्मित करून स्वागत करू लागल्यावर तुमचे उद्दीष्ट सहा, मग दहा असे वाढवत न्या.

तुम्ही फार मोठे कौतुक केले पाहिजे असे नाही. ''हा रंग तुला खुलून दिसतो'', ''तुमची केसांची स्टाईल मला आवडली'', ''तुमचा शर्ट खूप चांगला आहे'', ''तुम्ही फार कष्ट करता'', ''तुम्ही माझे मित्र आहात म्हणून मला आनंद वाटतो,'' इ. सारख्या साध्यासुध्या शब्दांनी तुम्ही तारीफ करू शकता. हे शब्द प्रभावी आणि अर्थपूर्ण असतात. तुम्ही सकारात्मक गोष्टींना प्रोत्साहन दिल्यावर तुम्हांला आनंद होईल. म्हणून तुम्ही केवळ देत नाही, तर त्याच वेळी तुम्हांलाही मिळते.

क्रांतीकारी प्रीती

जॉन सी. मॅक्सवेल

उत्तेजनामुळे सर्व काही बदलते

उत्तेजन अवर्णनीय आहे. त्याचा परिणाम फार मोठा, चमत्कारासारखा होता. शिक्षकाकडून मिळालेल्या उत्तेजनामुळे मुलाचे जीवन बदलू शकते. जीवनसाथीदाराकडून मिळालेल्या उत्तेजनामुळे लग्न वाचू शकते. पुढाऱ्याकडून मिळालेल्या उत्तेजनामुळे व्यक्ती प्रगती करू शकते. झिग झिग्लर म्हणतात, "कोणत्या क्षणी आणि प्रामाणिकपणे उच्चारलेल्या कोणत्या शब्दांमुळे जीवनावर परिणाम होऊ शकतो हे तुमच्या कधी लक्षात येणार नाही." लोकांना उत्तेजन देणे म्हणजे, दिवसाचा सामना करण्यासाठी, योग्य ते करण्यासाठी, जोखीम उचलण्यासाठी, बदल घडवण्यासाठी त्यांच्याकडे नसलेले धैर्य मिळवण्यास त्यांना मदत करणे. व्यक्तीला त्याचे स्वतःचे मोल पटवून देणे हा उत्तेजनाचा आत्मा आहे. आपण लायक, पात्र आहोत असे वाटण्यास आपण लोकांना मदत करतो तेव्हा त्यांची जीवन सर्वकाळासाठी बदलून गेल्याचे आपल्याला सर्वसाधारणपणे पाहायला मिळते. आणि कधी कधी तर ते जग बदलून टाकतात.

तुम्ही पालक असाल तर तुमच्या कुटुंबातील सदस्यांना उत्तेजन देणे हे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही संस्थेचे पुढारी असाल तर तुमच्या सहकाऱ्यांना तुम्ही ज्या प्रमाणात उत्तेजन द्याल त्या प्रमाणात त्यांची कार्यक्षमता वाढेल. कोणी कठीण परिस्थितीतून जात असेल तर एक मित्र या नात्याने त्याला तुम्ही उत्तेजनाचे सांत्वनपर शब्द बोलू शकता. ख्रिस्ती या नात्याने इतरांवर प्रीती करून आणि त्यांच्याशी उत्तेजनपर शब्द बोलून तुम्ही येशूचे प्रतिनिधित्व करू शकता.

क्लबमध्ये सहभागी व्हा

उत्तेजनाचे सामर्थ्य कमी कधी लेखू नका. डॉक्टर, समुपदेशक, मानसशास्त्रज्ञ असलेल्या जॉर्ज डब्ल्यू. क्रेन यांनी १९२० साली शिकागोमधील नॉर्थवेस्टर्न विद्यापीठात सामाजिक मानसशास्त्र शिकवायला सुरुवात केली. शिकवणे त्यांच्यासाठी नवीन होते, तरी ते मानवी स्वभावाचे गाढे अभ्यासक होते. आपल्या विद्यार्थ्यांना मानसशास्त्र व्यावहारिकरित्या शिकवण्यावर त्यांचा भर होता.

त्यांनी शिकवलेल्या वर्गांपैकी एक वर्ग संध्याकाळी भरत असे. त्या वर्गातील विद्यार्थी वयाने बऱ्यापैकी मोठे होते. ही तरुण मुलेमुली दिवसा शिकागोमधील डिपार्टमेन्ट स्टोअर्स ऑफिसेस आणि कारखान्यांमध्ये काम करीत असत आणि रात्री शिकून स्वतःमध्ये सुधारणा घडवण्याचा, दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करीत.

लोईस नावाची एक तरुणी विस्कॉन्सिन या छोट्या शहरातून नोकरीसाठी शिकागोला आली होती. एके संध्याकाळी वर्ग संपल्यावर, लोईस नावाच्या तरुणीने क्रेन यांना सांगितले की मला एकाकी, बाजूला फेकून दिल्यासारखे वाटते.

"ऑफिसातील काही मुली सोडल्या तर शहरात मी कोणाला ओळखत नाही, रात्री खोलीवर गेल्यावर मी घरी पत्रे लिहिते. विस्कॉन्सिनमधील माझ्या मित्रमैत्रिणींकडून मला पत्रे मिळतील याच आशेवर माझे दिवस ढकलले जातात."

लाईसची समस्या ऐकल्यावर क्रेन यांना कॉम्प्लीमेन्ट क्लब (प्रशंसा क्लब) सुरू करण्याची प्रेरणा झाली. वर्गात त्यांनी तशी सूचना दिली. आपल्या विद्यार्थ्यांना ते नंतर जी अनेक प्रॅक्टीकल असाईनमेन्ट्स देणार होते, त्यांपैकी ही एक होती.

"तुमच्या घरी, किंवा तुमच्या कामाच्या ठिकाणी किंवा बसमध्ये, गाड्यांमध्ये तुम्ही रोज मानसशास्त्राचा उपयोग केला पाहिजे," क्रेन यांनी त्यांना सांगितले, "काम्प्लीमेन्ट क्लब ही तुमच्या पहिल्या महिन्याची लेखी असाईनमेन्ट आहे. रोज तीन व्यक्तींची तुम्ही प्रामाणिकपणे प्रशंसा करायची आहे. तुमची इच्छा असेल तर तुम्ही हा आकडा वाढवू शकता. पण मार्क्स मिळवण्यासाठी तुम्ही तीस दिवस रोज किमान तीन व्यक्तींची प्रशंसा केली पाहिजे... तीस दिवस झाल्यानंतर तुमच्या अनुभवावर आधारित तुम्ही प्रबंध लिहायचा आहे. तुमच्या भोवतालच्या लोकांमध्ये, तसेच जीवनाकडे पाहण्याच्या तुमच्या स्वतःच्या दृष्टीकोनात झालेला बदल यांचा समावेश त्यात करा."

क्रेनच्या काही विद्यार्थ्यांनी या कल्पनेला विरोध केला. काही विद्यार्थ्यांनी कुरकूर केली की काय म्हणावे ते आम्हांला सुचणार किंवा समजणार नाही. तर काहीजणांना नाकारले जाण्याची भीती होती. तर काहीजणांना वाटले की, आपल्याला जे आवडत नाहीत, त्यांची प्रशंसा करणे योग्य नाही. एकजणाने विचारले, "तुम्हांला न आवडणारी व्यक्ती जर समोर आली, तर आपल्या शत्रूची स्तुती करणे अप्रामाणिकपणाचे ठरणार नाही का?"

"नाही, तुम्ही तुमच्या शत्रूची तारीफ करता तेव्हा तो अप्रमाणिकपणा नसतो," क्रेन यांनी उत्तर दिले, "कारण प्रशंसा ही योग्य, लायक गोष्टींसाठी केलेली स्तुती असते. चांगले सद्‌गुण, किंवा गोष्टी नसलेली एकही व्यक्ती नसते हे तुमच्या लक्षात येईल...

तुमच्या स्तुतीमुळे एखाद्या निराश, हताश व्यक्तीचे नीतीधैर्य उंचावेल. कोणत्या निर्णायक क्षणी तुम्ही एखाद्या मुलाची, मुलीची, पुरुषाची, स्त्रीची प्रशंसा कराल आणि त्यांच्यात बदल होईल हे तुम्ही सांगू शकत नाही.''

आपल्या प्रशंसांचा आपल्या भोवतालच्या लोकांवर सकारात्मक परिणाम होत आहे हे क्रेन यांच्या विद्यार्थ्यांच्या लक्षात आले, आणि या अनुभवाचा स्वतः विद्यार्थ्यांवर खूप मोठा प्रभाव पडला. लोईसचे आयुष्य आनंदाने उजळून निघाले. लीगल सेक्रेटरी म्हणून काम करणारी दुसरी एक मुलगी बॉसच्या जाचाला कंटाळून नोकरी सोडणार होती. कधी कधी कठीण वाटले तरी तिने त्याची प्रशंसा करणे सुरू केले. त्यामुळे त्याचे तिच्याशी वागणे बदलले. दोघांचेही एकमेकांविषयीचे पूर्वग्रह गळून पडले. त्यांचे एकमेकांवर प्रेम बसून लवकरच त्यांनी लग्न केले.

जॉर्ज क्रेन यांची कॉम्प्लिमेन्ट क्लबची कल्पना आता आपल्याला थोडी खुळेपणाची वाटेल. पण त्यामागील तत्त्व १९२० साली जितके सत्य होते, तितकेच आजही आहे. ज्याला मी उद्‌वाहक (वर नेणारे) तत्त्व म्हणतो तेच जॉर्ज क्रेन शिकवीत होते : आपल्या नातेसंबंधात आपण लोकांना एकतर वर उचलू शकतो किंवा खाली नेऊ शकतो. ते आपल्या विद्यार्थ्यांना कृतीप्रिय व्हायला शिकवत होते. क्रेन यांनी म्हटले, ''जगाला मान्यतेची, कौतुकाची भूक लागली आहे. ते प्रशंसेसाठी भुकेले आहे. पण प्रथम आपल्या जोडीदाराला कौतुकाचे दोन शब्द बोलून कोणीतरी सुरुवात करण्याची गरज आहे.''

उत्तेजन देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला लोकांविषयी माहीत असाव्यात अशा पाच गोष्टी

तुमच्या सभोवतालच्या लोकांवर प्रभाव टाकण्याचे जबरदस्त सामर्थ्य तुमच्यामध्ये आहे. तुम्ही दिलेल्या उत्तेजनामुळे कोणाचा तरी दिवस, आठवडा किंवा जीवनदेखील बदलून जाऊ शकेल.

लोकांना कशामुळे उत्तेजन मिळते हे जर तुम्हांला माहीत नसेल तर त्यांना उत्तेजन देणे कठीण आहे. म्हणून लोकांचा अभ्यास करणारे व्हा आणि कशामुळे त्यांना आनंद होतो ते शिका. लोकांविषयी मला माहीत असलेल्या पाच गोष्टींनी तुम्ही सुरुवात कराः

१. प्रत्येकाला आपण कोणी तरी असावे असे वाटते.

प्रत्येक व्यक्तीला मान्यता हवी असते. प्रत्येक व्यक्तीला आपण प्रिय असावे असे वाटते,

आपल्याविषयी लोकांनी चांगले बोलावे असे प्रत्येक व्यक्तीला वाटते. प्रत्येकाला आपण कोणीतरी असावे असे वाटते. अगदी लहान मुलांपासून वयोवृद्ध माणसापर्यंत हे खरे आहे.

आपण कोणीतरी आहोत असे एखाद्याला वाटण्यासाठी तुम्ही काय करू शकाल? त्यांना दहापैकी दहा मार्क्स देऊन. लोकांकडून आपल्या काय अपेक्षा आहेत हे त्यांना समजले तर त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करतात. तुम्ही त्यांच्याविषयी आणि त्यांच्याकडून सर्वोत्कृष्टची अपेक्षा केली, तर त्यांचे सर्वोत्कृष्ट ते तुम्हांला देतात. तुम्ही त्यांना उत्कृष्ट समजले किंवा दहापैकी दहा मार्क्स दिले, तर ते त्याप्रमाणे प्रतिसाद देतील. लोकांना मान्यता हवी असते. ती मानवाची तीव्र इच्छा असते, आणि आपण त्यांच्यावर किती विश्वास ठेवतो हे त्यांना दाखवून आपण त्यांना महान बनवू शकतो.

२. तुम्हांला किती काळजी आहे त्यांना समजत नाही, तोपर्यंत तुम्हांला किती माहिती आहे याच्याशी कोणाला काही देणेघेणे नसते.

आम्ही किती स्मार्ट आहोत, किती आध्यात्मिक आहोत, आमच्याकडे किती पदव्या आहेत, किती संपत्ती आहे हे लोकांना जाणून घययचे नसते. त्यांना केवळ एकच गोष्ट जाणून घ्यायची असते आणि ती म्हणजे आपल्याला त्यांच्याविषयी मनापासून किती जिव्हाळा वाटतो. आपल्या जीवनांद्वारे आपण लोकांना देवाची प्रीती दाखवण्याची गरज आहे.

हा धडा मी केट हचिन्सन यांच्याकडून शिकलो. त्या माझ्या दुसऱ्या इयत्तेतील संडेस्कूलच्या शिक्षिका होत्या. त्यांची माझ्यावर प्रीती होती आणि मला ते माहीत होते. आजारपणामुळे जर मला कधी चर्चला जाता आले नाही, तर त्या घरी येऊन माझी भेट घ्यायच्या.

"जॉनी, मागच्या रविवारी चर्चमध्ये मला तुझी उणीव भासली," त्या म्हणत, "तुझी तब्येत कशी आहे हे मला पाहायचे होते." मग त्या पाच सेन्ट्स देत असत. माझ्यासाठी ते त्या वेळी दहा लाख डॉलर्सच्या बरोबरीचे होते. त्या म्हणत, "पुढच्या रविवारी तू संडेस्कूलला येऊ शकशील असे मला वाटते. मागच्या रविवारी आम्हांला तुझी उणीव फारच जाणवली. तू वर्गात येशील तेव्हा मला तुला पाहायचे आहे, म्हणून मी शिकवायला उभी राहीन तेव्हा तू हात वर करून हालवशील का?" (आमच्या वर्गात पन्नास मुले होती) "म्हणजे मी तुझ्याकडे पाहून स्मित करीन, मला बरे वाटेल मी चांगल्या प्रकारे शिकवू शकेन."

रविवार आल्यावर मला बरे वाटो अथवा न वाटो मी संडेस्कूलला जात असे, त्या हसत, मान हलवत आणि मग शिकवत असत. माझी त्यांनी किती काळजी आहे हे मला माहीत होते, आणि त्यामुळे मी काहीही करू शकेन असे मला वाटे.

३. ख्रिस्ताच्या शरीरातील प्रत्येकजण हा ख्रिस्ताच्या शरीरातील प्रत्येकाच्या मालकीचा असतो

विश्वासणारे या नात्याने, पुष्कळ लोक सर्व काही स्वतःच्या हिंमतीने साध्य करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना इतरांविषयी अनुकंपा वाटत नाही, त्यांनीदेखील आपल्याप्रमाणेच स्वतःच्या प्रयत्नांनी सर्व काही मिळवावे असे त्यांना वाटते. पण ख्रिस्ताच्या शरीराचे कार्य अशा प्रकारे चालावे ही देवाची योजना नाही.

जेव्हा ख्रिस्ती व्यक्ती एकट्याने प्रयत्न करायचा ठरवते तेव्हा मी ऐकलेल्या एका विनोदी कथेतील गवंड्यासारखा तो होतो. एका चार मजली इमारतीच्या छतावरून त्याला सुमारे एक हजार किलो वजनाच्या विटा खाली आणायच्या होत्या. पुढची कथा त्याच्याच शब्दांत वाचा :

> सर्वा विटा हातांनी खाली आणायला खूप वेळ लागला असतो म्हणून त्या विटा एका पिंपात ठेवून पुलीच्या सहाय्याने खाली सोडावे असे ठरवले. ही पुली मी इमारतीच्या वर बांधली होती. तळमजल्यावर सुरक्षिततेची सर्व तयारी केल्यावर मी छतावर गेलो, दोरीला पिंप बांधला, त्यात विटा ठेवल्या आणि पिंप खाली सोडला.
>
> मग खाली जाऊन दोरी घट्ट धरून पिंप हळूहळू खाली उतरण्यासाठी मदत करू लागलो. माझे वजन केवळ १४० पौंड होते, त्यामुळे १००० किलो वजनाच्या पिंपाचा झटका मला इतका जोरदार बसला की, दोरी सोडून द्यायचेही मला सुचले नाही. पिंप खाली येऊ लागला तसतसा मी वेगाने वर जाऊ लागलो.
>
> दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यापाशी मी आलो तेव्हा विटा भरलेला पिंप खाली जात असताना मला भेटला. त्यामुळे माझ्या शरीरावर जखमा झाल्या.
>
> वर जाईपर्यंत मी मी दोरी घट्ट धरली. तेथे माझा पुलीत अडकला. त्यामुळे माझा अंगठा तुटला.

त्याच वेळी पिंप जमिनीवर जोरात आदळला, त्यामुळे त्याचा तळ फुटला व सर्व विटा खाली पडल्या. विटा बाहेर पडल्यामुळे पिंपाचे वजन केवळ ४० पौंड झाले, त्यामुळे माझे १४० पौंड वजनाचे शरीर झपाट्याने खाली येऊ लागले. रिकामा बॅरल वर जाताना मला पुन्हा भेटला. त्यामुळे माझा घोटा तुटला.

हळूहळू मी खाली आलो आणि विटांच्या ढिगाऱ्यावर आदळलो. त्यामुळे माझ्या खांद्याचे हाड तुटले. त्या क्षणी काय करावे हे मला सुचले नाही आणि मी दोरी सोडली. त्यामुळे रिकामा बॅरल धाडकन माझ्यावर आदळला आणि माझ्या डोक्याला इजा झाली.

"ही परिस्थिती पुन्हा तुमच्यावर आली तर तुम्ही काय कराल?" या तुमच्या इन्शुरन्स फॉर्मवरील शेवटच्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे सर्व काम एकट्यानेच करण्याचा अट्टाहास मी पुन्हा करणार नाही.

आध्यात्मिक दृष्टीकोनातून पाहिले तर लोक ख्रिस्ताच्या शरीरापासून फटकून राहण्याचा प्रयत्न करतात तेव्हा असेच घडते. आम्ही सर्व एकट्यानेच करावे अशा प्रकारे देवाची आमची रचना केली नाही. एकमेकांना उत्तेजन देण्यासाठी आणि मदत देण्यासाठी आपली रचना करण्यात आली आहे. बंधू आणि भगिनी या नात्याने आपण मिळून प्रवास करायचा आहे.

४. एखाद्याला उत्तेजन देणारा कोणीही मनुष्य पुष्कळजणांना उत्तेजन देतो.
माझ्या जीवनात पुष्कळ लोकांनी मला उत्तेजन दिले आहे व मदत केली आहे. आता वयाच्या एकसष्टाव्या वर्षी मी मागे वळून पाहतो तेव्हा इतर लोक माझ्याशी किती उदारतेने वागले हे पाहून मी आश्चर्यचकित होतो.

मला मदत करणाऱ्या लोकांपैकी एक व्यक्ती म्हणजे मी सातव्या इयत्तेत असतानाचे माझे संडेस्कूल शिक्षक ग्लेन लेदरवूड. आम्ही मस्तीखोर मुले होतो. थट्टामस्करी, बडबड, भांडणे - ऐकण्याखेरीज बाकी सर्व काही करीत असू. पण ग्लेनचे मात्र आम्ही ऐकत असू, कारण ते आमच्यावर प्रीती करीत आणि आम्हांला उत्तेजन देत.

एके दिवशी बोलता बोलता त्यांचा आवाज फाटला. आम्ही सर्वजण त्यांच्याकडे पाहून लागलो, तेही आमच्याकडे पाहू लागले आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

"वर्ग सुटल्यानंतर मला स्टीव्ह बेन्नर, फिल कॉनरॅड, ज्युनियर फाउलर आणि जॉन मॅक्सवेल यांना थोडा वेळ भेटायचे आहे. तुम्हांला काहीतरी महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे."

वर्ग सुटल्यावर आम्ही त्यांना भेटलो तेव्हा त्यांनी सांगितले की, दर शनिवारी रात्री मी सातव्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रार्थना करतो. काल रात्री देवाने मला सांगितले की देव तुम्हा चौघांना सेवेसाठी पाचारण करणार आहे. ही बातमी तुम्हांला प्रथम मी सांगावी असे मला वाटले. तसेच तुमच्यावर हात ठेवून प्रार्थना करणारा पहिला व्यक्ती मी व्हावे असे मला वाटते.

ग्लेन यांनी आपले हात आमच्या डोक्यांवर ठेवले, आणि ज्याला मी सेवेची अधिकृत दीक्षा म्हणतो ती दिली. त्यांचे म्हणणे बरोबर होऊते. आम्ही चौघेही पाळक झालो.

पुष्कळ वर्षांनंतर मी ग्लेनला भेटायला गेलो. इतकी वर्षे त्यांनी घेतलेल्या संडेस्कूल क्लासमधून किती मुले सेवाकार्यात गेली हे मी त्यांना विचारले. त्यांनी उत्तर दिले, मला नक्की माहीत नाही, पण किमान तीसजण तरी नक्की आहेत.

सातव्या वर्गातील मुलांवर त्यांनी केलेल्या प्रीतीमुळे आणि दिलेल्या उत्तेजनामुळे किती मंडळ्यांना लाभ झाला हे मला माहीत नाही. त्यांच्या उत्तेजनपर शब्दांमुळे किती जीवने प्रभावित झाली? स्वर्गात जाईपर्यंत मला कदाचित समजणार नाही, पण मी तुम्हांला हे सांगू शकतो : जो कोणी दुसऱ्या कोणाला तरी उत्तेजन देतो तो पुष्कळजणांना उत्तेजन देतो.

५. देव प्रत्येकावर प्रीती करतो

आपण कोणाला मदत करावी आणि कोणाला उत्तेजन द्यावे याची निवड करताना पुष्कळ ख्रिस्ती लोक फार चोखंदळपणा करतात. ते त्यांच्यासारख्या लोकांचा शोध घेतात. काही लोकांना तर असे वाटते की, आपल्याप्रमाणे विश्वास ठेवणाऱ्या आणि विचार करणाऱ्या लोकांनाच केवळ आपण मदत करावी. पण ही पद्धत नाही. येशूने नक्कीच असे केले नाही.

काही वर्षांपूर्वी एक लेख माझ्या वाचनात आला. एक मनुष्य खड्ड्यात पडला, पण त्याला बाहेर येता येईना. इतर लोक त्याच्याशी कसे वागले ते त्या लेखात सांगितले होते :

एक आत्मनिष्ठ किंवा व्यक्तीनिष्ठ मनुष्य तेथे आला आणि म्हणाला, "तू तेथे खाली पडलास याचे मला वाईट वाटते."

वस्तुनिष्ठ मनुष्य तेथे आला आणि म्हणाला, ''कोणी तरी या खड्ड्यात पडणे अगदी सुसंगत आहे.''

परूश्याने म्हटले, ''केवळ वाईट लोक खड्ड्यात पडतात.''

हा मनुष्य खड्ड्यात कसा पडला असावा याची आकडेमोड गणितज्ज्ञाने केली.

खड्ड्यात पडलेल्या माणसाविषयी एक वार्तापत्र वार्ताहराला करायचे होते.

मूलतत्त्ववाद्याने म्हटले, ''तुझी लायकी खड्ड्यात पडण्याचीच आहे.''

कॅल्विनिस्टने (म्हणजे कॅल्विनच्या सिद्धान्ततत्त्वावर विश्वास ठेवणारी व्यक्ती) म्हटले, ''तुझे तारण झाले असते तर तू खड्ड्यात पडलाच नसतास.''

आर्मेनियन माणसाने म्हटले, ''तुझे तारण झाले असूनही तू खड्ड्यात पडलास.''

कॅरिस्मॅटिक (कृपादानी) व्यक्तीने म्हटले, ''तू त्या खड्ड्यात नाहीस असा केवळ विश्वास धर.''

वास्तववादी मनुष्य तेथे आला आणि म्हणाला, ''हा काही खड्डा नाही.''

भूवैज्ञानिकाने त्याला खड्ड्यातील खडकांच्या आडव्या स्तरांची तारीफ करायला सांगितले.

एका आयआरएस कार्यकर्त्याने विचारले की, तू या खड्ड्याचा कर भरतोस का?

काउंटी इन्सपेक्टरने विचारले, ''तुझ्याकडे खड्डा खणण्याचे लायसन्स आहे का?''

स्वतःची कीव करणाऱ्या व्यक्तीने म्हटले, ''माझ्या खड्ड्यासमोर तुझा खड्डा काहीच नाही.''

आशावादी मनुष्याने म्हटले, ''यापेक्षा वाईट घडू शकले असते.''

निराशावादी मनुष्याने म्हटले, ''गोष्टी/परिस्थिती अजून वाईट होतील.''

त्या मनुष्याला पाहून येशूने त्याचा हात धरून त्याला खड्ड्याबाहेर काढले.

लोकांसाठी मरावे म्हणून येशू आला. त्याला लोकांची काळजी होती आणि आहे. तुम्हांला आणि मलाही लोकांविषयी कळवळा वाटावा. देव प्रत्येकावर प्रीती करतो हे आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे, आणि येशू इतरांशी जसा वागला असता तसे

आपण इतरांशी वागले पाहिजे. देवाने त्यांना ज्यासाठी निर्माण केले आहे ते होण्यासाठी आपण त्यांना उत्तेजन देण्याची गरज आहे.

आपण उत्तेजन देणारे व्हावे असे प्रत्येकाला मनात आत कुठेतरी वाटत असते असा माझा विश्वास आहे, आणि येशूला ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला – नकारात्मक व्यक्तीलादेखील येशूप्रमाणे होण्याची इच्छा असते. मी हे का सांगत आहे? कारण आपण इतर लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम करणारे व्हावे असे आपणा प्रत्येकाला वाटते. इतरांचे मोल वाढवण्याची, ते कमी न करण्याची आपली इच्छा असते.

म्हणून मला तुमचा उत्तेजनकर्ता होऊ द्या. तुम्ही बदल घडवू शकता. तुम्ही इतरांना मोल देऊ शकता. तुम्ही येशूचे चांगले प्रतिनिधित्व करू शकता आणि एके दिवशी तुम्ही हे शब्द ऐकाल, "शाबास भल्या व विश्वासू दासा." प्रत्येकजण उत्तेजन देणारा होऊ शकतो. त्यासाठी तुम्ही श्रीमंत असण्याची गरज नाही. तुम्ही हुशार असण्याची गरज नाही. तुमचे व्यक्तिमत्त्व आकर्षक असण्याची गरज नाही. तुम्हांला फक्त लोकांची काळजी आणि सुरुवात करण्याची इच्छा असली पाहिजे. तुम्हांला काही मोठे किंवा विशेष करण्याची गरज नाही. रोज तुम्ही ज्या लहान गोष्टी करू शकता त्यांच्यामध्ये तुमच्या कल्पनाशक्तीपेक्षा अधिक प्रभाव करण्याची शक्ती आहे.

- कोणीतरी काही चांगले करीत असल्याचे पाहा.
- कुणाला तरी प्रामाणिकपणे शुभेच्छा द्या, प्रशंसा करा.
- मदतीची गरज असलेल्या कोणाला तरी मदत करा.
- कोणाला तरी रडण्यासाठी आपला खांदा द्या.
- यशस्वी होणाऱ्या कोणाबरोबर तरी आनंद करा.
- कोणाला तरी आशा द्या.

हे तुम्ही करू शकता. आताच कृती करा. आणि मला आवडणारे हे अवतरण नेहमी लक्षात ठेवा : "या जगातून मी केवळ एकदाच जाणार आहे, म्हणून जे इतरांसाठी मी जे काही चांगले करू शकतो, किंवा जो काही चांगुलपणा मी दाखवू शकतो ते मला करू द्या. मला ते आता करू द्या. मला त्याकडे दुर्लक्ष करू देऊ नका, किंवा त्यापासून दूर भटकू देऊ नका. कारण या मार्गाने मी पुन्हा येणार नाही."

प्रकरण

10

दयाळूपणाची आक्रमक कृत्ये

आणि प्रीती व सत्कर्मे करण्यास उत्तेजन येईल असे एकमेकांकडे लक्ष देऊ.
इब्री. १०:२४

तुमची पत्नी/पती, कुटुंबातील एखादी व्यक्ती, किंवा मित्रासोबत बसून आपण इतरांसाठी आशीर्वाद कसे होऊ शकू याविषयी कधी चर्चा केली आहे का? तुमच्यापैकी पुष्कळजणांनी असे केले नसेल असे म्हटले तर चुकीचे होणार नाही असे मला वाटते. तीन वर्षापूर्वीपर्यंत मीदेखील असे केले नव्हते. ६ व्या प्रकरणात मी सांगितल्याप्रमाणे, असे करणे आता मला मोठे आनंदाचे आणि उपयुक्त वाटते. इतर लोकांना मदत करण्याच्या उद्देशाने आपण विचार करतो आणि बोलतो तेव्हा आपण सर्वजण उत्साहित होतो. इतर लोकांना मदत करण्याचा उद्देश बाळगून जर आपण काही करणार नाही, तर प्रीतीची क्रांती होणार नाही. आपल्यासमोर उद्दीष्टे असली पाहिजेत आणि ती साध्य करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

इतरांवर प्रीती करणे हे माझ्ये जीवनाचे ध्येय करावे असा निश्चय मी केला आहे. प्रीती करण्याच्या वेगवेगळ्या मार्गांची मला भूक लागली. प्रीती हे केवळ तत्त्व किंवा बोलणे नाही, तर ती कृती आहे (पाहा १ योहान.३:१८). लोकांना उत्तेजन देणाऱ्या आणि आपल्यासाठी ते किती मोलवान आहेत हे व्यक्त करणाऱ्या प्रेमळ शब्दांनी आपण

त्यांच्यावर प्रीती करू शकतो हे मी मागच्या प्रकरणात स्पष्ट केले आहे. तसेच इतरांवर प्रीती करण्यासाठी आपण आपला वेळ, शक्ती, धन आणि मालमत्ता यांचाही उपयोग करण्याची गरज आहे.

आपल्याकडे देण्यासारखे काही नाही असे कदाचित तुम्हांला वाटेल. तुमच्यावर कदाचित कर्ज असेल, तुमचा खर्च भागवणे तुम्हांला कठीण जात असेल, त्यामुळे इतरांना देण्याच्या विचाराने तुम्ही अस्वस्थ होत असाल, किंवा तुम्हांला द्यायची इच्छा आहे पण कसे द्यावे ते समजत नसल्याने वाईट वाटत असेल. तुम्ही जर नेटाने शोधण्याचा प्रयत्न केला, तर देण्याचे आणि प्रीतीचा प्रसार करण्याचे शब्दशः हजारो मार्ग तुम्हांला आढळतील.

बोलण्याप्रमाणे कृती करा

काय करायचे ते लोकांना सांगायचे, पण ते कसे करावे हे सांगायचे नाही ही मोठी चूक आहे असे मला वाटते. पुष्कळ लोक प्रीतीविषयी बोलतात, पण केवळ बोलण्यामुळे लोकांवर प्रॅक्टीकल मार्गांनी कशी प्रीती करावी हे समजणार नाही. प्रीतीविषयीचे एक पुस्तक मी नुकतेच वाचले. २१० पानांचे हे पुस्तक होते. "मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी; जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी. तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहात" (योहान.१३:३४-३५), या येशूने दिलेल्या नवीन आज्ञेविषयीचे स्पष्टीकरण त्यात दिले होते. पण व्यक्तीला जिचा उपयोग होईल अशी एकही व्यावहारिक किंवा सर्जनशील कल्पना पुस्तकात सुचवली नव्हती. एकमेकांवर प्रीती करणे फार महत्त्वाचे आहे हे लेखकाने पुन्हापुन्हा सांगितले होते, पण मी प्रामाणिकपणे सांगते की, प्रीतीविषयी सर्व ज्ञान जरी या पुस्तकात असले तरी तिची सुरुवात कशी करावी याचे अजिबात मार्गदर्शन नव्हते. लोकांना योग्य ते करायची इच्छा असते, पण त्यांना योग्य मार्गाने नेणाऱ्या मार्गदर्शकाची त्यांना गरज असते.

येशू केवळ प्रीतीविषयी बोलला नाही, तर प्रे.कृ.१०:३८ काय म्हणते ते लक्षात ठेवा: "तो सत्कर्मे करीत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांना बरे करीत फिरला." तो रोज लोकांना मदत करीत असल्याचे, त्यांचे ऐकत असल्याचे, किंवा कोणी गरज घेऊन त्याच्याकडे आले तर त्याला/तिला मदत करण्यासाठी स्वतःच्या योजनेमध्ये फेरबदल करीत असल्याचे त्याचे शिष्य पाहत होते. गरीबांना मदत करण्यासाठी ते पैसे साठवीत असल्याची तो नेहमी खातरजमा करीत असल्याचे ते

पाहत होते. तसेच तो लगेच क्षमा करीत असे व दुर्बलांशी धीराने वागत असे हे त्यांनी पाहिले होते. तो दयाळू, नम्र आणि उत्तेजन देणारा होता. त्याने कोणाविषयीही आशा सोडली नाही. येशू केवळ लोकांवर प्रीती करण्याविषयी बोलला नाही, तर प्रीती कशी करावी हे त्याने आपल्या भोवतालच्या लोकांना दाखवले. आपले शब्द महत्त्वाचे आहेत, पण शब्दांपेक्षा कृतीमध्ये जास्त वजन असते.

> आपले शब्द महत्त्वाचे आहेत,
> पण शब्दांपेक्षा कृतीमध्ये जास्त वजन असते.

आपली सर्वांत मोठी समस्या

ख्रिस्तीत्वातील आपली सर्वांत मोठी समस्या म्हणजे, काय करायला पाहिजे हे आपण लोकांना सांगू देतो, आणि काय करावे ते इतरांनाही सांगतो, पण मग आपण चर्चमधून, बायबलक्लासमधून बाहेर पडतो आणि काहीच करीत नाही. आपल्याला जे माहीत आहे त्याविषयी आपण काय विचार करतो त्याने काही फरक पडत नाही, तर आपण जे करतो ते आपल्याला जे माहीत आहे त्याचा पुरावा आहे. तुम्ही तुमच्या फळावरून ओळखले जाल असे येशूने सांगितले (पाहा मत्तय.१२:३३). याचा अर्थ असा की, आपले जीवन आणि आपली प्रवृती यांद्वारे आपण काय उत्पन्न करतो यावरून आतून आपण खरे कसे आहोत हे लोक सांगू शकतील.

"प्रीती व्यक्त करण्यासाठी मी नक्की काय करीत आहे?" हा प्रश्न मी स्वतःला नेहमी विचारला पाहिजे. प्रेषित पौलाच्या म्हणण्यानुसार आपण ज्ञानाने फसवले जाऊ शकतो. आपल्या ज्ञानाच्या गर्वामुळे आपण आंधळे होऊ शकतो आणि प्रत्यक्षात आपण तसे आचरण करीत नाही हे पाहू शकणार नाही. करिंथमधील लोकांना पौलाने सांगितले की, ज्ञानामुळे लोक गर्वाने फुगतात, पण प्रीती उन्नती करते, लोकांना उत्तेजन देते (पाहा १ करिंथ.८:१). आपले बोलणे आणि कृती यात अंतर नाही याची आपण सर्वांनी खात्री करून घेतली पाहिजे. म्हणून जग ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांना ढोंगी म्हणते यात काही आश्चर्य नाही, कारण ते तसेच आहेत.

बरीच वर्षे मी एका चर्चला जात असे. वर्षातून एकदा ते "मिशन संडे" पाळत असत. मिशनकार्याविषयी बोलत असत. पण आमच्या स्वतःच्या शहरातील गरीब आणि गरजू लोकांकडे ते एकदा तरी सुवार्ता घेऊन गेल्याचे मला आठवत नाही. पुष्कळसे संदेश हे सिद्धान्ततत्त्वांविषयी असत. त्यात ख्रिस्तीत्वाचे व्यावहारिक पैलू

आणि माझ्या समाजात मी कसे वागावे यांचा काही उल्लेख नसे. मजबूत सिद्धान्ततत्त्व महत्त्वाचे आहे, पण माझे रोजचे जीवन कसे जगावे हे समजणेही तितकेच महत्त्वाचे आहे. एकमेकांची निंदा, तटफुटी आणि मंडळीत पदासाठी धडपणारे लोक यांनी मंडळी भरली होती. अनेक प्रकारे आम्ही जगापेक्षा निराळे वागत नव्हतो; आम्ही केवळ चर्चला जात होतो. देवाच्या अलौकिक देणग्यांविषयी मी खूप उत्साही आणि आवेशी असल्यामुळे सरतेशेवटी मला चर्च सोडून जायला सांगितले. मी उत्साही, आवेशी ख्रिस्ती झाले होते, पण मी खूप भावनाप्रधान आहे, आणि मला शांत होण्याची गरज आहे असे सांगण्यात आले.

मग मी दुसऱ्या चर्चला जाऊ लागले. तेथील लोक आत्मिक दानांविषयी उत्साही होते. येशू ख्रिस्ताद्वारे मिळणाऱ्या तारणाविषयी इतरांना मोठ्या प्रमाणात सांगत होते. मला खूप उत्साह वाटला आणि देवाची सेवा करावी असे वाटू लागले. म्हणून मी स्त्रियांचा एक गट तयार केला. दर शुक्रवारी आम्ही बायबल ट्रॅक्ट्स घेऊन जात असू. लोक दुकानातून बाहेर पडत असताना आम्ही ते त्यांना देत असू. गाड्यांच्या काचेवर लावत असू. काही आठवड्यांच्या अवधीत आम्ही दहा हजार सुवार्तापुस्तिका वाटल्या. तसेच दर मंगळवारी संध्याकाळी मी माझ्या घरी पवित्र शास्त्राभ्यासवर्ग सुरू केला व त्यात बायबल शिकवू लागले.

मी देवात वाढत होते. त्याची सेवा करण्यात मला आनंद वाटत होता, पण मग मंडळीच्या वडिलांनी मला कमिटी मिटींगमध्ये बोलावले आणि त्यांची परवानगी न घेता महिलांना ट्रॅक्ट्स वाटण्यास प्रवृत्त केले, यावरून मी बंडखोरी करीत आहे असे मला सांगितले. तसेच त्यांनी डेव्हला व मला सांगितले की, बायबल वर्गात मी न शिकवता डेव्हने शिकवावे. या मंडळीने लोकांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला, आणि तसे करताना देवाने दिलेली दाने विझवण्याचा प्रयत्न केला, म्हणून आता या मंडळीचे अस्तित्वही उरले नाही.

त्यानंतर बरीच वर्षे मी दुसऱ्या एका चर्चला जाऊ लागले. तेथे चांगल्या गोष्टी शिकवल्या जात, पण आता मागे वळून पाहिले तर मला प्रामाणिकपणे सांगावेसे वाटते की, त्या मंडळीत खरी प्रीती फार थोडी होती. त्या मंडळीत सुवार्ताप्रसाराचे कार्य फार कमी होते, तसेच जागतिक मिशनकार्यासाठी फार थोडी तरतूद केली जात असे. कालांतराने तीही बंद झाली. तसेच तेथील पुढारी स्वार्थी, गर्विष्ठ, मत्सरी, दुसऱ्यांच्या यशाने भयभीत होणारे होते; काहीजण लोकांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणारे आणि अपरिपक्व होते. इतक्या स्व-केंद्रित आणि स्वसंतुष्ट असलेल्या चर्चमध्ये मी इतकी वर्षे वाया घालवली याचा विचार करून मला फार वाईट वाटते. मंडळीला

सुवार्ताप्रसारकार्यासाठी पाचारण झाले आहे. समाजाला, शहरांना, राष्ट्रांना आणि जगाला सुवार्ता सांगणे, साक्ष देणे हे मंडळीचे सेवाकार्य आहे (पाहा प्रे.कृ.१:८).

प्रीतीच्या वास्तविकतेमध्ये मंडळीने आक्रमकतेने कार्य केले पाहिजे. पवित्र शास्त्रात याची व्याख्या धीर, दयाळूपणा, नम्रता, इतरांच्या यशामुळे आनंदित होणे, निःस्वार्थीपणा, देणे, नेहमी सर्वोत्कृष्टतेवर विश्वास ठेवणे, क्षमा करण्यात तत्पर असणे, लोकांचा न्याय करण्याऐवजी, त्यांच्यावर टीका करण्याऐवजी कृपा करणे, अनाथ, विधवा, गरीब, भुकेले, बेघर आणि जाचलेल्या लोकांना मदत करणे अशी केली आहे. इतरांच्या कल्याणासाठी प्रीती आपला जीवही देते. वस्तुस्थिती ही आहे की, प्रीती सक्रीय असली पाहिजे, नाही तर ती मरते. ती प्रवाहित झाली पाहिजे आणि वाढली पाहिजे.

तुमच्या कळवळायुक्त हृदयाचे तुम्ही काय करणार?

१ योहान.३:१७ हे शास्त्रवचन आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारते : "मग जवळ संसाराची साधने असून व आपला बंधु गरजवंत आहे हे पाहून जो स्वतःला त्याचा कळवळा येऊ देत नाही त्याच्या ठायी देवाची प्रीती कशी राहणार?" दुसऱ्या शब्दांत हे वचन सांगत आहे की, आपण एखादी गरज पाहतो तेव्हा आपले कळवळायुक्त हृदय उघडायचे की नाही हे आपण ठरवू शकतो. पण जर आपण ते नेहमी बंद ठेवण्याची निवड केली तर देवाची प्रीती आपल्यामध्ये राहू शकणार नाही. प्रीतीचा स्वभावच असा आहे की तिने कृतीशील राहणे गरजेचे आहे, कारण ती जिवंत आहे. देव प्रीती आहे!

"जो प्रीती करत नाही तो देवाला ओळखत नाही; कारण देव प्रीती आहे" (१ योहान.४:८) असे म्हणून योहानाने मोठे धक्कादायक विधान केले. येशूच्या पावलांचा (पद्धतींचा) अभ्यास करून आपल्या रोजच्या जीवनात प्रीती कशी असावी याचा धडा आपण शिकू शकतो. किंवा कोणी एकाने म्हटल्याप्रमाणे "येशूच्या थांब्यांचा (तो जेथे थांबला) अभ्यास करून आपण प्रीतीविषयी अधिक शिकू शकतो." त्याच्याकडे लोकांसाठी नेहमीच वेळ होता! त्याने नेहमीच काळजी घेतली! तो कोठेही जात असला तरी गरजवंतांना मदत करण्यासाठी तो थांबला.

आपण व्यावहारिक होऊ या

आपण प्रीती कशी दाखवू शकतो याचे व्यावहारिक मार्ग सांगा असे मी शेकडो लोकांना विचारले आहे. मी पुस्तके वाचली, इंटरनेटवर शोध घेतला, आणि माझ्या रोजच्या

जीवनात लोकांवर प्रीती करण्याचे सर्जनशील मार्ग सामील करावेत म्हणून मी नेटाने शोध घेतला. मी शिकलेल्या गोष्टींपैकी काही तुम्हांला सांगायला मला आवडेल. पण तुम्हीदेखील सर्जनशील व्हा आणि तुमच्या कल्पना इतरांना सांगा असे मी तुम्हांला सुचवते. तुम्ही www.theloverevolution.com या वेबसाईटवर जाऊ शकता. ती प्रीतीच्या क्रांतीची अधिकृत वेबसाईट आहे. तेथे तुम्हांला प्रीतीच्या क्रांतीविषयी खूप माहिती आणि ही चळवळ पुढे नेण्यासाठी मदत करण्यासाठी साधने मिळतील. तुमच्या कल्पना तुम्ही इतरांना सांगू शकता आणि त्यांच्यापासून शिकू शकता. लक्षात ठेवा... तुम्ही प्रीतीची क्रांती आहात! तुमच्या सक्रीय सहभागाशिवाय ही चळवळ चालू शकणार नाही.

निरनिराळ्या लोकांकडून मिळालेल्या कल्पना मी पुढे सांगितल्या आहेत :

- तुम्हांला आणि दुसऱ्या कोणाला तरी एकच पार्किंग प्लेस हवी असेल, तर तुम्ही हसतमुखाने ती दुसऱ्या व्यक्तीला द्यावी.
- वृद्ध शेजाऱ्याच्या लॉनची छाटणी करून द्या, किंवा हिवाळ्यात बर्फ काढा.
- वृद्ध व्यक्तीचे घर स्वच्छ करा किंवा त्यांचे वाणसामान आणून देण्याची तयारी दाखवा.
- जाण्याची सुविधा नसलेल्या व्यक्तीला चर्चला किंवा इतर कार्यक्रमाला घेऊन जा. तुमच्या नेहमीच्या रस्त्याच्या विरुद्ध दिशेला जायचे असले तरी जा.
- व्यत्यय न आणता कोणाचे तरी म्हणणे लक्ष देऊन ऐका.
- नम्र ड्रायव्हर व्हा.
- परक्या व्यक्तीसाठी दरवाजा उघडा आणि त्याला किंवा तिला तुमच्याअगोदर आत जाऊ द्या.
- दुकानात तुम्ही खूप सामान खरेदी केले असेल, पण तुमच्या मागच्या व्यक्तीकडे केवळ दोनच वस्तू असतील तर प्रथम त्याला बील करून जाऊ द्या.
- एकटेच असणाऱ्या पालकाला थोडा एकांत मिळावा किंवा त्याचा/तिचा प्रोजेक्ट वेळेवर पूर्ण करता यावा म्हणून त्याच्या/तिच्या बाळाची काळजी घ्या.
- कुटुंबिय दुसऱ्या गावात/शहरात राहत असल्याने जी व्यक्ती शहरात एकटीच राहत असेल त्याला/तिला सुट्टीच्या दिवशी आपल्या घरी येण्याचे आमंत्रण द्या.

- कृतज्ञता दाखवण्यासाठी कार्ड किंवा फुले पाठवा.
- एकटीच असणाऱ्या मातेला आपल्या मुलांना घेऊन बाहेर जेवायला जाता यावे म्हणून तिला गिफ्ट सर्टिफिकेट द्या.

हे कार्यकारी आहे!

आम्हांला पुढीलप्रमाणे एक कल्पना मिळाली : "ज्या रेस्टॉरन्टमध्ये तुम्ही जेवत आहात तेथे कोणाचे तरी बील गुप्तपणे द्या." डेव्ह आणि मी बरेचदा असे करतो. त्याचे आनंददायक परिणाम आम्हांला पाहायला मिळाले आहेत. एके संध्याकाळी दोन वृद्ध स्त्रियांना आम्ही रेस्टॉरन्टमध्ये पाहिले. त्यांनी चांगली वेषभूषा केली होती. त्यांच्या जेवणाचे पैसे भरावेत असे आम्हांला वाटले आणि वेटरच्या हाती दिले. आम्ही त्याला म्हटले, अगोदर आम्हांला बाहेर जाऊ दे आणि मग त्यांना सांग की, कुणाला तरी तुम्हांला आशीर्वादित करायची इच्छा होती. त्यांनी अर्थातच कोण म्हणून विचारले तेव्हा वेटरने सांगितले की टीव्हीवरील सेविका होती, आणि त्यांना केवळ तुमच्या चेहऱ्यावर स्मित आणायचे होते.

पुष्कळ महिन्यांनंतर आम्ही पुन्हा त्याच रेस्टॉरन्टमध्ये गेलो. एका महिलेने आमच्याकडे येऊन मला ओळखले का असे विचारले. आम्हांला काही आठवले नाही, तेव्हा तिने तो प्रसंग सांगितला आणि म्हटले की ज्या रात्री आम्ही तिच्यासाठी जेवण दिले त्या दिवशी तिचा वाढदिवस होता आणि कोणीतरी असे केले म्हणून तिला खूप आनंद झाला होता. माझा टीव्ही कार्यक्रम तिने शोधला आणि तेव्हापासून नियमितपणे पाहत होती. आम्ही केवळ त्यांना आनंदीत केले होते एवढेच नाही, तर तिच्या वाढदिवशी देवाने आमचा उपयोग करून घेतला म्हणून अधिक आशीर्वादित झालो. ही बहीणदेखील आता टीव्हीवर नियमितपणे कार्यक्रम पाहून देवाच्या वचनाचे शिक्षण घेत आहे. याचे फळ काय होईल ते केवळ देवालाच माहीत आहे. म्हणून दयाळूपणाची एक छोटीशी कृती आणि थोडीशी आर्थिक गुंतवणूक यांमुळे केवळ आनंद मिळाला असे नाही, तर देवाच्या वचनाशी तिची ओळख झाली.

दुसरी एक सूचना आम्हांला मिळाली : "किराणा सामानाच्या दुकानात कोणाच्या तरी सामानाचे पैसे भरा." आमच्या मुलाने आम्हांला ही गोष्ट सांगितली. त्याची आई म्हणून मला मोठा अभिमान वाटला. तो आणि त्याची बायको एका किराणा दुकानात गेले होते. एक थकलेली, चिंताक्रांत महिला त्याला दिसली. तिच्याजवळ फारच थोडे पैसे असावेत असे वाटत होते. ती आपल्या यादीनुसार खरेदी करीत होती आणि वस्तू

फार काळजीपूर्वक आपल्या बास्केटमध्ये टाकत होती. तो तिच्याकडे गेला, तिला शंभर डॉलर्सची नोट दिली आणि जे हवे ते खरेदी करा असे सांगून निघून गेला. मी एकदा वाचले होते की, संधी मिळेपर्यंत प्रीती बाजूला थांबते, संधी मिळाल्यावर पुढे येते, आपले काम करते आणि पुन्हा पुढची संधी मिळेपर्यंत बाजूला जाते. हा फार सुंदर विचार आहे असे मला वाटते. तुम्हांला काय वाटते?

कोणी निराश लोक दिसतात का हे मी नेहमी पाहते आणि "देव तुमच्यावर प्रीती करतो" या साध्या संदेशासह त्यांना काही आर्थिक मदत करते. पुष्कळदा मी देवाविषयी काही बोलत नाही, मी केवळ त्याचे स्वभावगुण दाखवते! स्टारबक्स स्टोअर्समध्ये सुटीच्या वेळेत मी एका मुलीला पाहिले. ती तेथे काम करीत होती. ती एकटी टेबलवर बसली होती. खूप थकलेली दिसत होती. मी तिला पन्नास डॉलर्स दिले आणि म्हटले, "मला तुला केवळ आशीर्वादित करायचे आहे. तू नक्कीच खूप कष्ट करते आणि मला त्याचे कौतुक वाटते हे तुला समजावे ही माझी इच्छा आहे." आश्चर्यचकित होऊन तिने माझ्याकडे पाहिले आणि म्हटले, "आतापर्यंत माझ्यासाठी कोणी केलेली ही सर्वांत चांगली गोष्ट आहे."

आज आपल्यामध्ये वावरणारे किती लोक एकाकी, दुर्लक्षित आहेत, त्यांना प्रीतीचा फार कमी किंवा अजिबात अनुभव नाही. कोणतीही गोष्ट फुकट मिळण्याची किंवा जी त्यांनी कमवली नाही किंवा ज्यासाठी ते पात्र नाहीत अशी गोष्ट मिळण्याची त्यांना सवय नाही. दुसरा कोणताही हेतू न बाळगता केवळ लोकांना आशीर्वादित करण्यासाठी अशा छोट्याछोट्या गोष्टी करणे हा देवाची प्रीती दाखवण्याचा चांगला मार्ग आहे.

चांगले करायला विसरू नका

इब्री.१३:६ आपल्याला सांगते की, "चांगले करण्यास व दान करण्यास विसरू नका; कारण अशा यज्ञांनी देव संतुष्ट होतो." जरी हे वचन चर्चमधील लोकांसाठी या गोष्टी करायला सांगत असले तरी, मला तुम्हांला हे सांगू द्या की, अशा प्रकारे औदार्याने जगणे हे देवाला संतोष देणारे आहे. केवळ आपल्यासारखे असणाऱ्या किंवा मंडळीतील लोकांवर नव्हे, तर सर्वांशी चांगुलपणे वागा असे सांगणारी अनेक शास्त्रवचने आहेत. उदा. १ थेस्सल.५:१५ आपल्याला सांगते, "कोणी कोणाचे वाईटाबद्दल वाईट करू नये म्हणून जपून राहा आणि सर्वदा एकमेकांचा व सर्वांचे चांगले करत राहा."

तुमचा कचरा उचलणे किंवा पत्रे आणणे यांसारखी तुमची सेवा करणाऱ्या लोकांसाठी काहीतरी करण्यास मी तुम्हांला उत्तेजन देते. आपल्या जीवनात नेहमी असणारे हे लोक आहेत, पण आपल्यासाठी ते जे काम करतात त्यासाठी आपण त्यांचा विचार क्वचितच करतो. मला स्वतःला निश्चितच दिवसभर कचरा गोळा करायला आवडणार नाही.

माझ्या मुलीने तिचा कचरा गोळा करणाऱ्यांसाठी एक कृतज्ञतेचे पत्र लिहिले आणि त्यांना जेवणासाठी पैसे दिले. या गोष्टींमुळे या लोकांना फक्त आशीर्वाद मिळतो असे नाही, तर अशा गोष्टी त्यांच्या बाबतीत कधी घडत नसल्यामुळे त्यांना आश्चर्याचा धक्काही बसतो. आनंददायक नसणारी कामे करणाऱ्या, पण त्यांच्याकडे कोणाचे लक्ष नसणाऱ्या लोकांनी हे जग भरले आहे.

ज्या दुकानात मी सामान खरेदी करते त्या दुकानात मी एका महिलेला बाथरूम साफ करताना पाहिले आणि तिला काही पैसे देऊन म्हटले, "तुम्ही खूप कष्ट करता असे दिसते, आणि तुम्हांला थोड्या आशीर्वादाची गरज आहे असे मला वाटते." मी स्मित केले आणि लगेच तेथून निघून गेले. काही मिनिटांनी तिने मला बुटांच्या दुकानात पाहिले आणि माझ्या या छोट्याशा कृतीमुळे तिला आनंद, किती उत्साह वाटला ते सांगून माझे आभार मानले.

सौजन्यपूर्ण वागणुकीची सवय लावून घ्या

दुसऱ्यांवरील प्रीती व्यक्त करण्यासाठी कल्पना सुचवा असे आवाहन आम्ही केले तेव्हा एका व्यक्तीने लिहिले, नेहमी 'कृपा करून' आणि 'आभारी आहे' या शब्दांचा उपयोग करा. सौजन्यपूर्ण वागणुकीचे हे दोन साधे प्रकार आहेत, आणि उद्धटपणे न वागता सौजन्याने वागण्यामुळे इतरांविषयी आदर आणि दयाळूपणा दाखवता येतो. विशेषतः तुमच्या घरी तुमच्या कुटुंबियांसोबत सौजन्याने वागा असे मी सुचवते. मी डेव्हला एखादी गोष्ट करायला सांगितली आणि त्याने ती केली तर त्याला मी नेहमी थँक यू म्हणते. आपल्या प्रियजनांना गृहीत न धरणे फार महत्त्वाचे आहे.

प्रीती उद्धट नाही, १ करिंथ.१३:५ नुसार उद्धटपणा स्वार्थीपणातून येतो, आणि त्याला विरोध करण्याचा एक मार्ग म्हणजे नेहमी चांगले मॅनर्स वापरणे. आपला समाजा उद्धटपणाने भरला आहे, पण हा देवाचा स्वभावगुण नाही. येशूने म्हटले मी कठोर नाही (मत्तय.११:३०) आणि आपण त्याच्या उदाहरणाचे अनुकरण केले पाहिजे.

आपण सर्व प्रसंगी आभार मानले पाहिजे, कृतज्ञ राहिले पाहिजे असे पवित्र शास्त्र सांगते. आम्ही कृतज्ञ लोक आहोत असे आपण म्हणू, पण आपल्या अंतःकरणात जे आहे ते आपल्या मुखावाटे बाहेर पडते (पाहा मत्तय.१२:३४). जर आपण खरोखरच कृतज्ञ असू तर आपण सहजपणे आभार मानले पाहिजेत.

वेळ ही मोठी देणगी आहे - तुमचे कौशल्य द्या

तुमच्याकडे जे काही कौशल्य असेल, त्यासाठी नेहमीच पैसे मिळण्याची अपेक्षा न ठेवता अधूनमधून ते दान म्हणून द्या. उदा. तुम्ही जर फोटोग्राफर असाल, तर ज्याचे बजेट अगदी टाईट आहे अशा व्यक्तीच्या लग्नाचे फोटो फुकट काढून द्या.

माझी एक मैत्रीण डेकोरेटिव्ह पेन्टर आहे. एका तरुण महिलेच्या घराचे पेन्टिंग करण्यासाठी तिने नुकतेच तीन दिवस घालवले.

आपणा प्रत्येकाला देवाने काही क्षमता, काही कौशल्ये दिली आहेत, आणि एकमेकांच्या फायद्यासाठी आपण त्यांचा उपयोग केला पाहिजे.

एका स्त्रीकडे थोडे पैसे होते, पण तिला मिशनकार्याला आर्थिक मदत करायची इच्छा होती. तिने घरी तयार केलेले खाद्यपदार्थ विकून पैसा उभा केला. तिच्या कथेवरून आपल्या लक्षात येते की, जर आपण काहीही न करायला नकार दिला, तर काही ना काही करण्यासाठी आपल्याला मार्ग मिळेल, आणि जर प्रत्येकजण सहभागी झाला, तर आपल्या जगाने दुष्टाईवर विजय मिळवण्यास फार वेळ लागणार नाही.

काही उद्दिष्टे निश्चित करा

आपण काही उद्दिष्टे निश्चित करावीत. ध्येये निश्चित करणे आणि ती साध्य करण्यासाठी योजना आखणे यावर माझा ठाम विश्वास आहे. तुम्ही तुमच्या पाळकसाहेबांना सुचवू शकता की, रविवारी चर्च सुटल्यानंतर पुढच्या तीन तासात प्रत्येकाने काही ना काही दयाळूपणाचे कृत्ये करावे. जगभरात जर हे सुरू झाले तर काय होईल याची जरा कल्पना करा.

इतरांवरील आपली प्रीती व्यक्त करण्याच्या असंख्य मार्गांपैकी फक्त काहींचा उहापोह मी या प्रकरणात केला आहे. आम्ही काही करू शकत नाही असे म्हणणे खरे नाही. आपण सबबी सांगू, पण सबबी या स्वतःला फसवणे आणि काहीही न

करण्यासाठी स्वतःला निर्दोष सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे याखेरीज दुसरे काही नाही. जगभरातील लक्षावधी लोकांना वाटते की, आपल्यासमोर काही उद्देश नाही, आपल्या जीवनासाठी देवाची काय इच्छा आहे ते समजून घेण्याचा ते प्रयत्न करतात आणि संभ्रमात जगतात.

आपण येशूचे शब्द विसरू नये: "मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी; जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी" (योहान.१३:३४). आपल्या जीवनासाठी देवाचा हा हेतू आणि इच्छा आहे यात काहीही शंका नाही.

प्रकरण

11

लोकांना कशाची गरज आहे ते शोधा आणि त्याच्या उत्तराचा भाग व्हा

"मी सर्वांना सर्व काही झालो आहे."
१ करिंथ.९:२२

पौलाने म्हटले की, मी कोणाच्याही बंधनात नाही, तरी मी स्वतःला सर्वांचा सेवक केले आहे. या विधानाचा तुम्ही विचार केला तर हे फार आश्चर्यकारक विधान आहे हे तुमच्या लक्षात येईल. आपला कोणी गैरफायदा घेईल ही भीती न बाळगता तो सेवक म्हणून स्वतःला द्यायला मुक्त होता. खरे जीवन हवे असेल, तर आपले जीवन दिले पाहिजे हे त्याला माहीत होते. इतरांची सेवा करण्यासाठी, आणि त्यांना सुखी करण्यासाठी जगण्याचा त्याने निश्चय केला. येशूने त्याला दिलेल्या उदाहरणाचे तो अनुकरण करीत होता.

पौल पुढे म्हणाला की, मी यहूद्यांसाठी यहूद्यासारखा, जे नियमशास्त्राच्या अधीन आहेत त्यांच्यासाठी नियमशास्त्राच्या अधीन असल्यासारखा आणि दुर्बळांसाठी दुर्बळासारखा झालो (पाहा १ करिंथ.९:२२). दुसऱ्या शब्दांत लोकांची गरज जशी होती त्यानुसार त्याने स्वतःला केले. त्यांना ख्रिस्तासाठी जिंकण्यासाठी आणि त्यांच्यावरची प्रीती दाखवण्यासाठी आवश्यक ते सर्व त्याने केले. पौल उच्चशिक्षित

होता, पण अशिक्षित लोकांच्या बरोबर असल्यावर त्याने कधी आपल्या पदव्यांचा उल्लेख केला नाही किंवा स्वतःचे ज्ञान प्रगट करणारी भाषणे केली नाहीत. आपण किती उच्चशिक्षित आहोत याचे त्याने प्रदर्शन केले नाही. इतर लोकांना कमीपणा वाटू नये म्हणून असलेला त्याचा निश्चय व त्याची नम्रता पुढील विधानावरून स्पष्ट होते. त्याने लिहिले, "कारण येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला" (१ करिंथ.२:२).

लोकांबरोबर असताना पौल लोकांचे म्हणणे मन लावून ऐकत असे. आपण सर्वांनी असे करण्याची गरज आहे असे मला वाटते, कारण त्यामुळे नातेसंबंधात विलक्षण वाढ होते असा माझा अनुभव आहे. आपण लोकांना जाणून घेतले पाहिजे. त्यांना काय आवडते, काय आवडत नाही, काय हवे, काय नको, त्यांची गरज काय आहे आणि भविष्यासाठी त्यांची स्वप्ने काय आहेत हे आपण शोधले पाहिजे. एखाद्या क्षेत्रात जर ते दुर्बळ असतील आणि आपण बलवान असू, तर आपल्या क्षमतांचा आपण अभिमान न बाळगण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

लोकांना स्वतःविषयी बरे वाटण्यास मदत होतील असे मार्ग शोधा

खाण्याच्या बाबतीत मी स्वतःला शिस्त लावून घेतली आहे. अलीकडेच मी एका महिलेबरोबर एक आठवडा राहिले. तिला खाण्याच्या बाबतीत अजिबात शिस्त नव्हती. माझी शिस्त आणि तिची बेशिस्त यांचा उल्लेख ती बरेचदा करीत असे, तेव्हा तेव्हा मी तिला म्हणत असे, "माझ्यामध्येही काही उणिवा आहेत. आणि तू प्रयत्न आणि प्रार्थना करीत असताना तुझ्या या उणिवेवर विजयी होशील असा माझा विश्वास आहे."

माझ्या जीवनात असाही एक काळ होता, जेव्हा माझ्या मैत्रिणींच्या भावनांबाबत मी इतकी संवेदनशील नसायचे. त्या वेळी मी तिला शिस्तीचे फायदे आणि अधिक खाण्याचे तोटे याविषयी भलेमोठे भाषण दिले असते. पण त्यामुळे फायदा तर काही झाला नसता, पण माझ्या मैत्रिणीच्या भावना दुखावल्या असत्या आणि ती स्वतःला दोषी समजू लागली असती. अतिखाण्याच्या सवयीवर मात करण्यासाठी तिने माझ्याकडे मार्गदर्शन मागितले आणि तिला स्वतःविषयी कमीपणा वाटणार नाही अशा प्रकारे ते मी दिले. माझ्या लक्षात आले आहे की, लोकांना मदत करण्याचा एक मार्ग म्हणजे ज्याविषयी त्यांना अगोदरपासून वाईट वाटते त्याविषयी त्यांना कमीपणा वाटू न देणे.

सौम्यता आणि नम्रता हे प्रीतीचे दोन सुंदर पैलू आहेत. पौल म्हणतो की प्रीती फुगत नाही, गर्व करीत नाही (पाहा १ करिंथ.१३:४). नम्रता सेवा करते आणि नेहमी इतरांना उचलून धरते.

पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते की येशूसारखे नम्र मन आणि चित्तवृत्ती आपण धारण करावी (पाहा फिलिप्पै.२:५). तो देवाच्या स्वरूपाचा होता, तरीपण मनुष्य होऊन आमच्या बदली मरण पत्करावे आणि पाप्यांची शिक्षा स्वतःवर घ्यावी यासाठी त्याने स्वतःला नम्र केले (पाहा फिलिप्पै.२:६-९). लोकांची पातळी त्याच्याएवढी नव्हती म्हणून त्याने कधीही त्यांना कमीपणा वाटू दिला नाही. पौलानेही तसेच केले आणि आपणही पवित्र शास्त्रातील या उदाहरणांचे अनुकरण केले पाहिजे.

आपणा सर्वांना निरनिराळ्या गोष्टींची गरज असते

आपण सर्वजण निराळे आहोत, आणि आपणा प्रत्येकाच्या गरजा निरनिराळ्या आहेत. तुम्हांला जे वाटते ते लोकांना देऊन मोकळे होण्याऐवजी, त्यांची खरी गरज काय आहे ते समजून घेण्यासाठी तुम्ही अधिक प्रयत्न करावा असा आग्रह मी तुम्हांला करते. लोकांशी उत्तेजनपर शब्द बोलणे कदाचित तुम्हांला सोपे वाटत असेल म्हणून प्रत्येकाला उत्तेजन देण्याकडे तुमची प्रवृत्ती असेल. यात वाईट काही नाही, कारण प्रत्येकाला उत्तेजनाची गरज असते. पण ज्या लोकांना तुमच्याकडून वेगळ्या प्रकारच्या मदतीची अपेक्षा असते त्यांनाही तुम्ही केवळ उत्तेजनच द्याल. कदाचित त्यांचे तीन महिन्याचे भाडे थकले असेल. देव गरज पुरवील असे केवळ तोंडी उत्तेजन देण्याऐवजी भाडे भरण्यासाठी तुम्ही मदत करण्याची गरज असेल. तुम्ही आर्थिक मदत करू शकत नसाल, तर ते समजण्यासारखे आहे; पण परिस्थिती कठीण असेल तेव्हा शाब्दिक उत्तेजनासोबत तुम्हांला शक्य असेल ते करण्याचा प्रयत्न करणे चांगले आहे.

कदाचित तुम्हांला लोकांबरोबर वेळ घालवायला आवडत असेल. तुम्हांला त्यांच्याकडे जायला, फोनवर त्यांच्याशी बोलायला किंवा मित्रांना तुमच्या घरी जेवायला बोलवायला आवडत असेल. अशा प्रकारे तुमचा वेळ द्यायचा तुम्ही नेहमी प्रयत्न करीत असाल. पण ज्या लोकांना एकटे राहून शांत राहावे असे वाटत असेल त्यांचे काय? अशा वेळी त्यांना बाहेर जाऊन जेवता यावे म्हणून तुम्ही पैसे दिले आणि त्या वेळेत त्यांच्या मुलांचा सांभाळ केला तर त्यांना किती आनंद होईल! पण तुम्हांला जे आवडते ते त्यांना द्यायचा तुम्ही प्रयत्न करता.

काही लोक खूप खोलात जाऊन विचार करतात. ते पाठवत असलेली पत्रे, ई-मेल्स, व्हॉईस मेसेज यांना जणू अंतच नसतो. ती वाचायची, ऐकायची लोकांना भीतीच वाटते, कारण त्यात खूप वेळ जाईल हे त्यांना माहीत असते. सखोल विचार करून स्वतःला जे आवडते तेच करणाऱ्या या लोकांना मग इतर लोक टाळण्याचा प्रयत्न करतात.

संभाषण करीत असतानादेखील लोकांना काय हवे ते लक्षात घेतले पाहिजे. केवळ आपल्याला जे आवडते तेच लिहिणे किंवा बोलणे टाळले पाहिजे. तुमच्या एखाद्या मित्राला जर तपशीलवार माहिती हवी असेल तर त्याला सांगा, पण एखाद्याला केवळ गोषवारा समजून घ्यायचा असेल, तर त्याला केवळ सारांश सांगा.

मला बक्षिसे द्यायला आवडते, म्हणून माझी प्रीती व्यक्त करण्यासाठी मी नेहमी बक्षिसे देत असते. माझी एक सहाय्यिका होती, मी दिलेली बक्षिसे तिला विशेष आवडत नसत. त्यामुळे ती कृतज्ञशील नाही असे वाटून मला वाईट वाटू लागले. पण मी तिला अधिक चांगल्या प्रकारे ओळखू लागले तेव्हा तिने मला सांगितले की, प्रीतीयुक्त शब्द ऐकायला तिला फार आवडते. ते ऐकण्यासाठी ती भुकेली आहे. बक्षिसे देणे सोपे वाटल्याने मी तिला देत होते, पण वास्तविक तिला शब्द ऐकायची इच्छा होती. कोणी खूप चांगले काम केले तर मी बक्षिस देऊन त्यांचे कौतुक करते, पण तू किती चांगले काम करतेस आणि तुझे मला किती कौतुक वाटते हे मी तोंडाने तिला सांगावे अशी तिची इच्छा होती. तिला पाठीवर शाबासकीची थाप हवी होती. बक्षिसे देऊन मी तिच्यावरची प्रीती दाखवण्याचा प्रयत्न करीत होते, पण त्यामुळे तिला आपण प्रिय आहोत असे वाटत नव्हते. मला वाटते की आपल्याकडून पुष्कळदा असे घडते, कारण लोकांना खरोखर काय हवे आहे याचा विचार न करता आपण आपल्याला बरे वाटेल ते देण्याचा प्रयत्न करतो.

सर्वांनी एकसारखे असण्याची अपेक्षा करतो तेव्हा ते जसे नाहीत तसे होण्याचा दबाव आपण त्यांच्यावर टाकतो. आपली प्रत्येक गरज देव कृपेने पुरवतो. लोक जसे आहेत तसाच आपण त्यांचा स्वीकार केला, तर योग्य समयी योग्य देणग्या देणारे लोक तो आमच्या जीवनात आणतो.

लोकांचा अभ्यास करा

लोकांना माझ्याकडून काय हवे आहे ते समजून घेण्यासाठी मी लोकांचा अभ्यास केला तेव्हा माझ्यासाठी तो डोळे उघडणारा अनुभव ठरला. उदा. माझ्या पतीला आदर हवा

असतो, आणि माझी काळजी घेण्याचे काम तो चांगल्या प्रकारे करीत आहे असे मला वाटणे हे त्याच्यासाठी महत्त्वाचे आहे. त्याला शांत वातावरण आवडते. त्याला सर्व प्रकारचे खेळ आवडतात आणि गोल्फ खेळायला वेळ हवा असतो, चेंडूने खेळले जाणारे खेळ पाहायला त्याला आवडते. हे सर्व मी त्याला दिले तर तो खूप खूष, आनंदी असतो.

त्याउलट, माझी सेवा केलेली, मदत केलेले मला फार आवडते. माझे जीवन सुखावह व्हावे म्हणून कोणी काही केले तर माझ्यासाठी ते फार महत्त्वाचे असते. जेवण झाल्यावर माझा नवर नेहमीच किचन साफ करतो म्हणून मी बसून आराम करू शकते. एखादी जड वस्तू वाहण्यासारखे कठीण काम मी करीत असल्याचे तो पाहतो तेव्हा ताबडतोब मला ते खाली ठेवायला सांगतो आणि माझ्यासाठी तो ते काम करतो. या गोष्टींमुळे मी हवीहवीशी आणि मोलवान आहे असे मला वाटते. एकमेकांना काय हवे ते समजून घेणे आणि ते देण्यास तयार असणे यामुळे आमचे नातेसंबंध खूप चांगले, खूप दृढ झाले आहेत.

माझी मुलगी सॅन्ड्रा हिला मी तिच्यासोबत वेळ घालवलेला आणि तिला उत्तेजन दिलेले आवडते. माझी दुसरी मुलगी सॅन्ड्रा हिलाही उत्तेजनाचे शब्द हवे असतात, पण माझ्यासोबत वेळ घालवणे तिच्या दृष्टीने तितकेसे महत्त्वाचे नाही. दोन्ही मुली माझ्यावर खूप प्रीती करतात, पण त्यांची प्रीती त्या निराळ्या प्रकारे दाखवतात. सॅन्ड्रा मला जवळजवळ रोज फोन करते आणि ती व तिचे कुटुंब नेहमी आमच्यासोबत जेवायला येते. लॉरा सॅन्ड्राप्रमाणे नेहमी फोन करीत नाही, आणि तिच्यासारखी मला वरचेवर भेटतही नाही. तिची चार मुले व सासू यांची तिला काळजी घ्यायची असते तरी पण माझी वयोवृद्ध आई व आंटी या दोघींची काळजी घ्यायला ती मला मदत करते. त्यांचे सामान आणून देणे, त्यांच्या बँकेची कामे करणे, त्यांची बिले भरणे इ. कामे ती करते.

मला दोन मुले आहेत. दोघेही खूप चांगले आहेत, पण दोघांचेही स्वभाव निराळे आहेत. एकजण रोज मला फोन करतो व मी तुझ्यावर प्रीती करतो असे सांगतो; दुसरा नेहमी फोन करीत नाही, पण त्याची प्रीती वेगळ्या प्रकारे दाखवतो. त्यांच्यापैकी कोणालाही मी माझ्यासाठी काही करायला सांगितले तर दोघेही ते करतात किंवा करवून घेतात. माझा मुद्दा हा आहे की, माझी चारही मुले वेगवेगळी आहेत, पण खूप चांगली आहेत.

माझ्या प्रत्येक मुलाला माझ्याकडून जे हवे ते त्यांना देता यावे म्हणून मला त्यांचाही अभ्यास करावा लागला. एकाला बक्षिसे घ्यायला आवडते, तर दुसऱ्याला

माझ्यासोबत वेळ घालवायला आवडते, एकाला उत्तेजनपर शब्द हवे असतात, तर एकाला कौतुक हवे असते. मी अजूनही शिकत आहे, पण माझ्याऐवजी त्यांना खूष करायचा मी प्रयत्न करीत आहे.

आपणा प्रत्येकाची "प्रीतीची म्हणून एक भाषा" असते. डॉ. गॅरी चॅपमन यांनी त्यांच्या द फाईव्ह लव्ह लँग्वेजेस या पुस्तकात याविषयी स्पष्टीकरण केले आहे. व्यक्तीची प्रीतीची भाषा म्हणजे ज्या प्रकारे ती व्यक्ती प्रीती दाखवते किंवा स्वीकारते. मी सांगितल्याप्रमाणे सेवेची कृत्ये ही माझी प्रीतीची भाषा आहे, तर तिच्याबरोबर वेळ घालवणे ही माझ्या मुलीची प्रीतीभाषा आहे. आपल्या विशिष्ट भाषेत लोक आपल्याशी बोलतात तेव्हा आपण हवेहवेसे आहोत, लोकांची आपल्यावर प्रीती आहे असे वाटते आणि आपण दुसऱ्या कोणाच्या तरी प्रीतीभाषेत बोलतो तेव्हा त्यांना आपण प्रिय आहोत असे वाटते. पुष्कळदा आपल्याला जे हवे असते ते आपण लोकांना द्यायचा प्रयत्न करतो - आपल्या प्रीतीभाषेत आपण त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करतो, पण ती मोठी चूक ठरू शकते. आपल्याला जे हवे ते जर त्यांना नको असेल तर आपण कितीही परिश्रम केले तरी आपल्यावर कोणाची प्रीती नाही असेच त्यांना वाटेल.

तसेच मी हेही शिकायचा प्रयत्न करीत आहे की, एखाद्या व्यक्तीकडून मला जी गोष्ट हवी आहे ती कदाचित आता त्याच्याकडे/तिच्याकडे नसेल. मला जे हवे ते देवाने निवडलेल्या लोकांकडून मला मिळावे म्हणून प्रार्थना करायला शिकेपर्यंत अनेक वर्षे मी निराशेत घालवली. तोपर्यंत मी जे योग्य ते करीत राहते आणि मला सर्व मिळते म्हणून नव्हे, तर लोकांना जे हवे ते देऊन माझ्या आनंदात वाढ करते. ही त्यागाची भूमिका मला नेहमीच आवडते असे नाही, पण मी जे करावे असे देवाला वाटते ते करण्यामुळे मिळणारे आंतरिक समाधान मला आवडते.

तुमच्या जीवनात येणाऱ्या लोकांना काय हवे याचा शोध तुम्ही घेतला का, आणि ते त्यांना द्यायला तुम्ही तयार आहात का? तुम्हांला काय हवे असे तुम्ही त्यांना कधी विचारले का? आता स्वार्थीपणे राहणे आणि आपल्याला सोयिस्कर वाटेल तेच करणे थांबवण्याची वेळ आहे. देवाने आमच्या जीवनात आणलेले लोक आपण समजून घेतले पाहिजेत आणि आपल्या नव्हे तर त्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची गरज आहे.

इतरांच्या गरजा पुरवा

पवित्र शास्त्र शिकवते की, आपण जर विश्वासात दृढ असू तर आपण आपले स्वतःचेच सुख पाहण्यासाठी झटू नये, तर इतरांच्या दुर्बलता सहन कराव्या. प्रत्येकाने आपल्या

शेजाऱ्याचे भले व्हावे म्हणून त्यांना सद्बोध करण्यासाठी, त्यांची उभारणी करण्यासाठी प्रयत्न करावा (पाहा रोम.१५:१-२). हा सुंदर सल्ला आहे, पण आपण नेहमी याच्या विरुद्ध वागतो. इतरांनी आपल्याला सुखी करावे, आपल्याला जे आवडते ते करावे असे आपल्याला वाटते. त्याचा परिणाम असा होतो की, लोकांनी काहीही केले तरी आपल्याला आनंद होत नाही, समाधान होत नाही.

मनुष्याचे मार्ग उपयोगाचे नाहीत. आपल्याला खरोखर जे हवे आहे ते ते देत नाहीत, पण देवाचे मार्ग नेहमीच कार्य करतात. तो सांगतो त्याप्रमाणे आपण करू, तर आपल्याला काही त्याग करावा लागेल, पण त्यामुळे आपल्याला जो आनंद मिळेल तसा आनंद देवाच्या इच्छेमध्ये असल्याशिवाय इतरत्र कोठेही मिळत नाही.

उत्तर द्यायला कठीण, पण इतर लोकांवर प्रीती करण्याच्या बाबतीत तुम्ही नक्की कोठे आहात याची तुम्हांला स्पष्ट जाणीव करून देणारे काही प्रश्न तुम्ही प्रामाणिकपणे स्वतःला विचाराल का?

- उत्तर द्यायला कठीण असे पुढील काही प्रश्न तुम्ही स्वतःला विचारून त्यांची प्रामाणिकपणे उत्तरे द्याल का?
- इतरांसाठी तुम्ही किती करता?
- तुम्हांला लोकांना मदत करता यावी म्हणून त्यांच्या गरजा काय आहेत, त्यांना काय हवे याचा शोध घेण्याचा प्रयत्न तुम्ही करता का?
- तुमच्या जीवनात येणाऱ्या व्यक्तींना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी तुम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहात का?
- तुमच्या स्वतःच्या कुटुंबातील लोकांना तुम्ही किती चांगल्या प्रकारे ओळखता?

काही वर्षांपूर्वी मी या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला तेव्हा कित्येक वर्षे मी ख्रिस्ती सेविका असूनही माझ्यामध्ये किती स्वार्थीपणा आहे हे लक्षात येऊन मी अवाक् झाले होते. हे सत्य समजल्यामुळे सुखी होण्याचे प्रत्येक कारण माझ्याकडे असूनही मी अजून का दुःखी, असमाधानी आहे याविषयी माझे डोळे उघडू लागले. मी स्वार्थी, स्वकेंद्रित होते आणि माझ्यात बदल होण्याची गरज होती. हे बदल सहजासहजी किंवा झपाट्याने होत नाहीत, तसेच ते पूर्णही होत नाहीत, पण मी प्रगती करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि मी नेहमी आनंदित असते.

ऐकायला शिका

माझ्या स्वार्थीपणाविरुद्ध लढण्याचा आणि प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होण्याचा निश्चय मी केला, तेव्हा इतरांसाठी आशीर्वाद होण्यासाठी मला सर्जनशील मार्गांची

गरज भासली. लोक भिन्न आहेत, आणि त्यांच्या गरजाही निरनिराळ्या असतात म्हणून ते मला काय सांगतात ते खऱ्या अर्थाने ऐकण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी मी स्वतःला प्रशिक्षण देऊ लागले. मी कोणाशी जास्त वेळ बोलले तर त्याला/तिला काय हवे, त्यांची प्रार्थनेची विनंती काय हे मला समजते हे माझ्या लक्षात आले आहे. "काय करावे हे मला समजत नाही" ही सबब आता जुनी झाली असून ती आता कचरापेटीत टाकण्याची गरज आहे. जर आपल्याला खरोखर द्यायची इच्छा असेल तर आपल्याला मार्गही मिळेल. लक्षात ठेवा, "उदासीनता सबबी सांगते, पण प्रीती मार्ग शोधते!"

> "उदासीनता सबबी सांगते, पण प्रीती मार्ग शोधते!"

आपल्यावरील प्रीती ज्या प्रकारे व्यक्त केली जावे असे लोकांना वाटते ते समजून घेण्यासाठी ऐकणे फार महत्त्वाचे आहे असे मला वाटते. एक आठवड्याचा वेळ काढा आणि लोकांशी संभाषण करीत असताना त्यांच्या गरजांविषयी, आवडीनिवडीविषयी तुम्हांला काय समजले ते लिहून काढा. या यादीवर प्रार्थना करा आणि यांपैकी कोणती गोष्ट मी करावी अशी तुझी इच्छा आहे असे देवाला विचारा. त्यांपैकी एखादी गोष्ट करायची तुमची इच्छा असेल तर ती करा. लोकांना आशीर्वादित करण्यासाठी तुम्हांला देवाकडून विशेष मार्गदर्शनाची गरज आहे असे मला वाटत नाही. त्यांना जे हवे ते करणे तुमच्या आवाक्याबाहेर असले तर तुम्ही इतर लोकांचे सहकार्य घेऊन ही गरज भागवण्याचा प्रयत्न करावा असे मी सुचवते.

माझी एक मैत्रीण एकदा चर्चमधील एका तरुणाविषयी मला सांगत होती. त्याचे दात खूप वेडेवाकडे होते. ते कोणाला दिसू नयेत म्हणून तो हसणे टाळत असे. ही गोष्ट ऐकून मला वाईट वाटले आणि त्याचे दात नीट करण्यासाठी आम्ही निधी उभा करू शकलो. त्यामुळे त्याचे जीवन बदलले. हे सर्व आम्ही आमची नावे उघड न करता केले. अशा प्रकारची कथा आपण कितीदा ऐकतो, आपल्याला कळवळा येतो आणि तरीदेखील कशा प्रकारे मदत करता येईल याचा जराही विचार न करता निघून जातो? असे पुष्कळदा घडते असे मला वाटते. आपल्याला शिक्षण आणि पुन्हा प्रशिक्षणाची गरज आहे. नवीन सवयी अंगी बाणवून घेण्याची गरज आहे. आपण काही करू शकत नाही असे गृहीत धरण्याऐवजी किमान आपण त्याविषयी विचार केला पाहिजे.

१ योहान.३:१७ काय सांगते ते लक्षात ठेवा : "आपल्याजवळ संसाराची साधने असून व आपला बंधु गरजवंत आहे हे पाहून जो स्वतःला त्याबद्दल कळवळा येऊ देत नाही त्याच्या ठायी देवाची प्रीती कशी राहते?"

माझ्या ऐका मैत्रिणीला स्कीन केअर प्रॉडक्ट्सची गरज आहे हे मी ऐकले. माझ्याकडे एक्स्ट्रा सेट होता, तो मी तिला दिला. माझ्याकडचा परफ्युम संपला असे माझ्या आईने म्हटले तेव्हा मी तिला बाटली दिली. माझ्या आंटीला स्टारबक्स दुकांनामध्ये जायला आवडते तेव्हा मी तिला गिफ्ट कार्ड दिले. हे सर्व मी तुम्हांला केवळ एवढ्यासाठीच सांगत आहे की, तुमची प्रीती व्यक्त करण्यासाठी तुम्हांला निरनिराळ्या कल्पना सुचाव्यात. तुमच्याकडे पुष्कळ कल्पना आहेत याची मला खात्री आहे, म्हणून लव्ह रिव्होल्यूशनच्या वेबसाईटवर जाऊन तुमच्या कल्पना सांगायला विसरू नका.

आपण एखाद्या व्यक्तीचे जीवन सुधारण्यासाठी काही करतो, किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो तेव्हा या आशाहीन समाजात आपण आशेची लहर सोडतो. आपण बऱ्याने वाईटाला जिंकू शकतो, म्हणून आपण न थकता प्रयत्न करीत राहू या.

प्रकरण

12

विनाअट प्रीती

प्रीती आंधळी नसते - तिला कमी नाही, तर जास्त दिसते
राब्बी ज्युलियस गॉर्डन

पवित्र शास्त्र एक फार सुंदर गोष्ट सांगते. ती म्हणजे आपण पापी असताना ख्रिस्त आपणांसाठी मरण पावला (पाहा रोम.५:८). आपण त्याच्या प्रीतीला पात्र होईपर्यंत तो थांबला नाही; तो कसल्याही अटीशिवाय आपल्यावर प्रीती करतो. जीवनात कोणतीही गोष्ट मिळवण्यासाठी पात्र होण्याची, ती गोष्ट कमवण्याची आपल्याला इतकी सवय झालेली आहे की, हे समजणे आपल्यापैकी पुष्कळजणांना फार कठीण जाते.

देव कृपाळू आहे, आणि त्याची आपल्यावर असणारी महान, गाढ अद्‌भुत प्रीती पूर्ण करण्यासाठी त्याने आपले जीवन आमच्यासाठी फुकट दिले (पाहा इफिस.२:४). ही क्रांतीकारी प्रीती आहे! खऱ्या क्रांतीकारी प्रीतीने स्वतःला दिले पाहिजे, कारण त्यापेक्षा कमी करण्याने तिला कधीही समाधान होणार नाही.

देवाची विनाअट प्रीती आपल्याला त्याच्याकडे खेचते, आणि त्याच्या नावात आपण इतरांवर केलेली विनाअट प्रीती त्यांना देवाकडे आणील. त्याच्याऐवजी आपण लोकांवर प्रीती करावी, आणि तो देहरूपाने येथे असताना त्याने जे केले तसेच आपण करावे ही त्याची इच्छा आहे. आपण प्रीतीची क्रांती जगावे ही त्याची इच्छा आहे.

सहाव्या प्रकरणात माझ्या वडिलांविषयी सांगितलेली गोष्ट तुमच्या लक्षात असेल, ते पात्र नसतानाही त्यांची काळजी घ्यायला देवाने मला व डेव्हला कसे सांगितले हे तुमच्या लक्षात असेल. देवाची विनाअट प्रीती त्यांना दाखवल्याने त्यांचे अंतःकरण मृदू झाले, त्यांनी आपल्या पापांचा पश्चात्ताप केला आणि येशूला आपला तारणारा म्हणून स्वीकारले.

विनाअट प्रीती करणे, मानवी प्रीतीला अशक्य वाटते. पण येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या तुमच्या आणि माझ्यामध्ये देवाची प्रीती आहे, आणि प्रीतीचा तो प्रवाह आपण कोणत्याही अटींशिवाय वाहू दिला पाहिजे. माणसाची प्रीती अपयशी होते, पण देवाची प्रीती नाही. माणसाची प्रीती संपते, पण देवाची प्रीती संपत नाही. कधी कधी माझ्या लक्षात येते की, मानवी शक्तीने मी एखाद्या व्यक्तीवर प्रीती करू शकत नाही, पण देवाच्या प्रीतीने ते शक्य होते.

बरीच वर्षे मला वारंवार दुखावणाऱ्या एका व्यक्तीने अलीकडेच मला विचारले की, "माझ्याविषयी तुम्हांला काय वाटते? माझ्यावर तुमची प्रीती आहे का?" मी त्यांना प्रामाणिकपणे सांगू शकले की, तुमच्याविषयी माझ्या मनात फार आवडीच्या भावना आहेत असे नाही, पण देवाचे मूल या नात्याने माझी तुमच्यावर प्रीती आहे, आणि तुमच्या गरजेच्या प्रसंगी मी तुम्हांला मदत करीन.

देवाची खरी प्रीती भावनांवर अवलंबून नसते. ती निर्णयावर अवलूंन असते. मदत केल्यामुळे अंतिमतः कोणा व्यक्तीचे नुकसान होणार नसेल तर मदतीची गरज असलेल्या कोणालाही मी मदत करीन. पुष्कळदा मी असा विचार करते की, मदतीसाठी ते जितके अपात्र असतील तितकी ती मदत सुंदर आणि प्रभावी होईल. लोक मदतीला पात्र आहेत की नाहीत याचा विचार न करता मदत करणे हे खरोखर बंधमुक्त करणारे, मोकळेपणाचे आहे.

क्षमाशीलता

हे म्हणजे खूपच झाले... ज्याने थंड डोक्याने बील एबार्बचा खून केला त्याला बील क्षमा तरी कशी करू शकतो? बिल एबार्ब आणि चार्लस् मॅन्युएल एकमेकांना ओळखत नव्हते, पण एका क्षणात त्यांची जीवने एकमेकांत गुंफली जाणार होती. तो क्षण म्हणजे चार्लस्ने बंदुकीचा घोडा दाबून बिलचा भाऊ जॉन याची हत्या केली तो! त्या क्षणापासून बिलच्या डोक्यात सूडाशिवाय दुसरा विचारच नव्हता.

बिल रागाने वेडापिसा झाला होता, आणि चार्लस्‌ला मिळालेल्या कोणत्याही शिक्षेने आपले नुकसान भरून येणार नाही असे त्याला वाटे. जॉनचा खून झाल्यावर, बिलने खुन्याचा विचार केला नाही असा एकही दिवस गेला नाही. हा भयंकर द्वेष त्याला आतून पोखरत होता. त्याची नोकरी सुटली, त्याचा विवाह तुटला. या भयंकर मार्गात आपण असेच चालत राहिलो, तर आपल्याला जिवाला मुकावे लागेल हे त्याच्या लक्षात आले.

त्या वेळी बिलच्या जीवनात आलेला बदलाचा अनुभव हा त्याच्या भावाच्या खुनाच्या अनुभवापेक्षा जोरदार होता. बिलने ख्रिस्ताच्या क्षमाशीलतेचा अनुभव घेतला. हे अलौकिक असे काहीतरी होते, मनुष्याच्या क्षमाशीलतेच्या पलीकडचे होते. त्याच्यामध्ये असलेला द्वेष, राग देवाने दूर केला.

बिलच्या अंतःकरणात इतका बदल झाला की, तो अशक्य गोष्टीचा विचार करू लागला. जीवनात मी केलेल्या सर्व गोष्टींविषयी देव जर मला क्षमा करू शकतो तर मी चार्लस्‌ला क्षमा केली पाहिजे आणि तू माझ्या भावाचा खून केलास, त्याबद्दल मी तुला क्षमा करतो असे त्याला सांगितले पाहिजे हे त्याच्या लक्षात आले. प्रथम ही केवळ आज्ञाधारकतेची बाब होती, पण नंतर ती हृदयाची बाब झाली. म्हणून जॉनच्या मृत्यूनंतर अठरा वर्षांनी बिल आणि चार्ल्स एकत्र बसले आणि देवाने त्या दोघांच्या जीवनात जे केले त्याला पुष्टी दिली. क्षमाशीलतेच्या सामर्थ्याने देवाने या दोघांनाही बंधमुक्त केले होते.

आकडेवारी सांगते :

- क्षमाशीलतेमुळे ताण कमी होतो. मनात अढी बाळगल्याने तुमच्या शरीरावर ताण निर्माण होतो - स्नायू ताठरतात, ब्लड प्रेशर वाढते, खूप घाम येतो.
- तुम्ही क्षमा करू शकला तर तुमच्या हृदयाला फायदा होईल. क्षमाशीलता आणि तुमच्या हृदयाचे ठोके व ब्लड प्रेशर यात संबंध असल्याचे अभ्यासाअंती दिसून आले आहे.
- अलीकडच्या एका संशोधनात असे आढळले की, ज्या स्त्रिया आपल्या नवऱ्यांना क्षमा करू शकल्या आणि त्यांच्याशी दयाळूपणे वागू शकल्या, त्या अधिक प्रभावीपणे प्रश्न सोडवू शकल्या.

मानवी प्रीती भावनांवर अवलंबून असते. जे लोक आपल्याशी चांगले वागले, ज्यांनी आपल्याला मदत केली, किंवा अगोदर आपल्यावर प्रीती केली त्यांच्यावर आपण प्रीती करतो. ते आपल्याला स्वतःविषयी बरे वाटू देतात, किंवा आपले जीवन सुलभ करतात म्हणून आपण त्यांच्यावर प्रीती करतो असे म्हणतो. किंवा त्यांनी आपल्यावर प्रीती करावी म्हणून आपण त्यांच्यावर प्रीती करतो. पण या प्रकारची प्रीती ते काय करतात यावर अवलंबून असते, आणि ते जर तसे करणे थांबवतील तर कदाचित आपणही त्यांच्यावर प्रीती करणे थांबवू. अशा प्रकारची प्रीती येते आणि जाते, ती प्रथम गरम असते, मग थंड होते. जगात आपण अशा प्रकारच्या प्रीतीचा अनुभव घेतो. पुष्कळ विवाह आणि इतर नातेसंबंध अशा प्रकारच्या प्रीतीवर अवलंबून असतात. आईसक्रीमची चव चांगली असते म्हणून आपल्याला ते आवडते, आणि लोक आपल्याला नाताळाची बक्षिसे देतात म्हणून आपण त्यांच्यावर प्रीती करतो.

देवाची प्रीती पूर्णपणे वेगळी आहे - ती देवाशिवाय दुसऱ्या कशावरही अवलंबून नाही. आपला तारणारा म्हणून आपण ख्रिस्ताचा स्वीकार करतो तेव्हा पवित्र आत्मा देवाची प्रीती आपल्या अंतःकरणात ओततो (पाहा रोम.५:५). आपण देवाबरोबर सहकारी होतो तेव्हा आपण पृथ्वीवर त्याचे प्रतिनिधी व्हावे ही त्याची इच्छा असते. आपल्याकडून तो ज्या कामाची अपेक्षा करतो ते पूर्ण करण्यासाठी तो प्रीतीने आपल्याला सज्ज करतो. मानवी प्रीती संपते, आणि ती नेहमी संपते, तेव्हा कामगिरी पूर्ण करण्यासाठी देवाची प्रीती उपलब्ध असतेच.

मुलीने आपल्या वडिलांवर प्रीती करावी तशी मी माझ्या वडिलांवर करीत नसे, कारण ते माझ्याशी वडीलपणाने कधीच वागले नाहीत. पण माझ्यामध्ये देवाची प्रीती होती आणि त्यांच्या वृद्धापकाळात त्यांच्याशी दयेने, प्रीतीने वागण्याचा निर्णय मी घेऊ शकले. त्यांनी आपले सर्व आयुष्य वाया घालवले आणि दुःखद आठवणींशिवाय त्यांच्याकडे काही नव्हते म्हणून मला त्यांचा कळवळा वाटला.

क्षमाशीलतेच्या अद्‌भुत गोष्टी आपण नेहमी ऐकतो. एका तरुणाची गोष्ट मी ऐकली. त्याने दारू पिऊन गाडी चालवली आणि अपघात करून एका माणसाची पत्नी आणि मुलगा यांना ठार केले. हा अपघात घडवणाऱ्या तरुणाला क्षमा करावी ही देवाची इच्छा आहे हे त्या माणसाला माहीत होते. पुष्कळ प्रार्थना केल्यावर तो देवाच्या प्रीतीला स्वतःमधून प्रवाहीत करू देऊन त्याला क्षमा करू शकला. हा मनुष्य प्रीतीचा क्रांतीकारक होता.

लोकांनी आम्हांला काय केले हे पाहण्यापेक्षा त्यांनी स्वतःला काय केले हे पाहायला आपण शिकले पाहिजे. सर्वसाधारणपणे एखादी व्यक्ती दुसऱ्याला दुखावते

तेव्हा त्याने/तिने स्वतःलाही तितकेच दुखावलेले असते, आणि त्याच्या यातना त्यांनाही होत असतात. "हे बापा, ह्यांना क्षमा कर, कारण हे काय करतात ते त्यांना समजत नाही," (लूक२३:३४) असे येशूने म्हटले तेव्हा त्याने नेमके हेच केले.

देवाची प्रीती आपण मनाने समजून घेऊ शकत नाही, ती अंतःकरणाची बाब आहे. आम्ही पाप करीत असताना आणि त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत असताना देवाने आमच्यावर प्रीती करण्याचे काही कारण नाही, तरीपण तो प्रीती करतो.

कृपा न्यायावर विजय मिळवते

एखादी व्यक्ती किंवा परिस्थितीचा न्याय करणे सोपे आहे, पण कृपा ही त्यापेक्षा अधिक आहे. तिसऱ्या जगातील (गरीब देशांतील) लोकांना मदत करायची असेल, तर ते मूर्तींची, प्राण्यांची, सूर्यांची किंवा भुतांची पूजा करतात या गोष्टींकडे मी लक्ष देणार नाही. "त्यांची उपासमार होत आहे, यात काहीच आश्चर्य नाही, कारण त्यांनी देवाकडे आपली पाठ फिरवली आहे," असे मी सहज म्हणून शकेन. पण ते जेथे जन्मले आहेत तेथेच माझाही जन्म झाला असता तर माझीही स्थिती त्यांच्यासारखीच झाली असती. "माझ्यावर देवाची कृपा झाली नसती, तर मीही त्यांच्यासारखाच झालो असतो/असते" याचे आपण स्वतःला नेहमी स्मरण दिले पाहिजे.

एड्स झालेल्या एखाद्या पुरुषगामी माणसाकडे पाहून *त्याची हीच लायकी आहे* असे एखादा धार्मिक माणूस सहजपणे म्हणू शकतो. पण देव याच दृष्टीकोनातून त्याच्याकडे पाहतो का? का देव त्यामागचे खरे कारण पाहतो? मनुष्य श्वासोच्छ्वास घेतो तोपर्यंत देव आपला उद्धारक हात त्याच्याकडे लांब करतो - तुम्ही आणि मीही तसेच करावे ही त्याची इच्छा आहे. आपण इतरांच्या पापांचा स्वीकार करावा असा याचा अर्थ होत नाही, तर लोकांचा स्वीकार करून त्यांना औषधे, निवारा, प्रेमाचे शब्द यांनी मदत करावी व देवामध्ये आशा शोधण्यास मदत करावी.

कृपा आणि कळवळा हे प्रीतीचे दोन सर्वांत सुंदर पैलू आहेत, त्यांच्याशिवाय खरी प्रीती असूच शकत नाही. माझ्या आयुष्याच्या सुरुवातीच्या तीस वर्षांत प्रत्येक गोष्ट मला मिळवावी लागल्यामुळे कष्ट करून जे मी मिळवले ते इतरांना द्यायला मी तितकीशी उत्सुक नसायची. माझी मानवी प्रीती आणि माझ्यामध्ये ठेवलेली देवाची प्रीती यांतील फरक समजून घ्यायला मला थोडा वेळ लागला. कृपेसाठी आपण पात्र असण्याची किंवा आपण ती कमवण्याची गरज नसते. "प्रीती परिधान करा" असे

पौलाने कलस्सैकरांस सांगितले (पाहा कलस्सै.३:१४). परिधान करणे हा शब्दप्रयोग मला आवडतो. याचा अर्थ भावनांवर अवलंबून न राहता किंवा कारणांचा शोध न घेता एखादी गोष्ट काहीतरी उद्देशाने करणे. या छोट्याशा वाक्यप्रयोगामुळे जीवनात मी अनेक महत्त्वपूर्ण पाठ शिकले.

आता मी हे लिहीत असताना दुपारची वेळ आहे. मी अजून पायजम्यातच आहे. डेव्हने मला फोन केला आणि मला तुला मस्टँग कार शोला घेऊन जायचे आहे असे म्हटले. या कार शोला जाणे ही प्रीतीची कृती होईल. कारण उठून तयार होण्याची माझी इच्छा नाही. आहे तशीच बसून काम करायला मला आवडेल, पण मी जाईन. विनाअट प्रीती परिधान करण्याच्या अशा अनेक संधी आपणा सर्वांना मिळतील.

आपल्या भावनांच्या पलीकडे जगायला आपण जोपर्यंत शिकत नाही, तोपर्यंत देवाच्या प्रीतीने आपण लोकांवर प्रीती करू शकणार नाही, किंवा गरजू लोकांना मदत करू शकणार नाही. तुम्ही कृपा परिधान करायला तयार आहात का? तुम्ही प्रीती परिधान करायला तयार आहात का? योग्य गोष्ट करण्यापासून तुम्हांला रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या भावनांशी जर तुम्ही झगडत असाल तर स्वतःला विचारा, "अशा प्रसंगी येशूने काय केले असते?" डेव्हने माझी आशा सोडून दिली असती, तर आज मी जी आहे ती नसते यात काहीच शंका नाही. त्याने माझ्या भावना नाही, तर माझ्या अंतःकरणाचे ऐकले, आणि मी तुम्हांला तेच करायला उत्तेजन देत आहे.

प्रीती केवळ बाजूने निघून जात नाही

लोकांवर प्रीती करणे म्हणजे त्यांना आपला गैरफायदा घेऊ देणे असे नाही. त्यांनी काहीही न करता त्यांना जीवनाचा मोफत आनंद लुटू देणे असा याचा अर्थ नाही. पवित्र शास्त्र सांगते की, देव ज्यांच्यावर प्रीती करतो त्यांना शिस्त लावतो आणि त्यांच्यात सुधारणा करतो (पाहा इब्री.१२:६). सुधारणूक म्हणजे शिक्षा नव्हे. ते योग्य वागणुकीचे प्रशिक्षण आहे. या प्रशिक्षणामध्ये कधी कधी आशीर्वाद रोखून धरण्याची गरज असते, पण आपण देवाकडे याचना केली तर देव आपल्या मूलभूत गरजांची नेहमीच पूर्तता करतो. पवित्र शास्त्र सांगते की आपल्याला सर्व प्रकारच्या परीक्षांना तोंड द्यावे लागेल. आपल्याला सुज्ञता हवी असेल तर आपण ती देवाकडे मागावी, आपल्याला दोष न देता तो देईल (पाहा याकोब.१:१-५). हा फार सुंदर विचार आहे.

मादक पदार्थांचे व्यसन असलेल्या व्यक्तीला मी कार विकत घेऊन देणार नाही, कारण आपले व्यसन भागवण्यासाठी तो कार विकील हे मला माहीत आहे, पण मी

त्याला जेवण देऊ शकेन, आंघोळीसाठी जागा देऊ शकेन आणि नवीन जीवनाची आशा देऊ शकेन. देव तुझ्यावर प्रीती करतो आणि तुला मदत करू इच्छितो असे सांगू शकेन. मी त्याचा न्याय करणार नाही, कारण मी त्याचा न्याय केला तर त्याच्यावर प्रीती करू शकणार नाही.

पुष्कळदा लोक आपल्याला दुखावतात किंवा त्यांच्याशी जुळवून घेणे कठीण जाते तेव्हा आपण त्यांना आपल्या जीवनातून बाहेरकाढू इच्छितो. पण त्याऐवजी आपण त्यांच्याशी चांगले नातेसंबंध प्रस्थापित करावेत अशी देवाची इच्छा असेल तर काय? बाजूने निघून जाणे किंवा लोकांना आपल्या जीवनाचे दरवाजे बंद करणे सोपे आहे, पण देवाची तशी इच्छा नसते. प्रत्येक परिस्थितीत प्रीती नक्की कशी दिसते हे आपण शिकले पाहिजे आणि भावनांचा अडसर न आणता ते लागू केले पाहिजे.

विनाअट प्रीतीविषयी मी लोकांशी चर्चा करते तेव्हा मला एक प्रश्न विचारला जातो, ''लोकांनी काहीही केले तरी मी देत राहावे काय?'' या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. समजा, कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला मादक पदार्थांचे म्हणजे ड्रग्जचे आणि दारूचे व्यसन आहे, त्यासोबतच तो बेजबाबदार आहे. त्याला मदत करण्यासाठी कुटुंब खूप वेळ, पैसा खर्च करते आणि खूप प्रयत्न करते. पण तो पुन्हा आपल्या व्यसनांकडे आणि जीवनशैलीकडे जातो. या परिस्थितीत सैतान कुटुंबातील लोकांच्या दुर्बलतांचा फायदा घेतो, त्याच्यावर प्रीती करणाऱ्यांची आणि त्याला मदत करू इच्छिणाऱ्यांची शक्ती हिरावून घेतो. आपण एखाद्याला कितीही मदत केली, तरी आपल्याला मदत करावी असे जोपर्यंत त्या व्यक्तीला वाटत नाही, तोपर्यंत काही उपयोग नाही ही वस्तुस्थिती आपण लक्षात घेतली पाहिजे. पुष्कळदा अनेक वर्षे वैयक्तिक त्याग करून मदत करण्याचा प्रयत्न केल्यावर शेवटी कुटुंब मदत करायला नकार देते. हा निर्णय लगेच किंवा सहजासहजी घेता येण्यासारखा नाही, पण तो घ्यावा लागतो.

विनाअट प्रीतीविषयी मी लोकांशी चर्चा करते तेव्हा नेहमीच उपस्थित होणारा दुसरा प्रश्न म्हणजे, ''लोकांनी काहीही केले तरी मी केवळ देतच राहावे का?'' या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. समजा, कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला बऱ्याच वर्षांपासून किंवा तिला/त्याला समजू लागल्यापासून दारूचे आणि ड्रगचे व्यसन आहे, त्यासोबतच ती व्यक्ती एकदम बेजबाबदार आहे. त्याला मदत करण्यासाठी त्याचे कुटुंबिय पुष्कळ वेळ, पैसा खर्च करतात, खूप प्रयत्न करतात, पण थोड्या दिवसांनी तो मनुष्य पुन्हा आपल्या जुन्या सवयीकडे आणि जीवनशैलीकडे जातो. ही एक अशी परिस्थिती असते की, या व्यक्तीवर प्रेम करणाऱ्या आणि त्याला मदत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी, त्यांची शक्ती हिरावून घेण्यासाठी सैतान तिचा उपयोग करून

घेतो. कधी कधी आपल्याला ही गोष्ट मान्य करावी लागते की, एखाद्या व्यक्तीला मदत करण्याची आपली कितीही इच्छा असली तरी त्या व्यक्तीला जोपर्यंत मदत घेण्याची इच्छा नसते तोपर्यंत तिचा काहीही उपयोग होत नाही. पुष्कळदा असे घडते की, वर्षानुवर्षे अथक प्रयत्न करून, मोठा त्याग करून मदत करण्याचा प्रयत्न केल्यावर, कुटुंबातील लोक सदर व्यक्तीला मदत करण्याचे सरतेशेवटी नाकारतात. हा सहजासहजी किंवा झपाट्याने घेता येण्यासारखा निर्णय नाही, पण पुष्कळदा तो घ्यावा लागतो.

अशी परिस्थिती उद्‌भवते तेव्हा, आम्ही ख्रिस्ताची प्रीती खऱ्या अर्थाने आचरणात आणत नाही असा आरोप विश्वासणाऱ्यांवर केला जातो. "तुम्ही तुमच्या स्वतःच्या नातेवाइकांना जर मदत करत नाही, तर लोकांवर प्रीती करण्याचा दावा तुम्ही कसा करू शकता?" यांसारखे टोमणे कधी आपल्याला ऐकायला मिळतात. हे जरी कठीण असले तरी आपण ठाम राहून म्हटले पाहिजे, "तुला जर खरोखर तुझ्या समस्येला तोंड द्यायचे असेल, आणि त्याबाबतीत खरी मदत हवी असेल तर आम्हांला सांग," पण त्यासोबतच मला हेही माहीत आहे की, त्याला किंवा तिला आपली विनाशकारक जीवनशैली तशीच चालू ठेवण्यास आपण कदापि मदत करीत राहू नये.

आपल्या प्रिय व्यक्तीला आपण तसेच अडचणीत, त्रासात राहू देऊ नये, किंवा आजारी व्यक्तीला मदतीविना राहू देऊ नये, पण सदर व्यक्तीला आपण आपली शांती हिरावून घेऊ देऊ नये किंवा तिला केवळ आपला वापर करू देऊ नये. लोकांवर प्रीती करणे म्हणजे त्यांची स्वतः जे केले पाहिजे ते आपण त्यांच्यासाठी करणे असे नव्हे.

जे मदतीला पात्र नाहीत त्यांना कृपा मदत करते, पण विनाअट प्रीती लोकांना बेजबाबदार राहण्यास परवानगी देते असा याचा अर्थ नाही. कृपा अनेक संधी देते, आणि विनाअट प्रीती आशा कधीच सोडत नाही. ती प्रार्थना करते आणि संधी मिळेल तेव्हा येऊन मदत करते त्यामुळे खरोखर बदल घडतो.

देवाची इच्छा आहे की त्याची प्रीती आपल्यामध्ये आणि इतरांमध्ये वाहावी. संतुलित प्रकारे आपण स्वतःवर प्रीती करायला शिकण्याची गरज आहे, कारण आपण जर स्वतःवर प्रीती केली नाही, तर दुसऱ्यांना देण्यासाठी आपल्याकडे प्रीती नसेल. आपल्याकडे जे नाही ते आपण इतरांना देऊ शकत नाही हे लक्षात ठेवा. पण आपण येथेच थांबू नये! आपण इतरांना आरोग्य मिळवून द्यावे म्हणून देव आल्याला आरोग्य देतो. स्वतःची सुटका झाल्यानंतर आता आपण दुसऱ्यांची सुटका करणारे व्हावे. मानवी प्रीती नेहमीच संपते, पण आनंदाची गोष्ट म्हणजे देवाची प्रीती संपत नाही. देव आपल्याला अभिवचन देतो की, त्याची प्रीती कधीही अपयशी होत नाही!

प्रकरण

13

प्रीती वाइटाची नोंद ठेवत नाही

प्रीती अनीतीत आनंद मानत मानीत नाही, तर सत्य समागमात आनंद मानिते; सर्व काही सहन करिते; सर्व काही खरे मानण्यास सिद्ध असते; सर्वांची आशा धरिते.

१ करिंथ.१३:६-७

तुम्ही चांगले अकाउंटन्ट आहात का? तुमच्याशी कोणी वाईट वागले त्याचे तपशीलवार रेकॉर्ड तुम्ही ठेवता का? पूर्वी माझा आणि डेव्हचा वाद झाल्यावर मी माझ्या सर्व मानसिक फाईल्स उघडून त्याने जे जे वाईट केले ते शोधत असे. त्याच्या पूर्वीच्या चुकांची मी त्याला आठवण करून देत असे. इतक्या जुन्या गोष्टी माझ्या लक्षात आहेत हे पाहून त्याला आश्चर्य वाटत असे. एकदा त्याने मला विचारले, "या सगळ्या गोष्टी तू कुठे साठवून ठेवतेस?" वर्षानुवर्षे मी अशा गोष्टी मनात साठवून ठेवत होते, तर डेव्ह ताबडतोब क्षमा करून विसरून जात असे.

आम्ही एकमेकांवर प्रीती करावी ही देवाची इच्छा आहे, पण पूर्ण क्षमा केल्याशिवाय ते शक्य नाही. ज्यांच्यावर आपला राग आहे किंवा वैरभाव आहे, त्यांच्यावर आपण कधीच खऱ्या अर्थाने प्रीती करू शकत नाही. पौलाने करिंथकरांस पत्रात लिहिले, "प्रीती (देवाची आमच्यामध्ये असलेली प्रीती) गैरशिस्त वागत नाही, स्वार्थ पाहत नाही, चिडत नाही, अपकार स्मरत नाही" (१ करिंथ.१३:५).

सर्वोत्कृष्ट गोष्टीवर विश्वास ठेवा

आपल्याला जर लोकांवर प्रीती करायची इच्छा असेल तर लोकांकडे आणि ते करीत असलेल्या गोष्टींकडे पाहण्याचा आमचा दृष्टीकोन आम्ही देवाला बदलू दिला पाहिजे. दुसरे लोक जे करतात आणि बोलतात त्यांतील वाईट गोष्टींवर आपण विश्वास ठेवू शकतो आणि सर्व गोष्टींविषयी संशय बाळगू शकतो. पण खरी प्रीती नेहमी चांगल्यावर, जे सर्वोत्कृष्ट आहे त्यावरच विश्वास ठेवते. आपण काय विचार करायचा आणि कशावर विश्वास ठेवायचा ही निवड आहे. आपण आपल्या विचांरावर नियंत्रण ठेवत नाही, किंवा त्यांना शिस्त लावत नाही हे आपल्या जीवनातील बहुसंख्य समस्यांचे मूळ आहे. आपल्या विचारांना शिस्त न लावण्याची निवड करण्याद्वारे आपण दुसऱ्या कोणाविषयीच्या सर्वांत वाईट गोष्टीवर विश्वास ठेवण्याची किंवा संशयग्रस्त राहण्याची निवड करतो.

यिर्मया संदेष्ट्याने लोकांना विचारले, ''तुझे वाईट विचार तुझ्यामध्ये कोठवर असणार?'' (यिर्मया ४:१४). त्यांचे विचार देवाच्या दृष्टीने वाईट, त्याला दुखावणारे होते.

जे सर्वोत्कृष्ट त्यावर विश्वास ठेवायची निवड आपण करतो तेव्हा चांगल्या नातेसंबंधामध्ये त्रासदायक, नुकसानकारक ठरणाऱ्या सर्व गोष्टी सोडून देण्यास आपण सक्षम होतो. रागामुळे वाया गेली असती ती सर्व शक्ती मी असे म्हणून वाचवली: ''त्यांनी जे म्हटले किंवा केले त्याने मला जरी दुःख झाले असले, तरी त्यांचे अंतःकरण सरळ होते असा विश्वास मी धरते.''

दुसऱ्यांनी आपल्याविरुद्ध केलेल्या वाईट गोष्टींचे मानसिक रेकॉर्ड ठेवल्याने दुसऱ्या व्यक्तीमध्ये काही फरक पडत नाही, पण उलट आपल्यालाच त्रास होतो हे मी स्वतःच्या अनुभवावरून सांगते. कोणाविषयी तर मनात राग ठेवून पुष्कळदा आपण दिवस वाया घालवतो. ज्यांच्यावर आपण एवढे रागावलेले असतो त्यांना आपल्यामुळे कोणी दुखावले आहे याचीही कधी कधी कल्पना नसते. ते त्यांच्या दिवसाचा आनंद घेत असतात पण आपण मात्र वाया घालवत असतो.

आपल्याला जर रेकॉर्ड ठेवायचेच असेल तर लोकांच्या चुकांऐवजी त्यांच्या चांगल्या गोष्टींचे रेकॉर्ड का ठेवू नये?

नकारात्मक रेकॉर्ड ठेवण्याची उदाहरणे :

मला खेळ पाहायला आवडत नाही हे माहीत असूनही तो दिवसभर खेळ पाहत बसतो.

मी एखादी गोष्ट सांगायचा प्रयत्न करते तेव्हा डेव्ह माझ्या तपशीलात दुरुस्त्या करीत राहतो.

मला समजून घ्यावे असे वाटते तेव्हा डेव्ह मला सल्ला देतो.

आमच्या ४२ वर्षांच्या वैवाहिक जीवनात डेव्हने मला कितीदा फुले पाठवली हे एका हातावर मोजू शकते.

मी काय करणार आहे, किंवा माझे काही प्लॅन्स आहेत की नाही याची चौकशी न करता डेव्हने मित्रांसोबत गोल्फ खेळायला जायचे ठरवले.

सकारात्मक रेकॉर्ड ठेवण्याची उदाहरणे :

मी डेव्हशी चुकीचे वागले तरी तो मला ताबडतोब क्षमा करण्यास तयार असतो.

माझ्या मनाप्रमाणे करण्यास डेव्ह मला नेहमी मोकळीक देतो.

डेव्ह सर्व आवराआवर करतो. दुसऱ्या कोणी कचरा साफ करावा म्हणून तो तसाच टाकत नाही.

मी तुझ्यावर प्रेम करतो असे डेव्ह मला दररोज आणि कधी कधी दिवसातून पुष्कळदा म्हणतो.

माझे कपडे आणि दिसणे यासाठी डेव्ह माझी तारीफ करतो.

मला हवी असणारी आणि आम्हांला परवडेल अशी कोणतीही गोष्ट डेव्ह खरेदी करतो.

मला जिकडे जायचे तिकडे घेऊन जाण्यास डेव्ह नेहमी तयार असतो.

डेव्हचे आपल्या भावनांवर नियंत्रण आहे, तो कधी चिडचीड करीत नाही.

डेव्ह मला सांभाळतो. तो माझ्याबरोबर असतो तेव्हा मला सुरक्षित वाटते.

नकारात्मक गोष्टींपेक्षा सकारात्मक गोष्टींची यादी मोठी आहे हे तुमच्या लक्षात आले असेल. पुष्कळ लोकांच्या बाबतीतही असेच असे मला वाटते. लोकांतील आणि जगातील चांगल्या गोष्टींकडे पाहून आनंद करायला आपण शिकले पाहिजे, कारण आपल्याला बऱ्याने वाईटावर विजयी व्हायचे आहे. लोकांविषयी चांगले बोलण्याने व चांगला विचार केला तर, कधी काळी ज्यांनी आपल्याला त्रास झाला त्या गोष्टी आपल्या लक्षातही राहणार नाहीत.

पवित्र आत्म्याला दुखवू नका

आमचा राग, अक्षमाशीलता, कडवटपणा, भांडणे इ. मुळे आपण पवित्र आत्म्याला खिन्न करू शकतो. सर्व प्रकारचे वाईट विचार, द्वेष इ. गोष्टी काढून टाकण्याचा आग्रह

पवित्र शास्त्र करते. देवाच्या पवित्र आत्म्याला मी दुःखी करीत होते या विचाराने मला वाईट वाटते. पूर्वी मला लगेच राग येत असे हे मला आठवते, त्यामुळे मी त्याला दुःखी केले हे मला आठवते, आता पुन्हा तसे करण्याची माझी इच्छा नाही. हे करण्याचा एकच मार्ग म्हणजे इतरांविषयी मनात वाईट विचार आल्याबरोबर ते दाबून टाकणे. आपण एकमेकांना मदत करणारे, उपयोगी, एकमेकांशी दयाळूपणे वागणारे, आणि ख्रिस्ताने जशी आपल्याला क्षमा केली तशी एकमेकांना क्षमा करणारे व्हावे (इफिस.४ः३०-३२).

आपला राग पवित्र आत्म्याला खिन्न करतो, कारण आपण एकमेकांवर प्रीती करावी एवढीच देवाची इच्छा आहे असे नाही, तर रागाचा आपल्यावर किती विपरीत परिणाम होतो हे त्याला माहीत आहे. आपण पूर्ण स्वातंत्र्याने जीवनाचा आनंद घ्यावा असे त्याला वाटते. आपण देवाचे अनुकरण करावे. तो मंदक्रोध आहे, कृपाळू आहे आणि क्षमाशील आहे. आमच्या रागामुळे देवाचे नीतिमत्त्व प्रगट केले जात नाही.

आपल्याला काय वाटते यावर खरी प्रीती अवलंबून नाही, तसेच खऱ्या क्षमेचेही आहे. दोन्हीही आपल्या भावनांवर नाही, तर आपण घेतलेल्या निर्णयावर अवलंबून असतात. मी क्षमा करण्याचा निर्णय घेतला, तर माझ्या भावनाही हळूहळू त्या निर्णयाप्रत येतात हे मी शिकले आहे. इतरांना क्षमा करण्यामुळे त्यांना माझ्या जीवनातून बाद करण्याऐवजी मी त्यांच्याशी बोलू शकते. त्यामुळे मला त्यांच्यासाठी प्रार्थना करता येते, त्यांच्याविषयी नकारात्मक गोष्टी बोलण्याऐवजी आशीर्वचने बोलता येतात. आपण आपल्या भावनांना खूप महत्त्व देतो, पण आपल्या भावना नेहमी बदलतात हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. मात्र प्रीती बदलत नाही.

एकमेकांना सवलत द्या

आपण खऱ्या अर्थाने एकमेकांवर प्रीती करीत असू, तर आपण एकमेकांचे सहन करू आणि एकमेकांना मोकळीक देऊ (पाहा इफिस.४ः१-२). लोकांना सूट किंवा मोकळीक देणे म्हणजे त्यांच्या वाईट किंवा चुकीच्या वागण्याविषयी सबबी सांगणे असे नव्हे. एखादी गोष्ट चूक असेल तर ती चूकच आहे, तिच्याकडे दुर्लक्ष करण्याने काही फायदा होत नाही. एकमेकांना सवलत देणे म्हणजे आपण एकमेकांना कमी परिपूर्ण असायला मान्यता देतो. आपले शब्द आणि वृत्ती यांनी आपण असा संदेश देतो : "तू अमुक अमुक केलेस म्हणून मी तुला नाकारणार नाही, तुझ्या बाबतीत आशा सोडणार नाही. तुला यावर विजयी होता यावे म्हणून मी तुला मदत करीन, आणि तू यशस्वी होशील असा माझा विश्वास आहे."

माझ्या मुलांना मी सांगितले आहे की, तुम्ही कराल त्या प्रत्येक गोष्टीला माझी मान्यता असेलच असे नाही. मी नेहमी तुम्हांला समजून घेण्याचा प्रयत्न करीन आणि तुमच्यावर प्रीती करीन. त्यांच्या जीवनात ते नेहमी माझ्यावर भिस्त ठेवू शकतील हे त्यांच्या लक्षात राहावे ही माझी इच्छा आहे.

देवाला आपले सर्व दोष माहीत आहेत, आणि तरीही तो आपल्याला निवडतो. आपण चुका करण्यापूर्वी देवाला माहीत असते, आणि "मी तुला परिपूर्ण नसण्याची सवलत देतो" या दृष्टीकोनातून आपल्याकडे पाहतो. आपल्याला कधीही न सोडण्याचे किंवा न विसरण्याचे अभिवचन तो देतो (पाहा इब्री.१३:५).

मी जरी परिपूर्ण नसले तरी डेव्ह मला मोकळीक देतो. बदलण्यासाठी तो माझ्यावर कधीही दबाव आणत नाही. अपरिपूर्ण पत्नी असल्यामुळे तो माझा नाकार करील अशी भीती मला कधी वाटत नाही. आपल्या कौटुंबिक जीवनात आणि इतर नातेसंबंधात अशा काही गोष्टी असतात की त्या वेगळ्या असत्या तर बरे झाले असते असे आपल्याला वाटते, पण आपण जेव्हा खरोखर कोणावर प्रीती करतो तेव्हा त्यांच्या चांगल्यावाईट गुणांसह आपण त्यांना स्वीकारतो. वस्तुस्थिती ही आहे की, जगात परिपूर्ण लोक नाहीत. जर आपण परिपूर्णतेची अपेक्षा केली, तर आपण स्वतःसाठी निराशा आणि कडवटपणाचे जाळे तयार करतो. एकमेकांना सवलत देण्याद्वारे आपण जीवन सुलभ करतो, आणि त्यापेक्षाही अधिक म्हणजे आपण देवाच्या आज्ञा पाळतो हे दिसते.

तुम्हांला समजणार नाही अशी गोष्ट एखाद्याने केली तर त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न न करता "ते मानवप्राणी आहेत" हे स्वतःला सांगा. येशूला मानवाचा स्वभाव माहीत होता, म्हणून त्यांनी ज्या गोष्टी करू नयेत असे त्याला वाटे, त्या त्यांनी केल्यावर त्याला आश्चर्य वाटत नसे. मी येशूला ओळखत नाही असे पेत्राने म्हटले तरी येशूने त्याच्यावर प्रीती केली. त्याच्या दुःखसहनाच्या वेळेस त्याचे शिष्य त्याच्याबरोबर जागे राहून प्रार्थना करू शकले नाहीत, तरी त्याने त्यांच्यावर प्रीती केली. लोक परिपूर्ण नाहीत हे आपण लक्षात घेतले तर त्यांनी काहीही केले तरी त्यांच्यावर प्रीती करणे आपण थांबवणार नाही.

दुसऱ्यांनी केलेल्या वाईट गोष्टींची नोंद आपण ठेवू नये, एवढेच नाही तर आपण जे चांगले किंवा योग्य केले असे आपल्याला वाटते त्याचीही नोंद ठेवू नये. आपण खूप चांगले आहोत असा विचार करण्यामुळे आपण अधीर होतो आणि इतरांशी कृपेने वागू शकत नाही. प्रेषित मत्तयाने म्हटले की, आपण चांगले कृत्य करतो तेव्हा आपल्या

उजव्या हाताने काय केले ते डाव्या हाताला कळू नये (पाहा मत्तय.६:३). माझ्यासाठी याचा अर्थ असा की मी माझ्या दृष्टीने मी केलेली चांगली कामे किंवा माझे सद्गुण याचाच विचार करीत बसू नये. मला भेटणाऱ्या प्रत्येकावर प्रीती करण्यावरच मी लक्ष केंद्रित केले पाहिजे. प्रीतीच्या क्रांतीमधील हा प्राथमिक घटक आहे.

प्रीती पापावर आच्छादन घालते

प्रेषित पेत्राने म्हटले, "मुख्यतः एकमेकांवर प्रीती करा; कारण प्रीती पापांची रास झाकून टाकिते" (१ पेत्र.४:८). प्रीती केवळ एक चूक झाकत नाही, तर ती असंख्य चुका झाकते. देवाच्या आमच्यावरील प्रीतीने केवळ आमची पापे झाकली नाहीत, तर ती पापे पूर्णपणे काढून टाकण्यासाठी तिने किंमत भरली. प्रीती हा स्वच्छता करणारा शक्तीशाली घटक आहे. 'मुख्यतः एकमेकांवर प्रीती करा' हे पेत्राने सांगितले आहे त्याकडे मला तुमचे लक्ष वेधवायचे आहे.

प्रीती अंगी परिधान करा असे सांगून (पाहा कलस्सै.३:१४) पौलाने कलस्सैकरांस हाच संदेश दिला. एकमेकांवर प्रीती करण्याचे आणि तसे करण्यात कशाचेही अडखळण होऊ न देण्याचे स्मरण पवित्र शास्त्रात आपल्याला वारंवार देण्यात आले आहे.

माझ्या भावाने केलेल्या अपराधाबद्दल मी त्याला किती वेळा क्षमा करू असे पेत्राने येशूला विचारले तेव्हा त्याने उत्तर दिले, क्षमा करीत राहा (पाहा मत्तय.१८:२१-२२). पेत्राने सात वेळा असे सुचवले. हा प्रश्न विचारते वेळी त्याने सहा वेळा क्षमा केलेली असावी, आणि आता फक्त एकदाच क्षमा करावी असे त्याला वाटत होते की काय असे मला नेहमी वाटते. आपल्याला जर प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी व्हायचे असेल तर पुष्कळ वेळा क्षमा करावी लागेल हे लक्षात घ्या. कदाचित तो आपला रोजचाच अनुभव असेल. ज्या गोष्टींची आपल्याला क्षमा करावी लागेल त्यांपैकी काही किरकोळ, साध्या असतील. त्यांची क्षमा करणे आपल्याला जड जाणार नाही. पण कधी मोठी गोष्ट समोर येईल आणि त्याची आपल्याला क्षमा करता येईल की नाही असा प्रश्न आपल्याला पडेल. लक्षात ठेवा, आपल्याला करता येणार नाही अशी कोणतीही गोष्ट देव आपल्यावर येऊ देत नाही. देवाची प्रीती जर आपण आपल्यामध्ये वाहू दिली, तर आपण कोणालाही कशासाठीही क्षमा करू शकतो.

आपण लोकांचे दोष झाकतो तेव्हा आपल्याला आशीर्वाद मिळतात, आणि आपण ते उघड करतो तेव्हा शाप मिळतात. एखाद्याचे अपयश झाकणे म्हणजे त्याची वाच्यता न करणे. एखाद्याचे दोष तुम्हांला माहीत झाले तर ते दुसऱ्यांना सांगण्याची घाई करू

नका. तुमची रहस्ये तुम्ही जशी गुप्त ठेवता, तशीच लोकांची रहस्ये गुप्त ठेवा. पवित्र शास्त्रात आपल्याला पाहायला मिळते की, नोहा दारू पिऊन मस्त झाला आणि तंबूत उघडा पडला. त्याच्या एका मुलाने बापाची नग्नता आपल्या दोन भावांना सांगितली. त्यामुळे त्या दिवसापासून त्याच्या जीवनावर शाप आला. ज्या दोन मुलांना त्याने सांगितले ते आपल्या पित्याची नग्नता दिसू नये म्हणून पाठमोरे तंबूत गेले आणि त्यांनी त्याच्यावर वस्त्र टाकून त्याला झाकले. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की त्यांना आशीर्वाद मिळाला (पाहा उत्पत्ती ९:२०-२७). नोहाची नग्नता ही त्याच्या चुकीचे, त्याच्या पापाचे दर्शक आहे. आपण एकमेकांचे दोष उघड करू नये, तर झाकावेत हे या गोष्टीतून स्पष्ट होते.

आपला बंधू आपल्याविरुद्ध वागतो तेव्हा काय करावे याविषयी येशूने सूचना दिल्या (पाहा मत्तय.१८:१५-१७). प्रथम एकांतात त्याची भेट घेऊन त्याच्याशी याविषयी बोलावे. त्याने प्रश्न सुटला नाही, तर तो ताळ्यावर येऊन पश्चात्ताप करील या आशेने दोनतीन जणांना घेऊन त्याच्याकडे जावे. या साध्यासुध्या सूचनांचे आपण पालन केले, तर खूप प्रश्न सुटतील. ज्या समस्या लोकांनी एकांती जाऊन आपसात सोडवल्या पाहिजेत त्या घेऊन पुष्कळ लोक माझ्याकडे येतात. एखाद्या व्यक्तीला जाब विचारण्याची, उहापोह करण्याची गरज आहे असे वाटले तर घाबरू नका. वाद असणाऱ्या दोन पक्षांनी समस्येविषयी आपसात उघडपणे, मोकळेपणाने चर्चा करणे हा झटकन क्षमा करण्याचा साधासोपा मार्ग असतो. मनात ठेवलेली किल्मिषे ही उपचार न केलेल्या जखमांसारखी असतात. त्या हळूहळू पसरत जातात आणि सर्व भाग दूषित करतात, पर्यायाने आपण आजारी पडतो. अशा जखमा लवकरात लवकर स्वच्छ करण्याची गरज असते.

पवित्र शास्त्र योसेफ नावाच्या मनुष्याची गोष्ट सांगते. त्याच्या भावांनी त्याला गुलाम म्हणून विकले. योसेफ अजून जिवंत आहे, आणि त्यांना ज्या अन्नपुरवठ्याची आत्यंतिक गरज होती, त्याचा प्रमुख आहे हे त्यांना समजले तेव्हा ते घाबरले. आपण त्याच्याशी किती वाईटपणे वागलो हे त्यांना आठवले, तसेच त्यालाही आठवले. पण याविषयी कोणाला बोलायचे नाही असे त्याने ठरवले. त्यांच्याशी एकांतात बोलून त्याने त्यांना 'मी देव नाही, सूड घेणे हे माझे काम नाही तर परमेश्वराचे आहे' हे सांगितले. त्याने त्यांना मनमोकळेपणाने क्षमा केली, घाबरू नका असा धीर दिला आणि त्यांना व त्यांच्या कुटुंबियांसाठी धान्य द्यायच्या कामाला लागला. योसेफ प्रभावशाली पुढारी होता, जिकडे जाईल तिकडे त्याला मान मिळत होता यात काही शंका नाही. त्याला प्रीतीचे सामर्थ्य आणि पूर्ण क्षमेचे महत्त्व माहीत होते.

तुमच्या सर्व नोंदी पुसून टाका

तुम्ही ज्यांच्या नोंदी ठेवल्या असतील त्यांवर काट मारून "पूर्ण किंमत भरली गेली" असे का लिहू नये? "ज्या मनुष्याच्या हिशेबी प्रभु पापाचा दोष लावीत नाही तो धन्य" (रोम.४:८). देव पाप पाहत नाही असा याचा अर्थ होत नाही. याचा अर्थ असा की प्रीतीमुळे तो पाप्याला दंड आकारत नाही. चूक केली आहे हे प्रीती मान्य करते आणि अंतःकरणात तिचा न्याय होण्यापूर्वी पुसून टाकते. प्रीती चुकांची नोंद ठेवत नाही. त्यामुळे कडवटपणाला वाढायला वाव मिळत नाही.

स्मरणशक्ती कमी आहे म्हणून काहीजण चिंता करतात, पण खरे सांगायचे तर काही गोष्टी आपण विसरण्याची गरज असते. पुष्कळदा जे आपण विसरले पाहिजे ते आपण लक्षात ठेवतो आणि जे विसरले पाहिजे ते लक्षात ठेवतो. जीवनात आपण देवासारखी करू शकणारी एक गोष्ट म्हणजे क्षमा करणे आणि विसरणे. काही लोक म्हणतात, "मी त्यांना क्षमा करीन, पण कधीही विसरणार नाही." या विधानाची सत्यता अशी आहे की, जर आपण ती गोष्ट मनात ठेवली, तर आपण खऱ्या अर्थाने क्षमा केली नाही. ज्यांनी आम्हांला वेदना झाल्या, दुःख झाले अशा गोष्टी आम्ही कशा काय विसरू बरे? असा प्रश्न कदाचित तुम्ही मला विचाराल. त्याविषयी विचार न करण्याचा निश्चय करून आपण त्या विसरू शकतो असे याचे उत्तर आहे. ते विचार मनात आले, तर ते झटकून त्यांच्याऐवजी आपल्याला फायदेशीर ठरणाऱ्या दुशऱ्या गोष्टींचा विचार आपण करावा.

तुमच्या सर्व नोंदी पुसून टाकण्याचा परिणाम चांगला होईल. तुमच्यावरील दबाव, तुमचे ताण निघून जातील आणि तुमच्या जीवनाची गुणवत्ता वाढेल. तुम्ही आणि देव यांच्यातील घनिष्टता पुनःस्थापित होईल. तुमचा आनंद, शांती वाढेल. तुमचे आरोग्यही सुधारेल, कारण शांत, स्वस्थ मन व हृदय हे शरीराचे जीवन व आरोग्य आहे (पाहा नीती.१४:३०). कडवटपणा भिंती बांधतो, पण प्रीती पूल बांधते!

प्रकरण

14

प्रीती व्यक्त करण्याचे व्यावहारिक मार्ग

सर्व प्रसंगी सुवार्ता गाजवा आणि गरज असेल तेव्हा शब्दांचा
उपयोग करा.
सेन्ट फ्रान्सिस ऑफ असिसी

जेणेकरून तुम्ही लगेच प्रीती व्यक्त करू लागाल असे व्यावहारिक मार्ग मी तुम्हांला सुचवले नाहीत तर हे पुस्तक निरर्थक ठरेल. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रीती ही तत्त्व किंवा केवळ बोलणे नाही, तर कृती आहे. प्रीतीचे क्रांतीकारक या नात्याने जगात प्रीती आणण्याचे नवनवीन आणि चांगले मार्ग आपण सतत शोधत राहिले पाहिजे.

आपल्याकडे काहीही असेल, किंवा आपण काहीही केले असेल, पण आपल्याठायी जर प्रीती नसेल तर आपण काहीच नाही आणि आपण कोणीच नाही (पाहा १ करिंथ.१३:१-३). आपण आक्रमकपणे प्रीती दाखवणे, व्यक्त करणे हे भावी समाजासाठी आवश्यक आहे. देवाचे अस्तित्व आहे की नाही हे समजून घेण्यासाठी लोक आज खटपट करीत आहेत. या जगात असण्याचा आपला उद्देश काय आणि देव जर खरोखर अस्तित्वात आहे तर जगात इतकी दुष्टता का आहे हा त्यांचा प्रश्न आहे. मला वाटते की, त्यांनी जर कृतीपूर्ण प्रीती पाहिली तर त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळेल. देव प्रीती आहे आणि तो अस्तित्वात आहे, आणि स्वतःला प्रगट करण्याचा त्याचा

प्रमुख मार्ग म्हणजे त्याचे लोक. जगाला प्रीतीचे गुण पाहायचे आहेत. त्यांना संयम, दयाळूपणा, निःस्वार्थीपणा, क्षमा करण्याची इच्छा हे पाहायचे आहे. गरजवंतांना मदत करण्यासाठी त्याग करणारे लोक जगाला पाहायचे आहेत. प्रीतीचा स्पर्श होणे म्हणजे बोचऱ्या थंडीत उबदार पांघरुण लपेटून घेऊन शेगडीजवळ बसणे. यासारखी आनंददायक भावना दुसरी नाही. आणि हे बक्षीस इतरांना देण्याचे सामर्थ्य आपल्याकडे आहे!

> आपल्याकडे काहीही असेल, किंवा आपण काहीही केले असेल, पण आपल्याठायी जर प्रीती नसेल तर आपण काहीच नाही आणि आपण कोणीच नाही.

सहनशील व्हा

१ करिंथ.१३ मध्ये प्रेषित पौलाने प्रीतीची जी गुणवैशिष्ट्ये सांगितली आहेत, त्यात सहनशीलता पहिली आहे. पौल सांगतो की प्रीती सहनशील आहे. तुमच्या इच्छेप्रमाणे गोष्टी घडत नाहीत तेव्हा प्रीती स्थिर, स्वस्थचित्त राहते.

आमच्या स्टोअरमधील हळूहळू काम करणाऱ्या सेवकांशी मी सहनशीलते वागते. वैतागलेल्या, चीडखोर ग्राहकांकडून त्यांना अगोदरच खूप बोलणी ऐकावी लागत असतील म्हणून त्यांच्याशी सहनशीलतेने वागायचा निश्चय मी केला. मला त्यांच्या समस्यांत भर घालायची नाही, तर उपाय व्हायचे आहे. काम लवकर न केल्याबद्दल अलीकडेच एका स्टोअरक्लार्कने माझ्याकडे क्षमा मागितली. मी तिला म्हटले की, मला वाट पाहता येणार नाही इतके काही माझे काम महत्त्वाचे नाही. तिच्यावर मी दाखवलेल्या या प्रीतीने ती रिलॅक्स झाली.

प्रत्येकाशी सहनशीलतेने वागा आणि रागावर नियंत्रण ठेवा असे पवित्र शास्त्र आपल्याला सांगते (पाहा १ थेस्सल.५:१४). इतर लोकांना देत असलेल्या आपल्या साक्षीसाठी हे चांगले आहे, तसेच ते आपल्यासाठीही चांगले आहे. आपण जितके सहनशील होऊ तितका कमी ताण आपल्यावर येईल. पेत्राने म्हटले की, देव खूप सहनशील आहे. कोणाचाही नाश होऊ नये अशी त्याची इच्छा आहे (पाहा २ पेत्र.३:९). याच कारणासाठी आपणही एकमेकांशी, विशेषतः जे देवाचा शोध घेत आहेत त्यांच्याशी सहनशीलतेने वागावे.

पौलाने तीमथ्याला सांगितले की, "प्रभूच्या दासाने भांडू नये, तर त्याने सर्वांबरोबर सौम्य, शिकविण्यास उत्सुक, सहनशील, विरोध करणाऱ्यांस सौम्यतेने शिक्षण देणारा असे असावे" (१ तीमथ्य.२:२४). आपण रोज आपल्या कृतीने लोकांना शिकवतो. शिकवणे केवळ शब्दांनी होत नाही - पुष्कळदा कृती शब्दांपेक्षा अधिक प्रभावी असते. आपणा सर्वांचा प्रभाव असतो. त्याचा वापर आपण काळजीपूर्वक केला पाहिजे.

माझी चर्चमधील उपस्थिती किंवा ख्रिस्ती दागिने घालणे किंवा मोठे स्टीकर लावणे हा माझ्या देवाबरोबरील संबंधाचा पुरावा नाही. मी किती वचने पाठ केली, किंवा माझ्याकडे किती ख्रिस्ती पुस्तके, डीव्हीडी आणि सीडीज आहेत हाही पुरावा नाही. माझ्या ख्रिस्तीत्वाचा पुरावा क्रांतीकारी प्रीतीच्या फळांत दिसतो.

येणाऱ्या विरोधी गोष्टींचा सौम्यतेना सामना करता यावा म्हणून नियमितपणे प्रार्थना करा असे मी सुचवते. तुम्हांला अस्वस्थ करणाऱ्या गोष्टी तुमच्यावर येतील, पण त्यांचा शांततेने सामना करण्यास तुम्ही अगोदरच तयार असाल. आपले मन स्वस्थ ठेवणे हे फार महत्त्वाचे आहे. जगातील पुष्कळ लोक त्यांच्या मनाप्रमाणे गोष्टी घडल्या नाहीत, तर थयथयाट करतात. गोष्टी आपल्या मनाप्रमाणे झाल्या नाहीत, तरी आपण शांत, सौम्य राहण्याने मोठा प्रभाव पाडू शकतो असा माझा विश्वास आहे.

परिस्थिती कशीही असली तरी सहनशील आणि उपकारशील राहावे याविषयी मी काही आठवड्यांपूर्वी संदेश दिला. सहा आठवड्यांत मी तीन मोठ्या कॉन्फरन्स केल्या होत्या, त्यासोबत इतर अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या. रविवार सकाळची भक्ती ही त्यांपैकी शेवटची जबाबदारी होती. लवकर घरी जावे, चांगले रुचकर भोजन करावे, डेव्हसोबत थोडीफार खरेदी करावी, गरम पाण्याने मस्त आंघोळ करावी, एखादी चांगली मुव्ही पाहत आईसक्रीम पाहावे असे मी ठरवले होते. आतापर्यंत केलेल्या सर्व परिश्रमांसाठी स्वतःला प्रतिफळ द्यायचे मी ठरवले होते. स्वतःसाठी मी चांगली योजना आखली होती.

घरी जाण्यासाठी आम्ही विमानात बसलो. केवळ पस्तीस मिनिटात आम्ही घरी पोहोचणार होतो. मी खूप आनंदित झाले होते... एवढ्यात काहीतरी गडबड झाली. विमानाचे दार नीट बंद होईना. ते नीट होईपर्यंत दीड तास आम्ही बसून राहिलो. त्या दिवशी विमान उड्डाण करू शकणार नाही, म्हणून भाड्याने गाडी घेऊन घराकडे निघावे अशी चर्चा सुरू झाली. त्या वेळी शांत राहणे, सहनशील राहणे किती कठीण होते याची तुम्हांला कल्पना येणार नाही. माझे तोंड बंद ठेवणे हीच मोठी कसरत होती. नुकताच मी सहनशीलतेविषयी संदेश दिला होता. पण मी जर प्रार्थना केली तर परीक्षेत चांगल्या मार्कांनी पास होईन हे मी विसरले.

तुम्हांला ज्याची गरज आहे असा चांगला संदेश तुम्ही ऐकला आणि लगेचच तुमच्यावर तशी परीक्षा आल्याचा अनुभव तुम्ही कधी घेतला आहे का? नसेल, तर तुम्ही संदेश द्या, आणि तुम्ही दिलेल्या संदेशाची परीक्षा किती लवकर तुमच्यावर येते ते पाहा. आपण सर्वच प्रसंगी सहनशील असतो असे नाही हे मला मान्य आहे, पण आपण स्वतःला सहनशीलतेची शिस्त लावू शकतो. कधी कधी मला जे वाटते त्याविषयी मी काही करू शकत नाही, पण कसे वागावे यावर मी नियंत्रण ठेवू शकते, तसेच तुम्हीही ठेवू शकता. तेथे धावपट्टीवर बसून सहनशील राहणे मला जमत नव्हते, पण मी प्रार्थना करीत राहिले, हे प्रभू, आता थोड्या वेळापूर्वी मी जो संदेश दिला, त्याबाबत माझी स्वतःची साक्ष खराब असू नये म्हणून स्वस्थचित्त राहण्यासाठी माझे सहाय्य कर. देवाने मला मदत केली. आणि अशा परिस्थितीत मला हव्या तशा गोष्टी घडल्या नाहीत, तरी मी घरी पोहोचले तेव्हा मी ठरवलेल्या गोष्टी करण्यासाठी आमच्याकडे पुष्कळ वेळ होता.

तुम्ही स्वतःला कठीण परिस्थितीत पाहता तेव्हा स्वस्थ राहण्याचा प्रयत्न करा, म्हणजे देव तुमच्या वतीने कार्य करीत असल्याचे तुम्हांला पाहायला मिळेल. इस्राएली लोक मिसरी सैन्य आणि तांबडा समुद्र यांच्यामध्ये सापडले तेव्हा मोशेने म्हटले, ''परमेश्वर तुमच्यासाठी लढेल, तुम्ही शांत राहा'' (निर्गम १४:१४).

वेळ द्या

वेळ ही आपल्यापैकी बहुतेकांसाठी फार मोलवान गोष्ट आहे. आपण लोकांना त्यांचा वेळ द्या म्हणतो तेव्हा आपण त्यांच्याकडून मोलवान बक्षीस मागत आहोत हे लक्षात ठेवा, आणि त्यांचा वेळ आपल्याला मिळतो तेव्हा आपण आभारी असावे. लोक बरेचदा मला वेळ मागतात, दुःखाची गोष्ट म्हणजे बरेचजणांना मला वेळ देता येत नाही. मी जर तसा प्रयत्न केला, तर फार थकून जाईन, आणि या पृथ्वीतलावर देवाने जी जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे ती मला पार पाडता येणार नाही.

आपण प्रत्येकाला होय म्हणू शकत नाही, पण तसेच आपण प्रत्येकाला नकारही देऊ नये. तुम्ही काही वेळ द्यावा असे मी कळकळीने सांगते, कारण प्रीती दाखवण्याचा तो एक मार्ग आहे. अलीकडेच एका मित्राच्या विनंतीवरून मी टेनेसेमधील चर्चमध्ये बोलले. तेथे असताना मला जाणवले की, त्यांनी माझ्यासाठी जमा केलेले दान मी शहरातील गरीबांच्या मदतीसाठी चर्चला परत करावे. मी माझा वेळ आणि पैसा दोन्ही मोफत द्यावे ही देवाची इच्छा आहे हे माझ्या लगेच लक्षात आले. देण्याच्या

आनंदाशिवाय मी तेथून काही घेऊ नये ही त्याची इच्छा होती, आणि हा आनंद पुरेसा होता. दर वर्षी देव दोनतीन वेळा माझी अशी परीक्षा घेतो आणि त्याबद्दल मला आनंद वाटतो, कारण इतर लोकांसाठी मी जे करते त्याबद्दल मला नेहमीच काहीतरी मिळाले पाहिजे या विचारसरणीत मला कधीच अडकायचे नाही.

माझा पैसा किंवा इतर वस्तू देण्यापेक्षा माझा वेळ देणे माझ्यासाठी फार कठीण आहे हे मी मान्य करते. आतापर्यंत मी किमान दोनतृतीयांश आयुष्य जगले आहे, उरलेल्या आयुष्यात मी माझ्या उद्दिष्टांवर आणि देवाने माझ्यासाठी नेमलेल्या हेतूंवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. या गरजेपोटी मी पुष्कळदा 'नाही' म्हणते, पण माझी वेळ ही मोलवान देणगी आहे हे लक्षात घेऊन मी आवश्यकतेनुसार होकारही देते.

घर बदलण्यासाठी जेव्हा कोणी तुम्हांला मदत करते, तेव्हा ते त्यांच्या मोलवान वेळेची देणगी तुम्हांला देत असतात. तुमचे म्हणणे कोणी लक्षपूर्वक ऐकते तेव्हा ते तुमचा सन्मान करतात आणि तुमच्यावरील प्रीती व्यक्त करतात. "तुम्ही माझ्यासाठी अमुक अमुक करू शकाल का?" असे जेव्हा आपण कोणाला विचारतो, तेव्हा आपण त्यांच्याकडून फार मोलवान गोष्ट म्हणजे त्यांची वेळ मागत असतो.

वेळेचा विचार करा. देवासोबत घनिष्ट नातेसंबंध विकसित करण्यासाठी पुष्कळ वेळ द्या, तसेच तुमच्या वेळेपैकी काही वेळ तुम्ही प्रीतीची अभिव्यक्ती म्हणून त्याच्या लोकांना द्या. फिनिक्स शहरातील फर्स्ट असेंब्लीज ऑफ गॉड ही मंडळी अमेरिकेतील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या मंडळ्यांपैकी एक आहे. तिचे वरिष्ठ पाळक टॉमी बार्नेट यांनी म्हटले, "जीवन ही अशी गोष्ट आहे जी आपण सतत गमावत आहोत." म्हणून हाती घेतलेली प्रत्येक गोष्ट आपण गंभीरपणे केली पाहिजे. आमच्याकडे द्यायला काही नाही असे लोक म्हणतात तेव्हा जोपर्यंत आपण जिवंत आहोत, तोपर्यंत आपल्याकडे देण्यासाठी काहीतरी आहे हे ते विसरतात. ती गोष्ट म्हणजे आपला वेळ.

वेळ इतकी महत्त्वाची गोष्ट असल्यामुळे आपण ती सुज्ञपणे आणि हेतूपूर्वक दिली पाहिजे. लोकांना तुमचा वेळ चोरू देऊ नका, तुमचा वेळ वाया घालवू नका, आणि "मी वेळ घालवायचा प्रयत्न करीत आहे" असे कधी म्हणू नका. तुमचे प्राधान्यक्रम काय आहेत ते लक्षात घ्या आणि त्या गोष्टींवर आपला वेळ खर्च करा. तुमच्या यादीत देव आणि तुमचे कुटुंब यांना वरचे स्थान असले पाहिजे. स्वतःची काळजी घेण्यासाठीदेखील तुम्ही वेळ दिला पाहिजे. एक संतुलित व्यक्ती होण्यासाठी तुम्ही काम करण्याची, विश्रांती घेण्याची आणि खेळण्याची गरज आहे. तसेच ज्यांना तुमची गरज आहे त्यांना मदत करण्यासाठीदेखील तुम्ही काही वेळ दिला पाहिजे.

सर्व काही करण्यासाठी तुमच्याकडे वेळ नाही असे तुम्हांला वाटते, आणि तरीही तुम्ही दुसऱ्यांना वेळ देता तेव्हा देवाने टॉमी बार्नेट यांना जे सांगितले ते करण्यास मी तुम्हांला उत्तेजन देते. देवाने त्यांना सांगितले की, तुझ्या अर्ध्या तासाचे वेळ सुज्ञपणे वापर. तुझ्याकडे पुष्कळ मोकळे अर्धा तास आहेत हे देवाने त्यांना दाखवले. पास्टर बार्नेट म्हणतात की, तुमच्या अर्ध्या तासांच्या मोकळ्या वेळेचे तुम्ही काय करता हे जर तुम्ही त्यांना सांगितले तर तुमचे जीवन काय आहे हे ते तुम्हांला सांगू शकतील. कामाला जाताना येताना जो अर्धा तास तुम्हांला मिळतो त्याचे तुम्ही काय करता? डॉक्टरकडे आपला नंबर येईपर्यंत अर्धा तास वाट पाहत असताना तुम्ही काय करता? रेस्टॉरन्टमध्ये तुम्ही ऑर्डर दिल्यानंतर तुमचे जेवण टेबलवर येईपर्यंत लागणाऱ्या अर्ध्या तासात तुम्ही काय करता? दुसऱ्या कोणावर तरी प्रीती दाखवायला तुमच्याकडे या अर्ध्या तासांत वेळ आहे का? कोणाला तरी फोनद्वारे किंवा पत्राद्वारे उत्तेजन देण्यासाठी तुम्ही या मिनिटांचा उपयोग करू शकता का? तुम्ही कोणासाठी प्रार्थना करू शकता का? दुसऱ्या कोणासाठी तरी तुम्ही काय करू शकता हे समजण्यासाठी तुम्ही या वेळेत प्रार्थना करू शकता का? काय, कसे देता येईल याचा विचार करण्यासाठी या वेळेचा उपयोग तुम्ही करू शकता.

तुम्हांला मिळणाऱ्या या अर्ध्या अर्ध्या तासांच्या वेळेत तुम्ही पुस्तक लिहू शकता. तुम्ही एखादा आत्मा जिंकू शकता. एखादा महत्त्वाचा निर्णय घेऊ शकता. अस्ताव्यस्त असलेले घर अर्ध्या तासात स्वच्छ आणि टापटीप होऊ शकते. तुमचे अर्धा तास महत्त्वाचे आहेत, तुम्ही नीट विचार केला तर ते तुमच्याकडे बरेच आहेत हे तुमच्या लक्षात येईल. दिवसाच्या प्रत्येक सेकंदाला तुम्ही काहीतरी करा असे मी तुम्हांला सांगत आहे का? नाही. मी तसे सांगत नाही. कदाचित अर्धा तास विश्रांती घ्यावी असे तुम्हांला वाटेल, आणि त्यात काहीच वावगे नाही. कारण काही न करता वेळ वाया घालवण्याऐवजी त्या वेळेत तुम्ही विश्रांती घेतली.

लक्षात ठेवा, गेलेला प्रत्येक दिवस पुन्हा कधी तुम्हांला मिळणार नाही. त्यामुळे तो गुंतवा, वाया घालवू नका.

तुमचे शब्द, विचार आणि मालमत्ता यांनी प्रीती करा

विचारांचे सामर्थ्य : विचारांचे सामर्थ्य दाखवणारी ही कथा एका महिलेने मला सांगितली.

ख्रिसमसच्या काळात ख्रिसमस ट्रीसाठी जागा तयार करावी म्हणून मी अंजिराचे झाड वर बेडरूममध्ये नेले. त्या झाडाला खालच्या बाजूला एक छोटीशी फांदी होती. तिच्यावर थोडी पाने होती. त्या फांदीमुळे झाडाचा आकार चांगला दिसत नव्हता.

सकाळी उठल्यावर त्या झाडाकडे माझे लक्ष जात असे आणि मी मनातल्या मनात म्हणत असे, *ती फांदी मी छाटून टाकीन.* ज्या ज्या वेळी त्या झाडाकडे मी जाई तेव्हा तेव्हा *ही फांदी काही बरोबर दिसत नाही, ती कापून टाकावी हे बरे* हे विचार माझ्या मनात येत.

दिवस असेच निघून गेले. ते झाड पुन्हा दिवाणखान्यात आणले. त्या झाडाकडे जेव्हा लक्ष जाई तेव्हा त्या फांदीविषयी नकारात्मक विचार मनात येत. हा सिलसिला सुमारे दीड महिना चालला.

एके सकाळी मी त्या झाडाजवळ गेले, तर त्या फांदीवरील प्रत्येक पान पिवळे पडले होते. झाडावर दुसरीकडे कोठेही पिवळे पान नव्हते. धक्का बसून मी माझ्या पतीला सांगितले. त्याने माझ्याकडे पाहून म्हटले, ''माझ्याविषयी तू चांगला विचार करतेस म्हणून मला खरोखर आनंद वाटतो.''

त्याच दिवशी मी ती फांदी कापली.

माझ्या सासूबरोबर माझे चांगले संबंध नव्हते. अर्थात याचा दोष माझ्यावर नाही असे मला वाटत होते, कारण मी तिच्याशी नेहमी चांगले वागत असे. येथेही आपण प्रयोग करून पाहावे असे मी ठरवले. ज्या ज्या वेळी माझ्या सासूचा विचार माझ्या मनात येईल तेव्हा तेव्हा तिच्याविषयी चांगला विचार करण्याचा, त्यांच्यासाठी आशीर्वचने उच्चारण्याचा विचार मी केला.

ती क्वचितच मला फोन करीत असे. माझ्या बोलण्यात तिला काही रस नव्हता. पण मी तिच्याविषयी चांगले विचार करायला सुरुवात केल्यानंतर पाच दिवसांतच तिने तीनदा मला फोन केला. थोडाच वेळ ती बोलली, पण प्रेमाने, मित्रत्वाच्या भावनेने बोलली! मागच्या संपूर्ण वर्षात तिने मला जास्तीत जास्त सहा वेळा फोन केला होता.

विचारांचा सामर्थ्य या विषयावरील माझी शिक्षणमालिका या स्त्रीने मागवली आणि म्हटले, ''आता इतर लोकांविषयी मी काय विचार करते यावर मी नियंत्रण ठेवते.''

इतर लोकांविषयी आपण असंख्य विचार करतो, पण ते विचार आपण जबाबदारीने केले पाहिजेत. आपले विचार आध्यात्मिक जगात कार्य करतात. ते डोळ्यांना दिसत

नसले तरी इतर लोकांना ते जाणवतात असा माझा विश्वास आहे. या स्त्रीच्या नकारात्मक विचारांनी त्या अंजिराच्या झाडावर नकारात्मक परिणाम झाला, तसेच आपल्या विचारांचा परिणाम लोकांवरही होतो असे मला वाटते.

लोकांविषयी आपण जे विचार करतो त्यामुळे केवळ त्यांच्यावर परिणाम होतो असे नाही, तर त्यांच्या सोबतीत असताना आपण त्यांच्याशी कसे वागतो यावरही त्याचा परिणाम होतो. एखादी व्यक्ती मला आवडत नाही असा विचार करून मी त्या व्यक्तीच्या सर्व दोषांचा विचार करू लागले, तर माझ्या मनात त्यांची जी प्रतिमा निर्माण होईल त्याप्रमाणेच मी त्यांच्याशी वागू लागेन.

एके दिवशी मी माझ्या मुलीबरोबर खरेदी करीत होते. त्या वेळी ती किशोरवयीन होती. त्या दिवशी तिच्या चेहऱ्यावर पुष्कळ मुरमे होती, आणि तिचे केसही विस्कटलेले होते. तिच्याकडे लक्ष जाई त्या त्या वेळी मी विचार करीत असे, आज काही तू फार चांगली दिसत नाहीस. दिवस जसजसा पुढे चालला तसतशी ती निराश झाल्यासारखे वाटले. काय झाले असे मी तिला विचारले. तिने उत्तर दिले, "आज मी फार कुरुप आहे असे मला वाटते." त्या दिवशी देवाने विचारांच्या सामर्थ्याविषयी मला धडा शिकवला. लोकांविषयी चांगले, सकारात्मक, प्रेमळ विचार करून त्यांना आपण मदत करू शकतो, पण दुष्ट, नकारात्मक विचारांनी त्यांना दुखवू शकतो.

प्रार्थनेचा प्रकल्प म्हणून तुम्ही रोज एकेका व्यक्तीसाठी प्रार्थना करावी असे मी तुम्हांला सुचवते. त्या दिवशी त्या व्यक्तीविषयी चांगले विचार करा. दिवसभरात त्या व्यक्तीचे जे जे चांगले गुण तुम्हांला आठवतील त्यांविषयी विचार करा. त्यांनी तुमच्यासाठी जी चांगुलपणाची कृत्ये केली असतील त्यांचा विचार करा. दुसऱ्या दिवशी दुसऱ्या व्यक्तीविषयी सराव करा. चांगले विचार करण्याची सवय तुम्हांला लागेपर्यंत तुमच्या जीवनातील महत्त्वाच्या व्यक्तींविषयी असे आळीपाळीने विचार करीत राहा.

तुमच्या विचारांनी लोकांवर प्रीती करा, तुम्ही तसे करीत असताना तुम्ही त्यांच्या जीवनाची उभारणी कराल.

शब्दांचे सामर्थ्य : इतर लोकांची उन्नती करण्यासाठी, त्यांना उत्तेजन देण्यासाठी आपण शब्दांचा उपयोग कसा करू शकतो याविषयी आपण चर्चा केली आहे. पण तो लोकांवर प्रीती करण्याचाही एक मार्ग आहे हे मी तुम्हांला सांगू इच्छिते. इतरांवरील आपली प्रीती व्यक्त करण्यासाठी शब्दांचे उपयोग करण्याची क्षमता आपणा प्रत्येकामध्ये आहे. कालच मी एका रिअल इस्टेट एजंटला भेटले. तिचे डोळे सुंदर निळे होते. तुझे डोळे खूप सुंदर आहेत असे मी तिला सांगितले तेव्हा तिला आनंद वाटला.

एवढे बोलण्यासाठी मला काही फार वेळ लागला नाही, की कष्ट करावे लागले नाहीत. दुसऱ्या एका इस्टेट एजंटला मी भेटले. ती खूप सुंदर होती. तिच्या सौंदर्याची मी तारीफ केली तेव्हा तिलाही आनंद वाटला. नेहमीच्या बिझनेसच्या गोष्टी करीत असताना हे घडले. प्रीतीचे क्रांतीकारक या नात्याने आपल्यासभोवती असलेल्या लोकांना उत्तेजन देण्यासाठी, त्यांच्यावरील आपली प्रीती व्यक्त करण्यासाठी आपण दिवसभर शब्दांच्या सामर्थ्याचा उपयोग केला पाहिजे.

काल गोल्फ खेळून घरी आल्यावर पाच मिनिटातच डेव्हने मला सांगितले की, ''तू सुंदर दिसतेस, खूप कष्ट करतेस. मी तुझ्यावर प्रीती करतो.'' त्या वेळी गेले सात तास मी या पुस्तकावर काम करीत होते, थोड्या विश्रांतीची मला गरज होती. त्याचे शब्द ऐकल्यावर मला उत्साह वाटला. त्या रात्री आम्ही आमचा मुलगा, सून आणि त्यांचे लहान बाळ यांच्यासोबत बाहेर जेवायला गेलो. माझी सून निकोल हिला मी म्हटले, ''तू चांगली पत्नी आणि आई आहेस.'' मी हे सांगण्याअगोदरच रॉजरने तिच्या कानात ''मी तुझ्यावर प्रीती करतो'' असे कुजबुजल्याचे मी पाहिले होते. लोकांवरील प्रीती व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी दिवसभरात अशा गोष्टी आपण एकमेकांना बोलल्या पाहिजेत.

जिभेमध्ये जीवन आणि मरणाचे सामर्थ्य आहे. हा एक विस्मयकारक विचार आहे. इतरांना तसेच स्वतःला जीवन किंवा मृत्यू बोलण्याचा अधिकार आपल्याला आहे. आपण इतरांना जे बोलतो त्याचा परिणाम आपल्या स्वतःच्या जीवनावर देखील होतो. पवित्र शास्त्र म्हणते, ''जिव्हेच्या हाती मृत्यु व जीवन ही आहेत; तिची आवड धरणारे तिचे फळ भोगितात'' (नीती.१८:२१).

शब्द हे सामर्थ्याचे भांडार आहेत. आपण निवडू त्याप्रमाणे त्यांत सकारात्मक किंवा नकारात्मक सामर्थ्य आहे. तुमचे शब्द काळजीपूर्वक निवडा आणि सावधानतेने त्यांचा उपयोग करा. जीवन बदलू शकणारे संदेश ते देतात. आपल्या शब्दांनी एखाद्या व्यक्तीची स्वतःबद्दलची प्रतिमा आपण घडवू किंवा बिघडवू शकतो. आपल्या शब्दांनी आपण एखाद्या प्रतिष्ठा धुळीस मिळवू शकतो, म्हणून इतर लोकांविषयी आपण काय बोलतो याची खबरदारी घ्या. एकमेकांविषयीचे दृष्टीकोन कलुषित करू नका.

तुमचे शब्द गोदामात ठेवले आहेत रोज सकाळी तुम्ही गोदामात जाता आणि आज कोणकोणते शब्द वापरायचे ते निवडता अशी कल्पना करा. आज तुम्ही कोणाला भेटणार याची तुम्हांला कल्पना असल्यामुळे त्यांना उत्तेजन देणारे काही शब्द तुम्ही अगोदरच निवडाल व त्यांचा उपयोग कराल. दिवसभरात तुमच्या संपर्कात जे येतील

त्यांच्यासाठी शब्द निवडा आणि तुमच्या बोलण्याद्वारे प्रत्येकासाठी आशीर्वादित होण्याचा निश्चय आपल्या मनात करा.

माझ्या शब्दांनी रोज मी किती जणांना आत्मविश्वास देऊ शकते, उभारी देऊ शकते हे मला पाहायचे आहे. ज्या शब्दांनी कोणाचे भले झाले नाही, उलट लोकांना वाईट वाटले अशा निरर्थक, वायफळ गोष्टी बोलून मी माझ्या जीवनात पुष्कळ शब्द वाया घालवले आहेत. या वाया गेलेल्या शब्दांविषयी मला वाईट वाटते, आणि भूतकाळात जे नुकसान मी केले ते भरून काढण्यासाठी मी आता माझ्या शब्दांचा उपयोग करते.

जीभ हा फार लहान अवयव आहे, पण जर आपण काळजी घेतली नाही, तर ती विनाश करणारी आग पेटवू शकते. आपल्या मुखातून निघणाऱ्या शब्दांसाठी दावीद राजा नियमितपणे प्रार्थना करीत असे. त्याने म्हटले, "मी म्हणालो की, मी आपल्या जिभेने पाप करू नये म्हणून आपल्या चालचलणुकीस जपेन" (स्तोत्र.३९:१). माझ्या मनचे विचार व तोंडचे शब्द तुला मान्य असोत अशी प्रार्थना त्याने केली (पाहा स्तोत्र.१९:१४). जिभेचे सामर्थ्य आणि योग्य मार्गावर राहण्यासाठी देवाच्या मदतीची गरज आहे हे त्याला माहीत होते. आपण दाविदाच्या उदाहरणाचे अनुकरण केले पाहिजे.

संपत्तीचे सामर्थ्य : आपणा सर्वांकडे मालमत्ता आहे. काहीजणांकडे इतरांपेक्षा जास्त आहे. पण इतरांना आशीर्वादित करण्यासाठी वापरता येईल असे काही ना काही प्रत्येकाकडे आहे. आपली प्रीती व्यक्त करण्यासाठी शब्द आणि विचार या दोन्ही चांगल्या गोष्टी आहेत, पण मालमत्ता आणि वस्तू तेच कार्य करतात, आणि काही लोकांच्या दृष्टीने ते फार महत्त्वाचे आहे.

पवित्र शास्त्र सांगते की, आपल्याकडे दोन शर्ट असतील तर ज्याच्याकडे नाही त्याला एक शर्ट दिला पाहिजे. अन्नाच्या बाबतीतही तसेच आहे (पाहा लूक.३:११). प्रेषितांची कृत्येमध्ये आपण पाहतो ती पहिली मंडळी शक्तीशाली मंडळी होती, तिची रोज वाढ होत होती. सर्व प्रकारची अलौकिक चिन्हे, अद्‌भुते आणि चमत्कार त्यांच्यात सर्रास होत असत. देवाचे सामर्थ्य त्यांच्यासोबत होते, आणि आपले मन, हृदय, शक्ती आणि मालमत्ता यांसह ते एकमेकांवर प्रीती करीत असत.

> तेव्हा विश्वास धरणाऱ्यांचा समुदाय एकदिलाचा व एकजिवाचा होता. कोणीही आपल्या मालमत्तेतील काहीही स्वतःचे आहे असे म्हणत नसे, तर त्यांचे सर्व काही समाईक होते.
>
> *प्रे.कृ.४:३२*

आपण मालक आहोत की सेवक? आपल्याकडे जे काही आहे ते सर्व देवाकडून मिळाले आहे. वास्तविक ते सर्व देवाचे आहे. आपण त्याच्या मालमत्तेचे केवळ कारभारी आहोत. पुष्कळदा आपण गोष्टी खूप घट्ट धरून ठेवतो. देवाला गरज असेल तेव्हा सोडण्यास त्रास होऊ नये इतपत त्या ढिल्या धरल्या पाहिजेत. या वस्तूंना, मालमत्तेला सार्वकालिक मोल नाही याचे स्मरण आपण स्वतःला देत राहिले पाहिजे. आपण इतरांसाठी जे करतो ते टिकते. करिंथ येथील मंडळीला पौलाने सांगितले की, तुमचे दानधर्म गरिबांसाठी असावेत आणि ते सदासर्वकाळ टिकावेत (पाहा २ करिंथ.९:९).

आम्ही आमच्या संपत्तीचा आनंद घ्यावा, पण आमच्या संपत्तीने, मालमत्तेने आमचा ताबा घेऊन नये ही देवाची इच्छा आहे. पुढील प्रश्न आपण स्वतःला नेहमी विचारावा: "मी माझ्या संपत्तीचा मालक आहे, की माझी मालमत्ता माझी मालक आहे?" तुमच्याकडे जे आहे त्याचा उपयोग इतरांना आशीर्वादित करण्यासाठी तुम्ही करू शकता का? का ते द्यायला तुम्हांला जड जाते... तुम्ही वापरत नाही त्या गोष्टीदेखील?

बक्षिसादाखल मला अत्तराच्या बाटल्या नेहमी मिळतात. नुकताच माझा वाढदिवस झाल्याने मला बऱ्याच अत्तराच्या बाटल्या बक्षीस मिळाल्या. माझ्या एका मैत्रिणीने माझ्यासाठी चांगले कृत्ये केल्यामुळे तिला अत्तराची एखादी बाटली द्यावे असे एके दिवशी मला प्रकर्षाने वाटले. मी वापरत असलेल्या सेन्टपैकी एक सेन्ट तिला फार आवडतो हे मला माहीत होते. त्या सेन्टची एक बाटली माझ्या शेल्फवर होती, ती खूप महाग होती. मी स्वतःशीचे थोडी बोलले आणि लगेच ती बाटली काढून बॅगेत ठेवली व नेऊन तिला दिली. तिला फार आनंद झाला. त्यासाठी मला जास्त काही न करावे लागता, फक्त माझ्याकडची वस्तू द्यावी लागली.

बक्षिसे देणे हा प्रीती दाखवण्याचा चांगला मार्ग आहे. उदा. माझ्या एका मैत्रिणीने मला एकदा सांगितले की, तुझे वाढदिवसाचे बक्षीस मिळायला जर उशीर लागेल, कारण ते अजून तयार झाले नाही. ते मिळाले तेव्हा मला आश्चर्य वाटले, कारण ते माझ्या कुत्र्याचे हाताने काढलेले पेंटिंग होते. ज्याकडे पाहून मी अनेक वर्षे आनंद घेऊ शकेन असे ते बक्षीस होते. त्या पेन्टिंगमुळे मी आशीर्वादित झाले, पण तिने घेतलेल्या कष्टामुळे त्यापेक्षाही आशीर्वादित झाले.

देणे चांगले आहे, पण तुम्हांला शक्य असेल तेव्हा एखाद्या व्यक्तीला खरोखर ज्याची गरज आहे ते देण्याचा प्रयत्न करा. त्यांची गरज जाणून तुम्ही नेमके त्यांना जे हवे तेच दिले म्हणून ते खूप आनंदित होतील. माझ्या एका मैत्रिणीकडे विशेष जातीचे कुत्र्याचे पिलू होते. पिलू असतानाच ते मेले, त्यामुळे तिला खूप वाईट वाटले. त्याच

जातीचा कुत्रा मिळवणे कठीण होते, म्हणून मी प्रयत्न करून तिच्यासाठी एक मिळवला आणि तिला दिला. त्यामुळे तिला आश्चर्याचा धक्का बसला. आपण जर देवाकडे विनंती केली, तर लोकांना आशीर्वादित करण्याचे मार्ग तो आपल्याला दाखवील. आपण जर गोष्टी घट्ट धरून ठेवल्या नाहीत, आणि देण्याच्या संधी शोधत राहिलो तर आपल्याला आनंद घेता येईल, आणि इतरांना देता येईल एवढे देव आपल्याला नेहमी देतो.

कधी कधी देण्याची जबरदस्त उबळ मला येते. माझ्या मालमत्तेतून देऊन लोकांना माझी प्रीती दाखवावी असे मला वाटते. म्हणून मी माझ्या घरातील, ड्रॉवरमधील, कपाटातील वस्तू, माझी दागिन्यांची पेटी हे सर्व शोधून काय देता येईल ते पाहते. आणि मला कधीच गोष्टींची उणीव भासत नाही. मागच्या दोनचार वर्षांत कधीही न वापरलेल्या पुष्कळ वस्तू मला सापडतात. आपल्याकडे गोष्टी असणे आपल्याला फार आवडते, पण दुसऱ्या कोणाला तरी आशीर्वादित करण्यासाठी त्यांचा उपयोग करणे किती चांगले आहे!

काय द्यावे हे तुम्हांला समजत नसेल, तर देवाला विचारा. ताबडतोब दुःखी, गरजू लोकांना देता येतील अशा पुष्कळ गोष्टी तुमच्या लक्षात येतील. आपल्याकडे जे आहे त्याचा उपयोग आपण चांगल्या हेतूंसाठी केला, तर प्रीती वाढते, आणि देवाच्या मालमत्तेचे चांगले कारभारी म्हणून अधिक गोष्टी आपल्याला मिळतात.

हे ध्यानात घ्या की, जो हात राखून पेरतो तो त्याच मानाने कापणी करील; आणि तो सढळ हाताने पेरतो तो त्याच मानाने कापणी करील;

प्रत्येकाने आपआपल्या मनात ठरवल्याप्रमाणे द्यावे; दुःखी मनाने किंवा देणे भाग पडते म्हणून देऊ नये; कारण संतोषाने देणारा देवाला प्रिय असतो.

२ करिंथ. ९:६-७

तुम्ही तुमच्या मृत्यूशय्येवर असाल तेव्हा तुमच्या खात्यात किती शिल्लक आहे, तुमची मालमत्ता किती आहे हे विचारणार नाही. तुमच्यावर प्रीती करणारे कुटुंबिय, मित्र तुमच्याभोवती असावेत असे तुम्हांला वाटेल. लोकांवरील प्रीती दाखवण्यासाठी तुमच्याकडच्या साधनसामग्रीचा उपयोग करून आतापासून नातेसंबंध जोडण्याचा प्रयत्न करा.

क्रांतीकारी प्रीती

पास्टर टॉमी बार्नेट

शब्दकोशात क्रांती या शब्दाचे पुढीलप्रमाणे अर्थ दिले आहेतः **१.** शासनाविरुद्ध केलेले बंड, उठाव, शासनात केलेली उलथापालथ, सशस्त्र क्रांती, **२.** परिस्थितीचा किंवा काम करण्याच्या पद्धतीचा संपूर्ण कायापालट.

देव संपूर्ण जगात जी प्रीतीची क्रांती आणू पाहत आहे तिच्यात सहभागी होण्यासाठी हे अर्थ तुम्हांला लागू पडतात.

क्रांतीमध्ये गुंतलेला किंवा क्रांतीची तत्त्वे मान्य असलेला तो क्रांतीकारक असे डिक्शनरी म्हणते. प्रीतीची क्रांती हा खरोखर क्रांतीकारी सिद्धान्त आहे, कारण प्रीती म्हणजे काहीतरी मिळवण्याची आणि स्वतःजवळ असण्याची गोष्ट आहे असे जगाला वाटते. येशू ही विचारसरणी बदलण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि प्रीती ही आमच्यामधून प्रवाहित होणारी आणि आम्ही इतरांना दिली पाहिजे अशी प्रीतीच्या व्याख्या करणारी कृती आम्हांला करायला सांगत आहे.

म्हणून प्रीतीच्या या अद्वितीय चक्रात सहभागी होण्याचे आमंत्रण तुम्हांला आहे. जगाला देवाच्या कुटुंबात सामील करण्याचा प्रयत्न करीत असताना लोकांनी येशू ख्रिस्ताला अनुसरावे म्हणून त्यांना उत्तेजन देणे आणि प्रीती करणे हे उद्दीष्ट असलेल्या आणि सतत विस्तारित होत जाणारे हे वर्तुळ आहे.

प्रीती आणि उत्तेजनाच्या आपल्या या क्रांतीकारी वर्तुळामध्ये बेघर, नैसर्गिक आणि मनुष्यनिर्मित आपत्तींचे, अत्याचाराचे बळी, गर्भपाताच्या प्रश्नाला तोंड देणाऱ्या स्त्रिया, ज्यांची आर्थिक स्थिती हलाखीची आहे असे लोक, नोकरी नसणारे लोक इ. सर्वांचे स्वागत आहे.

प्रीतीची क्रांती साधी आहेः यात आपणा प्रत्येकाचा सहभाग आहे. आपल्या सभोवतील जे दुःखी, जाचलेले लोक आहेत त्यांना आपल्या वर्तुळास समाविष्ट करून आपापले वर्तुळ वाढवायचे आहे. नवीन लोकांना मंडळीत आणण्याच्या कार्यक्रमावर मंडळीने अनेक वर्षे जोर दिला आहे. पण असे अनेक कार्यक्रम आले आणि गेले, त्यांच्यामुळे विशेष अशी भर पडली नाही. उलट मंडळ्यांचे वर्तुळ विस्तारण्याऐवजी आकुंचन पावत गेले. लोकांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या कार्यक्रमांमुळे 'एकमेकांवर प्रीती करा' असे सांगणाऱ्या येशूचे आवाहन पूर्ण झालेले नाही.

क्रांतीचे आव्हान

प्रेषित पौलाने आपल्यासमोर हे आवाहन ठेवले आहे, ''तर मग देवाची प्रिय मुले ह्या नात्याने तुम्ही त्याचे अनुकरण करणारे व्हा; आणि ख्रिस्ताने तुमच्यावर प्रीती केली आणि देवाला सुवास मिळावा म्हणून स्वत:ला आपल्याकरता अर्पण व यज्ञ म्हणून दिले, त्याप्रमाणे तुम्हीही प्रीतीने चाला'' (इफिस.५:१-२).

प्रीतीच्या क्रांतीचे हे पाचारण आहे : प्रीती करण्याचा केवळ विचार करायचा नाही, तर प्रीतीत चालायचे. प्रीती करणे ही चांगली गोष्ट आहे हे पुष्कळ लोकांना माहीत आहे, पण तुमचे प्रीतीचे वर्तुळ तुम्ही कसे वाढवाल? रोज प्रीतीत चालण्याने ते वाढते.

आपल्या सर्वांचे प्रभावाचे एक वर्तुळ असते. आणि आपण सर्वजण एखाद्या वर्तुळाचा भाग असतो. आपल्यापैकी पुष्कळजणांना मित्रांच्या वर्तुळात राहायला आवडते. तुमच्या वर्तुळाचा आकार केवढा आहे? ते सर्वांसाठी आहे की खास लोकांसाठी आहे? आपण जर ख्रिस्ताच्या मनोवृत्तीने जगत असू, आणि आपल्यामध्ये जर ख्रिस्ताचे मन असेल तर आपल्या वर्तुळात सर्वांना प्रवेश असला पाहिजे.

माझ्या आतल्या वर्तुळात कोणत्या पापी लोकांना आणण्याचे आव्हान माझ्यासमोर आहे ते माझ्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, आणि त्यायोगे माझे वैयक्तिक वर्तुळ निश्चित होते. मी पापाचा प्रचंड द्वेष करतो, म्हणून पाप आणि पापी व्यक्तीविषयी मला वाटणारा द्वेष यांची सरमिसळ होऊन देऊन पापी व्यक्तीचा द्वेष करण्यास प्रवृत्त होणे तसे सोपे आहे. पण मी पापाचा द्वेष करावा, आणि पापी व्यक्तीवर प्रीती करावी ही देवाची इच्छा आहे हे मी शिकलो आहे. एखाद्या मुलाकडे रॅटलस्नेक जातीचा विषारी साप येत असल्याचे पाहून आपल्याला जसे वाटते तसा कधी कधी पापाच्या बाबतीत आपला दृष्टीकोन असतो. हा साप वेटोळे करून मुलाला दंश करायला तयार असतो. आपण सापाचा द्वेष करतो, पण मुलावर प्रीती करतो, आणि मृत्यूच्या संभाव्य दाढेतून मुलाला सोडवण्याची आपली इच्छा असते.

पापांच्या परिणामांविषयी लोकांना इशारा देण्यास आपण बांधील आहोत, पण पापी लोकांना आपल्या प्रीतीच्या वर्तुळात समाविष्ट करून घेण्यासाठी ख्रिस्ताच्या कळवळ्याने जगले पाहिजे. तसेच, आयुष्यात केलेल्या चुकीच्या निवडींचे नकारात्मक परिणाम काय आहेत हे पुष्कळ पापी लोकांना माहीत असते. म्हणून कोणीही उठून आपल्यावर दोषारोप करावेत हे त्यांना मान्य नसते. आपली जीवनशैली, व्यसने, अविश्वासूपणा किंवा भयंकर चुका यांमुळे केवळ देवच नाही, तर मंडळीसुद्धा आपले स्वागत करणार नाही या विचाराने ते त्रस्त झालेले असतात.

मंडळ्यांचे पुढारी आम्हांला नेहमी विचारतात की, फिनिक्स आणि लॉस एंजेलिस येथील ड्रीम सेन्टर या आमच्या मंडळ्या, कोणालाही नको असणाऱ्या, ज्यांच्यावर कोणाची प्रीती नाही, अशा लोकांसोबत जाणूनबुजून काम का करतात? त्यांनी अयोग्य निवडी केल्या आहेत. प्रत्येकाने आपल्या (देवाच्या) प्रीतीच्या वर्तुळात सहभागी व्हावे या देवाच्या इच्छेविषयी मला कधीही शंका वाटली नाही.

आपण जर येशू ख्रिस्ताचे खरे अनुयाची आहोत तर कोणालाही मज्जाव नसावा. यात वेगळ्या सिद्धान्ततत्त्वांवर विश्वास ठेवणाऱ्या, वेगळ्या पंथांच्या आणि अनुभवांच्या लोकांच्या समावेश आहे. आपण उत्तेजन देणारे, लोकांना देवाच्या विनाअट प्रीतीकडे नेणारी आशा सांगणारे, आणि देवाची त्यांच्यावर असणारी प्रीती दाखवणारा पुरावा झाले पाहिजे.

मला कोणी सहभागी करून घ्यावे किंवा कोणी वगळावे हे माझ्या हातात नाही. वधस्तंभावर टांगलेल्या स्थितीत असताना येशूने हे विधान केले, "हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही" (लूक.२३:३४). ज्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले त्यांचाही त्याच्या वर्तुळात समावेश होता. त्याच्यावर टीका करणारे, त्याच्यावर थुंकणारे, त्याची थट्टा करणारे आणि त्याने प्यायला पाणी मागितले तेव्हा क्रुरपणे आंब प्यायला देणारे या सर्वांचा त्याच्या प्रीतीच्या वर्तुळात समावेश होता.

ज्यांनी आपली आगळीक केली, अपराध केला त्यांनाही सामील करून घेण्यासाठी आपले वर्तुळ अस्तित्वात आहे. माझ्या वर्तुळातील लोकांशी कधीही भांडायचे नाही हे मी शिकलो आहे. आमच्यात भांडणे होत नाहीत. माझ्या प्रीतीच्या वर्तुळात मी जोपर्यंत सर्वांचा समावेश करतो तोपर्यंत मी सुरक्षित आहे. म्हणजे मग मी दुखावला जाणार नाही.

तुम्ही खूप मित्र करू शकत नाही, पण तुम्हांला जर खूप शत्रू असतील तर तुम्ही जाल तेथे एखादा शत्रू तुमच्या नजरेस पडेल. ज्याचा तुम्ही द्वेष करता तेच तुम्हांला जास्त लगटून राहते. तुम्ही प्रत्येकाचा स्वीकार केला तर देवाची प्रीती म्हणजे नक्की काय हे तुमच्या लक्षात येऊ लागते, आणि त्यात तुम्ही पारंगत होऊ लागता. तुमच्या प्रीतीच्या वर्तुळाबाहेर असलेली कोणतीही व्यक्ती तुम्हांला दुखावू शकते, पण तुमच्या वर्तुळाच्या आत असलेली व्यक्ती तुम्हांला दुखावू शकणार नाही.

धर्माच्या ज्या नियमशास्त्रानुसारी मानदंडाला बरेचजण खूप महत्त्व देतात ते अरुंद आणि खास लोकांसाठी म्हणजे इतरांना वगळणारे आहे. प्रीतीच्या क्रांतीचा मानदंड

सार्वत्रिक आहे. प्रीती आरोग्य देते! प्रीती प्रकाशित करते! प्रीती उचलून धरते! प्रीती पुनःस्थापना करते! माझ्या प्रीतीचे वर्तुळ जितके विस्तारत जाईल तितका अधिक आनंदीत मी होईन, आणि देवाची प्रीती लोकांना दाखवू शकेन.

कृतीशील प्रीतीची क्रांती

लॉस एंजेलिस येथे आम्ही ड्रीम सेन्टर सुरू केले तेव्हा, सरकार, मंडळ्या आणि आणि पोलिसांनीही ज्यांची आशा सोडून दिली होती अशा लोकांकडे जाणूनबुजून गेलो. गुंड, फरारी, बेघर, वेश्या, कुख्यात गुन्हेगार, दुर्लक्षित तरुण यांना सामावून घेण्यासाठी आम्ही आमचे वर्तुळ विस्तारले. आमच्या प्रीतीचे वर्तुळ इतके विस्तारले आहे की, जगभरातील आमची ड्रीम सेन्टर्स जगाला नको असलेल्या, दुर्लक्षित लोकांकडे पोहोचून त्यांना सेवेच्या कृत्याद्वारे ख्रिस्ताची प्रीती दाखवत आहेत.

लॉस एंजलिस येथे आम्ही 'गल्ली दत्तक योजना' राबवतो. त्या योजनेअंतर्गत दर आठवडी शेकडो स्वयंसेवक शेजारी जातात आणि त्यांची अंगणे स्वच्छ करणे, भिंती रंगवणे, आणि इतर निरनिराळ्या प्रकारे त्यांची सेवा करतात. ज्यांची ओळखही नाही त्यांना ख्रिस्ताची प्रीती दाखवावी म्हणून ही सेवा केली जाते.

लॉस एंजल्स शहरातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळली असताना, गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असताना आमच्या ड्रीमसेन्टरजवळच्या वस्तीतील पुष्कळ लोक ख्रिस्तामध्ये आले आहेत त्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण ७० टक्क्याने कमी झाले आहे. गुन्हेगारी, भ्रष्टाचार, पाप यांसाठी कुख्यात असलेला हा भाग आता ख्रिस्ताच्या प्रीतीत चालण्याचे उदाहरण आहे. ही प्रीतीची क्रांती आहे.

क्षमा करणे आणि देणे

तुम्हांला पापक्षमा मिळाली आहे का? मग इतरांना क्षमा करा. प्रीती क्षमा करणारी आणि देणारी आहे.

प्रीती देणे ही सर्वांत कठीण गोष्ट आहे. अनेक बाबतीत ती पैसे देण्यापेक्षा कठीण आहे, कारण प्रीती खुल्या हृदयातून आली पाहिजे.

पण आपल्यापैकी पुष्कळजणांचा प्रीतीविषयी गैरसमज आहे. प्रीती ही आपल्याला मिळावी आणि आपल्याकडे असावी अशी गोष्ट आहे. पण प्रीती खरी अशी नाही.

प्रीती ही अशा गोष्ट आहे जी तुम्ही फक्त देऊ शकता. तुमच्याकडे साठवून ठेवू शकत नाही. प्रीती आपल्या कुणाच्याही मालकीची नाही - आपण प्रीतीचा फक्त उपयोग करतो.

ज्याला नेहमी प्रीतीची गरज आहे, पण कधीही पुरेशी मिळत नाही अशा कोणाला कधी तुम्ही भेटला का? आपण अधिक प्रीतीला पात्र आहोत असे जोपर्यंत ते समजतात तोपर्यंत त्यांना आपल्याला कमी प्रीती मिळाली असे वाटते. आपल्या कमतरतेवरच त्यांचे इतके लक्ष केंद्रित झालेले असते की, त्यांना आपला पुरवठा कधीच पुरेसा वाटत नाही.

आम्ही दुःखी लोकांना मदत करतो तेव्हा आम्हांला केवळ प्रीतीची गरज आहे, कोणीतरी आमच्यावर प्रीती करावी असे आम्हांला वाटते, असे सांगणारे लोक आम्हांला नेहमी भेटतात. पण याची विरुद्ध बाजू सत्य आहे हे माझ्या लक्षात आले आहे : कोणीतरी आपल्यावर प्रीती करावी असे जितके आपल्याला वाटते त्यापेक्षा अधिक आपण कोणावर तरी प्रीती करावी असे वाटते.

कसल्याही अटीविना आपण प्रीती करतो तेव्हा आपण स्त्री किंवा पुरुषाशी जखडून राहणार नाही. पण जेव्हा कोणीतरी आपल्यावर प्रीती करावी असे आपल्याला वाटते तेव्हा आपण त्यांचे गुलाम होतो, आणि आपल्यावरील त्यांच्या प्रीतीच्या अभावाचे कैदी होतो.

घेण्यापेक्षा देणे अधिक महत्त्वाचे आहे

प्रीती घेण्यापेक्षा देणे अधिक महत्त्वाचे आहे असा माझा विश्वास आहे. तुम्ही प्रीती दाखवता तेव्हा तो ज्याच्यातून देव आपल्यावर सतत वर्षाव करीत राहतो असा स्वर्गीय नळ बनतो. जितकी अधिक प्रीती तुम्ही व्यक्त कराल तितका अधिक तो नळ उघडून लोकांवर प्रीतीचा प्रवाह देणे तुम्हांला सोपे जाते.

तुमच्याकडे किती प्रीती आहे हे तुम्ही किती प्रीती देता याच्याशी संबंधित आहे. हा विरोधाभास आहे, पण सत्य आहे : प्रीती राखून ठेवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ती देणे.

> प्रीती राखून ठेवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ती देणे.

जर तुम्ही नेहमी प्रीती देत राहिला, तर काय द्यायचे यावर तुमचे लक्ष केंद्रित राहील आणि तुमचा पुरवठा वाढेल. तुमच्यावर जरी कोणी उलट प्रीती केली नाही, तर

येशूकडून तुम्हांला प्रीतीचा कधी न संपणारा पुरवठा चालू राहील, आणि तुमचे जीवन प्रीतीने पूर्ण भरून जाईल.

मी तरुण होतो तेव्हा आतापेक्षा लोकांवर माझी कमी प्रीती होती. पण मी प्रीती देण्याचा प्रयत्न केला तेव्हा माझा स्वतःचा साठा वाढल्याचे माझ्या लक्षात आले. माझ्याकडे असलेली प्रीती जोपर्यंत मी वापरतो तोपर्यंत देव मला सखोल प्रीती देत राहतो.

तरुण असताना मुले मला विशेष आवडत नसत. पण एके दिवशी त्यांच्यावर प्रीती करण्याचा निश्चय मी केला. आता माझे अंतःकरण मुलांवरील प्रीतीने ओसंडून वाहते. आता मी मुलांवर प्रीती करतो, त्यांच्या सहवासात मला आनंद वाटतो आणि त्यांना आशीर्वादित करायला मला आवडते असे मनापासून म्हणू शकतो.

आता मी जीवनाचा विपुल आनंद घेतो. पण मी तरुण सुवार्तिक होतो तेव्हा इतका आनंदी नव्हतो. वीस वर्षांपूर्वी मला जितका आनंद होता त्याच्या वीसपट आनंद आता आहे. आनंदी राहायचे की दुःखी याचा निर्णय मी घेऊ शकतो हे मी ठरवले, आणि मी आनंदाची निवड केली. आनंद वाटायची निवड मी केली तेव्हापासून माझ्या जीवनात अधिक आनंद आला आहे.

प्रीती मिळवण्याचा प्रयत्न करणे हा चुकीचा मार्ग आहे हे लोकांना समजावे म्हणून त्यांना मदत करण्याची गरज आहे. प्रीती मिळवण्यासाठी आपल्याला ती शोधावी लागत नाही, तर द्यावी लागते हे आपल्या उदाहरणाद्वारे त्यांना दाखवावे.

खरी प्रीती कोणत्याही माणसापासून येत नाही, तर देवापासून येते. माझी पत्नी मार्जा हिच्यावरील माझी प्रीतीही शुद्ध आहे, कारण तिचा उगम मला माहीत आहे. प्रीती घेण्यापेक्षा देण्यात अधिक आशीर्वाद आहे हे आम्ही शिकलो आहोत. आणि पतिपत्नी एकमेकांना प्रीती देतात तेव्हा त्यांचा विवाह सुखी होतो.

हरवलेल्या आणि मरणपंथाला लागलेल्या जगाला कृतीशील प्रीती द्यायला ख्रिस्ताची मंडळी शिकते तेव्हा आपले प्रीतीचे वर्तुळ आपण विस्तारू आणि समाजाच्या भल्यासाठी समाजावर प्रभाव टाकू आणि समाजामध्ये सुधारण घडवून आणू.

तुम्ही क्रांतीसाठी तयार आहात का? तुमच्या वैयक्तिक प्रीतीच्या क्रांतीमध्ये वाटचाल करण्यासाठी काही कल्पना पुढे दिल्या आहेतः

१. प्रीती बोला.

प्रीतीचा धबधबा होऊन इतर लोकांवर नेहमी प्रीतीचा वर्षाव व्हा. ''मी तुझ्यावर प्रीती करतो'' असे प्रत्येक ख्रिस्ती विश्वासणारा अधिकाधिक बोलेल तेव्हा जगाच्या नातेसंबंधांची व्याख्याच पुन्हा लिहिली जाईल. मी तुमच्यावर प्रीती करतो असे तुम्ही जर लोकांना सांगाल, तर तुम्हांलाही ते परत ऐकायला मिळेल. तुम्ही अगदी मनापासून ''मी तुझ्यावर प्रीती करतो'' असे म्हणाल, तर तुम्ही ख्रिस्ताच्या प्रीतीने शक्तीशाली व्हाल.

२. तुमची प्रीती लिहून काढा

मला जी चांगली पत्रे येतात त्यांच्यासाठी मी ''मी तुमच्यावर प्रीती करतो'' ही फाईल तयार ठेवतो. माझ्यासाठी ते खूप महत्त्वाचे आहेत. तुम्ही दिलेली एखादी उत्तेजनाची नोट दुसऱ्या कोणासाठी तरी खूप महत्त्वाची असेल. तुमची प्रीती लिहिण्याद्वारे ती कायमस्वरूपी आणि टिकाऊ होते. ते शब्द वाचून जर कोणी निराशेवर विजयी झाले असेल तर तो ते आयुष्यभर जपून ठेवू शकतो. देवाच्या प्रीतीचा संदेश तुम्ही ज्याला लिहून दिला असेल त्याला उत्तेजन मिळते, तुम्हांला प्रेरणा मिळते, आणि देवाच्या प्रीतीविषयीची जाणीव वाढते.

३. अविश्वसनीय, धक्कादायक वाटतील अशा प्रीतीपूर्ण गोष्टी करण्याची जोखीम घ्या

ख्रिस्ताची प्रीती दाखवण्यासाठी लोक आपल्याकडून अपेक्षा करणार नाहीत अशा गोष्टी आपण केल्या, तर इतर लोकांच्या जीवनात त्याचा परिणाम बहुगुणित होईल. कधीकधी थोडेसे अधिक करण्यासाठी थोडी जोखीम घ्यावी लागते - हा प्रीतीच्या क्रांतीचा एक भाग आहे. स्वतःला विचारा, ''इतरांवर प्रीती करण्याबाबत मी आता जे करीत आहे त्यापेक्षा अधिक काही करू शकतो का?'' तुमचे जीवन अविस्मरणी बनवा; क्रांतीकारक नेहमी धक्कादायक गोष्टी करतात. देवाच्या प्रीतीची अभिव्यक्ती करीत असताना तुमच्या प्रीतीला काहीतरी धक्कादायक करू देऊन आजचा साधारण दिवस असाधारण करा.

४. प्रीतीमध्ये रडण्याची आणि आनंद करण्याची इच्छा असते

सर्वसाधारणपणे प्रीती दाखवणे म्हणजे जे आनंद करण्याच्या मूडमध्ये नाहीत त्यांना मदत करणे. कोणाच्या तरी दुःखात सहभागी होणे, दुःखात त्यांना साथ देणे यामुळे प्रीती आणि विश्वासाचा मजबूत पाया घातला जातो. येशू लग्नसमारंभांना आणि

प्रेतक्रियांना गेला. या दोन्ही परिस्थितीत लोकांना काय हवे हे त्याला माहीत होते. देवाची प्रीती आपण सर्व परिस्थितीत दाखवली पाहिजे, म्हणजे आनंदाच्या प्रसंगी आणि दुःखाच्या प्रसंगी आपल्याला प्रीती व्यक्त करताना अडचण होणार नाही.

५. निरनिराळ्या लोकांवर निरनिराळ्या प्रकारे प्रीती करण्यास शिका

लोक प्रीती निरनिराळ्या प्रकारे देतात आणि घेतात, म्हणून आपण लोकांवर निरनिराळ्या प्रकारे प्रीती करायला शिकले पाहिजे. जे आपल्या जवळचे आहेत त्यांच्यावर प्रीती कशी करावी आणि त्यांच्याकडून प्रीती कशी घ्यावी हे आपण प्रत्येकाने शिकणे महत्त्वाचे आहे, आणि जगात आपल्या भोवताली असलेल्या लोकांवर, विशेषतः ज्या लोकांवर दुसरे कोणी प्रीती करीत नाही त्यांच्यावर प्रीती कशी करावी हे शिकणे आवश्यक आहे. लोकांचा आणि देवाच्या वचनाचा अभ्यास करा. येशूने लोकांवर कशी प्रीती केली हे पाहा म्हणजे निरनिराळ्या लोकांवर निरनिराळ्या प्रकारे कशी प्रीती करावी हे तुम्हांला समजेल. त्यामुळे देवाचे गौरव होईल व ज्यांच्यावर प्रीती केली त्यांनाही आपण मोलवान आहोत असे वाटेल.

तुम्हांला क्रांतीकारक व्हायचे आहे का?

मग आज तुम्ही क्रांतीकारकासारखे वागाल का? आजपासून तुमच्या आयुष्याचा प्रत्येक दिवस तुम्ही प्रीतीच्या क्रांतीचे भाग आहात याचा पुरावा असेल का? कशामुळे तुमचे स्मरण केले जाईल? सरतेशेवटी केवळ प्रीती महत्त्वाची आहे. प्रीती आपल्याला सार्वकालिक मूल्य देते.आपण देवाच्या प्रतिमेप्रमाणे बनवलेली आध्यात्मिक निर्मिती असावे असे प्रत्येकाला वाटते, आणि केवळ प्रीती हाच तसे होण्याचा मार्ग आहे.

तुमची प्रीती अमर्याद आहे असे समजून प्रीती करा, आणि खरोखरच तुमची प्रीत अमर्याद आहे हे तुमच्या लक्षात येईल. एखाद्या व्यक्तीला तुम्ही प्रथमच भेटाल तेव्हा त्याच्यावर तुम्ही कदाचित प्रीती करणार नाही, पण तुमच्याकडे असलेली प्रीती जर तुम्ही दिली तर ती वाढेल.

तुम्ही सर्वांत प्रेमळ व्यक्ती व्हावे असे आवाहन मी करतो, तुम्ही सर्व वेळ जर प्रीती केली तर तुमचा प्रीतीचा साठा कधीही संपणार नाही हे मी सांगतो.

मग तुमचे काय म्हणणे आहे? देव आज उभी करीत असलेल्या सैन्यामध्ये आपले नाव पुन्हा नोंदवा म्हणजे मी तुम्हांला प्रीतीच्या क्रांतीमध्ये पाहीन.

प्रकरण

15

आपल्याला संजीवनाची गरज आहे, की क्रांतीची?

प्रत्येकजण जग बदलण्याचा विचार करतो, पण स्वतःमध्ये बदल करण्याचा कोणी विचारही करीत नाही.
लिओ टॉलस्टॉय

एखादी गोष्ट संजीवित होते, तेव्हा जुन्या गोष्टीला पुन्हा जीवन मिळते, तिच्याकडे पुन्हा लक्ष वेधवले जाते. समाजात धार्मिक बाबतीत असे घडते तेव्हा त्याला संजीवन म्हणतात. माझे प्रौढपणाचे सर्व आयुष्य मी ख्रिस्ती विश्वासणारी आहे, लोकांना संजीवनाविषयी बोलताना आणि प्रार्थना करताना मी ऐकले आहे. पण आपल्याला संजीवनाची नाही तर दुसऱ्या कोणत्या तरी गोष्टीची गरज आहे असे मला वाटते. मला वाटते आपल्याला क्रांती हवी आहे. क्रांती म्हणजे अचानक होणारा आमूलाग्र बदल.

क्रांतीकारक बदलापेक्षा जुन्याच जखमांना मलमपट्टी करण्यात आपण आनंद मानतो. पण पूर्वीच्या संजीवनांनी मंडळीत आणि जगात बदल झाला का? त्या त्या काळात त्यांचा उपयोग झाला हे खरे, पण आज मंडळीने जगात प्रभावी होण्यासाठी कशाची गरज आहे? ख्रिस्ताने आपल्याला जगाचा प्रकाश होण्यासाठी पाचारण केले त्यानुसार आपण प्रकाश होण्यासाठी कशाची गरज आहे?

बार्बारियन वे या आपल्या पुस्तकात एर्विन मॅक्मॅनस लिहितात, "निर्जंतुक, घासूनपुसून चकचकीत केलेले ख्रिस्तीत्व सोडा आणि तडजोडीऐवजी क्रांती, सुरक्षिततेऐवजी त्रास आणि कोमट पाणी घालून पांचट केलेल्या धर्माऐवजी आवेशाची निवड करणाऱ्या पूर्वीच्या सामर्थ्यशाली विश्वासाकडे परत या." ख्रिस्ताचा कळवळा त्याला वधस्तंभाकडे घेऊन गेला. मग पुढच्या पिढीला क्रांतीकारी प्रीतीचा अनुभव यावा म्हणून आपला कळवळा आपल्याला आपल्या काही जुन्या मार्गांचा त्याग करू देईल का?

येशू क्रांतीकारक होता, तो निश्चितच रूढीपरंपरांचा समर्थक नव्हता. तो बदल घडवण्यासाठी आला, त्यामुळे त्याच्या काळातले धार्मिक पुढारी अस्वस्थ झाले. देव कधीही बदलत नाही, पण तो इतरांमध्ये बदल घडवतो. त्याला सर्जनशीलता आणि नवीन गोष्टी आवडतात, तो गोष्टी ताज्यातवान्या आणि धगधगत्या ठेवतो हे मला समजले आहे.

काही मंडळ्या संगीतासारखी साधी गोष्ट बदलण्यादेखील विचार करणार नाही. ते गीते गातील आणि केवळ ऑर्गन वाजवतील. त्यांच्या मंडळ्यांचा आकार छोटा होत चालला आहे, समाजावर त्यांचा काही परिणाम होत नाही हे त्यांच्या लक्षात येत नाही. रविवारी सकाळी त्यांनी आपल्या सभासदांकडे नीट पाहिले पाहिजे आणि केवळ मध्यवयीन व वृद्ध माणसेच चर्चमध्ये आहेत याचा विचार केला पाहिजे. तरुण मुले कोठे आहेत? उत्साह, आवेश कोठे आहे? जीवन कोठे आहे?

काही वर्षांपूर्वी, आम्ही देशभरांत घेत असलेल्या सभांना कमी गर्दी होऊ लागली आहे, आणि फक्त मध्यमवयीन व वृद्ध लोक येतात हे आमच्या लक्षात आले. त्या वेळी २४ वय असलेल्या आमच्या मुलाने आम्हांला संगीत, डेकोरेशन, प्रकाशयोजना आणि आमची वेशभूषा यांत मोठे बदल करायला सुचवले. आमच्या पिढीला येशूच्या सुवार्तेची नितांत गरज आहे, पण जुन्या पद्धतीच्या धर्मामुळे आणि कंटाळवाण्या पद्धतीमुळे ते सुवार्तेपासून दूर राहतात असे त्याने सांगितले. साधारणतः वर्षभर डेव्हने आणि मी या कल्पनेला विरोध केला. बदलण्याची इच्छा नसलेले लोक जी सबब सांगतात तीच आम्ही सांगितली, "देव बदलत नाही." तसेच आतापर्यंत आम्ही जे केले ते यशस्वी ठरले, मग आता त्यात बदल करण्याची गरज काय? असे आम्हांला वाटले. आमच्या विचारसरणीत बराच अहम् दडला होता. आमचा चोवीस वर्षांचा मुलगा आता कुठे आमच्यासोबत सेवेत आला आणि काय करावे हे तो आम्हांला सांगतो? पण वर्ष उलटत गेले आणि इतर तरुणांचे विचार आम्ही ऐकले तेव्हा आमच्या

भक्तीच्या पद्धतीत, संदेशामध्ये बदल करण्याची गरज नाही, पण त्यासोबतच्या इतर गोष्टी बदलण्याची गरज आहे हे आम्हांला पटले.

जग बदलते, लोक बदलतात, नवीन पिढी मागच्या पिढीपेक्षा वेगळ्या तऱ्हेने विचार करते, आणि त्यांच्यापर्यंत कसे पोहोंचावे याचा विचार आपण केला पाहिजे. तरुण लोकांनी माझ्या सभांना यावे असे मला वाटत होते, पण त्यांना रस वाटेल असे काही करण्यास मी तयार नव्हते. पण हळूहळू आमची अंतःकरणे नवीन गोष्टींसाठी खुली झाली आणि आम्हांला मोठे परिणाम पाहायला मिळाले. आमचे जुने सभासद टिकले तसेच नवीन लोकही आले. त्यांच्यापैकी पुष्कळजण तरुण आणि आवेशी होते. आपल्याकडे जर जुन्या पिढीची सुज्ञता आणि नवीन पिढीचा सर्जनशीलता असेल तर दोन्ही पिढ्या आपल्याकडे राहतात.

एकदा आम्ही आमच्या पुढाऱ्यांची सभा घेतली. बदल करण्याचा आग्रह धरणाऱ्या आमच्या मुलाला काहीतरी वेगळी कल्पना सुचली, मला ती पसंत पडली नाही. तो त्याचा मुद्दा ठासून सांगत राहिला तेव्हा मी बाकीच्या सर्वांना विचारले, ''यावर तुमचे म्हणणे काय?'' ते सर्वजण माझ्या मताशी सहमत होते. सर्वांचे मत माझ्यासारखे आहे असे मी म्हटल्यावर आमचा मुलगा डॅनने म्हटले, ''आई, ते तुझ्यासोबत सहमत होतील यात काहीच आश्चर्य नाही, ते सर्वजण तुझ्या वयाचे आहेत.'' तेव्हा माझ्या लक्षात आले की, मी माझ्यासारखेच लोक माझ्याभोवती गोळा केले आहेत, म्हणून मी विविधतेला अडखळण होत आहे. आपल्याला केवळ एकाच पिढीतील पुढाऱ्यांची नव्हे, सर्व वयाच्या पुढाऱ्यांची गरज आहे.

दुसऱ्या एका प्रसंगी, डॅनला आमच्या मासिकात काही रंग वापरायचे होते. ते रंग आम्ही पूर्वी कधी वापरले नव्हते. मला ते रंग आवडले नाहीत म्हणून मी नाही म्हटले. पण नवीन रंग वापरण्याचा त्याचा आग्रह होता. मी ठामपणे म्हटले, ''मला ते रंग आवडले नाहीत, आणि आपण ते वापरणार नाही.'' त्याने म्हटले, ''स्वतःची सेवा करण्यासाठी तुला पाचारण झाले हे मला माहीत नव्हते. इतर लोकांना ते रंग आवडत असतील तर काय?'' त्या वेळी माझे डोळे उघडले. माझ्या लक्षात आले की, माझ्या ऑफिसमधील ड्रेसकोड माझ्या पसंतीप्रमाणे होते, मासिकातील, जाहिरातीतील आणि इमारतीचे रंग माझ्या पसंतीचे होते. मला आवडणारे संगीत आम्ही वाजवत असू. माझे बहुतेक निर्णय माझ्या आवडीचे होते, लोकांना गरज होती ते नव्हते.

डेव्हच्या आणि माझ्या लक्षात आले की, आमच्याकडे भक्तीच्या पद्धती होत्या, पण देवाच्या दृष्टीने त्या काहीच महत्त्वाच्या नव्हत्या. त्याला त्याचा संदेश सर्वांना

सांगायचा होता. म्हणून तेव्हापासून आम्ही बदल करू लागलो. आम्ही आमची वेषभूषा बदलली. तरुणांना आकर्षित करील असा वर्शिप बॅन्ड आम्ही आणला. तरुण पिढीला आवडतील अशी गाणी गायचे आम्ही ठरवले. आताच्या पिढीला सर्व गोष्टी झटपट करायला हव्या असतात, म्हणून आम्ही सभांची वेळ कमी केली. मला तीन तासांच्या सभांची सवय होती, पण इतरांना नाही. आम्ही आमची प्रकाशयोजना बदलली. वातावरणनिर्मिती करण्यासाठी आम्ही फॉग मशीन (धुके तयार करणारे) देखील घेतले. या मशीनमुळे किंवा तिच्यापासून निर्माण होणाऱ्या धुक्यामुळे लोकांना नीट दिसत नाही असे मला अजूनही वाटते, पण लोक जर माझ्याकडून सुवार्तासंदेश मनापासून ऐकत असतील तर या धुक्याचे मला काही वाटत नाही. लोकांना येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेकडे वळवण्यासाठी पौल सर्वांसाठी सर्व काही झाला हे लक्षात ठेवा (पाहा १ करिंथ.९:२-२२). भक्तीची पद्धत कशी असावी यावर त्याने जोर दिला नाही आणि आपणही देऊ नये.

पवित्र शास्त्र सांगते की अखेरच्या दिवसात आपल्याला स्वार्थी आणि स्वकेंद्रित मंडळी पाहायला मिळेल. लोकांची नीतीमूल्ये ढासळतील, ते धर्माचे रूप स्वीकारतील पण सुवार्तेचे सामर्थ्य नाकारतील (पाहा २ तीमथ्य.३:१-५). आपल्या मंडळ्यांत देवाचे सामर्थ्य पाहण्याची गरज आहे. आपल्याला बदललेली जीवने, आरोग्य, पुनःस्थापना आणि उद्धार हे पाहायची गरज आहे. देवाची प्रीती मुक्तपणे वाहत असलेली पाहण्याची गरज आहे. आपण क्रांती पाहण्याची गरज आहे, आणि मी तिचा भाग होण्याचा निश्चय केला आहे.

आमच्या कॉन्फरन्सेसमध्ये केलेले बरेचसे बदल मला विशेषसे आवडत नाहीत हे मी प्रामाणिकपणे सांगते. पण आपण आपल्या पद्धती सोडून आजच्या काळासाठी असलेल्या देवाच्या पद्धती स्वीकारण्याची गरज आहे हे मी शिकत आहे. आम्ही केलेले बरेचसे बदल हे व्यक्तिशः माझ्यासाठी त्याग असे आहेत. पण तसे करणे योग्य आहे हे मला माहीत आहे. आता मूर्खपणाचे वाटेल, पण पूर्वी मला वाटायचे की, जीन्स घालून व्यासपीठावरून संदेश सांगणाऱ्या लोकांना देव आशीर्वाद देणार नाही. पण मी गंभीरपणे विचार करू लागले की, दहा आज्ञा घेण्यासाठी मोशे पर्वतावर गेला तेव्हा त्याने कोणते कपडे घातले असतील? आणि मी किती मूर्ख आहे हे माझ्या लक्षात आले. बाप्तिस्मा करणारा योहान विचित्र कपडे घालत असे. त्याच्या खाण्यापिण्याच्या सवयी विचित्र होत्या, आणि जंगल हा त्याचा पत्ता होता. पण त्याने क्रांतीचे नेतृत्व केले. त्याने मशीहासाठी मार्ग तयार केला. तो संघटित धर्माचा पुरस्कर्ता नव्हता. त्याच्या काळातील धर्मपुढाऱ्यांना त्याने सापाची पिले म्हटले. प्रार्थना करण्यासाठी मंदिरात जाणाऱ्या पण गरजू लोकांना मदत करण्यासाठी बोटही न उचलणाऱ्या त्याच्या वेळच्या स्वतःला धार्मिक समजणाऱ्या लोकांचा त्याला राग येत होता.

देव अंतःकरण पाहतो आणि आपणही ते शिकण्याची गरज आहे. मोशे किंवा योहान कसे दिसत होते याच्याशी त्याला कर्तव्य नव्हते. मृत धर्माविरुद्ध बंड करण्याचे, आणि लोकांना त्याच्या निकट सहवासात आणण्याचे धैर्य दाखवणारे कोणीतरी मिळाले म्हणून त्याला आनंद झाला.

प्रीती त्याग करते

त्याग या शब्दाने आपल्याला तितकासा आनंद वाटत नाही, कारण आपल्याला आवडणारी किंवा आपल्याजवळ ठेवून घ्यावीशी वाटणारी गोष्ट द्यायची असा त्याचा अर्थ होतो. नवीन कराराच्या मूळ भाषेत या शब्दाचा अर्थ "अर्पणाची कृती किंवा जे अर्पण केले ते" असा होतो. प्रीती स्वतःचीच इच्छा पुढे रेटायचा प्रयत्न करीत नाही (पाहा १ करिंथ.१३:५). प्रीती बरेचदा, आपण करीत असलेल्या एखाद्या गोष्टीचे अर्पण करायला सांगते.

जुन्या करारातील अर्पणात पापासाठी अर्पण केलेल्या पशूंचा संदर्भ होता, पण नवीन करारात त्याचा संदर्भ ख्रिस्ताने वधस्तंभावर केलेल्या स्वतःच्या अर्पणाशी आहे. तसेच नवीन करार विश्वासणाऱ्यांना "तुम्ही आपल्या शरीराचा जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय असा यज्ञ करावा" असे सांगते (रोम.१२:१).

आज जगात जितकी खरी प्रीती पाहायला मिळाली पाहिजे, तितकी मिळत नाही याचे कारण लोकांना त्याग, अर्पण करायला आवडत नाही. त्यागपूर्ण रीतीने न देता एखादी गोष्ट आपल्याजवळच ठेवायची ही आपली उपजत प्रवृत्ती आहे. आपण आपला आराम, सुखसोयी सोडायला तयार नसतो. एखादी गोष्ट द्यायला सोपी किंवा सोयिस्कर असेल तर आपण कदाचित देऊ, पण जेव्हा त्याग, बलिदानाची गरज पडते तेव्हा आपण मागे सरकतो. "देवाचे मार्ग माझ्या मार्गांपेक्षा वेगळे आहेत का?" असा प्रश्न स्वतःला न विचारता तुमच्यापैकी कितीजण आपल्याच मार्गांना चिकटून राहण्याचा प्रयत्न करतात? पवित्र शास्त्र सांगते की, देवाचे मार्ग आपल्या मार्गांपेक्षा उंच आहेत (पाहा यशया ५५:८).

आपण नवीन सवयी अंगी बाणवू शकतो आणि त्यागपूर्ण जीवन आनंदाने जगू शकतो. इतरांशी दयाळूपणे वागावे हे लक्षात घेऊन आपण उदारपणे राहतो तेव्हा देवाला आनंद वाटतो (पाहा इब्री.१३:१६). "देवाने जगावर इतकी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला" (योहान.३:१६). प्रीतीने दिले पाहिजे, आणि देण्यासाठी त्यागाची गरज आहे!

एखादी गोष्ट करण्याच्या आपल्या सर्वांच्या काही ना काही पद्धती आहेत. आपलीच पद्धत योग्य असे आपल्याला वाटते. धर्माची मुख्य समस्या म्हणजे सर्वसाधारणपणे तो जुन्याच पद्धतीत अडकून पडतो. हे मार्ग लोकांची खरी सेवा करीत नाहीत, बदलण्यास नकार देतात. आपल्या मार्गांचे बलिदान करण्यास तो तयार नसतो.

माझी एक मैत्रीण तिच्या किशोरवयीन मुलीला दर रविवारी चर्चला पाठवत असे, पण तिला तेथे तेथे नेहमीच कंटाळा येत असे, सभा संपण्याची वाट न पाहता या मुली घरी येत असत. तिने कबूल केले की, तेथे जाऊन आम्हांला काहीच मिळत नव्हते. या मुलींची देवावर प्रीती असेल, पण चर्चमधील पद्धती त्यांना आवडत नसतील. त्या नवीन पिढीच्या आहेत, आणि नवीन प्रकारे गोष्टी करतात. दुःखाची गोष्ट म्हणजे, ख्रिस्ती घरात वाढलेली पुष्कळ मुले मोठी झाल्यावर कोणत्याही धर्मापासून दूर जातात. ढोंगीपणामुळे ते निराश होत असतील. रुढीपरंपरा पाहून वैतागत असतील किंवा अश्रूंना कंटाळत असतील. मंडळीने त्यांच्यासाठी कार्य केले नाही. त्यांना काहीतरी मूलभूत आणि सामर्थ्यशाली, काहीतरी साहसी हवे असते, पण त्यांना करता येणार नाही अशा कंटाळवाण्या गोष्टींत ते अडकतात.

लॉस एंजल्स येथील ड्रीस सेन्टरचा सहसंस्थापक टॉमी बार्नेट यांच्या लक्षात आले की त्या भागातील पुष्कळ तरुण मुले स्केटिंग करतात. सिनेमाच्या शुटींगसाठी एक प्रख्यात स्केटर त्या भागात येणार आहे, आणि शुटींगसाठी ५०,००० डॉलर्सचा हाफ पाईप उभारणार आहेत हे बार्नेट यांना समजले तेव्हा त्यांनी शुटिंग झाल्यावर हा पाईप चर्चसाठी मिळेल का असे विचारले. त्यांनी तो दिला, त्यांनी तो ड्रीम सेन्टरमध्ये आणला, आणि आता शनिवारच्या सभेला येणाऱ्या कोणालाही हवे असेल तर स्केटबोर्डचे तिकीट दिले जाते. काहीतरी नवीन आणि वेगळे करण्याच्या पास्टर बार्नेटच्या इच्छेमुळे हजारो तरुण ड्रीम सेन्टरमध्ये स्केटिंगसाठी येतात. त्यांच्यापैकी पुष्कळजण ख्रिस्ताचा स्वीकार करतात. स्केटर्सपर्यंत प्रीतीने पोहचण्यास अटकाव करू शकणाऱ्या जुन्या पद्धतींचा त्याग केला. त्यांना गरज समजली आणि ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी मदत केली. आजकालच्या तरुणांना - किंवा कोणालाही - केवळ पवित्र शास्त्र वाचायला आणि प्रार्थना करायला आवेडल असे मला वाटत नाही. लोकांना हसायची, मौजमजेची, साहसाची गरज असते, आणि त्यासाठी त्यांना जगात जावे लागू नये.

पास्टर बार्नेट यांनी सांगितले की, पांढरे झगे घातलेला २०० जणांचा त्यांचा गानवृंद (क्वायर) जेव्हा ''तू किती महान'' हे गीत गात असे तेव्हा किशोरवयीन मुले झोपत

असत. पुढच्या रविवारी या तरुणांनी आम्ही एखादे गीत गाऊ का असे विचारले तेव्हा त्यांनी परवानगी दिली. पुढच्या रविवारी त्यांनी त्यांचे गीत ऐकले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की या मुलांनी रॉक-एन-रोल गीताचे सुवार्तागीत केले आहे. प्रथम त्यांना वाटले की अरेच्चा, हे मी काय केले? पण त्यांनी पुढे ऐकले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, देवाचे आशीर्वाद या गीतावर आहेत. आपण नाकारलेली अशी एखादी गोष्ट देव निवडतो.

सुवार्तेचा संदेश पवित्र आहे, तो सांगण्याच्या पद्धती नाहीत हे आपण शिकले पाहिजे. आपण जर हे शिकले नाही, तर सध्याच्या पिढी दुरावण्याचा धोका असतो. त्यांना देवाची प्रीती जाणून घ्यायची तीव्र इच्छा असते. त्यांना ती समजण्यास मदत व्हावी म्हणून आपण आपल्या जुन्या पद्धतींचा त्याग करण्यास तयार असले पाहिजे.

आम्ही आमच्या शिबिरांमध्ये बदल केले तेव्हा नव्याने येऊ इच्छिणाऱ्या लोकांसाठी आम्ही सध्याच्या लोकांना जे हवे त्याचा त्याग केला का? दीर्घकाळ आमच्याबरोबर असलेल्या लोकांवर आम्ही अन्याय केला का? आम्हांला तसे वाटत नाही, कारण आध्यात्मिकरित्या परिपक्व असलेल्या लोकांनी दुसऱ्यांना सत्य समजावे म्हणून त्याग करण्यास तयार असले पाहिजे. मी बदल का करीत आहे हे लोकांना सांगितले तेव्हा त्यांनी आनंद केला. जे योग्य ते करायची लोकांची इच्छा असते, फक्त त्यांना ते समजले पाहिजे. अर्थात बदलाला विरोध करणारे लोक नेहमीच असतात, पण मग या लोकांची प्रगती होत नाही. ते मागेच राहतात. ते जेथे आहेत तेथेच राहतात. देव त्यांच्यासह किंवा त्यांच्याशिवाय पुढे जातो.

आपण प्रीतीच्या क्रांतीविषयी बोलतो तेव्हा आपण जीवनातील आमूलाग्र बदलाविषयी बोलतो. देवा तू आज आमच्यासाठी काय करणार असे न विचारता आज मी तुझ्यासाठी काय करू शकतो असे रोज देवाला विचारले पाहिजे. प्रीतीच्या क्रांतीमध्ये सहभागी होणाऱ्या सर्वांनी त्याग करण्यास तयार असले पाहिजे, जेणेकरून नवीन आनंद आणता येईल. आपले लक्ष स्वतःवरून दुसऱ्यांवर केंद्रित झाले पाहिजे. आम्हांला काय मिळेल याचा विचार न करता आम्ही काय देऊ शकू असा विचार केला पाहिजे. येशू आपल्या शिष्यांसोबत प्रवास करीत होता तेव्हा त्याने त्याने जीवनाविषयी शिकवले. केवळ सिद्धान्तविषयक प्रश्नांचा उहापोह करणारे नव्हे, तर देवाला संतोष देणारे जीवन रोज कसे जगावे याविषयीचे संदेश आपण पुलपीटवरून ऐकायची गरज आहे. संदेश सर्व वयोगटांसाठी लागू आहेत याची आपण खातरजमा करून घ्यावी.

ख्रिस्ताला तुम्ही दीर्घ काळापासून ओळखत असूनही, त्याची प्रीती अजून तुमच्यामध्ये बंदिस्त आहे का? तसे असेल तर आता धैर्याने तिला बाहेर सोडण्याची

वेळ आली आहे. देवाची प्रीती आपल्यामधून वाहणारे नाले आपण आहोत. देवाने तुमचा रोज उपयोग करावा म्हणून उपलब्ध राहा. तुम्ही रोज ही प्रार्थना करावी : "देवा, आज मी तुझ्यासाठी काय करू शकतो ते मला दाखव."

आम्ही आमची रोज जीवने रोज जिवंत यज्ञ म्हणून देवाला समर्पण करावीत ही देवाची इच्छा आहे (पाहा रोम.१२:१). आमचे सर्व अवयव व साधनसामग्री आपण त्याला अर्पण करावी ही त्याची इच्छा आहे. प्रीतीची क्रांती वेळ, शक्ती, पैसा, आपल्या पद्धती, आणि इतर अनेक गोष्टींचा त्याग मागेल, पण प्रीतीशिवाय जगणे म्हणजे आम्हांला जे जीवन देण्यासाठी येशू मरण पावला त्या जीवनाचा त्याग करणे.

धार्मिकतेच्या चाकोरीतून बाहेर पडा

धर्माच्या चाकोरीतून बाहेर पडून, ज्यांना खऱ्या समस्या आहेत अशा खऱ्या लोकांच्या सहभागितेत यायला तुम्ही तयार आहात का? आपल्यावर कोणीतरी प्रीती करणे ही आनंदाची किल्ली नाही, तर ज्याच्यावर प्रीती करावी असे कोणीतरी असणे ही आहे. जर तुम्हांला खरोखर आनंदी व्हायचे असेल तर ज्याच्यावर प्रीती करावी अशा कोणाचा तरी शोध घ्या. तुम्हांला देवाच्या चेहऱ्यावर स्मित आणायचे असेल तर दुःखी लोक शोधा आणि त्यांना मदत करा.

मी तीस वर्षे ज्या चर्चमध्ये गेले तेथे अनाथ, विधवा, गरीब आणि जाचलेल्यांची काळजी घ्यावी या माझ्या पवित्र शास्त्रीय जबाबदारीविषयी मला एकही संदेश ऐकायला मिळाला नाही. इतर लोकांना मदत करण्यावर पवित्र शास्त्र किती जोर देते हे समजल्यावर मी आश्चर्यचकित झाले. देव मला कशी मदत करील याविषयीच पवित्र शास्त्र सांगते असे तोपर्यंतच्या माझ्या ख्रिस्ती जीवनात मला वाटत होते. त्यामुळे मी दुःखी होते यात काहीच आश्चर्य नाही.

आफ्रिकेतील इथिओपिया, रवांडा आणि युगांडाला भेट देण्यासाठी मी सध्या तयारी करीत आहे. दुसरीकडे कोठेही पाहायला मिळाली नाही अशी मोठी गरज मला तेथे पाहायला मिळेल हे मला माहीत आहे, आणि मी द्यायला तयार व उत्सुक आहे. या दौऱ्यात वेळ, शक्ती, सुखसुविधा आणि पैसा यांचा त्याग करावे लागेल, पण मला गेले पाहिजे. दुःखी, जाचलेल्या लोकांना भेटले पाहिजे. गरीबी आणि उपासमार मी जवळून पाहिली पाहिजे, जेणेकरून घरी आल्यावर मी ती कधीही विसरणार नाही.

उपासमारीने अशक्त, रोगी झालेली बालके मी उचलून घेईन, आपल्या मुलांसाठी काही न करता आल्यामुळे ती मरताना पाहणाऱ्या आयांच्या डोळ्यांतील दुःख मी

पाहीन. पण त्यांच्यापैकी काहीजणींना मी मदत करीन. कदाचित त्या सर्वांना मी मदत करू शकणार नाही, पण मला जे शक्य ते मी करीन, कारण मी काहीही करण्यास नकार देणार नाही. आमचे मित्र आणि सहयोगी संस्था या कार्यात कशा प्रकारे सहभागी होऊ शकतील हे मी आल्यावर सांगू शकेन.

लोकांना मदत करायची इच्छा असते, पण काय करावे ते त्यांना समजत नाही. त्यांच्यासाठी कुणीतरी व्यवस्थापन करावे अशी त्यांची इच्छा असते. तुमच्यामध्ये नेतृत्वाची कौशल्ये आहेत का? जर असतील तर तुमच्या शहरांत गरीबांच्या मदतीसाठी तुम्ही कार्यक्रम आयोजित करू शकता, किंवा जगभरातील गरीब आणि हरवलेल्या लोकांमध्ये कार्य करणाऱ्या मिशनसंस्थांना आर्थिक मदत देण्यासाठी तुम्ही तुमच्या मित्रांना सहभागी करू शकता. मदत करण्याचा निश्चय केलेल्या महिलांच्या एका गटाने आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून सामान गोळा केले. त्याचा मोठा गॅरेज सेल लावला आणि आलेले सर्व पैसे गरीबांच्या मदतीसाठी दिले. त्यांना इतके यश आले की त्या नेहमी तसे करू लागल्या. आता त्यांचे स्वतःचे दुकान आहे. स्वयंसेविका ते चालवतात. विक्रीतून आलेले सर्व पैसे मिशनकार्याला दिले जातात. एका वर्षात ते ६५,००० डॉलर्स देऊ शकले. (या गटातील सर्व स्त्रिया ६५ वर्षांपेक्षा मोठ्या आहेत, आणि इतके मोलवान आणि सर्जनशील करण्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. त्यांची उरलेली आयुष्ये अधिक फलदायी करण्याचा निश्चय त्यांनी केला आहे.)

कोणाला तरी मदत करण्याचा निश्चय करा. सर्जनशील व्हा! चर्चमध्ये बसून केवळ गाणी गाऊ नका. दुःखीकष्टी लोकांना मदत करायच्या कामात सहभागी व्हा. येशूचे शब्द लक्षात ठेवा.

> ''कारण मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खायला दिले नाही, तान्हेला होतो तेव्हा मला प्यायला पाणी दिले नाही,
>
> परका होतो तेव्हा मला घरात घेतले नाही; उघडा होतो तेव्हा मला वस्त्र दिले नाही, आजारी व बंदिशाळेत होतो तेव्हा माझ्या भेटीला आला नाहीत.
>
> त्या वेळेस हेही त्याला उत्तर देतील, प्रभुजी, आम्ही केव्हा तुम्हांला भुकेले, तान्हेले, परके, उघडे, आजारी किंवा बंदिशाळेत पाहिले आणि तुमची सेवा केली नाही?
>
> तेव्हा तो त्यांस उत्तर देईल, मी तुम्हांला खचित सांगतो की, ज्याअर्थी ह्या कनिष्ठांपैकी एकालाही केले नाही, त्याअर्थी ते मला केले नाही.''
>
> *मत्तय. २५:४२-४५*

आमचा विश्वासनामा

मी सबबी सांगणे सोडून देऊन **अनुकंपित होतो.**
अन्यायाविरुद्ध **उभे राहतो.**
देवाच्या प्रीतीने युक्त होऊन वागण्यास **कटिबद्ध होतो.**
काहीही न करण्यास **मी नकार देतो.** हा माझा निश्चय आहे.
मी प्रीतीची क्रांती आहे.

लेखिकेविषयी

जॉयस मेयर ह्या जगातील उत्कृष्ट आणि प्रॅक्टिकल पवित्र शास्त्र शिक्षिका आहेत. न्यू यॉर्कट टाईम्सच्या सर्वोत्कृष्ट खपाच्या यादीत त्या क्र. १ च्या लेखिका आहेत. ऐंशीपेक्षा अधिक प्रेरणादायी पुस्तकांच्या त्या लेखिका आहेत. त्यात नेव्हर गिव्ह अप, दे सिक्रेट ऑफ हॅपिनेस, १०० वेज टू सिम्प्लिफाय युअर लाईफ, आणि बॅटलफिल्ड ऑफ द माईंड (मनाची युद्धभूमी) या पुस्तकांचा समावेश आहे. त्यांनी पेनी आणि इतर अनेक कथाही लिहिल्या आहेत. पवित्र शास्त्र शिक्षणाच्या त्यांनी हजारो कॅसेट्स आणि सीडीज प्रकाशित केल्या आहेत. एंजॉइंग एव्हरी डे लाईफ हा त्यांचा रेडिओ आणि टीव्ही कार्यक्रम जगभरात प्रक्षेपित होत असतो. शिबिरे घेण्यासाठी त्या जगभर प्रवास करीत असतात. जॉयस आणि त्यांचे पती डेव्ह यांचा चार मोठी मुले असून ते सेन्ट लुईस, मिसुरी येथे राहतात.

तारणाची प्रार्थना

देव तुमच्यावर प्रीती करतो आणि त्याला तुमच्यासोबत वैयक्तिक नातेसंबंध हवे आहेत. तुम्ही जर येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारले नसेल, तर आताच तुम्ही त्याचा स्वीकार करू शकता. त्याच्यासाठी तुमचे अंतःकरण उघडा आणि ही प्रार्थना म्हणा...

"पित्या, मी तुझ्याविरुद्ध पाप केले आहे याची मला जाणीव आहे. कृपा करून मला क्षमा करा. मला शुद्ध कर. तुझा पुत्र येशू ह्याच्यावर विश्वास ठेवण्याचे वचन मी देतो. तो माझ्यासाठी मरण पावला - तो वधस्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने माझे पाप स्वतःवर घेतले असा माझा विश्वास आहे. तो मेलेल्यांतून उठला असा माझा विश्वास आहे. आता ह्या क्षणी मी माझे जीवन येशूला समर्पण करतो.

पित्या, पापक्षमेची आणि सार्वकालिक जीवनाची देणगी तू मला दिलीस म्हणून मी तुझा/तुझी आभारी आहे. तुझ्यासाठी जगण्यासाठी कृपा करून मला मदत कर. येशूच्या नावात, आमेन."

तुम्ही मनापासून ही प्रार्थना केली म्हणून देवाने तुमचा स्वीकार केला आहे, तुम्हांला शुद्ध केले आहे, आणि आध्यात्मिक मरणाच्या बंधनातून तुम्हांला मुक्त केले आहे. पुढील शास्त्रभाग वाचून त्यावर मनन करण्यासाठी वेळ काढा आणि तुमच्या नवीन जीवनात तुम्ही देवाबरोबर वाटचाल करत असताना त्याने तुमच्याशी बोलावे म्हणून त्याला विनंती करा.

- योहान. 3:16
- 1 करिंथ. 15:3-4
- इफिस. 1:4
- इफिस. 2:8-9

- 1 योहान. 1:9
- 1 योहान. 4:14-15
- 1 योहान. 5:1
- 1 योहान. 5:12-13

ख्रिस्तासोबतच्या नातेसंबंधात तुमची वाढ होण्यासाठी तुम्हांला उत्तेजन मिळावे म्हणून पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्या चांगली मंडळी (चर्च) तुम्हांला मिळावी म्हणून प्रार्थना करा. देव नेहमी तुमच्यासोबत असेल. तो रोज तुम्हांला मार्गदर्शन करील आणि तुमच्यासाठी त्याच्याकडे असलेले विपुल जीवन कसे जगावे हे तो तुम्हांला दाखवील!

Other Books By Joyce Meyer

Books Available In English:

- A Celebration of Simplicity
- Approval Addiction
- Battlefield of the Mind - KIDS
- Battlefield of the Mind - TEENS
- Battlefield of The Mind - Devotional
- Be Anxious for Nothing
- Be Healed in Jesus Name
- Beauty for Ashes
- Do it Afraid
- Don't Dread
- Eat and Stay Thin
- Enjoy where you are on the way….
- Expect a move of God Suddenly
- Filled with the Holy Spirit
- Healing the Brokenhearted
- Help Me! I'm Married
- Help Me, I'm Afraid
- How to Succeed at Being Your Self
- I Dare you
- If not for the Grace of God
- In Pursuit of PEACE
- Knowing God Intimately
- Life in the Word - Devotional
- Life in the Word - Journal
- Life in the Word - Quotes
- Look Great Feel Great
- Managing Your Emotions
- Me and My Big Mouth
- Never Lose Heart
- Nuggets of Life
- PEACE
- The Penny
- Power of Simple Prayer
- Prepare to Prosper
- Reduce Me To Love
- Secrets to Exceptional Living
- Seven Things That Steal Your Joy
- Teenagers are People Too
- Tell them I Love Them
- The Confident Woman
- The Every Day Life BIBLE
- The Joy of Believing Prayer
- The Secret to True Happiness
- When God When
- Why God Why
- Woman to Woman

Books Available In Marathi:

- Battlefield of the Mind
- Beauty for Ashes
- Reduce Me To Love
- The Battle Belongs to The Lord

To contact the author in the United States, please write:

Joyce Meyer Ministries
P.O. Box 655,
Fenton, Missouri 63026
or call: (636) 349-0303
or log on to: www.joycemeyer.org

To contact the author in India, please write:

Joyce Meyer Ministries
Nanakramguda,
Hyderabad - 500 008
or call: 2300 6777
or log on to: www.jmmindia.org